
# फाल्गुनीची लूट



म. ग्रं. सं. ठाणे
विषय कादं
सं. क्र. १
REFBK-0010868

**ना. सी. फडके**

अनुक्रम २६६००
विभाग निबंध
क्रमांक १२८
नों. दि. १८/१२/६०.

उत्कृष्ट आणि गाजलेल्या इंग्रजी नाटक आणि
कादंबऱ्यांची कथानकें व त्यावरील
लालित्यपूर्ण अशीं परीक्षणें

# कस्तुरीची लूट

लेखक
ना. सी. फडके

दा. क्र.

REFBK-0010868

किंमत चार रुपये

प्र का श क :
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार
१८६, शनवार, पुणें २

* *

© ना. सी. फडके

* *

बलिप्रतिपदा १८८२

* *

प्रथमावृत्ति :
२१ ऑक्टोबर १९६०

* *

मुद्रक :
ज. ग. जोशी
जनार्दन प्रेस
२९४ सदाशिव, पुणें २

...... उत्कृष्ट निवेदनशैली हा प्रा. फडके
यांचा अत्यंत आल्हादकारक विषय आहे.
" मनोहरची आकाशवाणी " आणि
" वेचलेले मोती " वाचकांना सुपरिचित
आहेतच. त्याच धर्तीवर आतां ही
" कस्तुरीची लूट " आहे. ........

‘ नथिंग् सो स्ट्रेंज ’ ... १

‘ अरायव्हल अँण्ड डिपार्चर ’ ... २३

चित्रकलेंतील नग्नता ! ... ४७

‘ स्वैरिणी ’ ... ५२

‘ तीं तीं पदें नित्य फिरूनि येती ! ’ ... ८०

‘ बेगुन्हा ’ ... १०१

एका जगविख्यात नटीची गृहिणीची भूमिका ... १२७

ग्रं. क्र. 70८६६

# 'नथिंग् सो स्ट्रेंज'

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## जेम्स हिल्टन

महायुद्ध संपलें कीं त्याविषयींच्या साहित्याला भरती यावयाची हा नियम ठरलेला आहे. पहिल्या महायुद्धानंतर त्याबद्दल इंग्रज आणि अमेरिकन लेखकांनीं इतकीं पुस्तकें लिहिलीं कीं, अमेरिकेमध्यें 'कॉंग्रेस'चें जें प्रचंड ग्रंथालय आहे त्यांत या पुस्तकांचा एक स्वतंत्र वर्ग करण्यांत आला. दुसऱ्या महायुद्धानंतर तर अशा प्रकारचें युद्ध-वाङ्मय इतक्या प्रचंड प्रमाणावर लिहिलें गेलें, कीं तीं सारीं पुस्तकें एकत्र करायचीं म्हटलें तर एक स्वतंत्र ग्रंथालयच स्थापण्याची वेळ यावी. प्रत्यक्ष युद्ध जेव्हां चालू असतें तेव्हां स्वतंत्र लोकशाहीच्या देशांतसुद्धां 'आळी मिळी गूप चिळी'चा कायदा जारी असतो. लेखकांच्या तोंडाला कुलूप घातलेलें असतें. युद्धप्रयत्नांत ज्यामुळें कसूर निर्माण होईल असें कांहीं लिहिणाऱ्या लेखकाला तर तुरुंगाची हवाच खावी लागते. परंतु युद्ध संपलें, कीं हें कायद्याचें बंधन दूर होतें, आणि सांगण्यासारख्या जेवढ्या गोष्टी सांचलेल्या असतील तेवढ्या सगळ्या सांगण्याची एक प्रकारची शर्यतच सुरू होते. बांध घालून अडवून ठेवलेला लोंढा सुटावा त्याप्रमाणें युद्धाच्या गोष्टींनीं भरलेल्या पुस्तकांची दुकानांतल्या दर्शनी खिडक्यांतून गर्दी उसळते. बसची वाट पहात क्यूमध्यें उभ्या राहिलेल्या माणसांप्रमाणें हीं पुस्तकें एकमेकाला कोपरानें ढकलीत उभीं असतात, आणि 'आधीं माझं म्हणणं ऐका' 'आधीं मला उचला अन् वाचून काढा' असेंच जणूं पुस्तक षोकीनांना म्हणत असतात. दाटीनें उभें राहून आपापला नंबर लावूं पाहणाऱ्या या पुस्तकांत नाना प्रकार असतात. ज्यांनीं महायुद्ध प्रत्यक्ष लढविलें अशा विन्स्टन चर्चिल सारख्या मुत्सद्यांच्या 'युद्ध विषयक आठवणी' त्यांत असतात, ज्यानें केवळ स्वतःच्या समाधानासाठीं रणांगणावरच्या विविध अनुभवांची नोंद करून ठेवली अशा स्टीफन हॉवर्ड-सारख्या सामान्य शिपायांचे अनुभव असतात, कसलेल्या लेखकांनीं लिहि-

लेल्या कादंबऱ्याहि असतात. जेम्स हिल्टन यांची ' नथिंग् सो स्ट्रेंजें ' ही कादंबरी अशा गर्दींत मला दिसल्याबरोबर मीं उचलून घेतली, आणि घरीं आल्यावर मोठ्या उत्सुकतेनें वाचून काढली. ज्यांचें नवें पुस्तक वाचलें नाहीं तर आपल्या वाचनाचा अद्यावत्पणा कमी ठरेल असें वाटावें अशा लेखकांत जेम्स हिल्टन यांची गणना मी करतों. ' वुइ आर नॉट अलोन ' ही त्यांची कादंबरी माझ्या स्मरणांत अजून आहे. तिच्यावर " मनोहरची आकाशवाणी " मध्यें मीं केलेलें रसग्रहणात्मक विस्तृत भाषण तुमच्या स्मरणांत अजून असेल असें वाटतें. तशाच तऱ्हेचें भाषण हिल्टनच्या या नव्या कादंबरीवर करण्याचें मी योजिलें आहे.

हिल्टनच्या कादंबरी-लेखनाची एक विशिष्ट खुबी आहे. कथानकाच्या निरनिराळ्या दुव्यांचा मूळचा क्रम बदलून ते दुवे आगेमागें सरकवून दाखविण्याची एक विवक्षित पद्धत ते पसंत करतात. या युक्तीमुळें वाचकांची उत्कंठा जागृत करण्याचा गुण त्यांच्या कादंबरींत सहजासहजीं येतो. ' वुइ आर नॉट अलोन ' ही कादंबरी, त्यांनीं याच पद्धतीनें लिहिली; आणि ' नथिंग सो स्ट्रेंज ' या कादंबरींतहि निवेदनाच्या या युक्तीचा अवलंब त्यांनीं केला आहे ' वुइ आर नॉट अलोन ' चें कथानक मुळांतच थोडेंसें रहस्यमय होतें. त्यांतल्या मुख्य पात्रांचे स्वभाव-विशेष असे होते, कीं अरे, यांचीं चरित्रें कशीं कशीं घडलीं तें पाहिलेंच पाहिजे, अशी उत्सुकता वाचकाला वाटण्यासारखी होती. प्रीतीची उत्कटता, विफलता, कारुण्य यांचे गडद रंग नायिकेच्या चित्रांत होते, व त्यामुळें तिच्याविषयीं अनिवार सहानुभूति वाटण्यासारखी होती. हिल्टनच्या या नव्या कादंबरींत या गोष्टींचा जवळजवळ अभाव आहे. कथानकांत कल्पकता फार थोड्या प्रमाणांत आहे. आणि वाचणाऱ्याच्या भावना ज्यामुळें उसळून येतील अशा प्रसंगाचें प्रमाण अगदीं अल्प आहे. सारांश, 'नथिंग सो स्ट्रेंज' या कादंबरीची गोष्ट नरम आहे, आणि ती थोडक्यांत सांगितली तर तुम्हांला कदाचित असें वाटेल, यांत तीनशें पानांची कादंबरी लिहिण्यासारखें काय आहे ? तुम्हांला असें वाटतें का पहा.

मार्क ब्रॅडले नांवाचा चोवीस वर्षांचा एक अमेरिकन तरुण १९३६ सालीं लंडन युनिव्हर्सिटींत विज्ञान शास्त्र आणि गणित यांचा अभ्यास करीत

होता. जेन वेरिंग नांवाची विशेष सधन कुटुंबांतील एक अमेरिकन तरुण मुलगीहि त्या युनिव्हर्सिटींत इतिहासाचा अभ्यास करीत होती. तिचें वय त्या वेळेस अठरा वर्षांचें होतें. या दोघांची प्रसंगोपात ओळख झाली व ती वाढत गेली. पण हा परस्पर परिचय वाढतो न वाढतो तोंच फ्राम नांवाच्या एका विख्यात शास्त्रज्ञाच्या हाताखालीं संशोधन करायला म्हणून ब्रॅडले व्हिएन्नाला गेला, व त्यांच्या गांठीभेटी संपुष्टांत आल्या. पुढें जेन परीक्षेंत नापास झाली. तिनें लंडन सोडलें आणि वृत्तपत्रांत लेख लिहिण्याचा उद्योग ती करूं लागली. या उद्योगाच्या निमित्तानें ती १९३८ सालीं हिंडतां हिंडतां व्हिएन्नाला आली, आणि तिची ब्रॅडलेशीं पुन्हां गांठ पडली. या वेळेस तो आपल्या संशोधनाच्या कामांत अगदीं मग्न झाल्याचें तिला आढळून आलें. कांहीं दिवसांनीं ती पुन्हां व्हिएन्नाला आली तेव्हां पॉली नांवाच्या ज्यू मुलीशीं त्यानें लग्न केलेलें होतें. अर्थात् जेन आणि ब्रॅडले यांचें प्रेम जडण्याचा संभवच आतां राहिला नव्हता. हिटलर झपाट्यानें सत्तारूढ होत होता. नात्सींची राजवट सुरू झाली होती, महायुद्ध जवळ येत होतें. ॲटम बॉंब शोधून काढण्याच्या कामाला जर्मनींतले बडेबडे शास्त्रज्ञ जुंपले गेले होते. फ्राम त्यांपैकींच एक होता. ब्रॅडलेनें केलेलें एक संशोधन त्यानें खुशाल आपल्या नांवावर दडपून प्रसिद्ध केलें. ब्रॅडलेला जी कीर्ति मिळायची ती त्यानें लाटली. ब्रॅडलेला स्वतःला त्या गोष्टीचें कांहीं वाटलें नाहीं. पण पॉली भयंकर चिडली. फ्रामचा खोटेपणा उघडकीस आणून त्याची छीथू ब्रॅडलेनें केली पाहिजे असें ती म्हणूं लागली. तो कांहीं तिचें ऐकेना. त्याचें मन वळविण्यासाठीं तिनें जेनला मुद्दाम बोलावून घेतलें. परंतु तरीदेखील फ्राम-वर विश्वासघाताची फिर्याद करायला तो तयार होईना. शेवटीं फ्रामचें पारिपत्य करण्याचा पॉलीनें एक निराळाच मार्ग काढला. ती फ्रामच्या प्रयोगशाळेंत गेली. तिथें त्याची निर्भर्त्सना करून तिनें त्याला भोंसकून ठार करण्याचा प्रयत्न केला. पण तो साधला नाहीं. उलट पॉली मात्र तुरुंगांत गेली आणि पुढें मेली. या सुमारास महायुद्धाला जवळजवळ तोंड लागलें. आणि जर्मनींत राहणें सुरक्षित नाहीं असें पाहून जेन जर्मनी सोडून निघून गेली. नंतर जवळजवळ सहा वर्षें जेन आणि ब्रॅड यांची गांठभेट झाली नाहीं. जेन जगभर प्रवास करीत राहिली, वृत्तपत्रीय लेखिका म्हणून तिचा

लौकिक चांगलाच वाढला, तिचें युद्धविषयक लेख आणि प्रवासवर्णनें अव्वल दर्जाच्या अमेरिकन नियतकालिकांत प्रसिद्ध होऊं लागलीं. ती कदाचित् अमेरिकेबाहेर अशीच हिंडत राहिली असती. परंतु 'ग्रेट सर्कल' नांवाचें तिचं पुस्तक फारच लोकप्रिय झालें, हॉलिवुडच्या एका कंपनीनें त्या पुस्तकाच्या आधारानें एक चित्रपट तयार करण्याचें ठरविलें, आणि चर्चेसाठीं तिला बोलावून घेतलें. हॉलिवुडला आल्यावर थोड्याच दिवसांनीं तिला कळलें, कीं 'टेक्सस' मधील एका हॉस्पिटलमध्यें ब्रॅड आहे. त्याला कोणतेंहि दुखणें झालेलें नव्हतें. पण तो मनानें अगदीं दुबळा झाला होता. कशाची तरी भीति त्यानें घेतली होती, आपल्यावर कोणीतरी टेहळणी करीत आहे अशा शंकेनें तो सारे व्यवहार करीत होता, आणि मनाच्या या व्यथेमुळें त्याची प्रकृति ढांसळली होती. यासाठीं मानसोपचार करणाऱ्या एका तज्ज्ञ डॉक्टराच्या देखरेखीखालीं सरकारनें त्याला ठेवलें होतें. फ्रामच्या हाताखालीं ॲटम बॉंबच्या संशोधनाचें काम त्यानें कित्येक वर्षें केल्याचें अमेरिकन सरकारला माहीत होतें, व त्याचा सारा खरा पूर्वेतिहास कळून घेण्याची आणि संशोधनाबद्दल त्याला जी माहिती होती ती काढून घ्यायची अमेरिकन सरकारची इच्छा होती. त्यासाठींच 'टेक्सस' मधील या इस्पितळांत त्याची व्यवस्था करण्यांत आली होती. जेन वेअरिंगवर त्याचा विशेष लोभ असल्याचें सरकारी अधिकाऱ्यांना कळल्यावर त्याचा सारा इतिहास त्याच्याकडून काढून घेण्याची, व पर्यायानें त्याला बरा करण्याची कामगिरी त्यांनीं जेनवर सोपविली. त्यांनीं मुळीं ब्रॅडला हॉस्पिटलमधून काढून तिच्याकडेच आणून ठेवलें. तिच्या सहवासांत तो अधिक मोकळेपणीं वागूं लागला. मधला सहा वर्षांचा सारा वृत्तान्त त्यानें तिला हलके हलके सांगितला. देशद्रोहाचें कांहींतरी कृत्य त्यानें केलें असलें पाहिजे ही सरकारी अधिकाऱ्यांची समजूत खोटी ठरली. कोणतीहि गोष्ट लपवून न ठेवतां जेनला सारें सांगायचें ब्रॅडनें कबूल केलें तें मुख्यतः मानसमंथनाचा (सायको-ॲनॉलिसिसचा) एक उपचाराचा प्रयोग म्हणून. परंतु ही गोष्ट करतांकरतां जेनविषयीं त्याच्या अंतःकरणांत जी प्रीति होती तीहि आपोआप उघड झाली. तिनेंहि मनांतल्या मनांत नेहमीं त्याच्यावर प्रेम केलें होतें. याप्रमाणें दोघांनाहि जो मजकूर कळायला हवा तो कळला ! अर्थात् गोष्ट संपली.

' ' नथिंग सो स्ट्रेंज ' या कादंबरीचें कथानक नरम आहे असें जें मी म्हटलें तें आतां तुम्हांला पटेल. या गोष्टींत रहस्याचा थोडासा भाग आहे. ब्रॅडचें मन कशामुळें धास्तावलेलें आहे, असें कोणचें कृत्य त्याच्या हातून घडलें आहे कीं तें कुणाला कळतां कामा नये असें त्याला वाटतें, व ज्याची त्याची त्यालाच खंत वाटते, याबद्दलची तीव्र जिज्ञासा अमेरिकन अधिकाऱ्यांच्या ठिकाणीं व नायिका जेन हिच्याहि ठिकाणीं लेखकानें ठेवलेली आहे, आणि या त्यांच्या जिज्ञासेच्या संसर्गानें वाचक देखील उत्कंठेनें कादंबरी वाचतील अशी त्याची अपेक्षा आहे. ही अपेक्षा थोडीशी खरी ठरते. तथापि गोष्टींतला रहस्याचा हा पीळ कांहीं फारसा जोरकस नाहीं. ब्रॅडलेच्या हातून युद्धकालांत जें कांहीं घडलें असेल, त्याबद्दलचें रहस्य कांहीं अशा स्वरूपाचें नाहीं कीं वाचकानें म्हणावें, आतां हा रहस्याचा ताण आम्हांला सहन होत नाहीं, काय झालें तें सांगा बुवा. कादंबरीच्या अखेरच्या भागांत ब्रॅडनें युद्धकालांतल्या आपल्या भ्रमंतीचे तपशील जेनला धीरेधीरे सांगितले आहेत. पण या प्रदीर्घ आणि कांहींशा कंटाळवाण्या आत्मविश्लेषणांतून विशेष महत्त्वाची एकच गोष्ट निष्पन्न होते. पॉलीच्या मृत्यूला फ्राम कारण झाला हें कळल्यावर त्याचा खून करायचें ब्रॅडनें ठरविलें. पण अखेर खून करण्याऐवजीं फक्त अॅटम बॉंबच्या संशोधनांतल्या एका महत्वाच्या गणितांतल्या आंकड्यांची मुद्दाम गल्लत करून तो कागद त्यानें फ्रामच्या हातीं दिला. यामुळें अॅटम बॉंबचें खरें गणित जर्मनीला त्या वेळेस कळलें असतें तें कळलें नाहीं. म्हणजे फ्रामनें ब्रॅडचा जो वैयक्तिक घात केला होता त्याबद्दल फ्रामला ठार करून वैयक्तिक सूड घेण्याऐवजीं ब्रॅडलेनें हिटलरच्या राक्षसी सत्तेचे हात अॅटम बॉंबपर्यंत पोंचूं दिले नाहींत आणि स्वतःच्या सूडाच्या कृत्याला एक प्रकारचें राष्ट्रीय स्वरूप दिलें. जी गोष्ट ब्रॅड मनांतल्या मनांत लपवूं पहात होता ती गोष्ट म्हणजे त्यानें केलेला फ्रामचा हा विश्वासघात. गोष्टींत रहस्य खेळविलें आहे तें फक्त एवढेंच. ब्रॅडला मनापासून हिटलर आणि नात्सीवाद यांबद्दल तिटकारा होता. पण फ्रामच्या हाताखालीं त्याच्या अत्यंत विश्वासांतला एक मदतगार म्हणून त्यानें कित्येक वर्षें काम केलें असल्यामुळें अमेरिकन सरकार त्याच्या बाबतींत सतत संशयानें वागतें. आपल्याबद्दलचे सारे संशय फिटावे यासाठीं काय करावें तें ब्रॅडला कळत

नाहीं. फ्रामच्या हातीं खोटें गणित देऊन त्यानें खरें म्हणजे आपल्या राष्ट्राची मोठी सेवा केलेली असते. पण ती गोष्ट त्याला स्वच्छ सांगतां येत नाहीं. ती सिद्ध करणें तर बाजूलाच राहिलें. ब्रॅडच्या मनाची ही विचित्र अवस्था कौशल्यानें चित्रित करून विश्वासघाताच्या मुद्याला कादंबरीकारानें ठळकपणा आणला आहे खरा. तथापि ज्यामुळें वाचकांना उत्कंठेचा ताण असह्य वाटेल अशा रहस्याचें स्वरूप कांहीं या विश्वासघाताला येऊं शकत नाहीं. या रहस्याचा खरा संबंध कथानकाशीं नसून ब्रॅडच्या स्वभावाशीं आहे. विश्वासघाताच्या या रहस्यावर कथानकांतील महत्त्वाचे दुवे आधारलेले नाहींत; फक्त ब्रॅडच्या मनांतली गुंतागुंत व त्या गुंतागुंतीमुळें त्याला जडलेला भीतीचा आणि शंकेचा रोग एवढ्याशींच त्या विश्वासघाताचा संबंध आहे. म्हणून मी म्हणतों, कीं हिल्टनच्या या कादंबरींत रहस्याचा खेळ आहे, पण तो भडक नाहीं.

या कादंबरीची गोष्ट ज्याप्रमाणें नरम आहे त्याप्रमाणें पात्रेंहि नरम आहेत. ज्या कृत्यांचीं वर्णनें वाचतांना माणसाच्या भावना उचंबळून याव्यात अशीं कृत्यें तीं करीत नाहींत. पॉलीनें फ्रामवर केलेल्या प्राणघातक हल्ल्याचा एक प्रसंग सोडला तर विशेष उत्कट असा एकहि प्रसंग त्या पात्रांच्या वागण्यांत निर्माण होत नाहीं. ब्रॅड आणि जेन यांच्या परस्पर प्रेमाला देखील भडक रंग कुठेंच आलेला नाहीं. कथानकाची एकंदर प्रकृति जशी नरम आहे त्याचप्रमाणें पात्रांच्या स्वभावविशेषांतहि वाचकांनीं मिटक्या मारीत चाखावा असा खारटतुरटपणा नाहीं. किंबहुना पात्रांच्या स्वभावांत उत्कटता नाहीं. त्यामुळेंच प्रसंगांची उत्कटता नाहीं किंवा प्रसंगांत नाहीं म्हणून पात्रांत दिसत नाहीं असें वाटलें तर म्हणा. कारण प्रसंग आणि स्वभाव एकमेकांतून निर्माण होतात. मुद्याची गोष्ट ही कीं ‘ नथिंग सो स्ट्रेंज ’ या कादंबरींत कथानकाचीहि उत्कटता नाहीं, आणि स्वभाव-चित्रणाचीहि नाहीं. या कादंबरींतल्या घटनांचे व स्वभाव-चित्रणांचे रंग फिके आहेत.

आणि तरी ही कादंबरी एका कुशल कलावंतानें लिहिली आहे असा ठसा वाचणाऱ्याच्या मनावर राहतो; आणि त्या पुस्तकाची शिफारस करतांना तो ठसा कोणत्या कारणानें राहतो तेंच मला सांगायचें आहे.

कथानक मी तुम्हांला सांगितलें आहे. हें कथानक तुम्ही कशा रीतीनें

सांगाल, याचा विचार करा; आणि तो केल्यावर जेम्स हिल्टननें त्याची मांडणी कशी केली आहे तें ऐका. गोष्टींतल्या दुव्यांचा मूळचा क्रम बदलून ते मागेंपुढें सरकविण्याची हिल्टनची एक विशिष्ट पद्धत आहे, व तीच या कादंबरींत वापरलेली आहे असें मी सांगितल्याचें आठवत असेल. एकंदर गोष्ट हिल्टननें आपल्या तोंडानें सांगितलेली नाहीं, नायिका जेन हिच्या तोंडानें सांगितलेली आहे. कथानक १९३६ ते १९४५ म्हणजे नऊ वर्षांचें आहे. हें सांगतांना जेननें कुठें आरंभ केला असेल असें तुम्हांला वाटतें ? ब्रॅडलेची व तिची पहिली भेट झाली त्या भेटीपासून ? छे ! असा साधा आरंभ हिल्टन कधींच करणार नाहीं. मग लंडन युनिव्हर्सिटी सोडून जेन गेली तेथून ? किंवा ती व्हिएन्ना शहरीं ब्रॅडलेला भेटली तेथून ? नाहीं ! मग काय तिची आणि ब्रॅडलेची १९४५ सालीं अमेरिकेंत अकस्मात् गांठ पडली तेथून ? छे; छे ! गोष्टीच्या प्रारंभापासून प्रारंभ करणें जसें हिल्टनला पसंत नाहीं, तसेंच एकदम शेवटचा टप्पा गांठून सारी गोष्ट सिंहावलोकनानें सांगणेंहि हिल्टन पसंत करीत नाहीं. कथानकांतल्या कोणत्या तरी मधल्या टप्प्यापासून आरंभ करायचा, मग पूर्वीच्या हकीकती सांगत सांगत त्या टप्प्यापर्यंत आणून भिडवायच्या आणि तेथून कथासूत्र जें पुढें चालू करायचें तें अखेरपर्यंत नेऊन भिडवायचें–ही हिल्टनची ठरलेली युक्ति आहे; आणि तीच त्यानें या कादंबरींत वापरली आहे. हिच्यांतील नायिका जेन गोष्ट सांगायला आरंभ करते ती १९४५ सालीं, पण टेक्ससच्या इस्पितळांत ब्रॅडले असल्याचें कळतें तेथून नव्हे, तर त्याच्या पुष्कळच अलीकडे. जर्मनीनें ॲटम बॉंब शोधून काढण्याची जी खटपट चालविली होती तिच्याशीं ब्रॅडलेचा कांहींतरी संबंध असला पाहिजे या संशयानें त्याच्या पूर्वेतिहासाचा सारा तपशील उकरून काढूं पाहणाऱ्या अमेरिकन अधिकाऱ्यांना ब्रॅडलेचे आणि जेन वेअरिंगचे जिव्हाळ्याचे संबंध होते हें कळल्यावर तपासणीसाठीं तिला ते कचेरींत बोलावून आणतात, तेथून जेन गोष्ट सांगायला सुरवात करते. "होय, माझी त्याची मैत्री होती. कित्येक वर्षांपूर्वीं. तो इंग्लंडमध्यें होता तेव्हां."–तपासणींतल्या एका प्रश्नाला दिलेल्या या उत्तरापासून तिनें गोष्टीला सुरवात केली आहे. मग सरकारी कचेरींतून परत घरीं आल्यावर सहज खिडकींत उभें राहून बाहे-

रच्या रस्त्याकडे पाहतां पाहतां अशाच प्रकारें खिडकींत उभें राहून लंडन शहरांतल्या रस्त्याकडे १९३६ सालीं तिनें पाहिलें होतें, त्याच्या आठवणी तिला येतात, आणि मग एकंदर गोष्ट जशी घडली तशी ती सांगूं लागते. ती सांगत सांगत तपासणीच्या प्रसंगापर्यंत ती एकंदर कथासूत्र आणून भिडविते; आणि मग तेथून ती हॉलीवुडला कशी गेली, टेक्सस येथील हॉस्पिटलमध्यें ब्रॅड असल्याचें तिला कसें कळलें, तो तिच्याकडे येऊन कसा राहिला, आणि आत्मविश्लेषण करून सारें सांगण्याच्या ओघांत युद्ध-कालांतल्या त्याच्या हकीकती तिला कशा कळल्या तें ती सांगते. कथानकांत उत्कटता कुठेंच नाहीं. पण निवेदनाच्या या युक्तीमुळें कादंबरीला आकर्षकता आली आहे. वाचक पहिल्यापासून अखेरपर्यंत ती उत्कंठेनें वाचील अशी ओढ तिच्यांत उत्पन्न झाली आहे.

निवेदनाच्या या कसबाच्या जोडीला आणखी कांहीं गोष्टी हिल्टननें चतुराईनें योजल्या आहेत, त्या लक्षांत घ्यायला हव्या. कादंबरींत अगदीं प्रमुख पात्रें दोनच : जेन आणि ब्रॅड. पण या दोघांच्या जीवितक्रमावर परिणाम करणारीं आणखीं तीन माणसें आहेत. ब्रॅडनें जिच्याशीं लग्न केलें ती ज्यू मुलगी, पॉली, जेनचा बाप आणि जेनची आई, हीं तीं तीन माणसें होत. जेनच्या आईचें या गोष्टीच्या पहिल्या भागांत विशेष महत्त्व आहे. तें कसें तें आधीं सांगतों.

१९३६ सालीं लंडनच्या युनिव्हर्सिटींत शिकत असतांना जेन फक्त अठरा वर्षांची होती, आणि ब्रॅड चोवीस वर्षांचा होता. अमेरिकन तरुण तरुणी या वयांत एकमेकांच्या प्रेमांत पडत नाहींत तथापि प्रथम भेट झाल्यापासून जेनला तो फार आवडूं लागला. विशेषतः शास्त्रीय संशोनाबद्दलचा त्याचा उत्साह, घरची गरिबी असूनहि विद्याव्यासंग करण्याची त्याची कळकळ, नांवलौकिक मिळविण्याची नव्हे तर संशोधन कार्यांत कांहींतरी विशेष करून दाखविण्याची त्याची महत्त्वाकांक्षा, आणि सामान्य लोक जिला आयुष्यांत ‘ मजा ’ समजतात तिच्याविषयींची अरुचि इत्यादि त्याच्या अंगचे गुण पाहून तरुणांत सामान्यतः जें आढळत नाहीं तें याच्यांत आहे असें तिला वाटूं लागलें. ती त्याच्याकडे आकृष्ट झाली. कदाचित् या आकर्षणाला प्रेमाचें स्वरूप आलेंहि असतें. पण एक चमत्कारिक गोष्ट घडली.

ती ही कीं आपल्या आईचें प्रेम ब्रॅडवर जडलेलें आहे अशी शंका तिला आली; आणि आपल्या आईच्या आणि ब्रॅडच्या परस्परांशीं वागण्याकडे ती जों जों बारकाईनें पाहूं लागली तों तों तिची ही शंका चांगलीच दृढ झाली. तिचा बाप बराच वयस्क होता; पण तिची आई छत्तीस वर्षांची होती. ज्याचें मोठमोठ्या लोकांत वजन आहे अशा एका अत्यंत सधन अमेरिकन माणसाची ती बायको. पैसा आणि स्वातंत्र्य या दोन्ही गोष्टींची तिला कांहीं कमतरता नव्हती. नवऱ्याशीं बेइमानीनें वागणारी ती नव्हती, परंतु इमानाची मर्यादा संभाळून सुंदर तरुण पुरुषांशीं प्रेमाचे चाळे खेळण्याचा तिचा स्वभाव होता. ती ब्रॅडवर अनुरक्त झाली, आणि ब्रॅडहि तिच्या प्रेमांत सांपडला या गोष्टीचें जेनला कांहीं आश्चर्य वाटलें नाहीं. हें प्रेमकरण कुठल्या थराला जाणार तें मात्र तिला कळेना.

परंतु तिला कल्पनाहि नव्हती अशा आकस्मिक रीतीनें हें प्रकरण संपलें. फ्रामच्या हाताखालीं संशोधन करायला म्हणून ब्रॅड व्हिएन्नाला गेला. ब्रॅडसारख्या असामान्य बुद्धीच्या तरुणानें लंडन युनिव्हर्सिटींत आपले दिवस वाया घालवण्यांत कांहीं अर्थ नाहीं, जिथें खरोखरच आंतरराष्ट्रीय महत्त्वाच्या प्रयोगशाळा आहेत अशा एखाद्या युरोपियन संशोधन केंद्रांत एखाद्या नामंकित शास्त्रज्ञाच्या हाताखालीं काम करण्याची संधि त्याला मिळाली पाहिजे असें जेनचा बाप म्हणूं लागला, आणि नुसतें असें म्हणूनच तो थांबला नाहीं. फ्रामच्या हाताखालीं ब्रॅडनें रहावें याबद्दलची सारी व्यवस्थाहि त्यानें लगेच केली. मोठमोठ्या लोकांत त्याच्या शब्दाला मान होता. ब्रॅडच्या शिक्षणाची ही व्यवस्था करणें त्याला अवघड नव्हतें. त्यानें फ्रामला व्हिएन्नाहून बोलावून घेतलें, ब्रॅडची व त्याची मुलाखत घडवून आणली, फ्राम परत व्हिएन्नाला गेला तो ब्रॅडला बरोबर घेऊनच. नाटकांत एखादा अचानक प्रसंग घडावा तसें हें सारें घडलें. मात्र या घटनेमागची एक लहानशी गुप्त गोष्ट इतर कोणाच्या नाहीं पण जेनच्या लक्षांत आली. या गोष्टीचा अर्धा भाग तिनें प्रत्यक्ष पाहिला, बाकीचा अर्धा तिनें तर्कानें ओळखला. ब्रॅडलेला आपल्याबरोबर घेऊन जाण्याची कबुली फ्रामनें दिली व ब्रॅड त्याच्याबरोबर जाणार हें ठरलें, तेव्हां जेनची आई ब्रॅडला एकीकडे भेटली, व फ्रामबरोबर न जाण्याचा बेत त्यानें करावा म्हणून तिनें त्याचें मन वळविलें.

त्याला अखेरचा निरोप देण्यासाठीं जेन त्याच्या खोलीवर गेली, तेव्हां तो म्हणाला, " पण मी जातच नाहीं. मी आपला बेत बदलला आहे. " तें ऐकून तिला आश्चर्य वाटलें, आणि आईनें त्याला राहण्याचा आग्रह केला असला पाहिजे हें तिनें ओळखलें. तिनें तें ब्रॅडच्या लक्षांत येऊं दिलें नाहीं. परंतु फ्रामसारख्या मोठ्या संशोधकाच्या हाताखालीं काम करण्याची दुर्मिळ संधि त्यानें घालवूं नये असें मात्र तिनें त्याला बोलून दाखविलें. दुसऱ्या दिवशीं तिला ब्रॅडचें पत्र आलें, त्यांत त्यानें लिहिलें होतें, " मी आपला बेत पुन्हां बदलला. मी फ्रामबरोबर व्हिएन्नाला जात आहे. " जेनला आनंद झाला, पण आश्चर्यहि वाटलें. त्याच्या त्या बेत बदलण्याची आणि निघून जाण्याची संगति एकाच तर्कानें लावतां येण्यासारखी आहे असें तिला वाटलें. तो तर्क असा; कीं तिच्या आईनें त्याची पुन्हां केव्हां तरी एकांतांत गांठ घेतली असली पाहिजे, व त्यांचें भांडण झालें असलें पाहिजे. जेनच्या आईला ब्रॅड व्हिएन्नाला जायला नको होता तो एवढ्याचसाठीं, कीं त्याच्याशीं प्रेमाचा खेळ केवळ गमतीखातर करायला मिळावा. एका प्रतिष्ठित सधन पुरुषाची बायको, आणि अठरा वर्षांच्या मुलीची आई, या दोन नात्यांच्या जबाबदारीला बाध येऊं न देतां ब्रॅडशीं प्रेमाचा खेळ तिला करायचा होता. तिच्या मर्जींतला तिचा एक चहाता आणि प्रेमिक अशी भूमिका पत्करून त्यानें रहावें अशी तिची इच्छा होती. ब्रॅडला हें रुचलें नसावें. त्यानें तिच्याजवळ हट्ट धरला असावा, कीं हें अर्धवट आणि चोरटें प्रेम पुरें झालें. दोघे मिळून पळून जाऊं या असा देखील हट्ट त्यानें कदाचित् धरला असावा. त्याच्या या म्हणण्याला तिनें रुकार दिला नसावा. आणि अशा प्रकारें प्रेमाची निराशा झाल्यावर ब्रॅडनें फ्रामबरोबर व्हिएन्नाला जाण्याचें ठरविलें असावें. आपल्या आईचें आणि ब्रॅडचें नक्की नातें काय होतें तें जेनला कधींच कळलें नाहीं. पण ब्रॅडनें एकदां फ्रामबरोबर जाण्याचा बेत रद्द केला आणि पुन्हां मन पालटून तो अखेर गेला, या दोन्ही चमत्कारांची संगति मात्र तिला लावतां आली होती ती तिची आई आणि ब्रॅड यांच्यांतील प्रेम जमेला धरूनच.

ब्रॅडचें व्हिएन्नाला जाणें प्रत्यक्ष घडलें त्या वेळेस त्या प्रकारांतील तिच्या बापाच्या भूमिकेबद्दल जेनची एवढीच कल्पना झाली होती, कीं केवळ ब्रॅडच्या हुशारीवर तो खूष झाला होता व त्याचें जन्माचें कल्याण व्हावें

म्हणून त्याला फ्रामकडे व्हिएन्नाला पाठविण्याची व्यवस्था त्यानें केली होती. पण दोन वर्षांनंतर ती ब्रॅडला व्हिएन्ना शहरीं भेटली तेव्हां, आणि हॉलीवुडमध्यें त्याची तिची १९४५ सालीं गांठ पडली तेव्हां त्याच्याकडून कांहीं नवीन गोष्टी तिला कळल्या, व त्यांवरून ब्रॅडनें फ्रामच्या हाताखालीं काम करावें याबद्दल तिच्या बापानें जी अमर्याद उत्सुकता दाखवली होती तिची निराळीच संगति तिच्या लक्षांत आली. केवळ परोपकार बुद्धीनें व जगाच्या शास्त्रीय ज्ञानांत ब्रॅडकडून भर पडावी या निर्मळ हेतूनें तिच्या बापानें ब्रॅडला फ्रामकडे पाठविलें नव्हतें. ब्रॅडचा व आपल्या बायकोचा सहवास असाच वाढत गेला तर कांहींतरी भलते प्रकार होतील हें त्यानें ओळखलें होतें. स्वतःकडे किंचित्हि वाईटपणा न घेतां, इतकेंच नव्हे, तर ब्रॅडचें जन्माचें कल्याण करण्याचें श्रेय मिळवून त्याची लंडनहून उचलबांगडी करण्याची व त्याची आणि आपल्या बायकोची ताटातूट करण्याची एक नामी युक्ति म्हणूनच ब्रॅडला व्हिएन्नाला धाडण्याची खटपट त्यानें केली होती. ब्रॅडचा व्हिएन्ना येथील राहण्याचा सारा खर्च देखील तो भागवीत होता. आपल्या बायकोच्या हातून होणारा वेडेपणा टाळण्यासाठीं, आणि स्वतःच्या संसाराची प्रतिष्ठा व लौकिक कायम राखण्यासाठीं एवढी किंमत तिच्या बापानें दिली होती.

जेनच्या आईचा संबंध कथानकाशीं आला आहे तो एवढ्यापुरताच. पुढें तिनें नवऱ्यापासून घटस्फोट घेतला, आणि १९४२ सालीं ती मोटरच्या अपघातांत सांपडून मरण पावली, या गोष्टी लेखकानें सांगितल्या आहेत; पण त्या कळल्यामुळें कादंबरी वाचणाऱ्याच्या मनावर कांहीं विशेष परिणाम होत नाहीं. गोष्ट सांगणारी कादंबरीची नायिका जेन आपल्या आईच्या घटस्फोटाचा आणि मृत्यूचा निर्देश करते तो देखील तटस्थपणानेंच. किंबहुना आईबाप आणि कन्या यांच्यांतल्या संबंधाचें जें चित्रण लेखकानें या पुस्तकांत केलें आहे त्यांत गोडवा मुळींच नाहीं. कदाचित् पैसेवाल्या अमेरिकन लोकांच्या राहणीचें हेंच यथातथ्य चित्र असेलहि. पण आईबाप आणि मुलगी यांच्यांतील वात्सल्याचा आणि प्रेमाचा भाग सोडला तर जेनच्या आईपेक्षां तिच्या बापाचा संबंध कथानकाशीं अधिक आलेला आहे. ब्रॅड व्हिएन्नाला निघून गेला तिथें जेनच्या आईचा संबंध संपला; पण तिच्या बापाचा मात्र कथानकां-

तील पुढच्या एका घटनेशीं पुष्कळ महत्त्वाचा संबंध आला आहे. तो कसा तें सांगण्यासाठीं पॉलीची हकीकत सांगायला हवी.

फ्रामनें ब्रॅडचें संशोधन आपल्या नांवावर खपवून त्याचा विश्वासघात केला याबद्दल सूड घेण्यासाठीं पॉलीनें फ्रामवर प्राणघातक हल्ला केल्यावर ती पकडली गेली, हें मीं मागेंच सांगितलें. हा प्रसंग मात्र कादंबरींतला सगळ्यांत उत्कृष्ट—कदाचित् अत्यंत चित्तवेधक असा एकटा एकच असा—प्रसंग आहे व हिल्टननें तो मोठ्या सुंदर रीतीनें रंगविलाहि आहे. फ्रामनें आपलें संशोधन चोरलें ही गोष्ट जाहीरपणानें बोलून, शक्य तर त्याच्यावर फिर्याद करून ब्रॅडनें त्याचें पारिपत्य केलें पाहिजे, व त्याचा ढोंगीपणा चव्हाट्यावर आणला पाहिजे असा पॉलीनें ब्रॅडजवळ हट्ट धरला; पण त्यानें तो मुळींच मानला नाहीं. जेननें देखील या बाबतींत त्याचें मन वळविण्याचा खूप प्रयत्न केला; पण फ्रामनें आपल्या नांवावर खपविलेलें संशोधन माझें आहे असें जाहीरपणें सांगण्यास ब्रॅड कांहीं केल्या तयार होईना. इतर नात्सी लोकांप्रमाणें फ्रामहि दुष्ट होता, लबाड होता, हें त्याला कबूल होतें. पण तो एक अत्यंत बुद्धिमान् शास्त्रज्ञ आहे याबद्दलहि त्याची खात्री होती, आणि त्याच्या बुद्धिमत्तेबद्दल त्याला अमर्याद आदर वाटत होता. शिवाय त्याचें म्हणणें असें, कीं "हें संशोधन माझें आहे, हें त्याचें आहे या भाषेंत कांहीं अर्थ नाहीं. शास्त्रीय सत्यावर कुणाहि एका व्यक्तीचा मालकी हक्क असूं शकत नाहीं. त्यावर साऱ्या मानवजातीची मालकी असते." ही त्याची भूमिका लेखकानें फार सुंदर रीतीनें स्पष्ट केली आहे, व या भूमिकेमुळें फ्रामचें पारिपत्य करावेंसें त्याला वाटत नाहीं, हें अगदीं साहजिक आहे असें वाचकाला वाटायला लावलें आहे. पण पुढें जेव्हां पॉली पकडली जाते आणि फ्रामवर हल्ला केल्याबद्दल तिला शिक्षा होणार हें उघड दिसतें तेव्हां ब्रॅड आपला हट्ट सोडायला तयार होतो. काय वाटेल तें झालें तरी पॉलीची सुटका झाली पाहिजे असें त्याला वाटूं लागतें. वकील त्याला जेव्हां सांगतो, कीं 'पॉलीनें फ्रामवर केलेल्या हल्ल्याला फार सबळ कारण होतं असं जर कोर्टांत सिद्ध करतां आलं तरच पॉलीची शिक्षा कदाचित् टळेल,' तेव्हां फ्रामचा डॅबिसपणा कोर्टांत सिद्ध करायला तो तयार होतो. सत्यसंशोधक शास्त्रज्ञाची त्याची

भूमिका संपते. पॉलीवर अत्यंत प्रेम करणारा तिचा नवरा एवढीच त्याची भूमिका शिल्लक राहते. त्याच्या मनोवृत्तींतला हा बदल हिल्टननें मोठ्या कौशल्यानें रंगविलेला आहे. आणि ब्रॅडच्या विचारांत हा बदल घडतो न घडतो तोंच कथानकाला एक अनपेक्षित कलाटणी त्यानें दिलेली आहे. कोणती तें पहा.

जें संशोधन फ्रामनें स्वतःचें म्हणून मिरविलें तें माझें होतें असें भरपूर पुराव्याच्यानिशीं ब्रॅडनें कोर्टांत सिद्ध केलें तर त्या बळावर असें म्हणतां येणार होतें कीं आपल्या नवऱ्याचा असा विश्वासघात झालेला पाहून पॉलीला भयंकर संताप येणें साहजिक होतें, त्या संतापाच्या भरांत तिनें फ्रामवर केलेला हल्ला क्षम्य समजला पाहिजे, आणि कोर्टानें तिला दया दाखविली पाहिजे. असें म्हटल्यानें ती निर्दोषी ठरून सुटेल अशी खात्री बाळगतां येत नव्हती, पण निदान कायद्याच्या आधारानें तिचा बचाव करतां येण्याजोगा होता. वकिलाचा हा सल्ला ऐकल्यावर एकीकडे सत्य हें कुणाच्याहि मालकीचें नाहीं ही दृढ समजूत आणि शास्त्रज्ञ या नात्यानें फ्रामविषयींचा पराकाष्ठेचा आदर, आणि दुसरीकडे पॉलीविषयींचें प्रेम व तिला संकटांतून सोड-विण्याची इच्छा यांचा झगडा ब्रॅडच्या मनांत सुरू होतो; आणि त्यांत पॉलीबद्दलच्या प्रेमाचा विजय होतो. पॉलीचा बचाव करण्याचा एक मार्ग सांपडला म्हणून जेनला आनंद होतो व जबाब तयार करण्याचें काम ती आणि ब्रॅड मिळून मोठ्या उत्साहानें करूं लागतात. परंतु त्या सुमारास जर्मनींतलीं राजकीय परिस्थिति झपाट्यानें बदलते. महायुद्धाला जवळजवळ तोंड लागतें, नात्सींचा अंमल धुमधडाक्यानें सुरू होतो, राजसत्तेच्या मर्जी-तल्या फ्रामसारख्या शास्त्रज्ञाची बदनामी सत्ताधारी लोक कोर्टांत उघडपणें होऊं देतील ही गोष्ट उघडउघड अशक्य वाटूं लागते. न्यायदानाचें यंत्र म्हणजे राजसत्तेला प्रिय असणाऱ्या लोकांचें रक्षण करणारें व अप्रिय असणाऱ्या लोकांचे कांटे मार्गांतून दूर करणारें यंत्र होऊन बसतें! या परिस्थितींत ब्रॅडच्या जबाबावर कोर्ट विश्वास ठेवील, अथवा त्यानें कितीहि भक्कम पुरावा दिला तरी फ्रामनें लबाडी केली असें मानून पॉलीला दया दाखवील, या आशेंत कांहीं अर्थ उरत नाहीं. काय वाटेल तें झालें तरी राजसत्तेच्या तालावर नाचणारें कोर्ट फ्रामविषयीं पक्षपातच दाखवील, आणि सत्ताधा-

त्यांच्या मर्जीतल्या माणसांवर हल्ला करणें म्हणजे कांहीं पोरखेळ नव्हे अशी दहशत लोकांना घालण्यासाठीं पॉलीला देहांत शासनच देण्यांत येईल या गोष्टी उघड दिसूं लागतात. मग प्रश्न असा उत्पन्न होतो, कीं पॉलीचे प्राण वांचविण्याचा कांहीं मार्गच नाहीं का? वकील म्हणतो, " आहे त्या मार्गानें तुम्हांला जातां आलं तर पहा. " आपण मोठें साळसूद लोक आहोंत असें जबाबदार अमेरिकन लोकांचें मत झालें तर तें नात्सी लोकांना या वेळेस हवें होतें. एखाद्या बड्या वजनदार अमेरिकन माणसानें वरिष्ठ नात्सी अधिकाऱ्याचें मन वळविलें तर मोहबतीखातर पॉलीला कदाचित सोडून देण्यांत येईलहि. वकिलाचा हा सल्ला ऐकतांच जेनला आपल्या बापाची आठवण होते. ती ब्रॅडला बरोबर घेऊन त्याच्याकडे जाते. तिचा बाप ब्रॅडला विचारतो, " तुझी पॉली तुला परत सुखरूप मिळविण्यासाठीं तूं वाटेल तें करायला तयार आहेस? " ब्रॅड सांगतो, " वाटेल तें. " जेनचा बाप म्हणतो, " ठीक आहे. मग या कागदावर सही करून तो माझ्याजवळ दे. " जेनच्या बापानें अशी योजना केलेली असते, कीं ब्रॅडनें कोर्टांत एक लेखी जबाब सादर करावा. त्यांत असें म्हणावें, कीं फ्रामनें माझें संशोधन चोरलें या पॉलीच्या समजुतींत कांहींएक अर्थ नाहीं. तें संशोधन फ्रामनेंच केलेलें होतें. पण पॉली म्हणजे एक भ्रमिष्ट स्त्री आहे, आणि तिनें फ्रामवर जो हल्ला केला तो देखील वेडाच्या भरांत; असा जबाब ब्रॅडनें दिला तर—आणि तरच—पॉलीचे प्राण वांचवितां येणार होते. वरिष्ठ नात्सी अधिकाऱ्याकडून जेनच्या बापानें असें वचन मिळविलें होतें—अर्थात् लेखी नव्हे फक्त तोंडी—कीं फ्रामच्या कीर्तीवर येणारा कलंक जर ब्रॅडनें जाहीरपणें पुसून टाकला तर पॉलीवरचा खटला झटपट उरकण्यांत येईल. तिचा गुन्हा शाबीत झाला असें मानण्यांत येईल, परंतु ती वेडी आहे असेंहि समजण्यांत येईल; आणि तिची रवानगी तुरुंगाऐवजीं इस्पितळांत करण्यांत येईल; आणि तिला इस्पितळांत ठेवण्याचं नाटक थोडे दिवस करण्यांत येईल आणि मग स्वित्सर्लंडमध्यें तिची गुपचूप रवानगी करण्यांत येऊन तिला ब्रॅडच्या हवालीं करण्यांत येईल...

म्हणजे आतां ब्रॅडपुढं मोठा चमत्कारिक पेंच उभा राहिला. संशोधनाचें सारें श्रेय तर त्याला देऊन टाकावें लागणार होतें, फ्रामची श्रेष्ठता कबूल

करावी लागणार होती, त्याच्याबद्दलची निष्ठा जबाबांत बोलून दाखवून नात्सी पक्षाशीं आपले दृढ संबंध आहेत अशी जाहीर कबुली द्यावी लागणार होती; परंतु याहूनहि भयंकर गोष्ट होती ती ही कीं, एक भ्रमिष्ट वेडीपिशी म्हणून आपल्या बायकोचा त्याला जाहीरपणानें धिःकार करावा लागणार होता. म्हणजे पॉलीचे प्राण वांचविण्यासाठीं त्याला तिच्यावर दुष्ट प्रहार करावा लागणार होता; आणि इतकें करूनहि नात्सी अधिकारी आपल्या शब्दाला जागतील अशी खात्री नव्हतीच. बोलूनचालून त्यांचें वचन तोंडी होतें. असल्या एकांगी करारावर मुळींच सही करूं नये असें जेनचें म्हणणें होतें. पण पॉलीला सोडविण्याचा दुसरा मार्ग नव्हता. आणि तिची सुटका केलीच पाहिजे असा ध्यास ब्रॅडला लागला होता. ब्रॅडनें त्या करारवजा जबाबावर सही केली. आणि तो कागद जेनच्या बापाच्या हातीं दिला. जेनच्या बापाचा कथानकाशीं महत्त्वाचा संबंध कसा आला तें आतां तुम्हांला कळलें असेलच.

नात्सी अधिकारी आपल्या वचनाला जागणार नाहींत ही जेनची भीति खरीच ठरली; तिच्यावरच्या खटल्याची सुनावणी झाली. सरकारी वकिलानें ब्रॅडचा जबाब मोठ्या ऐटीनें वाचवून दाखविला, 'दोषी पण वेडी' असा निकाल कोर्टानें दिला, पॉलीची रवानगी इस्पितळांत झाली, येथपर्यंत सारें कराराप्रमाणें ठीक झालें. पण पुढें रंग बदलला. ब्रॅड स्वित्झर्लंडमध्यें जाऊन पॉलीची वाट पहात बसला. पण दिवसामागून दिवस जाऊं लागले तरी ठरलेल्या कराराप्रमाणें नात्सी अधिकारी पॉलीची रवानगी त्याच्याकडे करीनात, ब्रॅडला फार काळजी वाटूं लागली. परंतु वाट पहाण्याखेरीज त्याच्या हातांत कांहींच नव्हतें. मध्यंतरीं युद्धाचा भडका सुरू झाला होता, नात्सी अधिकारी करतील ती पूर्व दिशा झाली होती, त्यांना अप्रिय असणारीं माणसें निर्दयपणें नाहींशीं करण्यांत येत होतीं. एके दिवशीं ब्रॅडला एक सरकारी पत्र आलें. त्यांत लिहिलें होतें–पॉली मेली !

निराशेचा आणि दुःखाचा हा प्रहार भयंकर होता. तो झाल्यावर बदला घेण्याचा ब्रॅडनें निश्चय केला. फ्रामचा जीव घेण्याचें त्यानें ठरविलें. तो जर्मनींत परत आला आणि त्यानें फ्रामची भेट घेतली 'मला तुमच्या हाताखालीं संशोधन करीत रहायचें आहे,' हें त्याचें म्हणणें ऐकून फ्राम

खूष झाला. एके दिवशीं केव्हांतरी फ्रामला या जगांतून नाहींसा करायचा असें मनाशीं ठरवून ब्रॅड त्याच्याकडे राहिला व काम करूं लागला. परंतु पुढें त्याच्या मनांत आलें, कीं केवळ फ्रामचाच नव्हे, तर एकंदर युद्ध-पिपासू नात्सी सत्तेचा सूड घेण्याचें साधन आपल्या हातांत आहे. हाच विचार त्यानें अखेर अंमलांत आणला. ॲटमबॉंबच्या संशोधनांतल्या गणितांतल्या आंकड्यांची त्यानें गल्लत करून टाकली. तें गणित त्यानें फ्रामच्या स्वाधीन केलें, आणि अशा प्रकारें नात्सींच्या शास्त्रीय आघाडीवर एक अत्यंत महत्त्वाचा 'साबोटाज' केल्यानंतर त्यानें जर्मनी सोडली.

यानंतरच्या काळांत अमेरिकन सरकार ब्रॅडकडे संशयित नजरेनें कां पहात होतें, आणि कोणत्या गुप्त कृत्याच्या जाणिवेनें ब्रॅडला विमनस्कतेचा रोग जडला होता' या दोन्ही गोष्टी आतां तुम्हांला नीट कळतील. ही त्याची विमनस्कता घालविण्यासाठीं, आणि त्याच्या चरित्रांतील सर्व गोष्टी त्याच्याच तोंडून काढतां आल्या तर काढण्यासाठींच अमेरिकन सरकारनें ब्रॅडला टेक्सच्या इस्पितळांत आणून ठेवलें होतें. आणि आपला हा हेतु साध्य व्हावा म्हणूनच त्यांनीं नंतर त्याला जेनच्या हवालीं केलें. जेनच्या सहवासांत ब्रॅड मोकळेपणानें कसें बोलूं लागला आणि अखेर दोघांच्याहि मनांतलें एकमेकांचें प्रेम दोघांना कसें कळलें वगैरे कथानकाचा भाग मी तुम्हांला आधींच सांगितला आहे.

जेनच्या बापाच्या म्हणण्याप्रमाणें ब्रॅड जबाबावर सही करून देतो. या ठिकाणीं लेखकानें जेनची आणि ब्रॅडची फारकत केली आहे; आणि नंतर घडलेल्या हकीकती ब्रॅड जेव्हां अखेर जेनला भेटतो तेव्हां त्याच्या तोंडून वदविल्या आहेत. तीनशें सात पानांच्या या कादंबरीचे लेखकानें एकंदर पांच विभाग केले आहेत. दुसऱ्या विभागाच्या शेवटीं ब्रॅडनें जेनच्या बापाजवळ करार लिहून दिला आहे, आणि जेन त्याला सोडून गेली आहे. पुढच्या तीन भागांत मुख्यतः ब्रॅड आणि जेन यांची पुन्हां हॉलीवुडमध्यें भेट झाल्यानंतर तिच्याजवळ तो एक प्रकारचें आत्मनिवेदन करतो तेच आहे. जवळ जवळ शंभर पृष्ठांचा हा भाग आहे. ब्रॅडच्या बोलण्यांत मागच्या हकीकतीचे दुवे हलके हलके स्पष्ट झालेले आहेत. एखादी आकृति तयार करण्यासाठीं कारागिरानें बारीक बारीक तुकडे जुळवावे तसें हे दुवे जुळत

जातात. अशाप्रकारें दुव्यांची सांगड घालण्यांत लेखकाचें कौशल्य आहे हें खरें; पण वाचकाच्या सहनशक्तीला मोठा ताण पडतो. ब्रॅडच्या बोलण्यांत एखादा लहानसा महत्त्वाचा दुवा केव्हां प्रगट होईल त्याचा नियम नाहीं. हें ध्यानांत ठेवून त्याचें आणि जेनचें संभाषण वाचकाला फार काळजीपूर्वक वाचावें तर लागतेंच, पण दुव्यांच्या जुळणीची ही क्रिया फारच सावकाश होत असल्यामुळें त्याला त्या भाषणांचा कंटाळाहि येतो. हिल्टननें अवलंबिलेली ही निवेदन पद्धति मला कांहीं फारशी पसंत नाहीं. म्हणून मी असें म्हणेन कीं, हिल्टनच्या या कादंबरीचीं पहिलीं दीडशें पानें फार चित्तवेधक आहेत, पण पुढचीं दीडशें पानें बरीचशीं कंटाळवाणीं झालेलीं आहेत.

मात्र ब्रॅडच्या अखेरच्या आत्मनिवेदनाचा कंटाळवाणा प्रदीर्घपणा सोसला, तर मला असें वाटतें कीं, या कादंबरींत आकर्षक अशी कोणती गोष्ट असेल, तर ती म्हणजे ब्रॅडचें स्वभावचित्र. कोणत्याहि कादंबरीचा सरसपणा ठरावयाचा झाला तर मी स्वतःला असा प्रश्न करतों कीं, " ही कादंबरी मला पुन्हां वाचावीशीं वाटेल ती तिच्यांतल्या गोष्टीसाठीं ? " ' नथिंग सो स्ट्रेंज ' या कादंबरीच्या बाबतींत या प्रश्नाचें उत्तर ' ब्रॅडच्या स्वभावदर्शनासाठीं ' असें मी निःशंकपणें देईल. या कादंबरीची नायिका जेन आहे आणि एकंदर गोष्ट तिनेंच सांगितली आहे हें खरें असलें तरी मी जेव्हां कादंबरी वाचून हातावेगळी केली तेव्हां माझ्या डोळ्यापुढें तिचें नव्हे तर ब्रॅडचें चित्र तरंगत राहिलें. ब्रॅडच्या स्वभावचित्रांत फार मजेदार छटा आहेत. संशोधनाचा त्याचा अव्यभिचारी छंद, कीर्तीविषयींची उदासीनता, सुखोपभोगांविषयींची एखाद्या साधूला शोभेल अशी त्याची अरुचि, जेनच्या आईविषयीं त्याला वाटलेलें कोवळ्या तारुण्यांतलें अविवेकी प्रेम, फ्रामच्या बुद्धिमत्तेविषयींचा त्याचा आदर, त्यानें त्याचा घात केला तरी देखील न चळणारी फ्रामविषयींची त्याची निष्ठा, या निष्ठेवरहि अखेर विजय मिळविणारें त्याचें पॉलीवरचें प्रेम, आणि अखेर जी त्याच्या मनांत खरोखर अगदीं पहिल्यापासून होती—परंतु जिच्या परिस्फुटतेंत कोणची ना कोणची आठवण होती—ती त्याची, कादंबरीच्या अखेरीस बोलून दाखविलेली, जेनवरची प्रीति—या ब्रॅडच्या स्वभावांतील विविध लहरी अतिशय मनोहर आहेत. ब्रॅडच्या या स्वभावचित्रापुढें नायिका जेन हिचें चित्र सुद्धां फिकें

पडतें. तिच्या बुद्धिमत्तेबद्दल आदर वाटतो. आईच्या, बापाच्या, आणि ब्रॅडच्या वागण्याचा प्रत्येक वेळेस सहानुभूतीनें विचार करण्याची तिची तयारी व त्यांना दोष न देण्याची तिची इच्छा याचें कौतुक करावेसें वाटतें. ब्रॅडला सहाय्य करण्याची व धीर देण्याची तिची उत्सुकता आणि धडपड यामुळें तिच्या स्वभावचित्राला शोभाहि आली आहे. परंतु ब्रॅडच्या तिच्या प्रेमांत विचारीपणामुळें एक प्रकारचें दूरत्व आल्यासारखें वाटतें. तिची प्रीति थंड आहे, शांत, गंभीर, अबोल आहे. तारुण्यसुलभ आग्रह, उताविळी, ऊब त्या प्रीतींत नाहीं. 'टेक्सस' च्या हॉस्पिटलमध्यें आलेला ब्रॅड तिला अकल्पित भेटला नसता तर ब्रॅडसाठीं ती झुरत राहिली असती, असें वाटत नाहीं. भावनेच्या परिपूर्तीसाठीं अट्टाहास करणारी ती वाटत नाहीं. कदाचित् अमेरिकेंतल्या उच्चवर्गीय सुशिक्षित, स्वतंत्र कर्तबगार मुलींचें हें प्रातिनिधिक चित्र असेलहि. परंतु जिच्या प्रेमकथेशीं वाचकानें तद्रूप व्हावें, आणि जिच्या प्रेम साफल्याची ओढ वाचकाला तिच्यापेक्षांहि अधिक वाटावी अशा नायिकेच्या चित्रांत जी मनोहारिता असते ती हिल्टननें रेखाटलेल्या जेनच्या चित्रांत नाहीं एवढें खास !

'सत्याइतकें अद्भुत दुसरें कांहीं नसतें,' असें डॅनिएल वेब्स्टर नांवाच्या ग्रंथकाराचें एक वाक्य आहे–( There is nothing so strange as truth ) या वाक्यांतले 'नथिंग सो स्ट्रेंज' एवढेंच शब्द घेऊन कादंबरीच्या नांवासाठीं हिल्टननें त्यांचा उपयोग केलेला आहे. परंतु एकंदर गोष्टींत जें अगदीं अद्भुत आणि अविश्वसनीय वाटावें अशाचा भाग फारच थोडा आहे. गोष्टीचें अस्सल स्वरूप कोणतें तें पाहूं लागलों, कीं ती एक प्रेमकहाणी आहे असेंच म्हणावें लागते. आणि ज्या प्रेमाची ती कहाणी त्यांत उत्कटता कुठेंहि नाहीं. मग उच्छृंखलता तर दूरच राहिली परंतु याचा असा अर्थ नव्हे कीं ती कहाणी मनोज्ञ नाहीं. संयमित प्रीतीची चालरीत उतावळ्या प्रीतीच्या चालरीतीहून भिन्न असेल, तिचे रंग भडक नसतील, गडद नसतील. परंतु तिच्या फिक्या रंगांतहि सौंदर्य आहे; आणि हें सौंदर्य दाखविणारा हिल्टनसारखा कुशल कलावंत असला कीं तें पहावेसें वाटतेंच. अशा कुशल चित्रणाच्या अनेक जागा या पुस्तकांत आहेत त्यांतली एकच सांगतों.

कादंबरीच्या अखेरीस ब्रॅड जेनजवळ आत्मनिवेदन करतो तेव्हां तो पुनः-

पुन्हा अशा शंकेनें अस्वस्थ होतो, कीं आपण जें सांगत आहोंत तें ऐकून जेनचें आपल्याविषयीं फार वाईट मत होईल. तो पुनःपुन्हां तिला विचारतो, "आतां तुझ्या दृष्टीनं मी अगदीं वाईट मनुष्य ठरलों असेन, नाहीं?" अन् ती पुनःपुन्हां सांगते, "मुळींच नाहीं. आणखी सांग तुझी हकीकत." तो सांगत राहतो. शेवटीं तो म्हणतो,

"ज्या गोष्टी इतक्या मोकळेपणानं मी कधींच कुणाला सांगितल्या नसल्या त्या मी तुला कशा सांगितल्या कोण जाणे. तुझ्याविषयीं मला काय वाटतंय् हें मला कळत नाहीं. फार गुंतागुंतीची गोष्ट आहे ती."

जेन म्हणते, "पण मला तुझ्याविषयीं काय वाटतं तें मी सांगतें. त्यांत गुंतागुंत मुळींच नाहीं. अगदीं सोपी आणि सरळ गोष्ट आहे ती. माझं तुझ्यावर प्रेम आहे."

यापुढें कादंबरींतली जेन म्हणते—

'माझं प्रेम मी त्याच्याजवळ बोलून दाखवलं तर तो काय म्हणेल कुणास ठाऊक असं मला पूर्वी अनेक वेळां वाटलं होतं. पण या वेळेस वाटलं नाहीं. माझी भीति संपली होती. शंका फिटली होती. फक्त जिज्ञासा शिल्लक होती.'

तो कांहीं वेळ स्तब्ध राहिला. मग माझ्याभोंवतीं हात टाकून तो हळूंच म्हणाला, "हें छान झालं."

त्याच्या त्या शब्दांचा नक्की अर्थ माझ्या ध्यानांत चटकन् आला नाहीं. पण तो लगेच म्हणाला, "कारण माझंदेखील तुझ्यावर प्रेम आहे." त्याचे ते शब्द ऐकल्यावर माझा पहिला तोल गेला. तें त्याच्या लक्षांत येऊं नये म्हणून मी हंसलें व म्हणालें, "तूं सांगितलंस तें ऐकून मला आनंद झाला."

त्यानें विचारलें, "तुला ठाऊक होतं ना?"

"होतं. पण......तुझ्या तोंडून ऐकल्यामुळं मला फार आनंद झाला."

* * *

# अरायव्हल अँड डिपार्चर

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## आर्थर कोएस्लर

हिल्टनच्या ' नथिंग सो स्ट्रेंज ' या कादंबरीशीं जिचं फार साम्य आहे अशी एक कादंबरी मला आठवते. या कादंबरीच्याहि कथानकाशीं महायुद्धाचा संबंध आला आहे. या कादंबरीचा नायकहि विमनस्कतेच्या रोगाला बळी पडलेला ( Neurotic ) आहे. नायकाच्या आत्मनिवेदनानं याहि कादंबरीचा मोठा भाग व्यापलेला आहे. हिच्या कथावस्तूचा गाभाहि प्रेमच आहे— इतकंच नव्हे, तर हें प्रेम उच्छृंखल आहे. ही कादंबरीदेखील वाचकाच्या मनाचा ठाव घेणारी आहे. आणि हिचाहि कर्ता हिल्टनसारखा नामांकित आहे. त्याचं नांव आर्थर कोएस्लर; आणि कादंबरीचं नांव ' अरायव्हल अँड डिपार्चर. ' कोएस्लरच्या ' डार्कनेस ॲट नून ' या कादंबरीचा गाजावाजा तुमच्या कानांवर आलेला असेल. हिचं मराठी भाषांतर नुकतंच प्रसिद्ध झालं आहे—तें कदाचित् तुमच्या पाहण्यांत आलं असेल. मला ' डार्कनेस ॲट नून ' पेक्षांहि ' अरायव्हल अँड डिपार्चर ' ही कादंबरी फार आवडते.

' नथिंग सो स्ट्रेंज ' ही ३०७ पानांची कादंबरी आहे. ' अरायव्हल अँड डिपार्चर ' पुरती दोनशें पानांची देखील नाहीं. सिंहावलोकनाच्या पद्धतीनं या कादंबरींत नायक पीटर स्लाव्हेक याच्या बावीस वर्षांतल्या सगळ्या हकीकती सांगितलेल्या आहेत. पण तो सिंहावलोकनाचा भाग सोडला आणि कादंबरींत प्रत्यक्ष हकीकत किती दिवसांची आहे तें पाहिलं तर कांहीं थोड्याच महिन्यांची आहे असं दिसतं. आणि या थोड्या महिन्यांत जें कांहीं घडतं तें एका ठिकाणींच घडतं. म्हणजे स्थलकालाच्या दृष्टीनें ' नथिंग सो स्ट्रेंज ' पेक्षां ' अरायव्हल अँड डिपार्चर ' च्या गोष्टींत एकजिनसीपणा आणि सुटसुटीतपणा अधिक आहे. मुख्य पात्रेंहि अगदीं थोडींच आहेत. नायक पीटर, त्याची प्रेयसी ओदेत, आणि आत्मनिवेदनाच्या

पद्धतीनं त्याला बरा करण्याचा प्रयोग करणारी डॉक्टरीण सोनिया बॉलगार. पात्रं एवढीच, स्थलकालाची चौकटहि लहान, त्यामुळें मुख्य गोष्टहि लहानशी आणि सुटसुटीत आहे. पीटरच्या आत्मनिवेदनांत प्रकट होणाऱ्या हकीकतीचं रामायण खूपच मोठं आहे; आणि 'नथिंग सो स्ट्रेंज' मधील ब्रॅडलेच्या आत्मनिवेदनासारखी त्याची मंदगति आणि प्रदीर्घता कंटाळवाणी वाटते. पण हें भारूड वेगळं केलं तर मुख्य गोष्ट चटकदार आहे.

'बालकन्स' मधील कोठल्यातरी एका शहरांत पीटर स्लाव्हेक नांवाचा तरुण मुलगा युनिव्हर्सिटींत शिकत होता. क्रांतिकारक चळवळींत तो सामील झाला. क्रांतिकारकांची धरपकड झाली त्यावेळेस तो पकडला गेला. पोलिसानीं त्याचा अनन्वित छळ केला. जवळ जवळ तीन वर्षें त्याला तुरुंगांत काढावीं लागलीं. त्याच्या शिक्षेची मुदत संपण्याच्या सुमारास महायुद्ध सुरू झालं. त्याचा देश जर्मनांच्या ताब्यांत गेला, त्याला पुनः पकडण्यांत आलं, त्याच्याकडून पार्टीची गुप्त माहिती मिळविण्यासाठीं 'गेस्टापो' नीं त्याचे हाल केले, त्याची पुनः कोठडींत रवानगी झाली. परंतु त्याचा कोणताच गुन्हा शाबीत करतां येत नाहीं असं दिसून आल्यावर एक वर्षानंतर त्याला सोडून देण्यांत आलं. मजुरी करून पोटाला मिळवीत त्यानं कांहीं दिवस काढले. नंतर कोणत्यातरी तटस्थ राष्ट्राचा आश्रय घ्यावा, आणि शक्यतर दोस्तांच्या सैन्यांत शिपाई म्हणून दाखल व्हावं, अशा हेतूनं एका बोटींत बसून त्यानं देश सोडला, व अखेर एके दिवशीं पहांटे तीन वाजण्याच्या सुमारास बोटीच्या धक्क्यावरून समुद्रांत उडी घेऊन पोहत पोहत त्यानं एका तटस्थ राष्ट्राचा किनारा गांठला. (लेखकानं या तटस्थ राष्ट्राला नांव दिलेलं नाहीं. एक अनामिक तटस्थ राष्ट्र अशा संदिग्ध शब्दांनीं त्याचा उल्लेख केला आहे!) १९४१ सालच्या वसंतऋतूंतील ती एक पहांट होती. (पीटर या तटस्थ राष्ट्राच्या किनाऱ्याला लागला. या ठिकाणीं कादंबरीचा प्रारंभ होतो.)

पोलिसांच्या छळांत उजवा पाय तीन ठिकाणीं डागून जखमी झालेला, नाकाचं हाड मोडलेलं, पुढचे दोन दांत निखळलेले, अंगावरच्या कपड्यां-खेरीज कपडे नाहींत, आठ दहा दिवस कशीबशी गुजराण करतां येईल एवढीच पुंजी खिशांत, पैशाचं पाकिट, चाकू, पेन्सिल, आणि घड्याळ या

पलीकडे मालकीची वस्तु नाहीं, आणि कसंहि करून या तटस्थ देशांत प्रवासाचा परवाना मिळवायचा, आणि सैन्यांत दाखल व्हायचं या पलीकडे भविष्यकाळाबद्दलचा बेत नाहीं, अशा अवस्थेंत पीटर स्लाव्हेकची स्वारी तटस्थ देशाच्या किनाऱ्याला येऊन लागली. रहायला ठिकाण नाहीं, खिशांत आठ दिवसांपुरतेच पैसे, शक्य तितक्या लवकर लष्करांत दाखल व्हायचं एवढा एकच बेत मनांत! दिवसांतून एकदां 'कॉन्शुलेट' च्या कचेरींत जावं, शेंकडों लोकांच्या• 'क्यू' मध्यें उभं रहावं, पाळी आली कीं "अधिकाऱ्यांनीं माझ्याबद्दल कांहीं निर्णय केलाय् का?" असा प्रश्न कौंटरवरच्या मुलीला विचारावा, 'अजून नाहीं. पुढं सरका. मागच्या माणसाला जागा द्या.' असं उत्तर ऐकावं, कचेरींतून बाहेर पडावं, कुठंतरी वणवण भटकावं, केव्हांतरी कुठल्यातरी हॉटेलांत शक्य तितके कमी पैसे खर्च करून पोटाला आहुति द्यावी, समुद्रस्नान करणाऱ्या माणसांसाठीं तीरावर उभ्या केलेल्या झोपड्यापैकीं एका झोपडींत रात्रीं अंग आडवं करावं, असा पीटरचा कार्यक्रम चालू झाला. पण हें किती दिवस चालणार? खिशांतल्या दिडक्या संपत आल्या. 'कान्शुलेट' कचेरींत तर 'अजून नाहीं' याखेरीज दुसरं उत्तर मिळेना. पीटरला पुढचा मार्ग दिसेना.

पण अशावेळीं त्याला अचानक साहाय्य मिळालं. त्याच्या देशांतली आणि त्याच्या कुटुंबाच्या ओळखींतली एक डॉक्टरीण कांहीं कामासाठीं या तटस्थ देशांत येऊन राहिली होती. तिचें नांव सोनिया बॉलगार. तिचं काम संपलं होतं पण प्रवासाच्या परवान्याचे कागद मंजूर होईपर्यंत तिला राहणं भाग होतं. तटस्थ देशांत येऊन पोंचल्यानंतर दुसऱ्या दिवशीं एका हॉटेलांत पीटर न्याहरी करीत बसला होता. तेव्हांच तो सोनियाच्या दृष्टीस पडला होता, व तिनं मनाशीं आश्चर्य केलं होतं, ही स्वारी इकडे कुठं? मानसमंथन (सायको–ॲनॅलिसिस) शास्त्राचा तिनं अभ्यास केलेला होता, त्या शास्त्रानुसार उपचार करण्यांत तिनं प्राविण्यहि मिळविलं होतं, आणि भोंवतालच्या साऱ्या माणसांच्या वागण्याकडे आपल्या शास्त्राच्या चष्म्यांतून ती पाहत असे. पीटरच्या लहानपणापासून त्याला तिनं पाहिलं होतं, आणि त्याचा ध्येयवाद, क्रांतीसाठीं कांहींतरी करण्याची त्याची धडपड, पक्षनिष्ठा, नंतर क्रांतिकारक पक्षांविषयींची त्याची निराशा, त्यामुळें त्याच्या ठिकाणीं

आलेली विषण्णता आणि ध्येयशून्यता, हा सारा इतिहास म्हणजे मानस-मंथनाचा एक विषय आहे असं ती समजत होती. एक ध्येयप्रवृत्त निराश झालेला तरुण असं पीटरचं वर्णन इतरांनीं केलं असतं; सोनियानं पीटरवर निराळंच लेबल लावलं होतं. ज्याच्या मनांत विचार–विकारांचा ‘ गंड ’ निर्माण झाला आहे आणि त्या ‘ गंडा ’ ची गुंतागुंत मानसमंथनाच्या प्रक्रियेनं सोडविल्याखेरीज ज्याच्या वागण्यांत स्थिरता आणि सुसंगति येणार नाहीं, असा एक रोगी—असें तें लेबल होतं. म्हणून तटस्थ देशांत पीटर आलेला पाहिल्याबरोबर त्याची गांठ घ्यावी, शक्यतर त्याला मदत करावी अशी तिला इच्छा झाली. ‘ कॉन्शुलेट ’ च्या कचेरींत ती देखील रोज जात असे. पण पीटर तिला भेटे. पण तो तिला टाळीत असे. पण अखेर एक दिवस तिनं त्याला गांठलंच; त्याचा दंड धरला, व ती त्याला आपल्या बिऱ्हाडाकडे घेऊन गेली. तुझा पासपोर्ट येईपर्यंत तूं माझ्याकडेच रहा असा तिनं त्याला आग्रह केला. इतकंच नव्हे, तर त्याला बरोबर घेऊन बाजारांत जाऊन तिनं त्याच्यासाठीं भरपूर कपडेसुद्धां खरेदी केले. या सुमारास पीटरच्या खिशांतल्या दिडक्या संपतच आल्या होत्या. जिवंत कसं रहायचं या विवंचनेंतच तो होता. सोनियानं त्याला आश्रय दिल्यावर त्यानं तो अमान्य केला नाहीं. तो तिच्याकडे राहूं लागला. आपल्या परवान्याचे कागद आले काय म्हणून चौकशी करायसाठीं ‘ कॉन्सुलेट ’ कचेरींत रोज एकदां हेलपाटा घालायचा, चार वेळच्या जेवणावर भरपूर हात मारायचा, झकपक कपडे करून इकडेतिकडे हिंडायचं, सोनियाकडे मित्रमंडळी येत त्यांच्या गप्पा ऐकायच्या, असा त्याचा नवा कार्यक्रम सुरू झाला.

वरवर आरामशीर वाटणारा हा दिनक्रम त्याला कांहीं मोठा सुखाचा वाटत नव्हता. दुसरा कांहीं मार्गच नव्हता म्हणून त्यानं तो पत्करला होता. पण त्याच्या मनाला तो कांहीं प्रशस्त वाटत नव्हता. सोनियाकडे राहणं त्याच्या मनाला लज्जास्पद वाटावं याचं कारण फार चमत्कारिक होतं. ही मध्यम वयाची निपुण बुद्धिमति डॉक्टरीण अफाट विचारांची होती. नीति-नियमांचीं आणि रूढींचीं बंधनं तिला मूर्खपणाचीं वाटत. या बंधनांमुळं माणसांचीं मनं खुरटून गेलीं आहेत, या खुरटेपणामुळं मनुष्यजातीची अवस्था एखाद्या रोग्यासारखी झाली आहे, आणि स्वातंत्र्य–समतेचे जयघोष,

समाजवाद, नात्सीवाद, साम्राज्यवाद इत्यादि वाद, पक्षोपपक्षांच्या आरोळ्या, स्वार्थत्यागाची भाषा, जुलूम, अत्याचार, लढाया या सगळ्यांच्या बुडाशीं तो रोग आहे, अशी तिची विचारसरणी होती. माणसाचं सारं आयुष्य कृत्रिम बनून गेलेलं आहे आणि त्यामुळं रोगट झालेलं आहे, आणि संपूर्ण नैसर्गिक आणि निरोगी आयुष्य कंठायचं असेल तर माणसानं सारीं बंधनं झुगारून दिलीं पाहिजेत, असं ती म्हणे. ती नुसतं असं म्हणत नसे त्याप्रमाणें ती वागत असे. स्वैराचारिणी हें विशेषण तिला अगदीं पूर्णपणें लागू होतं. तिच्या प्रियकरांची संख्या मर्यादित नव्हती, आणि तिनं आपल्याला घरीं आणून ठेवलं तें एक नवा पोरसवदा प्रियकर म्हणूनच ही गोष्ट पीटरच्या लक्षांत यायला फार वेळ लागला नाहीं. तिच्यांत व आपल्यांत असला संबंध असावा याची त्याला खंत वाटे. या चमत्कारिक परिस्थितींतून केव्हां एकदां सुटका होईल याची तो वाट पाहूं लागला. पण तितक्यांत एक निराळाच पाश उत्पन्न झाला. त्याचं एका तरुण मुलीवर प्रेम जडलं !

या मुलीचं नांव ओदेत. सोनियाच्या घरीं गप्पाष्टकासाठीं रात्रीच्या जेवणानंतर जमणारी जी मित्रमंडळी होती, त्यांपैकींच ओदेत होती. पीटरला ती प्रथम दिसली तेव्हांच तिच्याविषयीं त्याला फार आकर्षण वाटलं. गप्पा-गोष्टींत ती सहसा भाग घेत नसे. कोचाच्या एका कोपऱ्यांत ती नेहमीं बसलेली असे. सोनिया बोलूं लागली कीं तें ऐकतांना तिची मुद्रा एकदम फुलून येत असे. ओदेतकडे सारखी टक लावून पीटर पहात राही. तिच्या सौंदर्यावर तो अगदीं भाळून गेला. तिच्या ओठांकडे पाहिलं, कीं, ती मुलगी नसून एक नाजुकसा छोकराच आहे असा पाहणाऱ्याला भास होण्यासारखा होता. पीटर तिच्या त्या ओठांकडे आणि केसांकडे घटका न् घटका पहात राही. तिच्या त्या केसांवरून प्रेमानं हात फिरवावा अशी जबरदस्त इच्छा त्याला होत असे. ती आवरण्याचा तो प्रयत्न करी. पण तो करतांना दुसरीकडे त्याला अशी उसळी येई कीं, तिच्या केसांवरून हात फिरविण्याचं सुख मिळविण्यासाठीं जरूर तर तिला बलात्कारानं धरावी, कुस्करावी, दंतव्रण करावा, मारावं, झोंबावं......ती त्याच्याशीं एखादाच शब्द बोले, आणि तोहि अशा आविर्भावानं, कीं जणूं एक मूर्ख कोंवळं पोर यापलीकडे ती त्याला किंमत देत नव्हती. सोनियाकडून ओदेतविषयीं

त्याला माहिती कळली होती ती एवढीच, कीं ती फ्रेंच होती, एका नटावर तिचं प्रेम जडलं होतं, त्याच्याशीं तिचं लग्नहि होणार होतं पण तो पुढं लढाईवर गेला आणि मारला गेला होता, तिच्या आईबापांचा घटस्फोट झाला होता, ती आपल्या बापाजवळ कांहीं दिवस राहिली होती, पण तोहि लवकरच मेला होता, तिची आई अमेरिकेंत होती, तिच्याकडे रहावयास ती आतां जाणार होती, पासपोर्ट मिळेपर्यंत ती या तटस्थ देशांत राहिली होती.

एके दिवशीं पीटर घरांत एकटाच बसलेला असतांना ओदेत आली. सोनिया बाहेर गेली आहे असं पीटरकडून कळल्यावर ती परत जाऊं लागली. पीटर तिला थांबण्याचा आग्रह करूं लागला, पण ती ऐकेना. ती उठून दारापर्यंत गेलीसुद्धां, पण पीटरनं तिला धरून आंत ओढलं अन् दार लावलं. त्याच्या हातांतून सुटण्यासाठीं ती धडपड करूं लागली, पण त्यामुळं तिच्या अंगाचा अधिक निकट स्पर्श होऊन पीटरचं मन जास्तच भडकलं, व तो तिला आणखी आणखी गच्च धरूं लागला. शेवटीं एकमेकांशीं झोंबाझोंबी करतां करतां तीं दोघंहि कोचावर खालीं एकमेकांच्या अंगावर पडलीं. पीटरची इच्छा पूर्ण झाली. ओदेतनं ती पूर्ण होऊं दिली. मात्र प्रेमाच्या या चमत्कारिक पहिल्या सलामीनंतर पीटर आणि ओदेत यांचं प्रेम नीट जुळलं. ओदेतच्या सहवासांत पीटरचा काळ फार सुखाचा गेला.

पण ओदेतचा पासपोर्ट मंजूर झाल्यावर ती अमेरिकेस गेली. पीटरचा परवाना आल्यावर त्यानं तिच्याकडे जाऊन तिच्याशीं लग्न करायचं, किंवा निराळ्या मार्गानं जायचं, तें त्याचं त्यानं ठरवायचं होतं. पण ओदेतची एकाएकीं ताटातूट झाल्याचं पीटरला फार दुःख झालं, तो आजारी पडला. अर्धांगवायूच्या झटक्यानं त्याचा उजवा पाय लुळा पडला. हें त्याचं दुखणं शारीरिक नसून मानसिक आहे, असं सोनियाचं निदान होतं. मानस-मंथनाच्या आणि आत्मनिवेदनाच्या उपायांनीं—आणि या उपायांनींच—तो बरा होईल असं तिला वाटलं कांहीं आडपडदा न ठेवतां मनांतल्या साऱ्या गोष्टी आठवून आठवून पीटरनं सांगाव्या व त्या सोनियानं ऐकाव्या असा क्रम सुरू झाला. अगदीं लहानपणीं आपण आपल्या धाकट्या भावाच्या मृत्यूला कारण झालों, आणि मोठेपणीं पोलिसांचा छळ सोशीत असतांना पार्टीशीं बेइमानी केली, अशा दोन गुन्ह्यांची जाणीव पीटरच्या मनांत

खोल रुजलेली होती, व जाणिवेचा 'गंड' हेंच त्याच्या रोगाचं मूळ कारण होतं. सोनियानं त्याची खात्री पटवून दिली, कीं हे दोन गुन्हे त्याच्या हातून वास्तविक घडलेले नव्हते. ही समजूत पटल्यावर पीटरचं मन स्वच्छ झालं. तो झपाट्यानं बरा झाला. सोनियानं त्याची अशीहि खात्री पटविली कीं क्रांति, पक्षनिष्ठा इत्यादि कल्पना भ्रामक आहेत. या कल्पनांना तरुण पोरं बळी पडतात तीं केवळ स्वतःच्या अहंकाराची तृप्ति करण्यासाठीं आणि हा अहंकार देखील रोगट असतो. बलिष्ठाचा आत्मविश्वास नसतो तो.. जगापासून आपला दुबळेपणा लपवूं पहाणाऱ्या व जगानं आपल्याला पराक्रमी समजावं अशी इच्छा धरणाऱ्या दुर्बलांची ती आत्मवंचना आणि धडपड असते...

पीटर बरा झाला, थोडासा हिंडूं फिरूं लागला. त्या सुमारास सोनियाचा पासपोर्ट मंजूर झाला, व ती स्वदेशीं निघून गेली. पीटर एकटाच मागं राहिला. त्याचाहि परवाना आला. ओदेतकडे जाऊन तिच्याशीं लग्न करण्याचा बेत त्यानं केला होता. अमेरिकेंत जाणाऱ्या बोटीवर त्यानं जागा मिळविली. बोट ज्या दिवशीं प्रत्यक्ष निघायची त्याच्या आधीचे दिवस पीटर मोजूं लागला. या मधल्या दिवसांत ओदेतशीं सुखासमाधानानं संसार करण्याची इच्छा आणि क्रांतीसाठीं आपण कांहींतरी केलं पाहिजे, निदान चालू महायुद्धांत भाग घेऊन लढलं पाहिजे, हा विचार, या दोन दिशांनीं पीटरच्या मनाची ओढाताण सुरू झाली. प्रवासाची सारी तयारी तो करीत होता. केव्हां एकदां ओदेतकडे जायला आपण निघूं अशी घाई त्याला झाली होती. पण सैन्यांत दाखल होऊन कांहींतरी वीरकृत्य करावं, या इच्छेचाहि त्याच्या मनांत वरचेवर जोर होत होता. अखेर बोट सुटण्याचा दिवस उजाडला. पीटर बंदरावर गेला, बोटीवर चढला, आपल्या केबिनमध्येंदेखील जाऊन बसला. बोटीचा पहिला भोंगा वाजला, दुसराहि वाजला. आतां तिसरा भोंगा वाजला, कीं बोट धक्क्यापासून दूर होणार होती. परस्परविरुद्ध विचारांचं पीटरच्या मनांतलं कित्येक दिवसाचं युद्ध आतां हातघाईला आलं होतं. ओदेतकडे परत जायचं, कीं मानवतेच्या कल्याणासाठीं लढायचं? प्रेमानं भरलेल्या संसारांत पडायचं, कीं साहसकर्मांत उडी घ्यायची? भोग कीं त्याग? कोणत्या मार्गानं जायचं

तें ठरविण्याची केबिनमधल्या पीटरची धडपड चालली होती...अखेर गांठ एकदम सुटली. त्याच्या मनानं निर्णय घेतला. तिसरा भोंगा वाजणार तोंच तो आपल्या केबिनमधून बाहेर पडला, जिन्यावरून धांवला, धक्क्यावर पोंचला. तिथं लष्करी खात्याची कचेरी होती. त्या कचेरींत जाऊन त्यानं सांगितलं, मला सैन्यांत दाखल करून घ्या. कचेरीच्या खिडकींतून त्यानं बाहेर नजर टाकली, तों बोट हलली होती. आणि हलके हलके दूर जात होती.

'अरायव्हल अँड डिपार्चर' या कादंबरीचं कथानक एवढंच आहे. आत्मनिवेदनाच्या गुऱ्हाळानं ज्याप्रमाणं 'नथिंग सो स्ट्रेंज' या हिल्टनच्या कादंबरीचा जवळ जवळ अर्धा भाग व्यापला आहे, त्याप्रमाणंच 'अरायव्हल अँड डिपार्चर' या एकंदर एकशें अठ्याऐंशी पानांच्या कादंबरींत पीटरच्या आत्मनिवेदनानं जवळ जवळ ऐंशी पानं व्यापलेलीं आहेत. अस्सल कथानक जेमतेम शंभर पानांचं! म्हणजे खरोखर पाहतां ही एक दीर्घ लघुकथा आहे. तिला आत्मनिवेदनाचं ठिगळ जोडून लेखकानें तिची कादंबरी बनविली आहे. पाश्चात्य लेखकांना सध्यां दोन गोष्टींचं वेड सध्यां लागलेलं दिसतं. स्मृतिभ्रंशाचं आणि सायको-ॲनॅलिसिसचं. हिल्टनच्या 'रँडम हार्वेस्ट' या कादंबरींत मुख्य पेंचप्रसंग उत्पन्न करण्यासाठीं स्मृतिनाशाचा व स्मृतीच्या पुनरागमनाचा उपयोग केलेला आहे हें तुम्हांला माहीत असेलच. इतर कित्येक कादंबऱ्यांतहि ही 'सिच्युएशन' वापरलेली तुम्हांला आढळली असेल. कांहीं देशी चित्रपटांतील नायक–नायिका ( या लेखकाच्या दृष्टीनं अत्यंत सोयिस्कर अशा ) रोगाला बळी पडलेल्या तुम्ही पाहिल्या असतील. कथा–कादंबऱ्यांत स्मृतिनाशाची फॅशनच मधें आली होती. आणि या फॅशनप्रमाणेंच दुसरी फॅशन 'सायको-ॲनॅलिसिस'ची! शास्त्रीय चिकित्सेच्या दृष्टीनं स्मृतिनाश आणि 'गंडधारणा' ( न्यूरोसिस ) या दोन्ही रोगांची कल्पना अजून तावूनसुलाखून निघायची आहे. तर्काला पटण्यासारखं त्यांचं स्वरूप अजून सिद्ध करतां आलेलं नाहीं. ज्याचा स्मृतिनाश होतो त्या माणसाला गतायुष्यांतील एकूण एक गोष्टी आठवेनाशा व्हायला हव्यात परंतु तसं घडत नाहीं. पूर्वायुष्यांतल्या कांहीं विवक्षित गोष्टींचा पट्टा तेवढा रोग्याच्या स्मृतींतून निखळतो. म्हणजे त्याच्या स्मरणाच्या पेटींतल्या कांहीं वस्तूंची तेवढीच चोरी होते, बाकीच्या पेटींत

शाबूत रहातात. कथालेखाच्या दृष्टीनं ही गोष्ट फारच सोईची आहे. आणि म्हणूनच कथा–वाङ्मयांतल्या बऱ्याच पात्रांना हा रोग चटाचट जडला. पण शास्त्राच्या दृष्टीनं हें सारं अद्भुत ठरतं. आणि रोगाची कल्पनाच मुळांत अशास्त्रीय असल्यामुळं म्हणजे गतायुष्यांतल्या किती गोष्टी स्मरणांतून निखळून पडायच्या, कां आणि केव्हां निखळायच्या; आणि त्या पुन्हां एकदम माणसाला केव्हां आणि कां आठवूं लागायच्या, याबद्दल शास्त्रीय सिद्धान्त अगर उपपत्ति कोणीच सांगत नसल्यामुळं लेखकाला आपल्या कथेंतील पात्राची स्मृति वाटेल तेव्हां, वाटेल तेवढीच कापण्याची आणि तो कापलेला भाग पुन्हां वाटेल तेव्हां जोडण्याची संपूर्ण सवलत असल्यामुळें त्याच्या त्या करण्यांत कसब मुळींच रहात नाहीं. कथानकांत चमत्कृति उत्पन्न होते; पण कल्पकतेचं चातुर्य मुळींच उरत नाहीं. त्याला सवंगपणाचं रूप येतं !

आणि 'सायको–ॲनॅलिसिस' चं प्रकरणहि यापैकींच. हें शास्त्र मुळांतच इतकं ठिसूळ आहे, कीं त्याचा आधार घेऊन कथानकांत चमत्कृति आणण्यांत लेखकाच्या चातुर्याला मुळींच व्यायाम घडण्यासारखा नसतो. कोणत्याहि पात्राला कसला तरी 'गंड' असल्याचं दाखवावं, त्याच्या आत्मनिवेदनाचं चऱ्हाट वळावं, गंड नाहींसा झाल्याचं दाखवावं, आटपला कारभार ! साराच पोरखेळ ! हिल्टनच्या 'नथिंग सो स्ट्रेंज' मधील नायकाच्या रोगाचं व रोगमुक्ततेचं चित्रण व प्रस्तुत 'अरायव्हल अँण्ड डिपार्चर' कादंबरींतील नायकाच्या मनाची गुंतागुंत व त्या गुंतागुंतीची उकल, यांचं चित्रण म्हणजे असला पोरखेळ आहे. या पोरखेळाचं कौतुक मुळींच करावंसं वाटत नाहीं. भुताटकीला जसं कांहीं बंधन नाहीं, तसंच या 'सायको ॲनॅलिसिस' ला व त्यावरील उपचाराला तर्काचं बंधन नाहीं. लेखकानं मन मानेल त्याप्रमाणं कल्पना करावी, पेंचप्रसंग निर्माण करावा, तो सोडवावा. सिद्धान्त नाहींत, नियम नाहींत. कायदा नाहीं ! आर्थर कोएस्लरनं तर प्रस्तुत कादंबरींतच मानसोपचाराची फार मार्मिक चेष्टा एके ठिकाणीं केली आहे. डॉक्टर सोनिया बॉलगार हिचा वाचकांना परिचय करून देतांना तो लिहितो, "लोकांना या बाईविषयीं आकर्षण वाटावं याला आणखी एक कारण होतं. तें कारण म्हणजे तिचा धंदा. मानसमंथन

शास्त्रांतली ती एक तज्ज्ञ होती. या शास्त्राचं थोडक्यांत वर्णन असं करतां येईल, कीं जें अनाकलनीय तें अगदीं उघड आहे. असं सांगण्याचं आणि सारासार विचाराला जें उघड आणि साधं वाटतं, त्याभोंवतीं शब्दावडंबराच्या साहाय्यानं रहस्याचं वलय निर्माण करण्याचं तें एक शास्त्र आहे."

पण 'अरायव्हल अँड डिपार्चर' मधला सायको-ॲनॅलिसिसचा, आणि पीटरच्या आत्मनिवेदनाचा हा कौशल्यशून्य आणि (मला) हास्यास्पद वाटणारा भाग सोडला तर, या कादंबरीचा सरसपणा निर्विवाद आहे. पीटर स्लाव्हेक तटस्थ देशांत येतो, राहतो, आणि जातो, एवढ्याच घटनेची ही साधी गोष्ट आहे. पण या साधेपणांतच सौंदर्य आहे. पीटर तटस्थ देशांत आला आणि कांहीं दिवसांनीं गेला, या मधल्या दिवसांतली तेवढी हकीकत कादंबरींत आलेली आहे. पण 'अरायव्हल अँड डिपार्चर' हें तिचं नांव केवळ पीटरलाच अनुलक्षून नसून डॉक्टर सोनिया बॉलगार आणि ओदेत या दोन मुख्य पात्रांना लागू आहे, हें स्पष्ट दिसतं. कारण त्या दोघीहि अशाच आलेल्या व गेल्या आहेत. किंबहुना असं म्हणतां येईल, कीं निरनिराळ्या दिशांनीं तटस्थ देशांत येणाऱ्या पीटर, सोनिया, आणि ओदेत या तीन व्यक्तींचीं योगायोगानं पडलेलीं गांठ व त्या गांठींभेटींत परस्परांच्या सहवासाचा त्यांच्यावर झालेला परिणाम हाच कादंबरींचा विषय आहे. भिन्नभिन्न व्यक्तींना कांहीं निमित्तानं एकत्र आणून त्यांच्या स्वभावांत निर्माण झालेले संघर्ष दाखवून कथानकाची सजावट करण्याची ही युक्ति नवीन नाहीं. या युक्तीनं रचलेल्या संविधानकांत नाट्य सहजासहजीं निर्माण होतं. स्थलकालाची एकताहि आपोआप साधते. नाटककार आणि कादंबरीकार या युक्तीचा अवलंब मोठ्या हौसेनं करतात. व्हिकिबाऊमच्या 'ग्रँड हॉटेलची' आठवण एक ठळक उदाहरण म्हणून तुम्हांला चटकन् होईल. 'अरायव्हल अँड डिपार्चर' या कादंबरींत पीटर, सोनिया, आणि ओदेत या तीन दिशांनीं आलेल्या तीन. व्यक्तींच्या स्वभावांचा एकमेकांवर झालेला परिणामच मुख्यतः लेखकानं दाखविलेला आहे. त्यानं आपल्या कॅमेऱ्याचा 'फोकस' हा परिणामावर—आणि विशेषतः पीटरवर लावलेला आहे. बाकीच्या गोष्टी फोकसच्या बाहेर आहेत, आणि मुख्य चित्राच्या अनुषंगानं आलेल्या गोष्टी आहेत. अर्थात् ही कादंबरी

घटनाप्रधान नाहीं. तिच्यांत स्वभावचित्रणाला प्राधान्य आहे. या चित्रणाच्या सौंदर्यावर कादंबरीची यशस्विता अवलंबून आहे. हें ओळखूनच लेखकानं ती लिहिली आहे. आणि या कादंबरीची गोडी तुम्हांला सांगायची तर स्वभावचित्रणाच्या बाबतींत लेखकानं जी करामत केली आहे तिच्याविषयींच मला बोललं पाहिजे.

पीटर, ओदेत, आणि सोनिया यांपैकीं पीटर हें मुख्य पात्र, आणि बाकीचीं दोन गौण पात्रें. त्याच्या विचार–विकारांना वळण देणाऱ्या दोन व्यक्ति एवढ्याचसाठीं सोनिया आणि ओदेत या स्त्रियांचं प्रयोजन आहे. या दोघींच्याहि सहवासांत पीटर येतो. दोघींच्याहि सहवासाचा परिणाम त्याच्या मनावर होतो. पण या परिणामाचं स्वरूप अगदीं भिन्न आहे. आणि ती भिन्नता अपरिहार्य वाटावी अशा धोरणानं त्या दोघींचीं चित्रं वाचकांच्या नजरेपुढं पहिल्यापासून उभीं करण्यांत लेखकाचं खरं चातुर्य दिसून येतं.

सोनिया म्हणजे एक जहांबाज बाई आहे. बुद्धिमति, शास्त्रपारंगत, नवमतवादी, नास्तिक, नीतिनियमांची व रूढीची थट्टा करणारी, आणि स्वैराचारिणी ! तिच्या या अंतरंगाला साजेसंच बाह्य रूप लेखकानं तिला बहाल केलेलं आहे. तिचा बांधा धष्टपुष्ट, उंचनीच. तिची चाल एखाद्या पुरुषासारखी निर्भय. शास्त्राचं अध्ययन, डॉक्टरणीचा धंदा, आणि बुद्धिप्रामाण्यवादाची घेतलेली दीक्षा, यामुळं तिच्या बोलण्या चालण्यांत स्त्रीसुलभ मार्दव नाहीं. लाडीक चाळे तर दूरच राहिले. कर्कशता आहे. स्वतःच्या विषयवासनेची तिला खंत नाहीं. ती लपविण्याचा तिचा प्रयत्न नाहीं. आपल्या प्रणयक्रीडे-साठीं नवं नवं भक्ष्य ती निःसंकोचपणानं शोधते. अशा या स्त्रीविषयीं पीटरच्या मनाची पहिली प्रतिक्रिया ही, कीं तिच्या कचाट्यांत सांपडतां कामा नये. सांपडलों कीं हिनं आपला घांस घेतलाच. पण परिस्थितीच अशी निर्माण झाली, कीं तिनं देऊं केलेला आश्रय पीटर नाकारूं शकत नव्हता. तो तिच्याकडे राहिला. आणि राहिला याचा अर्थ असा, कीं एखाद्या पुरुषानं बाई ठेवावी त्याप्रमाणं तिनं त्याला ठेवलं. या प्रेमप्रकारांत पीटरच्या मनाला आनंद होणं शक्यच नव्हतं. नव्हे, तो संबंध त्याला किळसवाणाच वाटण्यासारखा होता. त्याच्या लहानपणीं सोनिया बॉलगार त्याच्या आईकडे येऊन बोलत बसत

असे. तेव्हांच तिच्या पुष्टतेकडे आणि धिप्पाडपणाकडे पाहून त्याला वाटलं होतं, अरे बापरे ! आणि आतां जेव्हां तिच्या उघड्या मांड्या त्यानं प्रथम पाहिल्या तेव्हां त्याला कसली आठवण झाली ? लेखक लिहितो, " तिच्या त्या मांसल पुष्ट मांड्या पाहतांच कामुक इच्छेचे रोमांच त्याच्या अंगावर उभे राहिले. संभोगाची उत्सुकता विजेच्या लहरीप्रमाणें त्याच्या अंगांत थरारली. पण त्या भरीव रसरशीत मांड्यांकडे पाहून एका चमत्कारिक फुलाची हकीकत त्यानें ऐकली होती, त्या फुलाची त्याला आठवण झाली. हें फूल दिसायला फार सुंदर पण मोठें भयंकर असतें. त्याच्या सौंदर्याला भुलून किडे त्याच्यावर बसले, कीं तें आपल्या पाकळ्या हळूहळू मिटून घेतें, आणि किड्यांना खाऊन टाकतें ! "

परंतु सोनियाशीं पीटरचा एवढाच--फक्त शारीरिक संबंध आल्याचं लेखकानं दाखवलेलं नाहीं. शरीरभोगाच्या बाबतींत सोनिया जशी अलौकिक पातळीवर होती, तशीच तिची बुद्धि, शास्त्रनिपुणता आणि सायको-ॲनॅलिसिसच्या बद्दलची निष्ठा, या गोष्टीदेखील अलौकिक होत्या. सोनियाच्या कामुकतेच्या जाळ्यांत जसा तो प्रथम सांपडला, तसाच तिच्या मानसोपचाराच्या तडाख्यांतहि पुढं सांपडला. ओदेत एकाएकीं अमेरिकेला निघून गेल्यामुळं तो अर्धांगवायूनं आजारी झाला तेव्हां सायको-ॲनॅलिसिसनं त्याला बरा करण्याचं काम सोनियानं आपल्याकडे घेतलं. त्याच्या साऱ्या पूर्वस्मृति तिनं खोदून खोदून विचारून एक प्रकारें खणून बाहेर काढल्या. आणि त्याच्या मनांत गुन्ह्याची जी जाणीव खोल रुजली होती, ती मूर्खपणाची ठरवून उपटून टाकली. तिनं त्याच्यावर हें एक प्रकारचं ऑपरेशन केलं. ( सायको-ॲनॅलिसिसवाले या गोष्टीला 'ड्रीम सर्जरी' म्हणतातच. ) पीटरच्या मनांत लहानपणापासून मोठमोठ्या ध्येयाचं आकर्षण होतं, त्या ध्येयांकडे धांव घेण्याची इच्छा होती, आणि त्या प्रयत्नांत आपण कच खाल्ली, स्वपक्षाशीं द्रोह केला या जाणिवेचा न्यूनगंड त्याच्या मनांत तयार झाला होता. सोनियानं हें सारं झाडून टाकून त्याचं मन स्वच्छ केलं तिनं त्याला सांगितलं " बाबा, देव देश, धर्म हे सगळे अर्थशून्य शब्द आहेत, क्रांतीसाठीं त्याग करावासा वाटेल तेव्हां जरूर करावा पण त्यांत आत्मवंचना नसावी. आणि क्रांति घडवून आणण्याच्या कामीं आपल्या पक्षाला यश येणं अशक्य

आहे असं दिसून आल्यावर केवळ इमान राखायसाठीं पक्षांत राहूं नये. कारण त्यांत आत्मवंचना आहे, तूं पक्ष सोडलास, त्यांत एक मोठा अपराध केलास असं कां समजतोस ) ही मूर्ख समजूत टाकून दिलीस तरच तूं मनानं आणि शरिरानं धडधाकट होशील. राजकारणावर तुझा विश्वास राहिलेला नाहीं ना ? मग पुन्हां त्यांत पडूं नकोस, आपलं वैयक्तिक सुख साधण्याच्या मार्गाला लाग. "...याप्रमाणं त्याच्या मनांत वर्षानुवर्षं सांचलेली सारी अडगळ तिनं उचलून फेंकून दिली. शारीरिक संबंधांत ज्याप्रमाणं या बाईनं पीटरला एक धक्का दिला होता, त्याप्रमाणं हा एक बौद्धिक धक्का तिनं त्याला दिला. दोन्ही एक प्रकारचे बलात्कारच. एका बलात्काराचा जसा तिला विधिनिषेध नव्हता, तसाच दुसराहि बलात्कार निव्वळ शास्त्रीय भूमिकेवर तिनं केला होता.

असं हें कोएस्लरनं रंगविलेलं या बाईचं चित्र आहे. आणि हिच्याशेजारीं एक अगदीं भिन्न रंगाचं चित्र उभं करून लेखकानं विरोधाची शोभा निर्माण केली आहे. हें दुसरं चित्र ओदेतचं. सोनिया वयानं मोठी; तर ही ओदेत अगदीं कोवळी ! ती धिप्पाड, तर ही नाजूक. ती एखाद्या पुरुषासारखी जहांबाज, तर ही मृदु ! अबोल ! लाजरी ! स्त्रीसुलभ गुणांची पुतळीच ! सोनियाकडे पाहतांच पीटरच्या मनांत उठलेली पहिली प्रतिक्रिया दूर पळून जाण्याची, तर ओदेतला पाहातांच तिला घट्ट मिठींत धरण्याची ! या विरोधामुळं ओदेतच्या चित्रांत प्रारंभापासूनच आकर्षकपणा निर्माण झाला आहे; आणि पहिल्या झोंबाझोंबीच्या चमत्कारिक सलामीनंतर पीटर आणि ओदेत यांच्या परस्पर प्रेमाचं जें वर्णन कोएस्लरनं केलं आहे तें फार बहारीचं वठलेलं आहे. इतकं बहारीचं, कीं त्यांच्या प्रेमाचं आख्यान अवघ्या चारपांच आठवड्यांत आणि अवघ्या पंधरा पानांत आटपलेलं पाहून वाचकाचा विरस होतो. तथापि या छोट्याशा आख्यानांत पीटर आणि ओदेत यांच्या प्रणयविवशतेचीं एकाहून एक सुंदर वर्णनं जागोजाग विखुरलेलीं आहेत; आणि त्यांत वैषयिक उत्तानताच केवळ नाहीं, सुसंस्कृत उत्कटता आहे. उदाहरणार्थ, एके दिवशीं संध्याकाळीं नित्यक्रमाप्रमाणं पीटर आणि ओदेत तें एका हॉटेलमध्यें बसलेलीं असतांना त्यांच्यांत जो संवाद झाला तो ऐका.

" कां रे ? असा गप्प कां बसलास ? " ओदेतनं त्याच्या तोंडाजवळ तोंड झुकवून विचारलं, " काय झालं तुला ? "

पीटर म्हणाला, " कांहीं नाहीं. तूं खात असतांना तुझ्याकडे निरखून पहावंसं मला वाटलं. तुझ्या ओठांच्या आणि दांतांच्या हालचाली होतात, त्या मला आवडतात. तुझ्या साऱ्याच गोष्टी मला आवडतात. तुझ्या जिभेचें टोंक हळूंच चोरट्यासारखं पुढें येतं अन् तुझ्या ओठांतून दिसूं लागतं तें आवडतं. तुझ्या गुलाबी हिरड्याकडे पहावंसं वाटतं. तुझ्या ओठांत मादक मदिरा आहे. ती मला आवडते, तुझ्या तोंडांत तोंड घालावं, आणि ती आकंठ पिऊन शुद्धबुद्ध हरपून पडावं असं मला वाटतं. "

" शीः ! कांय गाढव आहेस रे ! " ओदेत हलकेच म्हणाली. तिनं आपलीं कोपरं टेबलावर टेकलीं आणि हातावर हनुवटी ठेवली. त्याच्या डोळ्यांकडे पाहण्याऐवजीं ओठांकडे नजर लावण्याची तिला चमत्कारिक संवय होती. आणि आतांप्रमाणं ती जेव्हां तोंडाशीं तोंड भिडवून पाहूं लागे, तेव्हां जवळपणामुळं तिच्या दृष्टींत तिरळेपणा येई. ती म्हणाली, " हें बघ, पेत्या ! ( पीटर या नांवाचा तिनं बनविलेला हा लाडका अपभ्रंश होता ) तूं मला फार फार आवडतोस. पण यावरून माझं तुझ्यावर प्रेम जडलंय् असं मात्र समजूं नकोस हं. निदान माझ्यावर तुझं आहे तितकं कांहीं माझं तुझ्यावर प्रेम नाहीं. "

ग्लास रिकामा करून पीटर म्हणाला, " नसलं तर नसलं. मी तर म्हणतों तुझं कमी आहे तेंच ठीक आहे. मालाचा पुरवठा वाढला कीं त्याची किंमत कमी व्हायची हा ठरलेला सिद्धांत आहे. तागडीची एक बाजू जड झाली, कीं दुसरी हलकी होऊन वर जायचीच ! माझं असेल नसेल तेवढं सारं प्रेम वजनांत तूं मला घालूं दिलंस, कीं मी अगदीं सुखांत असेन. "

" पण वेड्या पेत्या, दिल्लगी करणारा पुरुष असा अल्पसंतुष्ट नसतो. "

" हां, बस्स कर " पीटरनं ग्लासांत दारू ओतली, " आपण चिक्कार झिंगून पडूं या. "

यासारखाच सुंदर पीटर आणि ओदेत अल्पकालिकच ठरलेल्या प्रणयी जीवनांतला आणखी एक प्रसंग पहा.

२

" ती दोघे अंथरुणांतच किती वेळ तरी पडून राहिलीं होतीं. आपल्याच विचारांत मग्न झाल्याप्रमाणं तिची नजर किती वेळ तरी शून्य होती. तिच्या त्या तसल्या दृष्टीची पीटरला भीति वाटत असे. तो मध्येंच कांहींतरी बोलला कीं तिची ती नजर निवळत असे. परंतु लगेच तिच्या नजरेंत पहिला शून्यपणा दिसूं लागे. अखेर तिन्हीसांजा झाल्या. ती एकदम उठली, आणि मानेखालीं उशी घेऊन टेकून बसली.

" माणसानं खुशाल लढाईत मरावं, हा काय गाढवपणा ! "

तिच्या उघड्या खांद्यावर हात टाकून पीटर म्हणाला, " लढाईत मरायचं ठरवून का माणूस लढाईवर जातो ? "

" पण म्हणून काय झालं ? खुशाल मरायचं म्हणजे काय ? " एखाद्या लहान मुलाला शोभणाऱ्या हट्टानं ती म्हणाली, " मला जर पांच प्राण असतील, तर देशासाठीं, क्रांतीसाठीं किंवा अशाच दुसऱ्या गोष्टीसाठीं मी त्यांतले दोन देईन. फार तर तीन. पण पांचहि प्राण द्यायचे म्हणजे काय ? "

ती पुढं झुकली. तिचे गुडघे त्याच्या गुडघ्यांना लागले. त्याच्या तोंडाला तोंड भिडवून ती म्हणाली, " तूं खरंच का लढाईवर जाणार ? त्यापेक्षां माझ्याबरोबर कां येत नाहींस ? " आजपर्यंत तिनं भविष्यकालाचा उल्लेख कधीं केला नव्हता. पीटर तिला कांहींतरी म्हणणार होता. तितक्यांत ती मागं सरकली, आणि आपल्या नेहमींच्या आवाजांत म्हणाली, " पण तिनं हें काय भलतंच बोलणं काढलं ! चल, कपडे करूं या आणखी बाहेर जाऊं या. "

ती आपल्या पायांवर मोजे चढवीत होती, तेव्हां पीटर तिच्याकडे निरखून पहात होता. तिनं झगा घातला, तेव्हां कांहींशा नाराजीनं तो म्हणाला,

" आतां पाहिलंस, तूं एकेक वस्त्र अंगावर चढवते आहेस, आणि माझ्या नजरेपुढून हलके हलके नाहींशीं होत आहेस. आणि तुझं अस्सल रूप कसं आहे तें आतांशा कुठं मला कळायला लागलं आहे. " तो अंथरुणांत आडवा झाला आणि अर्धवट तिला व अर्धवट वरच्या कडीपाटाला सांगितल्याप्रमाणं बोलूं लागला. " ज्या स्त्रीवर आपलं प्रेम जडलेलं आहे ती संपूर्ण विवस्त्र झालेली अगदीं पहिल्यांदा दृष्टीस पडली, कीं केवढा धक्का

बसतो त्याची तुला कल्पना आहे का? ज्याचा अजून मुळींच परिचय झालेला नाहीं अशा शरिराला जें पूर्ण परिचयाचं झालेलं आहे असं आपल्या प्रेयसीचं तोंड जोडलेलं माणसाच्या एकाएकीं दृष्टीस पडतं! नग्न शरिरावर आरूढ झालेलं तें तोंडसुद्धां नेहमींहून कांहीं निराळंच भासूं लागतं. वाटतं तें देखील पार बदलून गेलं आहे, आणि आपल्याकडे बघून म्हणत आहे, 'माझी ओळख आहे असं तुला वाटलं होतं, नव्हे? पण वेड्या जें तुझ्या ओळखीचं झालं होतं, तें सत्य नव्हतं. सत्य हें आहे. बघ, नीट बघ.' आणि सगळ्यांत मनाचा गोंधळ उडविणारी गोष्ट ही, कीं समोर दिसणाऱ्या त्या नग्न शरिरांत जिव्हाळा काडीचा नसतो. एखाद्या जड वस्तूसारख तें वाटतं. आधीं आपण त्या नग्न शरिराचीं स्वप्नं रचलेलीं असतात, आणि आपण कल्पना केलेली असते, कीं, तें रहस्यमय असेल, आणि त्यांत लपलेल्या रहस्याचा उलगडा करण्यांत काव्य असेल. पण आतां त्याकडे पाहून आपल्याला वाटतं. ह्यँ, हा काय एक निर्जीव पुतळा आहे झालं! श्वास चालू आहे एवढाच फरक. आणि मग एकाएकीं आपल्या ध्यानांत येतं, कीं आपल्या प्रेयसीचं जें तोंड आपण हजारदां पाहिलं तें तिचं खरं तोंड नव्हे, या नग्न आकृतीचा खरा चेहरा दुसराच आहे. तिच्या स्तनांचीं टोकं म्हणजे त्या चेहऱ्याचे खरे डोळे होत. तीं स्तनाग्रं आपल्याकडे दुरून टवकारून पहात असतात. प्रथम आपल्याला तें सारं फार चमत्कारिक वाटतं पण हलके हलके या दुसऱ्या चेहऱ्याशीं आपली जानपछान होते..."

ओदेतचा पोषाख संपला होता, आणि ती बूट चढवीत होती. तिनं हसून विचारलं, "असं असं, मग तुझी नीट झाली आहे कीं नाहीं जानपछान?"

अशाप्रकारं पीटर आणि ओदेत यांनीं एकमेकांच्या सहवासांत जे थोडे दिवस काढले, त्यांचीं फार चटकदार वर्णनं कोएस्लरनं केलेलीं आहेत. त्यामुळं ओदेत जेव्हां अकस्मात् निघून जाते, तेव्हां तिच्यावांचून भकास वाटणाऱ्या तिच्या खोलींत वेड्याप्रमाणं उभ्या राहिलेल्या पीटरविषयीं वाचकाला उत्कट सहानुभूति वाटल्याखेरीज रहात नाहीं. ओदेतनं पीटरसाठीं जें लहानसं पत्र लिहून ठेवलेलं असतं, त्यांतला मजकूर वाचतां वाचतां पीटर-

प्रमाणंच त्याच्या डोळ्यांत अश्रु उभे राहणार नाहींत तो वाचक मोठ्या खंबीर मनाचा म्हणावा लागेल. ओदेतनं त्या पत्रांत लिहिलेलं आहे.

" मला जावं लागणार हें मला माहीत होतं. पण आपल्या सुखाच्या घटका नासाव्यात अशी माझी इच्छा नव्हती. आणि तुला कोणत्याहि प्रकारचा आग्रह करण्याचीहि नव्हती. आपली भेट पुन्हां होणं अगर न होणं तुझ्या हातांत आहे. पण तूं माझ्याकडे येणार असशील तर उशीर करूं नको. माझ्या आठवणींतली माझ्या लाडक्या पीटरची मूर्ति पुसट होऊं लागण्याच्या पूर्वींच ये. फार उशीर केलास तर तूं माझ्यापुढं उभा राहिल्या-बरोबर होय, हाच माझा पीटर म्हणून मी तुला एकदम मिठी कशी मारीन? तेव्हां उशीर करूं नको. लवकर ये. आणि तूं माझ्याकडे येणार नसलास तर–तर काय, माझी आठवण ठेव. आपण किती बोललों, किती हिंडलों त्याची आठवण ठेव. आणि हें बघ, त्या दुसऱ्या चेहऱ्याचीहि आठवण ठेव. तो तुला आवडला हें मला फार आवडलं होतं!"

सोनिया आणि ओदेत या दोन सर्वस्वी भिन्न रूपाच्या आणि भिन्न वृत्तीच्या स्त्रियांच्या सहवासांत पीटरनं अशाप्रकारं भिन्न भिन्न अनुभव घेतले. सोनियानं त्याच्या ठिकाणची पोरकट भावनोत्कटता नाहींशीं केली. ओदेतनं त्याच्या अंतःकरणाला प्रीतीचा चटका लावला. हे दोन संस्कार वरवर पाहतां भिन्न वाटले तरी वास्तविक ते भिन्न नाहींत. सोनियानं पीटरला शिकविलं, कीं ध्येय, पक्ष, निष्ठा, क्रांति इत्यादि पोकळ शब्दांच्या वल्गनांत कांहीं अर्थ नाहीं. माणसाचा यावरचा विश्वास उडाला कीं मग त्यानं त्यांचा खोटा हव्यास सोडावा, आपलं वैयक्तिक सुख साधावं. ओदेतनं पीटरला असलं कोणतंहि तत्त्वज्ञान पाजलं नाहीं. पण असल्या तत्त्वज्ञानाहून श्रेष्ठ असा प्रत्यक्ष अनुभव तिनं त्याला दिला. तो अनुभव प्रीतीचा. तिनं त्याला प्रीति करायला शिकवलं. सोनियाच्या आणि ओदेतच्या शिकवणुकींचा संकलित परिणाम पीटरच्या मनावर कोणता व्हावयास हवा? आपल्याला साहजिकच वाटतं कीं या दोन स्त्रियांच्या शिकवणुकींची गोळाबेरीज करून पीटर ओदेतकडे जाईल व आपलं पुढचं आयुष्य तिच्या सहवासांत कंठील. आपल्या या अपेक्षेला लेखकाकडून उत्तेजनहि मिळतं. पीटरनं अमेरिकेला जाण्यासाठीं बोटीवर जागा राखून ठेवली, उरलेले दिवस तो मोजूं लागला,

इत्यादि वर्णनं आपल्याला वाचायला मिळतात. बोट सुटण्याचा दिवस उजाडतो, पीटर धक्क्यावर जातो, बोटीवर चढतो, आपल्या केबिनमध्यें शिरतो. बोटीचा पहिला भोंगा वाजतो, दुसरा वाजतो. वाचकाला वाटतं, आतां काय चारपांच मिनिटांत बोट सुटेल आणि पीटर अमेरिकेच्या वाटेला लागेल.

पण लेखकानं या ठिकाणीं वाचकांना एकदम हुलकावणी दिली आहे. कादंबरीचा नायक पीटर आगबोटीच्या अखेरच्या भोंगा वाजणार, तोंच केबिनच्या बाहेर धांव घेतो, खालीं धक्क्यावर येतो, आणि लष्करी अधिकाऱ्यांना सांगतो, माझा बेत बदलला आहे, मला लष्करांत दाखल करून घ्या ! वैयक्तिक सुखाच्या मार्गानं जाण्याऐवजीं कोणत्यातरी उच्च ध्येयासाठीं आत्मार्पण करण्याच्या मार्गानंच पीटर अखेर गेला असं कोएस्लरनं दाखविलं आहे.

कोणी म्हणतील, कादंबरीची ही अखेरी तर्काला पटण्यासारखी नाहीं. मी म्हणेन; बरोबर आहे. ती तर्काला पटण्यासारखी नाहीं. पण म्हणूनच ती फार सुंदर आहे. कारण ती तर्कबुद्धीला पटणारी नाहीं असं तुम्हांला वाटावं हाच लेखकाचा हेतू आहे. मनुष्य निरनिराळ्या प्रसंगीं जें वर्तन करतो, त्या मागचे हेतु अगदीं सुव्यवस्थित असतात ही समजूत चुकीची आहे, शास्त्राचं तर्कट चालवून या हेतूंचं गूढ उकलण्याचा सायको—ॲनॅलिसिससारखा खटोटाप व्यर्थ आहे; मनुष्य शांत विचारानं सहसा वागत नाहीं, ऐन घडीच्या भावनेप्रमाणंच वागतो; तर्कशुद्ध प्रवृत्ति आणि अतर्क्य भावनांतून उद्‌भवणाऱ्या प्रवृत्ति वेगवेगळ्या आहेत; पहिल्या नव्हे तर दुसऱ्या प्रवृत्तीच माणसाच्या हातून कृत्यं घडवितात; या प्रवृत्ति जितक्या अगम्य आणि गूढ आहेत तितक्याच प्रभावी आहेत; आणि त्यामुळें आपलं आयुष्यक्रम ठरविण्याचं स्वातंत्र्य माणसाला नसून या गूढ हेतूंचा तो गुलाम आहे – अशा स्वरूपाची विचारप्रणाली लेखकाला 'सूचित' करायची आहे. नीट ध्यानांत घ्या, 'सूचित' करायची आहे. ही विचारप्रणाली त्यानं स्पष्ट शब्दांत मांडलेली नाहीं. 'वाचकहो' अशी हांक मारून त्यानं कुठंहि व्याख्यान झोडलेलं नाहीं. मात्र चाणाक्ष वाचकानें ती सहज ओळखावी अशाप्रकारं कादंबरीच्या शेवटीं त्यानं आपल्या नायकाला वागायला लावलेलं आहे. यांतच कादंबरीच्या सौंदर्याचं मर्म आहे.

हें सौंदर्य आणखीच खुलविण्यासाठीं कोएस्लरनं एक गंमत केली आहे. ती गंमत अशी, कीं कादंबरीचा प्रारंभ आणि शेवट यांचा सांधा त्यानं फार बहारीनं जुळविला आहे. ज्या वर्णनानं कादंबरीची सुरवात त्याच वर्णनानं तिची अखेर त्यानं केली आहे. वाक्यंदेखील बरोबर तींच ! जणू ज्या ठिकाणीं गोष्ट सुरू झाली त्या ठिकाणींच ती संपली. मध्यंतरी जें घडलं तें घडलं नाहींच ! किंवा घडलं तरी तें विरून गेलं. पाण्याच्या प्रवाहावर काठीचा तडाखा मारला, कीं उगीच क्षणभर तो दुभंगल्याचा भास होतो, परंतु लगेच त्याची जुळणी होऊन तो पुन्हां पहिल्याप्रमाणं आणि पहिल्याच दिशेनं वाहूं लागतो, त्या प्रमाणं पीटरच्या जीविताचा प्रवाह वाहूं लागला असं वाचकाला वाटेल, अशा बेतानं कादंबरीचा आरंभ आणि अंत लेखकानं साधला आहे.

स्वदेशांतून पळालेला पीटर एके दिवशीं पहांटे बोटीवरून समुद्रांत उडी घेतो या ठिकाणीं कादंबरीची सुरुवात होते. या सुरुवातीचं वर्णन पुढीलप्रमाणें आहे.

" तो तरुण मनाशीं म्हणाला, ' हं, चला, घ्या उडी ', आणि जणूं मुद्दाम नव्हे, तर तोल गेल्यामुळं शरीर वाकडंतिकडं पुढं झुकवून त्यानं उडी घेतली...बोटीच्या डेकपासून खालच्या पाण्याची काळीभोर सपाटी सुमारें तीन पुरुष होती. जें करायचं त्याचे सारे तपशील आधीं आजमविण्याचा त्याचा जिज्ञासू स्वभाव असल्यामुळं वरून खालीं पडायला आपल्याला एक पूर्णांक एक पंचमांश सेकंद लागतील, असा त्यानं हिशोब करून ठेवला होता. पण आतां त्याला वाटलं, कीं यापेक्षां कमीच वेळांत आपण खालीं आदळतों. ज्या क्षणीं गुडघे पोटाशीं धरून त्यानं आपलं अंग खालीं झोंकून दिलं त्या क्षणीं त्याच्या मनांत फक्त एवढाच विचार होता, ' हं,. चला घ्या उडी '. त्या शब्दांचा उच्चार त्यानं मनाशीं दोनदां केला होता. तितक्यांत खालच्या पाण्याचा मार प्रथम त्याच्या तळव्यांना आणि नंतर अधिक जोरांत त्याच्या मांड्यांना बसला होता. उडी टाकण्यापूर्वी एक लहानसं गाठोडं मेणकापडांत गुंडाळून तें त्यानं एका दोरीनं आपल्या मानेभोंवतीं बांधलं होतं, तें फाडकन त्याच्या तोंडावर आपटलं. काळ्या पाण्याची खळखळ त्याच्या कानांशीं झाली ती त्याला ऐकूं आली.

गाठोड्याच्या मारामुळं त्याच्या ओठांतून निघालेलं रक्त पाण्याच्या फेसांत मिसळलं होतं, तो फेस त्याच्या नाकातोंडांत शिरला. त्याला वाटलं आपण खालीं खालीं बुडत आहोंत. बोटीवरून पडतांना मधल्या मजल्यावरच्या केबिनमधला दिवा त्याला क्षणभर भोकांतून दिसला होता, त्याची त्याला आठवण झाली. तो पाण्याच्या पृष्ठभागावर पुन्हां आला तेव्हां त्यानं पाहिलं, तों आगबोटीची स्थिर काळीकुळकुळीत आकृति सुमारें नऊदहा हात मागं राहिली होती. ”

बरोबर याच स्वरूपाचं वर्णन कादंबरीच्या शेवटीं आहे. आणि तें लागू पडावं अशी चतुराईची योजना कोएस्लरनं केली आहे.

अखेरचा तिसरा भोंगा वाजण्यापूर्वीं पीटर बोटीवरून धांवला, खालीं धक्क्यांवर आला, आणि त्यानं लष्करी नोकरीसाठीं आपलं नांव नोंदविलं. यानंतर नक्की काय झालं तें कोएस्लरनं स्पष्ट सांगितलेलं नाहीं. इतकंच सूचित केलं आहे, कीं शत्रूच्या प्रदेशांत विमानांतून जाऊन छत्रीच्या सहाय्यानं खालीं उतरणाऱ्या वैमानिकांच्या तुकडींत पीटरला दाखल करण्यांत आलं. एके रात्रीं पीटरची तुकडी विमानांतून निघाली, आणि ठरलेल्या विवक्षित स्थळीं गेल्यावर इतर वैमानिकांबरोबर पीटरनं खालीं उडी ठोकली. कादंबरीच्या अखेरीस जें वर्णन आहे तें पीटरच्या या उडीचं. हें वर्णन करतांना प्रारंभींच्या वर्णनांतली शक्य तितकीं वाक्यं कोएस्लरनं पुन्हां लिहिलीं आहेत.

“ तो तरुण मनाशीं म्हणाला, ‘ हं, चला, घ्या उडी ’ आणि तोल गेल्याप्रमाणं शरीर वाकडंतिकडं पुढं झुकवून त्यानं उडी घेतली...त्यानं आपले गुडघे पोटाशीं दुमडून धरले होते, आणि तो गिरक्या घेत घेत अंतराळांतून खालीं येत होता...बोटीवरून उडी मारल्यावर काळ्या पाण्याचा मार त्याच्या तळव्यांना अन् मांड्यांना लागला होता त्या-प्रमाणेंच यावेळींहि त्याच्या मांड्यांना कसला तरी जोराचा तडाखा बसला. त्यानं पाहिलं तों कमरेला बांधलेल्या पट्ट्याच्या टोंकाची छत्री एखाद्या गोल डौलदार फुलाप्रमाणं त्याच्या डोक्यावर उलगडली होती. वर—खूपखूप वर—आभाळांत चांदण्या चमकत होत्या. खालीं पृथ्वी-

गोल स्तब्ध होता. जणूं तिथं माणसांची हालचाल नव्हती, घरंदारं नव्हतीं ! सारं शांत निःशब्द ! चांदण्यांच्या प्रकाशांत पर्वतांच्या काळ्या आकृति दिसत होत्या, त्या उघड्या बोडक्या चंद्रलोकावरच्या जळून राखुंडी होऊन गेलेल्या ज्वालामुखीसारख्या ! स्वतःच्या गतीमुळं पीटरला वाटलं, संबंध तारामंडळ हेलावत आहे, खालची पृथ्वी एकदां या कुशीला एकदां त्या कुशीला तिरपागडी होत आहे ! अंतराळांतून डौलानं हलकेच खालीं सरकणाऱ्या पुष्पाकार छत्रीच्या हिंदोळ्यावर पीटर बसला होता. त्याला एकदम आपल्या बालपणांतली एक आठवण झाली. त्याच्या आईच्या बागेंत दोन झाडांना बांधलेल्या झोपाळ्यावर तो असाच झोके घेत बसत असे. झोक्याची दोरी फांद्याना घासली कीं तिचा करकर आवाज होत असे. आणि पुढं माग झोके घेतां घेतां मोठेपणीं कोणकोणते पराक्रम करायचे त्याचीं स्वप्नं पीटर मनाशीं रंगवीत असे."

प्रारंभ आणि शेवट यांचा चातुर्यपूर्ण मिलाफ लेखकानं कसा केला आहे तें आतां तुमच्या लक्षांत आलं असेल. पण कोएस्लरचं हें चातुर्य मला विशेष कलात्मक ज्या कारणासाठीं-वाटतं तें तुम्हीं ओळखलं आहे कीं नाहीं कोण जाणे. गोष्टीच्या सुरवातीच्या व अखेरच्या वर्णनांच्या केवळ शाब्दिक साम्यावर मी भाळून गेलों नाहीं. या सारखेपणांत एक महत्त्वाचा खोल अभिप्राय आहे, व त्यावर मी खूष आहे. सुरवातीला आणि शेवटींहि पीटर अंतराळांत आहे. त्याचे पाय खालच्या पाण्याला लागलेले नाहींत, जमिनीला लागलेले नाहींत. तो मधेंच लोंबकळत आहे. आपण उडी कां घेतली तें त्याला निश्चित माहीत नाहीं. या उडीचे कोणते परिणाम होणार आहेत त्याचीहि त्याला स्पष्ट कल्पना नाहीं. पण त्यानं उडी घेतली आहे खरी. ती घेतल्यांवाचून राहवेना म्हणून घेतली आहे. उडी घेण्याचा त्याचा निर्णय तर्कसिद्ध नाहीं. तर्कबुद्धीप्रमाणंच वागायचं तर त्यानं उडी घेतलीहि नसती पण त्यानं ती घेतली. त्याच्या मनांत लपलेली कोणती तरी गूढ भावना म्हणाली, घे उडी, आणि त्यानं तात्काळ उडी घेतली...अशाप्रकारें उडी घेणारे पीटरच जगांत जिकडेतिकडे आहेत असं लेखकाला खचित सुचवायचं आहे. सायको—ॲनॅलिसिसच्या शास्त्राप्रमाणं ज्यांचं रेखीव विश्लेषण करतां येतं अशा विचार——विकारांच्या प्रेरणेनं मनुष्य वागत नाहीं

त्याच्या हातून बरी-वाईट वागणूक घडविणारे गूढ संकल्प निराळेच आहेत. माणसाचं प्रत्येक कृत्य म्हणजे पीटरनं घेतलेल्या उडीसारखं आहे. त्यामागचे संकल्प गूढ असतात, त्याचे पुढचे परिणाम ज्याचे त्यालाच कळत नाहींत. मधली उडी तेवढी स्पष्ट दिसते...

असें कांहींतरी अस्पष्ट पण गंभीर विचार 'अरायव्हल अँड डिपार्चर' या कादंबरीचं अखेरचं पान वाचल्यावर वाचकांच्या मनांत आलेच पाहिजेत.

या कलापूर्ण अखेरीप्रमाणंच कादंबरींत आणखी एक सौंदर्यस्थल आहे, आणि त्या स्थलाकडे नीट पाहिलं तरच नायक पीटर याचं स्वभावचित्र लेखकानं कोणत्या धोरणानं रंगविलं आहे, तें तुम्हांस समजेल. पीटर अखेर ओदेतकडे जात नाहीं. पण त्याचा अर्थ तो तिला सर्वस्वी विसरला असाहि नाहीं, किंवा त्याचं तिच्यावर प्रेम नव्हतं असंहि नाहीं. कोएस्लरनं असं दाखविलं आहे, कीं अखेर लष्करांत दाखल झाल्यावर पीटर ओदेतला एक मोठं पत्र लिहितो. या पत्रांतला कांहीं महत्त्वाचा भाग ऐकण्या-सारखा आहे.

"...मला आतां पुरतं कळलेलं आहे, कीं माझं तुझ्यावर फार प्रेम होतं' आणि मी जन्मभर तुझ्यावर प्रेम करीत राहीन आणि तरी मी तुझ्यापासून दूर जात आहें कां तें माझं मलाच कळत नाहीं...हें बघ ओदेत, लहान-पणीं आपण एक गंमतीचं खेळणं विकत घेऊन खेळतों तें खेळणं माहीत आहे तुला? तें खेळणं म्हणजे एक कागद असतो. त्या कागदाकडे नुसतंच पाहिलं, कीं वाटतं जांभळ्या आणि तांबड्या रेघा त्याच्यावर वांकड्या तिकड्या ओढल्या आहेत, दुसरं कांहीं नाहीं. पण त्या कागदाबरोबरच दुसरे दोन पारदर्शक रंगीत कागद मिळतात. त्यांतला तांबडा कागद रेघोट्यांच्या कागदावर ठेवला, कीं त्यावरच्या तांबड्या रेघा पार दिसेनाशा होतात, आणि जांभळ्या रेघांचं एक चित्र तयार होतं. कुत्र्याला उडी मारायला शिकविणाऱ्या विदुषकाचं तें चित्र असतं, पण तांबडा कागद काढला आणि निळा ठेवला, कीं निळ्या रेघा दिसेनाशा होतात आणि निळ्या रेघांचा बनलेला गर्जणारा सिंह दिसूं लागतो. मूळ कागदांत विदुषकाचंहि चित्र असतं सिंहाचंहि असतं. त्यांतलं कोणतं स्पष्ट दिसूं लागेल हें कोणता कागद आपण त्याच्यावर ठेवूं त्यावर अवलंबून. प्रत्येक व्यक्ति अशा भिन्न भिन्न

चित्रांची मिळून बनलेली असते. आणि त्यांतलं कोणतं चित्र केव्हां स्पष्टपणें प्रगट होईल हें कुणाला सांगतां येण्यासारखं नाहीं. "

ओदेतला पीटरनं लिहिलेल्या अखेरच्या पत्रांतलीं हीं वाक्यं किती सुंदर आहेत म्हणून मला कोणी विचारलं, तर मी सांगेन घटका दोन घटका एखादी रागिणी गाऊन मोठा नामांकित गायक अखेरची तान मारून जेव्हां ती संपवितो आणि त्या तानेंतील स्वर हवेंत विरले तरी आपल्या कानांत तरंगत राहतात त्या वेळेस ते स्वर जितके सुंदर वाटतात तितकींच हीं वाक्यें सुंदर आहेत !

* * *

# चित्रकलेंतील नग्नता !

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## जेम्स मॅकिंटायर

लंडन शहरांतील एका कॉफी हाऊसमध्यें थोड्याच दिवसापूर्वी एक नाट्यपूर्ण प्रसंग घडला.

पाश्चात्य देशांत चित्रकृतींच्या प्रदर्शनासाठीं जसे खास हॉल आणि गॅलऱ्या आहेत त्याचप्रमाणें हॉटेलांत आणि विश्रांतिगृहांत चित्रांची प्रदर्शनं मांडण्याची पद्धति बरीच रूढ झालेली आहे. कॉफी हाऊस या नांवाचं ट्रॅफलगार स्क्वेअर नजीकचं लंडन शहरांतील स्थळ अशा प्रदर्शनासाठीं प्रसिद्ध आहे. थोड्याच दिवसांपूर्वी जो नाट्यमय प्रसंग घडला तो याच स्थळीं !

त्याचं असं झालं, जेम्स मॅकिंटायर नांवाच्या एका तरुण चित्रकाराचीं चोवीस चित्रं ' कॉफी हाऊस ' च्या चालकांनीं प्रदर्शनासाठीं स्वीकारलीं आणि ती कॉफी घेण्याच्या हॉलमध्यें भिंतींवर लावून ठेवलीं. दुसऱ्या दिवशीं कॉफी हाउसमध्यें नोकरी करणाऱ्या तरूण परिचारकांनीं मालकाला साफ बजावलं कीं, " ही सारीं चित्रं सभ्य अभिरूचीला धक्का देणारीं आहेत. आणि यांतलं एक चित्र विशेषच उत्तान असल्यामुळें हें ताबडतोब काढून टाकलं तर ठीक, नाहींतर आम्ही सर्वजण नोकरी सोडून निघालों बघा ! "

जेम्स मॅकिंटायर याच्या त्या चित्रांत कांहीं समुद्राचे देखावे होते, परंतु बाकीचीं सारीं नग्न स्त्रीपुरुषांचीं चित्रें होतीं, आणि ज्या चित्रावर सर्व तरूण परिचारकांचा एवढा घुस्सा झाला होता त्या चित्रांत स्वीडनमधल्या एका रमणीय उपवनांत प्रेमिकांचं एक जोडपं संपूर्ण नग्न अवस्थेत हिरव्या तृणांकुरावर बागडत होतं !

एकजात सर्व परिचारकांनीं काम सोडून जाण्याची दहशत घातली तेव्हां कॉफी हाऊसच्या मालकानें तें विवक्षित नग्न चित्र भिंतीवरून काढून टाकलें.

ही गोष्ट समजल्याबरोबर चित्रकार जेम्स मॅकिंटायर दाण दाण पाय आपटीत कॉफी हाऊसमध्यें घुसला, रागारागानं बडबडला, आणि आपलीं सर्व चित्रं भिंतीवरून उतरून काढून काखोटीला मारून चालता झाला.

पुढें मालकानं त्याला भेटून त्याची समजूत घातली. त्याची विनवणी केली. तेव्हां उपवनांतील संपूर्ण नग्न प्रेमिकाचं चित्र वगळून बाकीचीं तेवीस चित्रं पुन्हा प्रदर्शित करण्यास मॅकिंटायरनं संमति दिली.

अशाप्रकारें ' कॉफीच्या पेल्यां ' तील हें वादळ शांत झालं.

परंतु या वादळाच्या निमित्तानं ' कला आणि अश्लीलता ' या बद्दलच्या उलट सुलट मतांच्या फैरी इंग्लंडमधील टीकाकार आणि कलाकार यांच्या वर्तुळांत जोरानं झडूं लागल्या आहेत; आणि जेम्स मॅकिंटायर याची चित्रकला व कलाविषयक मतं याजकडे जनतेचं लक्ष जोरानं वेधलं गेलं आहे.

"कॉफी हाऊसमधील" वादळासंबंधीं जेम्स मॅकिंटायर म्हणतो, कीं ह्या असल्या ढोंगी सोंवळेपणाचाच मला तिटकारा येतो. आणि ह्या ढोंगी सोवळेपणाशीं झटापट करण्याची प्रतिज्ञा मी केली आहे. माझ्या त्या चित्रांतील प्रेमिक संपूर्ण नग्न असल्याचं पाहून एवढं अकांडतांडव करण्याचं त्या पोरींना काय कारण होतं ? त्या स्वतः कधीं प्रेम करीत नाहींत ? प्रियकराबरोबर उपवनांत एकांत करीत नाहींत ? आणि तो करतांना माझ्या चित्रांतले स्त्रीपुरुष जसे संपूर्ण विवस्त्र अवस्थेंत वागडत आहेत तशा या पोरी वागडत नाहींत ? मला माहीत आहे. शपथेवर खरें तें सांगा असं म्हटलं तर, या पोरींना कबुली द्यावी लागेल कीं एकांत मिळाल्यावर प्रेमिक अशीच वागडतात. त्यांचा असला स्वैर विहार हेंच सत्य आहे ! पण या पोरींना सत्याचं दर्शन सहन होत नाहीं. आपणदेखील अशाच वागतों, याची कबुली देण्याचं धैर्य, यांच्या ठिकाणीं नाहीं. उजाडलेलं कळूं नये म्हणून कोंबडी झांकणाऱ्या म्हातारीप्रमाणें यांचं वागणं आहे. या पोरींचंच कशाला, सारा समजाचंच वागणं असं ढोंगानं भरलेलं आहे. पण या ढोंगाशींच मला झुंज करण्याची माझी इच्छा आहे. "

इंग्लंडमधील वृत्तपत्रांत या चित्रकाराचा उल्लेख ' अँग्री यंग पेंटर ' ( संतप्त तरुण चित्रकार ) अशा शब्दांनीं केला जात आहे. त्याचा आणि त्याच्या कलेचा कुणी कैवार घेत आहेत, कुणी धिःकार करीत आहेत.

मॅकिंटायरचीं नग्न चित्रं म्हणजे इंग्लंमधील कलाप्रेमी समाजाच्या चर्चेचा एक प्रमुख विषय सध्यां झालेला आहे. चित्रकलेंत संपूर्ण नग्नता असावी कीं नाहीं ? अशा नग्नतेनं सद्‌भिरुचीला धक्का बसावा कीं बसूं नये ? चित्र-कृतींतील संपूर्ण नग्नता अनैतिक आणि अश्लील मानावी कीं नाहीं ? इत्यादि प्रश्नावर गरम चर्चा आजपर्यंत अनेक वेळां झालेली होती, तिची पुन्हां एकदा जोरानं उजळणी होत आहे.

आपल्याकडेहि अशा प्रकारची चर्चा अधून मधून होत असते. नग्न स्त्रियांचं चित्रण करण्याची धिटाई आपल्याकडले चित्रकार सहसा दाखवीत नाहींत. तथापि कथासाहित्याचे निर्माते वारंवार सनातन्यांचा रोष स्वतःवर ओढून घेत असतात. स्त्रीपुरुषांच्या चुंबुना–लिंगनांचीं वर्णनं वाचल्याबरोबर संस्कृति रक्षक कृष्णराव मराठे प्रभृति मंडळी ‘ शान्तं पापं ! शान्तं पापं ! ’ असा ओरडा करतात, हा प्रकार आपल्या परिचयाचा आहे. साहित्यांत उत्तान शृंगार असावा कीं नाहीं. त्यानं समाजाच्या नीतीचा विच्छेद होतो कीं काय, असा उत्तान शृंगार नवसाहित्यांतच आहे कीं रामायण, भारत, भागवत यासारख्या जुन्या ग्रंथांतहि वैपुल्यानें आहे. इत्यादि गोष्टींची चर्चा आपल्याकडेहि प्रसंगोपात होत असते.

जेम्स मॅकिंटायर या चित्रकाराची कलाविषयक मतं आपल्याला मार्गदर्शक होण्यासारखी आहेत.

हा चित्रकार पुरता तीस वर्षांचादेखील नाहीं. परंतु त्याचं चारित्र, त्या चारित्राच्या ओघांत त्याला आलेले अनुभव, आणि त्या अनुभवांमुळें त्याचीं बनलेलीं कलाविषयक आणि जीवनविषयक मतं, या साऱ्याच गोष्टी ऐकण्या-सारख्या आहेत.

त्या कुणाला पटतील, कुणाला पटणार नाहींत. परंतु ज्यांना ज्यांना म्हणून चित्रकलेबद्दलची मर्मदृष्टि आपल्या अंगीं यावी अशी इच्छा आहे त्या सर्वांना ती मनोरंजक खचित वाटेल.

ज्याच्या नग्न चित्रांनीं सध्यां इंग्लंडमधें वादाचं वादळ उठविलं आहे, त्या जेम्स मॅकिंटायरवर लहानपणींच उद्योग करून पोट भरण्याची पाळी आली होती. अवघ्या चौदा वर्षांच्या ‘ जिमी ’नं ग्लासगो शहरांतील एका जहाज बांधण्याच्या कारखान्यांत रोजगार पत्करला. परंतु दोन वर्षांनंतर

त्यानं तो रोजगार सोडला आणि दक्षिण अमेरिकेकडे जाणाऱ्या एका गलबतावर चपराशाची नोकरी पत्करली. आपल्या आयुष्यांतल्या या खडतर दिवसांच्या आठवणी काढून जेम्स मॅकिंटायर म्हणतो, " माझी खरी वाढ झाली याच कष्टप्रद काळांत. माणसाचें व्यक्तिमत्व घडविणारा समुद्रासारखा दुसरा कुणी नसेल. तुफान समुद्रांतून वाट काढणाऱ्या खलाशांच्या संगतींत वावरण्याची आणि रहाण्याची वेळ माझ्यावर येण्याचा अवकाश, शरीरानंच नव्हे तर मनानंदेखील मी वाढलों. माझं दुबळं बालपण संपलं. मी मर्द जवान बनलों.

दर्यावर्दी जीवनाच्या या काळांत जेम्स मॅकिंटायरनं आपला फुरसतीचा वेळ चित्रं काढण्यांत घालविला. शिक्षकासाठीं तो अडून बसला नाहीं. त्याचा तोच शिक्षक बनला. ( नंतर पुढेंहि कधीं तो कोणत्याहि शाळेंत अगर गुरूकडे शिकला नाहीं. त्याची चित्रकला स्वयंसिद्ध आहे. ) समुद्राचं तांडवनृत्य आणि तुफान समुद्रावर विजय मिळवूं पाहणारा मनुष्य, या दोघांतील संघर्षाचा त्याच्या मनाला मोह पडला. दर्यावर्दी जीवनांचीं चित्रं रेखाटण्यांचा त्यानं सपाटा लावला. मॅकिंटायर म्हणतो, " ज्याला चित्रकार व्हायचंय् त्यानं दोन वर्षें तरी समुद्रावर अवश्य काढावी. त्याला चित्रकलेचं तंत्र आपोआप हस्तगत करतां येईल ! आणि शिवाय त्याला जीवन म्हणजे काय तें कळेल ! "

एकदां त्यांचं जहाज ऑस्ट्रेलियांतील सिडनी बंदराला लागलं तेव्हां ऑस्ट्रेलियन निसर्गाचे देखावे रंगविण्यासाठीं म्हणून तो किनाऱ्यावर गेला. चित्रं काढण्यांत तो इतका दंग झाला की, त्याला वेळेचं भानच राहिलं नाहीं. तो परत येऊन पाहातो तों जहाज बंदर सोडून निघून गेलं होतं !

मग स्वारी ऑस्ट्रेलियांतच दोन वर्षें राहिली. भटक्याचं जीवन कंठणाऱ्या त्याच्यासारख्या माणसाला इंग्लंड काय, ऑस्ट्रेलिया काय, दोन्ही सारखीच. कुटल्याहि देशांत रहावं आणि त्याच देशाला आपलं घर म्हणावं. पुढें त्यानं एका जहाजावर नोकरी धरली. तो हिंडूं लागला. एकदां कॅनडामध्यें त्यानें लोणचीं तयार करणाऱ्या एका कारखान्यांत नोकरी धरली. रोजगाराचे जे पैसे मिळत ते कॅनव्हास आणि रंग खरीदण्यावर खर्चावे आणि कारखान्यांत फुकट मिळणारीं लोणचीं खाऊन दोन वेळचं

१०८६९



जेवण करावं. त्या दिवसांची आठवण काढून मॅकिंटायर म्हणतो कीं, " त्या दिवसांत मीं इतकी लोणचीं खाल्लीं आहेत कीं, आतां माझ्या जेवणांत मला तिखटमीठ लागत नाहीं.

अशाप्रकारें थोडी थोडकीं नव्हे, आठ वर्षें भ्रमंती केल्यानंतर जेम्स मॅकिंटायर १९५२ सालीं इंग्लंडला परत आला, आणि 'चेल्सी'च्या चित्रकार वसाहतींत राहूं लागला. त्याच्या चित्रकृतीकडे लोकांचं लक्ष वेधलं गेलें. त्याची कीर्ति म्हणा, अपकीर्ति म्हणा, गेल्या सात वर्षांत खूपच वाढली आहे. चित्रकलेच्या क्षेत्रांत 'द्वाड बाळ' अशी पदवी त्यानं मिळविली आहे.

चित्रकलेबद्दलची या कलावंताचीं मतं विलक्षण बंडखोरपणाचीं आहेत. तो म्हणतो, " पुरुषाचं म्हणा स्त्रीचं म्हणा, नग्न चित्र काढायचं, आणि तें काढतांना पुरुषाच्या इंद्रियावर हळूच एक पान रंगवायचं, किंवा स्त्रीची लज्जा राखण्यासाठीं तिचा हात ऐन मोक्याच्या ठिकाणीं ठेवलेला दाखवायचा, हें शुद्ध ढोंगीपणाचं आणि भेकडपणाचं कृत्य आहे. नग्नता म्हटली कीं तिथें असली झांकापाक बिलकूल उपयोगी नाहीं. ती निखालस नग्नताच असली पाहिजे. अशा नग्नतेंत सौंदर्य तर आहेच, परंतु सत्यदेखील आहे. या सत्यावर आच्छादन घातलं कीं सत्यहि संपलं आणि सौंदर्यहि संपलं. संपूर्ण नग्नतेकडे नजर लावतांना लज्जा वाटायचं काय कारण ? ज्यांना लज्जा, भीड, संकोच वाटत असेल त्यांनीं नग्नतेच्या वाटेलाच जाऊं नये हें उत्तम ! खंडीभर कपड्यांनीं ज्यांनीं अंग झांकलीं आहेत अशा स्त्री-पुरुषांचींच चित्रं त्यांनीं बघावींत हें उत्तम ! तुर्की लोकांत वापरतात तसले सर्वांग झाकणारे बुरखे पांघरलेल्या स्त्रिया रंगवाव्या आणि बघाव्या ! अशीं सभ्य चित्रं काढायचीं म्हटलीं तर चित्रकाराला फार श्रमहि करायला नकोत. त्यानं नुसते पायघोळ दाखविले कीं पुरे ! त्या बुरख्यांत स्त्रिया रंगवायचं कांहींच कारण नाहीं. ज्यांना असल्या बुरख्यांनीं लपेटलेलीं वस्त्रं काढायचीं असतील त्यांनीं खुशाल काढावींत. जीवनांतल्या सत्यापासून दूर पळावं—माझा मार्ग निराळा आहे. मला जीवनांतल्या सत्याशीं भिडायचं आहे. त्यासाठीं माझी चित्रकला मला वापरायची आहे. नग्न स्त्री-पुरुषांचीं चित्रं मी काढणार आहे आणि तीं काढतांना माझा हात संपूर्ण नग्नतेच्या अलीकडे थांबणार नाहीं, चलणार नाहीं ! "

अशीं सडेतोड मतें बोलून दाखविणाऱ्या या चित्रकारानं जें एक चित्र नव्यानं रंगविलं आहे, त्या चित्राचा मथळा आहे ' नग्न मॉडेलच्या समवेत नग्न कलावन्त ' या मथळ्यावरूनच हें चित्र कशा प्रकारचं असेल याची कल्पना करतां येण्यासारखी आहे. हें चित्र पूर्ण होण्यापूर्वीच एका ' गॅलरी ' वाल्यानं त्याचं प्रदर्शन करण्यासाठीं तें ठरवून टाकलं आहे. हें अपुरं चित्र कित्येक टीकाकारांना आधीं दाखविण्यांत आलं आहे, आणि चित्राबद्दलचीं उलटसुलट मतं वृत्तपत्रांतून आधींच फडकूं लागलीं आहेत. हर्बर्ट फेलोज या नांवाचा टीकाकार म्हणतो, " चित्रकलेची खरी मर्मदृष्टि पाहाणाराला यावी यासाठीं त्याला वेळोवेळीं धक्के देणं आवश्यकच असतं हें मला कबूल आहे. परंतु रसिकाला धक्का देणं निराळं आणि त्याच्या डोक्यांत गदा घालून त्याचा मुडदा पाडणं निराळं ! " परंतु पॉल मॅक्के नांवाचा दुसरा एक टीकाकार म्हणतो, " मॅकिंटायरचं हें ' नग्न मॉडेल, नग्न कलावंत ' चित्र प्रदर्शित करण्याची खरी जागा एखादी बंदिस्त गॅलरी किंवा हॉल नव्हे. पिकॅडिली सर्कसच्या चौकांत ' ईरॉस 'चा जो पुतळा आहे त्याच्या गळ्यांत हें चित्र टांगायला हवं. असं केल्यानंच कलाकृतीकडे बघण्याची खरी दृष्टि लक्षावधि लोकांना येईल. "

आजपर्यंत नग्न स्त्रियांचीं चित्रं कांहीं थोड्या चित्रकारांनीं काढलेलीं नाहींत. कलावंत आणि त्याचं मॉडेल हा विषय आजपर्यंत अनेक चित्रकारांनीं हाताळला आहे. परंतु अशा चित्रांत कलावंतहि संपूर्ण नग्नावस्थेत असलेला दाखविण्याचं धाडस करणारा पहिलाच चित्रकार म्हणून मॅकिंटायरचा उल्लेख करावा लागेल. " तुम्ही मॉडेलप्रमाणेंच कलावंतहि नग्न दाखविला तो कशासाठीं ? " असा प्रश्न मॅकिंटायरला करण्यांत आला, तेव्हां तो म्हणाला, "आपल्या कलेपुढें उभं राहतांना लौकिक व्यवहाराचीं सारीं बंधनं कलावंतास टाकून दिलीं पाहिजेत. असं केल्याखेरीज तो आपल्या कलेशीं संपूर्ण अर्थानं एकरूप होऊं शकत नाहीं. मॉडेल म्हणून चित्रकारापुढें उभ्या राहाणाऱ्या स्त्रीनं ज्याप्रमाणें निखालस विवस्त्र झालं पाहिजे, त्या प्रमाणेंच तिच्या नग्नतेचं चित्रण करणाऱ्या कलावंतानंहि निखालस विवस्त्र झालं पाहिजे."

मॅकिंटायरचीं हीं नग्न चित्रं इकडे भारतांत आलीं आणि त्याचं प्रदर्शन झालं तर काय घडेल याची कल्पनाच केलेली बरी !

* * *

# ' स्वैरिणी '

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## हॉवर्ड स्प्रिंग

एका उदयोन्मुख तरुण इंग्रज नाटककारानं एक नवं नाटक लिहिलं. त्या नाटकाचा एक खाजगी प्रयोग झाला, त्यावरून नाटककर्त्यांची, नाटकांत काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांची, निमंत्रित प्रेक्षकांची, प्रयोगास हजर राहिलेल्या टीकाकारांची, आणि नाटकांत पैसे गुंतविणाऱ्या धंदेवाईक पैसेवाल्यांचीदेखील खात्री झाली कीं, लंडनच्या वेस्ट एन्ड विभागांतल्या थिएटरांत हें नाटक लावलं तर धंद्याच्या दृष्टीनं यशस्वी ठरेल. एका प्रमुख मॅनेजरनं या नाटकासाठीं थिएटर गुंतविलं. नाटककाराशीं नटनटींशीं जरूर ते करार केले, नाटकाच्या तालमी जोरांत सुरू झाल्या. नायिकेच्या कामासाठीं ज्या नव्या नटीची योजना झाली होती, तिचं सौंदर्य असामान्य होतं, आणि सौंदर्याच्या तोडीचंच तिचं अभिनयकौशल्य होतं. या नाटकांतलं तिचं काम पाहिल्याबरोबर इंग्रजी रंगभूमीवर एक नवी स्वरूपसुंदर आणि अभिनयकुशल नटी उदयाला आली असा तज्ज्ञांचा अभिप्राय पडेल याविषयीं ज्यांनीं ज्यांनीं खाजगी प्रयोगांतलं तिचं काम पाहिलं त्यांची त्यांची खात्री होती. तिच्या कामामुळें हें नाटक गाजणार होतं, आणि तें लिहिणाऱ्या तरुण नाटककारालाहि मोठीच कीर्ति मिळणार होती. नाटकाच्या तालमी अत्यंत उत्साहानं चालल्या होत्या. नाटकाची जाहिरातहि साऱ्या प्रमुख वृत्तपत्रांत जोरानं चालू होती. लंडन शहराची नाटकी दुनिया नाटकाचा प्रयोग पहावयास अत्यंत उत्कंठ झाली होती.

परंतु मनुष्य ठरवितो एक, आणि दैव घडवितं दुसरंच !

नाटकाच्या पहिल्या जाहीर प्रयोगाच्या दिवशींच एक अत्यंत दुःखपूर्ण घटना घडली !

एका विचित्र प्रसंगामुळें नायिकेचं सौंदर्य पार नष्ट झालं ! तिचा चेहरा विद्रूप झाला ! तिचं लावण्य संपलं !

ज्या नव्या नाटकाचा पहिला जाहीर प्रयोग होणार होता त्याची अशा प्रकारें अकस्मात् शोकांतिका झाली. नाटककाराच्या महत्त्वाकांक्षेचा चक्काचूर झाला ! नायिकेचे मनोरथ धुळीस मिळाले !

'किती दारुण दुःखाची घटना ही !' असाच उद्गार कुणाच्याहि तोंडून खचित निघेल. परंतु ज्या नायिकेचं सौंदर्य अशा प्रकारें एका क्षणांत उध्वस्त झालं ती एक अत्यंत स्वार्थी, साहसी कठोर अन्तःकरणाची, गर्विष्ठ स्त्री होती असं आपल्याला कळलं तर? मग तिच्या विषयींची आपली अनुकंपा पूर्वीसारखी गाढ आणि निर्भेळ राहणार नाहीं. आपल्या मनांत येईल, स्वतःच्या मतलबासाठीं ज्याचा त्याचा बळी घेणारी ही स्त्री असेल तर मग तिला असं प्रायश्चित्त मिळालं हें न्यायाला अनुसरूनच झालं असं म्हटलं पाहिजे. परंतु त्या तरुण स्त्रीनं मतलबी, महत्त्वाकांक्षी, कठोर बनावं अशा प्रकारच्या परिस्थितींतच ती वाढली होती, लहानपणीं तिच्या वांट्याला दारिद्र्य आणि दुःख यांखेरीज कांहीं आलं नव्हतं, या दुःस्थितींतून डोकं वर काढण्यासाठीं ती सतत धडपडली होती व कठीण जगांतल्या वैषम्याशीं, अन्यायाशीं आणि संकटांशीं झगडण्याचं सामर्थ्य तिला फक्त परमेश्वरानं दिलेल्या लावण्यांत होतं, असं आपल्याला समजलं तर? मग आपल्या सहानुभूतीला पुन्हां थोडासा हेलकावा मिळेल, आणि तिच्या वांट्याला जी विद्रूपता आली तिच्याबद्दल आपल्या अन्तःकरणांत दया नव्हे पण निदान कींव तरी उत्पन्न होईल.

सारांश, अशा स्त्रीचं शब्दचित्र जितकं मनोहर तितकंच वाचकाच्या अन्तःकरणांत कौतुक, सहानुभूति, तिरस्कार अशा वेगवेगळ्या भावनांची खळबळ उडविणारं ठरेल; आणि हें शब्दचित्र रेखाटणारा जर विशेष कुशल असेल तर या स्वरूपसुंदर स्त्रीची कहाणी म्हणजे एक विलक्षण चित्तवेधक कादंबरी होईल.

* * *

होईल कशाला, प्रत्यक्षांतच झाली आहे. या कादंबरीचं नांव 'राशेल रोझिंग' असं आहे. हिच्या कर्त्याचं नांव हॉवर्ड स्प्रिंग असं आहे. 'राशेल रोझिंग' या कादंबरींत कथारचनेचे, स्वभाव-रेखाटनाचे आणि शैलीचे जे अनेक गुण आहेत त्यांची विस्तारानं चर्चा करण्यासारखी आहे.

या जगांत पुरुषाप्रमाणेंच स्त्रियांचेहि परोपरीचे नमुने आढळतात. सुष्ट–दुष्ट, प्रेमळ–कठोर, स्वार्थी–परोपकारी, अल्पसंतुष्ट–महत्त्वाकांक्षी, ममताळू-कजाग, पापभीरू–दुराचारी, अशा अनंत तऱ्हांच्या स्वभावांनीं स्त्रीसृष्टि गजबजलेली आहे. आणि त्यांचं चित्रण ललित लेखकांनीं नाटकांत, कादंबऱ्यांत, गोष्टींत केलेलं आहे. सद्‌गुणी स्त्रीचं चित्रं तेवढं विहित मानावं आणि दुर्गुणी स्त्रीचं निषिद्ध मानावं असा पंक्तिप्रपंच ललित लेखकाला मान्य नाहीं. [illegible] लेखणी चांगली स्त्री रंगवितांना जितकी रंगते तितकीच वाईट [illegible] चित्रांतहि रंगते.

[illegible] गोष्ट मात्र लक्षांत घ्यावयास हवी. ती ही कीं कजाग, दुष्ट किंवा स्वैरिणी स्त्रीचं शब्दचित्र वाचकांना पटेल आणि आवडेल अशा प्रकारें काढतांना लेखकाचं कसब अधिक कसाला लागतं. याचं कारण कदाचित् असं असेल कीं, सुंदर, सद्‌गुणी, प्रेमळ स्त्री वाचकाला चटकन् आवडते; आणि त्यामुळें लेखकानं उभी केलेली तिची मूर्ति बघतांना व स्वीकारतांना तिच्या संभाव्यतेची विशेष चिकित्सा तो करीत नाहीं. ती त्याला हवीशी वाटते आणि म्हणून तिचं वर्णन तो तत्परतेनं ग्राह्य मानतो. नाटककार किंवा कादंबरीकार आपल्या कथेंतली मुख्य व्यक्तिरेखा जेव्हां निर्माण करतो तेव्हां ती ‘ सिम्पथेटिक कॅरेक्टर ’ ठरेल–म्हणजे जिच्याविषयीं प्रेक्षकांना किंवा वाचकांना चटकन् आत्मीयता वाटेल अशी ठरेल याची दक्षता त्याला घ्यावयाची असते. सुंदर, सद्‌गुणी स्त्रीची गोष्ट सांगतांना हें काम फारसं अवघड नसतं. शरीरानं विद्रूप किंवा मनानं विकृत अशा स्त्रीची कहाणी सांगतांना मात्र तिच्याबद्दल वाचकांच्या ठिकाणीं आत्मीयता उत्पन्न करण्यासाठीं लेखकाला विशेष परिश्रम करावे लागतात. वाईट स्त्रीचं स्वभावचित्र श्रोत्यांना अगर वाचकांना पूर्णपणें पटविणं म्हणजे लेखकाच्या कौशल्याला तें एक प्रकारचं आव्हान असतं.

असामान्य रूप आणि आत्यंतिक स्वार्थ व कठोरपणा यांच्या मिश्रणानं बनलेली, श्रीमंतीसाठीं आणि विलासासाठीं हापापलेली स्त्री म्हणजे इंग्रजी कथा-साहित्यांत तर एक ठरीव पात्र झालेलं आहे. अशा स्त्रीचं चरित्र अनेक इंग्रजी कादंबऱ्यांचा व चित्रकथांचाहि विषय झालेला आहे. तेव्हां हॉवर्ड स्प्रिंग यांच्या ‘ राशेल रोझिंग ’ या कादंबरीची नायिका राशेल म्हणजे

कल्पनेच्या दृष्टीनं एक अगदीं नवीनच पात्र आहे असं कांहीं म्हणतां येणार नाहीं. मग हॉवर्ड स्प्रिंगचं विशेष कौशल्य कशांत आहे ? या प्रश्नाचं उत्तर असं कीं तें राशेलच्या स्वभावरेखाटनांत आहे, आणि तिची जी चरित्रकथा लेखकानं तयार केली आहे त्या कथेच्या सुंदर रचनेंतहि आहे. कसं तें सांगतों.

* * *

जिनं लहानपणीं आत्यंतिक दारिद्य आणि त्या दारिद्यांतून निर्माण होणारी अनीतीची व घातपाताची दुर्गंधी भरपूर सहन केली आहे आणि पाहिली आहे, या गलिच्छ भोगांतून बाहेर पडायचं आणि श्रीमंतीचा आणि सुख विलासाचा उपभोग घ्यावयाचा अशी एक दुर्दम्य महत्त्वाकांक्षा जिच्या मनांत वाढली आहे, ही महत्त्वाकांक्षा साधण्यासाठीं अनुपम लावण्याची देणगी हेंच एकमेव साधन जिच्याजवळ आहे, आणि हें साधन वापरतांना कोणताहि विधिनिषेध बाळगायचा नाहीं अशी जिच्या मनाची तयारी झालेली आहे, अशी राशेल कादंबरीच्या प्रारंभीं हॉवर्ड स्पिंगनं वाचकांपुढें उभी केली आहे. परंतु श्रीमंती आणि सुखविलास मिळविण्याची राशेलची धडपड हा कांहीं सबंध कादंबरीचा विषय लेखकानं ठेवलेला नाहीं. मॉरिस बॅनरमन नांवाच्या एका कोट्याधीशाची व तिची गांठ पडते, तिच्या सौंदर्यावर तो लुब्ध होतो आणि तिला तो केवळ आपली प्रेयसी म्हणून मानीत नाहीं तर तिच्याशीं तो विधिपूर्वक लग्न करतो. लंडन शहरांतील बॅनरमनच्या एका भव्य प्रासादांत गृहिणी म्हणून राशेल प्रवेश करते. स्वप्नांत देखील जें वैभव आणि जें सुखविलास नव्हते त्यांची ती स्वामिनी होते. म्हणजे राशेलच्या धडपडीची कहाणी समाप्तच होते. परंतु हॉवर्ड स्प्रिंगच्या कथारचनेचं कौशल्य असं कीं ही कहाणी संपतां संपतांच तिच्यांतून एक दुसरीच कहाणी सुरू होते.

मॉरिस बॅनरमनची राशेल धर्मपत्नी झाल्यावर वास्तविक पुढें कांहीं मनोवेधक कथाभाग शिल्लक उरला असेलसं वाचकाला वाटत नाहीं. ज्याला ‘ पन्नाशीची झुळूक ’ लागली आहे असा गडगंज संपत्तीचा मालक मॉरिस बॅनरमन आणि जी नवतारुण्यानं मुसमुसत आहे अशी अलौलिक रूपाची राशेल या दोघांना ‘ नांदा सौख्य भरे ’ असा आशीर्वाद देऊन

मोकळं व्हावं असं वाचकाच्या मनांत येणं अगदीं साहजिक आहे. परंतु असा आशीर्वाद देण्याची घाई करतां कामा नये असं वाचकांना वाटावयास लावण्याची युक्ति हॉवर्ड स्प्रिंगनं हळूच योजलेली आहे कादंबरीच्या रंग-मंचावर त्यानं मॉरिस व राशेल यांच्या जोडीला आणखी एक पात्र आणून ठेवलेलं आहे. एका तरुण उदयोन्मुख नाटककाराचं हें पात्र आहे. याचं नांव जूलियन हीथ. एका खानदानी लॉर्डाचा हा मुलगा देखणा, हुशार, महत्त्वाकांक्षी, सुविद्य, मार्मिक आणि गोड बोलणारा, कुणालाहि चटकन् आवडावा असा ! अशा या जूलियनशीं राशेलचा परिचय तिच्या विवाहाच्या आधींच झालेला कादंबरीकारानं दाखविलेला आहे. ज्या ठिकाणीं राशेल कोट्याधीश मॉरिसची पत्नी होते त्या ठिकाणीं 'राशेल रोझिंग'चं कथानक संपण्याऐवजीं त्यांतल्या नाट्यपूर्ण भागाला खरी सुरुवात होते याचं कारण राशेल आणि जूलियन या दोघांचा परिचय घडतो हेंच आहे.

राशेलचं सौंदर्यच असं होतं कीं तें पाहिल्याबरोबर कुणीहि थक्क व्हावं. तरुण जूलियनवर त्याचा परिणाम व्हावा हें अपरिहार्यच होतं. परंतु त्याच्या मनांत ती भरली ती तिच्या रूपापेक्षांहि तिच्या ठिकाणचे ऐटबाज, रुबाबदार नाट्य बघून. तिचा व त्याचा परिचय नुकतांच झाला होता. तिचं मॉरिसशीं लग्न झालेलं नव्हतं, तेव्हां रात्रीच्या जेवणासाठीं ती बरोबर आली तर तिला घेऊन जावं या हेतूनं ज्या श्रीमंती हॉटेलांत ती रहात होती तिथल्या प्रतीक्षागृहांत वरच्या मजल्यावरून ती खालीं केव्हां येते याची वाट बघत जूलियन बसला होता. थोड्याच वेळांत जिन्याच्या पहिल्या पायरीवर आलेली राशेल त्याला दिसली, आणि एकेक पायरी उतरणाऱ्या राशेलकडे बघून तो स्मिमितच्च झाला. तो स्वतःशीं उद्गारला, " वाहवा ! या रूपगर्वितेचा केवढा ऐटबाज प्रवेश हा ! एखाद्या नाटकाचा पडदा वर गेल्याबरोबर मुख्य नटी जिन्यावरून हलके हलके पावलं टाकीत अशी येत असतांना प्रेक्षकांच्या दृष्टीस पडली तर ते तिच्याकडे श्वास रोखून पहात रहातील खचितच ! आणि नाटकाच्या अर्ध्या यशाची खात्री देतां येईल खास ! ही राशेल लावण्यसंपन्न तर आहेच ! परंतु ही जन्मसिद्ध नटीदेखील आहे ! "

* * *

या विचाराचं बीज जूलियनच्या मनांत अंकुरित व्हायला लागलं. एक नवं नाटक लिहायचं, आणि त्यांतल्या पहिल्या प्रवेशांत नायिका जिनावरून खाली येत आहे असं दाखवायचं. या कल्पनेचा ध्यासच त्यानं घेतला. राशेल जशी सुंदर आहे तशीच निश्चयी, महत्त्वाकांक्षी, स्वार्थी व कठीण अंतःकरणाची आहे हे तिच्याशीं त्याचा परिचय जों जों वाढला तों तों त्याच्या लक्षांत आलं, आणि आपल्या नव्या नाटकांत हुबेहुब याच स्वभावाची नायिका निर्माण करून तिच्याभोंवतीं एक चित्तवेधक कथानक गुंफतां येईल असं त्याला वाटूं लागलं. त्यानं भराभर नाटक लिहून काढलं. ज्यांनीं ज्यानीं तें वाचलं त्यांनीं त्यांनीं तें पहिल्या प्रतीचं ठरविलं. या नाटकांतली मुख्य नायिकेची भूमिका राशेलनं केली तर खरी बहार होणार होती. या गोष्टीला राशेलची अनुमति कशी मिळवितां येईल, आणि तिला रंगभूमीचा अनुभव मुळींदेखील नसतांना तिला कशी तयार करतां येईल हा मोठा प्रश्न होता. परंतु हा बिकट प्रश्न सोडविण्याची जबाबदारी एका व्यक्तीनं हौसेनं स्वतःकडे घेतली. ही व्यक्ति म्हणजे जूलियनची बहीण मिना.

या निमित्तानं कादंबरीच्या कथानकांत मिनाचं पात्र कादंबरीकारानं कौशल्यानं आणलं आहे, आणि ते आल्यापासूनच कादंबरीच्या खऱ्या रंगतीला सुरुवात होते. कोट्याधीश मॉरिस बॅनरमन, केवळ त्याच्या संपत्तीसाठीं त्याच्याशीं लग्न करणारी अप्सरातुल्य लावण्याची राशेल, नाटककार म्हणून कीर्ति मिळवूं पाहणारा एका मोठ्या लार्डाचा तरुण मुलगा जूलियन, अशा तीन पात्रांचा त्रिकोणच केवळ या कादंबरींत नाहीं. या तीन पात्रांच्या जोडीला चवथं महत्त्वाचं पात्र इथें आहे. तें म्हणजे जूलियनची बहीण मिना. कथानक त्रिकोणात्मक नाहीं, चौकोनी आहे. या चार पात्रांच्या एकमेकांविषयींच्या प्रतिक्रियांतून एकेक घटना निर्माण झाली असून अखेरचा शोकपूर्ण प्रसंग म्हणजे त्या सर्व घटनांचा परिपाक वाटतो. हीं चारीं पात्रं हॉवर्ड स्प्रिंगनं अत्यंत कौशल्यानं रंगवून वाचकांपुढें उभीं केलीं आहेत. कुणी सुष्ट आहेत, कुणी दुष्ट आहे. परंतु प्रत्येकाची स्वभावरेखा अशी कांहीं वैशिष्ट्यपूर्ण आणि आकर्षक वठली आहे कीं, त्यांत डावं उजवं सांगणं कठीण जावं.

मॉरिस बॅनरमननं अलोट संपत्ति मिळविली आहे. परंतु त्याला

व्यापाराचा कंटाळा आला आहे. निवांतपणें कुठं तरी मजेंत राहावं, आणि व्हायोलिन वाजविण्यांत निष्णात व्हावं किंवा लेखक व्हावं अशा कलात्मक ध्येयाची जी भूक लहानपणापासून त्याच्या स्वभावांत होती ती यथेच्छ भागवावी, कलावंतांचा सहवास जोडावा, पैसा रगड मिळविला आतां कलेच्या क्षेत्रांत मोठेपणा मिळवावा आणि मिरवावा असं मॉरिसला वाटूं लागलेलं असतं. त्याच्या मनांत ही क्रांति होते त्याच सुमारास राशेल त्याला योगायोगानं भेटतं. तिला बघतांच तिच्या सौंदर्यानें तो वेडा होतो. तिच्याशीं तो लग्न करतो. दारिद्र्यांतून व हालअपेष्टांतून वर डोकं काढण्यासाठीं राशेल धडपडत असते. सुखासाठीं आणि संपत्तीबरोबर मिळणाऱ्या निश्चिततेसाठीं वाटेल त्या थराला जाण्यापर्यंत तिच्या धडपडीची मजल गेलेली असते. अशा वेळीं तिला मॉरिस बॅनरमन भेटतो. तो आपल्याशीं विवाह करील असें तिच्या ध्यानींमनींहि नसतं. त्याची प्रेयसी म्हणून राहण्याची तिच्या मनाची तयारी असते. तो जेव्हां लग्नाची गोष्ट काढतो तेव्हां ती चकितच होते. आपलें दैव इतकं उघडेल अशी कोठून तिची कल्पना ? ती मॉरिसच्या म्हणण्याला रुकार देते आणि त्याची लाडकी गृहस्वामिनी बनते. नाटककार म्हणून कीर्ति मिळवावी अशा महत्त्वाकांक्षेनं ज्यूलियन झटत असतो, रखडत असतो अशा वेळेस त्याला राशेल भेटते, आणि त्याचा व तिचा परिचय वाढत जातो. जी एकदां मोठी नटी म्हणून गाजलेली आहे, परंतु अंगांत अलौकिक अभिनयगुण असूनहि जिला नटी म्हणून कीर्ति मिळविण्याची हौस नाहीं, आपल्या बापाच्या निसर्गरम्य बंगल्यावर राहून कांहींतरी उपयुक्त समाजकार्य करण्याची ओढ जिला अधिक आहे, अशी चळवळ्या, धडपड्या, स्वभावाची, निकोप प्रकृतीची, भावावर अतोनात प्रेम करणारी मिना आपल्या स्वच्छंदांत रमलेली असते, अशा वेळेस जूलियनबरोबर एके दिवशीं घरीं आलेली राशेल तिच्या दृष्टीस पडते, तिच्या सौंदर्यानं ती थक्क होते, जूलियनपेक्षांहि अधिक राशेलकडे आकृष्ट होते, तिची मैत्री संपादावी असं तिला फार वाटूं लागतं.

म्हणजे कादंबरींतलीं चार मुख्य पात्रं कोणकोणत्या परिस्थितींत आणि कोणकोणत्या भावनेनं एकमेकांकडे ओढलीं गेलीं आहेत पहा. हीं चार माणसं एकत्र आल्यामुळेंच त्यांच्या मनोधर्माचे उलटसुलट खेळ सुरू होतात,

आणि त्या खेळांतूनच नाना सुखदुःखांचे तरंग उठून शेवटीं शोक-प्रसंगाची एक विलक्षण लाट उठून फुटते !

* * *

मॉरिसचा सेक्रेटरी हार्टिंगन, जूलियनचा परममित्र चार्लि रोबक, जुलियनचा बाप लॉर्ड ऊफॅन्हॉन अशीं जीं दुय्यम पात्रं कादंबरींत आलीं आहेत त्यांचीं देखील चित्रं मनोवेधक वठलीं आहेत. तथापि वाचकांच्या मनांत अगदीं ठसून भरतात, अशीं मुख्य पात्रं चारच. राशेल, मॉरिस, जूलियन आणि मिना. राशेलविषयीं प्रेम, मतलबी वासना व यौवनसुलभ आकर्षण, प्रथम प्रीतियुक्त मैत्री आणि नंतर द्वेषयुक्त तिरस्कार अशा तीन तऱ्हांच्या तीन भावना अनुक्रमें मॉरिस, बॅनरमन, जूलियन हीथ, आणि मिना यांच्या मनांत उद्भवलेल्या हॉवर्ड स्प्रिंगनं दाखविलेल्या आहेत. त्या भावनांची वाढ अतिशय सुसंगत आणि चित्ताकर्षक रीतीनं दाखविली आहे, आणि या तीन भिन्न भिन्न भावनांचेच प्रवाह एकमेकांवर आपटून अखेरचा कल्लोळ कसा प्रकट झाला तें चित्रित केलं आहे. म्हणजे ' राशेल रोझिंग ' या कादंबरीची खरी रंगत आहे मुख्य चार पात्रांच्या स्वभावधर्मांच्या संघर्षांत.

मॉरिसशीं विवाहित होण्याच्या जरा अगोदर तिचा आणि जूलियन हीथचा परिचय व्हावा ही गोष्ट कथानकाच्या दृष्टीनं फार महत्त्वाची ठरते. त्याचप्रमाणें राशेलचा आणि मिनाचा परिचय झाला नसता, मिनाला तिच्याविषयीं आकर्षण वाटलं नसतं, पुढं या आकर्षणाचं रूपांतर तिरस्कारांत आणि द्वेषांत झालं नसतं तर राशेलच्या वांट्याला अखेरीस जी विद्रूपता आली ती आली नसती. जूलियन आणि त्याची बहीण मिना या भावंडांशीं राशेलचा संबंध आला नसता तर तिचं विवाहित आयुष्य सुखासमाधानाचं आणि इमानीपणाचं झालं असतं अशी खात्री कुणी द्यावी ! परंतु ज्या प्रकारचीं तिचीं सुखदुःखं या कादंबरींत वर्णिलेलीं आहेत त्यांहून सुखदुःखाची निराळी तऱ्हा तिच्या वांट्याला आलीं असती येवढं खास. या दृष्टीनं जूलियन आणि मिना, या दोघांच्या स्वभाववैशिष्ट्यांना महत्त्व आहे, आणि यांच्या प्रवेशप्रसंगांनाहि महत्त्व आहे. आणि कादंबरीकारानं मॉरिस व

राशेल यांच्याबरोबरच या दोन भावंडांचीं स्वभावचित्रं जशीं सफाईदार हातानं काढलीं आहेत, त्याचप्रमाणें त्यांच्या प्रवेश-प्रसंगांतहि मोठी कल्पकता दाखविली आहे.

* * *

नाटकांतल्या महत्त्वाच्या पात्राचा पहिला प्रवेशच प्रेक्षकाच्या मनांत भरण्यासारखा ऐटबाज व्हावा अशी काळजी नाटकारानं घ्यावी त्याप्रमाणें 'राशेल रोझिंग' मधली जूलियन आणि मिना हीं दोन महत्त्वाचीं पात्रं कादंबरींत आणतांना हॉवर्ड स्प्रिंगनं चातुर्य दाखविलं आहे. जूलियन आणि राशेल यांच्या पहिल्या भेटीचं वर्णन वाचतांना वाचक मनांत म्हणूं लागतो, आतां हा नेहमीच्या साच्याचा त्रिकोण होणार. परंतु तितक्यांत राशेलच्या पहिल्या भेटींत तिच्यावर अनुरक्त होणारी मिना वाचकासमोर येते, आणि राशेलच्या स्वैरतेविषयीं तिच्या मनांतला तिटकारा, मॉरिसच्या दिलदार स्वभावाविषयींचा आदर आणि राशेलच्या जाळ्यांत सांपडून दुराचारी बनूं पाहणाऱ्या आपल्या भावाला अधःपातापासून वांचविण्याची तिची तळमळ, या तीन भावना-जों जों मिनाच्या मनांत फोफावत गेलेल्या वाचकाला दिस-तात तों तों त्याची खात्री पटते कीं, हा नेहमींचा त्रिकोण मुळींच नाहीं, तर फार चतुराईनं उभा केलेला डौलदार चौकोन आहे. वाचकाला अखेरच्या शोकप्रसंगाची कल्पना अर्थातच करता येत नाहीं. परंतु विविध स्वभावांच्या चौरंगी सामन्यांत तो गुंगून जातो खास. त्याची खात्री पटते कीं मॉरिस आणि राशेल यांचीच केवळ ही कथा नसून जूलियन आणि मिना यांचीहि आहे. किंबहुना मॉरिस आणि राशेल हा या कथेचा कच्चा माल आहे, आणि त्याला प्रेक्षणीय आणि मननीय अशा कथाशिल्पाचा आकार दिला आहे तो मिना आणि जूलियन या बहीणभावांनीं ! इतकं या दोन पात्रांचं महत्त्व आहे. आणि म्हणूनच कादंबरीच्या रंगमंचावर या दोन पात्रांचा प्रवेश कादंबरीकारानं फार झोकांत घडविला आहे. 'राशेल-रोझिंग' या कादंबरीची रचना किती सुबक आहे तें दाखविण्यासाठीं हे दोन प्रवेशप्रसंग कांहींशा विस्तारानं सांगावेसे मला वाटतात.

'राशेल रोझिंग' ही कादंबरी म्हणजे स्वरूपसुंदर, स्वार्थी आणि

महत्त्वाकांक्षी राशेलची कहाणी आहे. परंतु ज्या श्रीमंतीसाठीं ती हापापली होती ती तिला कशी मिळाली याची कहाणी नव्हे, तर ती मिळाल्यानंतर तिच्या वांट्याला दारुण्य वैफल्य अकस्मात कसं आलं याची ही हृदयस्पर्शी कथा आहे. कादंबरीच्या अखेरीस राशेलवर जो विलक्षण दुःखप्रसंग ओढवला त्याचीं बीजं, तिची आणि नाटककार ज्यूलियन हीथची जी भेट झाली तिच्यांत आहेत. म्हणून या भेटीच्या प्रसंगाला कादंबरींत विशेष महत्त्व आहे, आणि हा प्रसंग घडविण्यांत आणि रंगविण्यांत हॉवर्ड स्प्रिंगनं मोठे मनोवेधक रंग भरले आहेत.

सहज योगायोगानं भेटलेली राशेल मॉरिस बॅनरमनला एकदम फार आवडली. केवळ प्रिय सखी म्हणून नव्हे तर लग्नाची बायको या नात्यानं तिच्या सतत सहवासाचा उपभोग घ्यावासा त्याला वाटूं लागला. राशेलला वश करतांना अगदीं पहिल्या प्रतीचे सर्व सुखविलास त्यानं तिला द्यावेत हें अगदीं साहजिकच होतं. ज्यांच्याजवळ द्रव्याची विशेष अनुकूलता नसते अशा प्रेमिकांना सुद्धां परस्पर अनुनयाच्या पहिल्या कल्पनारम्य अवस्थेंत सहविहाराची विशेष गोडी वाटते. मॉरिस तर कोट्याधीश होता. अगदीं उत्तमांतली उत्तम रोल्स राईस गाडी त्याच्या मालकीची होती. तिच्यांत राशेलला बरोबर घेऊन मॉरिस सुंदर सुंदर निसर्गरम्य स्थळांच्या सफरी करूं लागला.

अशा एका सफरींतच राशेल आणि जूलियन यांची पहिली भेट झाली!

पहाडी मुलखांतल्या एका अवघड वळणानं गाडी हाकीत असतां समोरून अकस्मात एक छोटी गाडी आली, ती मॉरिसला दिसली नाहीं. गाड्यांची टक्कर झाली आणि मॉरिसचा पाय इतका दुखावला कीं त्याला उभं देखील राहवेना. ताबडतोब डॉक्टरी इलाज करणं आवश्यक होतं. म्हणून असं ठरलं कीं मॉरिसच्या गाडीची ज्या छोट्या 'सनबीम' गाडीशीं टक्कर झाली तिच्यांतल्या दोघां तरुणांपैकीं एकानं मॉरिसला 'सनबीम' गाडींत घालून हॉस्पिटलमध्यें न्यावं, आणि दुसऱ्यानं मॉरिसची रोल्स राईस हांकून राशेलला हॉटेलमध्यें पोचवावं. या बेताप्रमाणें राशेल रोल्स राईसमधून निघाली. तिच्या शेजारीं बसून जो तरुण गाडी हांकीत होता त्याच्याकडे तिनं साहजिकपणें न्याहाळून पाहिलं. गाडीच्या चाकावरचे त्याचे हात,

शर्टच्या कफांचीं सोनेरी बटणं, हातावरचं सुबक घड्याळ, उंच बांधा, 'फर-गेट मी नॉट'च्या फुलासारखे निळेनिळे डोळे, कोरलेली मिशी ! त्याच्या एकंदर चर्येत, बसण्याच्या ऐटींत, पोषाखांत कुळाचा खानदानीपणा आणि वृत्तीचा बेफिकीर रुबाब प्रतिबिंबित झाला होता !

ऐटबाज तऱ्हेनं गाडी हांकतां हांकतां तो म्हणाला, थोडक्यांत निभावलं म्हणायचं ! एक मुडदा गाडींत घालून न्यायची वेळ माझ्यावर आली असती; पण माझं भाग्य असं कीं एका सुंदर तरुण मुलीला घेऊन मी चाललों आहें ! तुझ्या बापाला झालेली दुखापत— "

राशेल चटकन् म्हणाली " तो माझा बाप नाहीं. "

" ओ ! सॉरी. तुम्हां दोघांकडे पाहून मला वाटलं—"

" त्याचं आणि माझं कांहीं नातं देखील नाहीं. त्याचं नांव मॉरिस बॅनरमन, माझं नांव राशेल रोझिंग. "

" आणि माझं नांव जूलियन. "

" जूलियन ? एवढंच ? –समजा चेकवर सही करायची झाली तर– ? "

" चेकवर ? बापरे ! चेक लिहिण्याची वेळ कशाला येते आहे मला ? परंतु आली तर त्यावर सही करतांना जूलियन हीथ असं लिहावं लागेल मला."

* * *

अशा प्रकारें राशेल आणि जूलियन यांचं पहिलं संभाषण सुरू झालं. जूलियन्‌ला राशेलचं लावण्य पाहून तिच्याविषयीं वाटूं लागलेलं आकर्षण त्यानं लपवून ठेवण्याचा मुळींच प्रयत्न केला नाहीं. त्याच्या बोलण्यांत उघड उघड कौतुक होतं इतकंच नव्हे तर चतुर अतिप्रसंगीपणादेखील होता. तो आणि त्याचा दोस्त चार्ली रोबक लंडन शहरांतल्या गरीब वस्तींत एकत्र कसे राहत होते, नाटककार म्हणून नांव मिळविण्यासाठीं तो स्वतः आणि संगीत रचनाकार म्हणून लौकिक मिळविण्यासाठीं चार्ली दोघेहि कसे धडपडत होते, आज ते वनभोजनला कसे गेले होते व तिकडून येत असतांनाच हा अपघात कसा झाला होता, इत्यादि हकीगती सांगतांनादेखील स्वतःच्या स्वच्छंदी आनंदीपणाची छाप राशेलवर पडावी असा त्याचा हेतु स्पष्ट दिसत होता. तो म्हणाला,

" आज रात्रीं आमचा मुक्काम असेल प्रेस्टन शहरांत. उद्यां आमच्या स्वाऱ्या जातील लंडनमध्यें. माझ्या नांवाचं कार्ड असूं दे तुझ्याजवळ." खिशांतलं छापील कार्ड काढून तिच्यापुढें धरून तो पुढें म्हणाला, " तूं कधीं लंडनमध्यें आलीस आणि नोकर, निरोप्या, शिपाई, सोबती अशा कुठल्याहि नात्यानं माझी मदत तुला घ्यावीशी वाटली तर—ऊं: ! मी काय बोलतों आहे देव जाणें ! "

" मला तर कांहीं कळत नाहीं. "

" कळत नाहीं तेंच बरं आहे." मग त्यानं एकदम विचारलं, " आज रात्रीं तूं माझ्याबरोबर जेवशील काय ? "

" कां ? "

देखण्या पोरींना जेवणाचीं आमंत्रणं देण्याची जूलियनला संवय होती. परंतु कोणत्याहि पोरीनं ' कां ? ' म्हणून त्याला कधीं विचारलं नव्हतं. तो थोडासा चमकला, परंतु मग पुटपुटत म्हणाला, " कां म्हणून काय विचारते आहेस ? हेतु उघडच आहे. परिचय वाढावा, जानपछान व्हावी, आनंदाची घटका जवळ यावी म्हणून. "

" थँक्यू. पण तुझं आमंत्रण मला नाहीं स्वीकारता येणार. मला बॅनरमनकडे बघावं लागेल ना ? "

" नकार देऊन अगदीं काळीज कापतेस तूं माझं. मला वाटतं तूं माझ्याकडे लक्ष द्यावंस यासाठीं माझा पायच मोडून घेतला पाहिजे मला. "

" अगदीं बरोबर. परंतु तसं घडलं नाहीं तरीदेखील लंडनमध्यें आपली भेट होईल. "

" हें तूं वचन दिलंस असं मी समजतों. येशिल माझ्याकडे ? "

" येईन. "

" पण केव्हां ? मला वाटतं इथेंच सारी मेख आहे. "

" केव्हां तें नाहीं सांगतां येत. परंतु लवकरच येईन. मला आशा आहे, लवकरच ! "

त्यानें तिला हॉटेलांत सोडलं आणि बॅनरमनची गाडी ठेवण्याची व्यवस्था करून तो गेला. परंतु रात्रीचं जेवण तिच्याबरोबर करण्याची इच्छा कांहीं त्याला मनांतून घालवितां येईना. तिनं नकार दिला होता, परंतु पुन्हां

तिची आर्जवं केलीं तर ती हो म्हणेलहि अशी त्याला आशा वाटली. व्यवस्थित कपडे करून तो पुन्हा हॉटेलांत गेला आणि तिची वाट बघत हॉलमध्यें बसला. कांहीं वेळानं जिन्याच्या पहिल्या पायरीवर येऊन उभी राहिलेली ती त्याला दिसली. जेवणासाठीं तिनं कपडे केले होते, त्या वेळीं तिचं लावण्य विलक्षणच दिसत होतं. ती एकेक पायरी उतरूं लागली तेव्हां तिच्याकडे बघतां बघतां त्याच्या मनांत आलं. हिचा हा रुबाबदार प्रवेश एखाद्या नाटकाच्या आरंभीं घालण्यासारखा आहे खरा. ही नुसती रुपवती नाहीं, जन्मसिद्ध नटीदेखील आहे !

या प्रसंगींदेखील राशेलनं त्याचं जेवणाचं आमंत्रण स्वीकारलं नाहीं. परंतु नवं नाटक लिहिण्याची कल्पना जूलियनच्या मनांत पक्की रुजली आणि कादंबरींतील पुढच्या घटनांचीच एकप्रकारें तयारी झाली.

* * *

थोड्याच दिवसांनीं राशेलनं मॉरिसशीं लग्न केल्याची बातमी जूलियनला कळली. परंतु हें लग्न राशेलनं प्रेमासाठीं नव्हे तर पैशासाठीं केलेलं आहे ही गोष्ट जूलियनसारख्या चतुर तरुणाला कुणी सांगायला नको होती. त्याच्या स्वतःच्या मनांत तिच्याविषयीं अभिलाषा उत्पन्न झाली होती ती आवरण्याची गरज त्याला वाटली नाहीं. मॉरिस दुखणाईत होऊन अंथरुणावर पडला होता. राशेलनं आपल्याजवळ बसून न राहतां इकडे तिकडे हिंडावं, मजेंत वेळ घालवावा असं त्याला मनापासून वाटत होतं. यामुळें जूलियन आणि राशेल यांच्या गांठीभेटी वरच्यावर होऊं लागल्या. तिला तो मनापासून आवडला.

मग एके दिवशीं लंडनच्या उपनगरांतल्या ‘ मार्ल्यांम्स ’ नांवाच्या आपल्या बापाच्या मोठ्या बंगल्यावर जूलियन राशेलला घेऊन गेला. त्याची बहीण मिना राशेलला पहिल्यांदाच भेटली ती या प्रसंगीं !

मिना म्हणजे एक मोठी चमत्कारिक मुलगी होती. लहानपणापासून तिला नाट्याची आवड व अभिनयाची असामान्य देणगी. लंडनच्या रंगभूमीवर कांहीं नाटकांत मुख्य भूमिका करून लौकिकहि तिनं मिळविलेला. परंतु नटी होण्याची ईर्षा तिला नव्हती. बापाच्या निसर्गरम्य इस्टेटीवर

स्वच्छदानं राहावं आणि जमेल तें समाजकार्य करावं याची तिला अधिक हौस. स्वतःच्या सौंदर्याचे चोचले करावे, नटवेपणानं रहावं अशा वृत्तीचा तिच्या ठिकाणीं संपूर्ण अभाव. भावावर तिचं निःसीम प्रेम, आणि नाटककार म्हणून गाजण्यासारखे गुण त्याच्या अंगीं आहेत याबद्दल तिची खात्री. अशी ही जूलियनची बहीण मिना कथानकांत ज्या वेळेस प्रविष्ट झाली, त्याच वेळेस चांगल्या-वाईट घटनांचीं बीजं पेरलीं गेलीं. राशेलला बघितल्याबरोबर तिच्या लावण्यानं अत्यंत स्तिमित होऊन मिना जागच्या जागीं उभीच राहिली. ती म्हणाली, " बापरे ! जूलियन, इतकी अद्भुत स्त्री कुठें सांपडली तुला ? "

जूलियननं दोघींची ओळख करून दिली, आणि तो राशेलला म्हणाला, " माझ्या बहिणींच्या चालीरीति गावंढळ आहेत हें तुझ्या लक्षांत आलंच असेल. "

मिना आणि राशेल यांच्या भेटीच्या या पहिल्या प्रसंगाचं महत्त्व लक्षांत घेऊन लेखकानं दोघींचं वर्णन केलं आहे तें मुळांतून वांचण्यासारखं आहे.

* * *

ज्यांच्या स्वभावांच्या संघर्षांतून पुढच्या नाट्यपूर्ण घटना निर्माण होणार होत्या त्या दोघी स्त्रिया अशा प्रकारें प्रथम भेटल्या. दोघींहि आपापल्या परी चकित झाल्या. दोघींनाहि एकमेकींविषयीं विलक्षण आकर्षण वाटलं.

मिना राशेलला म्हणाली, " हा माझा खुळा भाऊ मला नेहमीं म्हणतो कीं तुला नटी व्हायचं असलं तर इथें या खेड्यांत राहून कसं चालेल ? नाटक कंपन्यांचे मॅनेजर काय इथें तुला शोधीत येतील ? तूं खरं म्हणजे लंडनला राहायला हवंस. परंतु शहरांत राह्यला मला नाहीं आवडत. रंगभूमीवर माझं प्रेम आहे. परंतु नाटकी जगांतले ते हेवेदावे, द्वेष, मत्सर, चहाड्या, ढकला ढकली याची मला किळस आहे. " तिनं राशेलकडे अगदीं निरखून बघितलं, आणि ती हंसून पुढें म्हणाली, " आतां तुझ्यासारखी लावण्याची अपूर्व देणगी मला असती तर गोष्ट निराळी होती. मग मी सरळ एखाद्या मॅनेजरच्या खोलींत गेलें असतें, आणि बाहेर पडलें असतें ती एका नाटकांतली मुख्य नटी म्हणून पसंत होऊनच ! "

राशेलनं खांदे उडवून म्हटलं, " इतकी सोपी आहे ही गोष्ट ? "

मिना चटकन् म्हणाली, " होय, तुझ्यासारखं सौंदर्य असल्यावर सारं सोपं आहे. "

अशा प्रकारें पहिल्या भेटींत मिना राशेलवर अगदीं खूष झाली.

आणि हॉवर्ड स्प्रिंगच्या प्रस्तुत कादंबरीची खरी रंगत कशांत असेल तर मिनाच्या या वृत्तींत झालेल्या फरकांत. राशेलविषयींची मिनाची अगदीं पहिली प्रतिक्रिया निर्भेळ आकर्षणाची आणि कौतुकाची होती. पण कादंबरीचं कथानक जसं जसं पुढें पुढें सरकतं तसं तसं हें आकर्षण आणि कौतुक पुसून टाकणाऱ्या विरोधी भावना मिनाच्या मनांत उत्पन्न होऊन बळावत जातात. राशेल म्हणजे एक तिरस्करणीय स्वैरिणी आहे असं तिला वाटूं लागतं. मिना आणि राशेल यांच्या स्वभावांतील संघर्ष हाच या कादंबरीचा खरा गाभा आहे.

राशेलचं सौंदर्य आणि तिचा विशिष्ट स्वभाव डोळ्यांपुढें ठेवून बरोबर त्या नमुन्याच्या स्त्रीविषयीं नवं नाटक लिहिण्याची कल्पना जूलियनच्या मनांत इतकी भिनली कीं ती मिनाला सांगितल्यावांचून त्याला राहावलं नाहीं. आणि मिनाला ती एकदम पसंत पडली इतकंच नव्हे तर जूलियनच्या या नव्या नाटकांतली प्रमूख भूमिका राशेलनं केली तर खरी बहार होईल अशी पुरवणी–कल्पना तिनं काढली. राशेलनं नाटकांत काम केलेलं मॉरिसला आवडेल काय, राशेल कितीहि सुंदर असली तरी तिला रंगभूमीचा कांहींच अनुभव नाहीं तेव्हां नाटकांतलं काम तिला जमेल काय, अशा शंका जूलियननं काढल्या तेव्हां तिनं त्याला सांगितलं, " नाटक लिहिण्याचं काम तुझं, तें तूं उत्तम प्रकारें कर म्हणजे झालं. मॉरिसची संमति मिळवायची, राशेलला नाटकी जगाची गोडी लावायची, तिला अभिनयाचं शिक्षण द्यायचं हीं सारीं कामें माझ्याकडे लागलीं. "

* * *

राशेलशीं अधिक मैत्री करण्यासाठीं कोणतं तरी निमित्त मिनाला हवंच होतं तें जूलियनच्या नव्या नाटकाच्या निमित्तानं तिला सांपडलं. शिवाय व्यावसायिक रंगभूमीविषयीं तिचं मत वाईट होतं, तथापि नाटकांत काम कर-

ण्याची हौस तिला होतीच, आणि जूलियननं लिहिलेल्या नाटकांत चांगली भूमिका मिळाली तर ती उत्तम वठविण्याची ईर्षा तिला वाटत होती. आपण आणि राशेल दोघींनीं मिळून नाट्यप्रयोगांत काम केलं तर मोठी बहार होईल असं तिला वाटलं. आणि मुख्य म्हणजे जी राशेल नुसतीच सौंदर्याची पुतळी होती तिला आपल्या हातीं घेऊन तिची निपुण नटी बनविण्याची एक नवीनच महत्त्वाकांक्षा तिच्या मनांत उद्भवली. अशक्य तें शक्य करून दाखविण्याची विलक्षण हौस या मिनाच्या स्वभावांत होती. 'Born crusader' अशा शब्दांत हॉवर्ड स्प्रिंगनं मिनाचं वर्णन केलं आहे. या वर्णनाचा अर्थ असा कीं सदासर्वदा कोणत्या तरी लढाऊ मोहिमेवर असणं हा मिनाच्या स्वभावाचा स्थायीभाव. राशेलला हातीं घेऊन तिला नटी करून सोडण्याच्या कल्पनेचं आकर्षण मिनाला वाटलं तें यामुळेंच !

मिना आणि जूलियन या दोघां बहीणभावांनीं राशेलच्या बाबतींत एक गोड गुप्त कट केला असं म्हणायला हरकत नाहीं. राशेलवर नाटक लिहिण्याचं जूलियननं ठरविलं. तिला नटी बनविण्याचं मिनानं ठरविलं, दोघंहि आपापल्या उद्योगाला जोरानं लागलीं आणि दोघांनींहि आपापलीं कामं अल्पकाळांत पुरीं केलीं. जूलियनचं नवं नाटक प्रथम चार्लि रोबकनं वाचलं, मग मिनानं वाचलं. दोघांनींहि तें पहिल्या प्रतीचं ठरविलं. लॉर्ड ऊपॅव्हॉन यांच्या इनामी गांवांतल्या 'मार्ख्योम्स' बंगल्यावर प्रतिवर्षी एक खाजगी नाट्यप्रयोग करण्याची प्रथा पांचपंचवीस वर्षे चालत आली होती. साहजिकच अशी कल्पना निघाली कीं 'मार्ख्योम्स' बंगल्यावर यंदाचा प्रयोग करायचा तो जूलियनच्या नव्या नाटकाचाच करावा. 'मार्ख्योम्स' येथील वार्षिक नाट्यप्रयोग जरी खाजगी उत्सवाच्या स्वरूपाचा असला तरी बोलून चालून एका मोठ्या लॉर्डाच्या इनामी गांवांतील समारंभ असे. लंडनमधले सारे बडे बडे स्त्रीपुरुष व नाटकी जगांतलीं महत्त्वाचीं माणसं त्या नाटकाला निमंत्रणावरून हजर रहात असत. जूलियन आणि मिना यांनीं असा विचार केला कीं या निमंत्रितांना नवं नाटक आणि त्यांतलं राशेलचं काम पसंत पडलं तर मग नाटकाविषयीं आणि राशेलविषयीं अधिक भरंवसा धरतां येईल, आणि लंडनच्या वेस्टएण्ड विभागांतल्या थिएटरांत नाटकाचे जाहीर प्रयोग करतां येतील. म्हणजे 'मार्ख्योम्स' बंगल्यावर होणारा नाट्यप्रयोग

चांचणी प्रयोगासारखा होता. या चांचणी नाट्यप्रयोगाची तयारी अगदीं हातघाईनं सुरू झाली. मार्ख्यॉम्स बंगल्याच्या आवारांतलं जुनं धान्याचं कोठार सजवून शृंगारून त्याचं थिएटर बनविण्यांत येत असे. देखावे तयार करण्याचं काम चार्लि रोबककडे सोपविलं गेलं. मिना आणि राशेल या दोघींकडे तर नाटकांतल्या प्रमुख भूमिकाच होत्या. स्वतः जूलियन नाटकांतल्या नायकाचं काम करणार होता. लॉर्ड उपॅल्हॉनदेखील या गमतींत दरवर्षी-प्रमाणेंच सामील होणार होते. खास त्यांच्यासाठीं म्हणून जूलियननं एक छोटीशी भूमिका टाकली होती.

सारांश, मार्ख्यॉम्स येथें होणाऱ्या नाट्यप्रयोगाच्या तयारीची मोठी दंगलच उडाली. नाटकांत काम करणाऱ्या सर्व माणसांनीं एकत्र राहणें आवश्यक वाटल्यावरून चार्लि, जूलियन, व राशेल मार्ख्यॉम्स बंगल्यांत राह्यलाच आलीं. नाटकाचा प्रयोग कल्पनेपलीकडे यशस्वी झाला. तो पाहणाऱ्या वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींनीं प्रशंसेचे कॉलमच्या कॉलम लिहिले. एका धंदेवाईक मॅनेजरानं वेस्ट एण्डमधील एका थिएटरांत नाटक लावण्याचं नक्की ठरविलं. मग काय विचारतां! जूलियनच्या आणि राशेलच्या उत्साहाला अगदीं भरती आली. जाहीर प्रयोगाची तारीख ठरली. ती जसजशी जवळ येत होती तसतसा जूलियनचा, राशेलचा आणि मिनाचा देखील उत्साह वाढत होता.

परंतु एकीकडे ही गोष्ट घडत असतांनाच कथानकांतल्या मुख्य पात्रांच्या एकमेकांविषयींच्या प्रतिक्रियांतहि झपाट्यानं बदल होत होता. नाटकाच्या पहिल्या जाहीर प्रयोगाची तयारी एकीकडे होत होती, तर दुसरीकडे पडद्याआड कितीतरीं नाटकं घडत होतीं. आणि त्यांचे परिणाम जूलियन, राशेल, मिना आणि अल्पांशानं मॉरिस या चौघांवरहि घडत होते.

हे परिणाम म्हणजे एक प्रकारचीं स्फोटक द्रव्यं होतीं. तीं बंदिस्त होतीं तोंवर सारं ठीक होतं. 'राशेल रोझिंग' या कादंबरीचा शेवटचा भाग वाचतांना वाचकांना स्पष्ट जाणीव होते कीं, चिन्हं कांहीं ठीक नाहींत, जें जें घडत आहे तें तें वरून वरून शांत, स्तब्ध, ठाकठीक दिसलं तरी त्याच्या उदरांत आग आहे. मात्र अखेरचा भडका कसा आणि केव्हां

उडणार आहे त्याची वाचकाला कल्पना करतां येत नाहीं. यामुळें जो विलक्षण शोकप्रसंग कादंबरीच्या अखेरच्या पानांत कादंबरीकारानं चित्रित केला आहे तो वाचतांना वाचकाला विलक्षण धक्काच बसतो. एका क्षणांत राशेलचं सौंदर्य नष्ट होतं! वज्राघातानं कोसळून पडणारं एखादं मंदिर प्रत्यक्ष बघितल्यासारखं वाचकाला वाटतं! परंतु या अवस्थेंतच वाचकाचं मन हळूच म्हणतं जें घडलं तें अटळ होतं. राशेलच्या वांट्याला एका क्षणांत आलेली केविलवाणी अवस्था बघून वाचकाचं अंतःकरण वायाळ होतं. कादंबरीची अखेरी जितकी प्रक्षोभक आणि विस्मयकारक आहे तितकीच ती अत्यंत सुसंगत वाटावी याची दक्षता हॉवर्ड स्प्रिंगनं घेतलेली आहे. या कादंबरीच्या सौंदर्याची अपूर्वाई बघायची असेल तर तिच्यांतल्या प्रमुख चार पात्रांच्या भिन्न भिन्न स्वभावांचं चित्रण लेखकानं केवढ्या कौशल्यानं केलेलं आहे, त्यांच्या परस्परांविषयींच्या प्रेम, राग, लोभ, द्वेष इत्यादि भावनांचा खेळ किती मनोवेधक रीतीनं रंगविला आहे तें बघायला हवं.

कादंबरीच्या अखेरीस जो दुःखप्रसंग घडला तो कां घडला? तर तिच्यांतील चार प्रमुख पात्रांच्या मनोवृत्ति विशिष्ट तऱ्हेनं पालटत गेल्या म्हणून. विशेषतः मिना प्रारंभीं होती तशी राहिली नाहीं म्हणून. तिचं राशेलविषयींचं पहिलं प्रेम पार नाहींसं झालं म्हणून. त्या प्रेमाची जागा द्वेषानं आणि तिरस्कारानं घेतली म्हणून मिनाच्या वृत्तींतलं हें स्थित्यंतर अत्यंत महत्त्वाचं आहे. या स्थित्यंतरामुळेंच अखेर ती राशेलचं वैर करूं लागते. राशेल स्वैरिणी आहे, तर मिना तिची वैरिणी बनली आहे.

नाटकाच्या निमित्तानं जूलियन, राशेल आणि मिना एकत्र आलीं तेव्हां त्यांच्या एकमेकांविषयींच्या भावना कशा होत्या, आणि जसेजसे दिवस गेले, नाटकाच्या जाहीर प्रयोगाची तारीख जवळ आली, तसंतसं त्या भावनांना निराळंच वळण कसं लागत गेलं तें पाहण्यासारखं आहे. 'माख्यॉम्स' बंगल्यावर होणाऱ्या नाट्यप्रयोगाच्या निमित्तानं सारी मंडळी एकत्र राहूं लागली तिथेंच भावनांच्या गुंतागुंतीला आणि विघाताला सुरुवात झाली. या विघातक गुंतागुंतीचं मुख्य कारण जूलियन व राशेल यांच्यांतील परस्पर

आकर्षणाला आलेलं भडक स्वरूप, आणि त्यांच्या प्रेमसंबंधाबद्दल मिनाच्या मनांत उत्पन्न झालेली घृणा हें होय.

जूलियनच्या नाट्यप्रयोगांतलं आपलं काम यशस्वी झालं तर नटीचा पेशा आपल्याला करतां येईल असं जेव्हां राशेलला दिसूं लागलं, तेव्हां तिच्या स्वैरतेंत स्वार्थी हिशेबाची भर पडली. श्रीमंतीच्या आणि सुखविलासांच्या उच्च सुरक्षित स्थानावर चढण्याची एक पायरी एवढ्याच दृष्टीनं तिनं मॉरिसचा उपयोग केला होता. पण आतां तिला आढळून आलं कीं, आपल्याला पायरीची कांहीं जरूर नाहीं. स्वतःच्या कर्तृत्वानं तें स्थान आपण मिळवूं शकूं. मॉरिसच्या रागालोभाची पर्वा आपल्याला कशाला हवी? त्याला खुशाल धुडकावून लावण्याचं सामर्थ्य आपल्यांत आहे. आपल्या जिवाला लागलेली जूलियनच्या प्रीतीची ओढ आवरण्याचं कांहीं कारण नाहीं.

तिच्या मनानं हा टप्पा गांठलेला असतांनाच नाटकाच्या तालमींच्या निमित्तानें ती आणि जूलियन 'मारव्यॉम्स' बंगल्यावर एकत्र राहूं लागले. त्यांचा सहवास अखंड घडूं लागला. एका श्रीमंत सरदाराच्या वैभवशाली बंगल्यांतलं वास्तव्य, भोंवतालीं पसरलेली सृष्टीची अपूर्व शोभा, आणि मन मानेल तसं वागण्याचं सहज मिळालेलं स्वातंत्र्य, इतक्या अनुकूल आणि उद्दीपक गोष्टी एकत्र झाल्यावर प्रेमिकांचा स्वैराचार वाढायला कितीसा उशीर लागणार? मॉरिस अजून दुखण्यांतून बरा झाला नव्हता तरी मारव्यॉम्स येथें जो नाट्यप्रयोग झाला तो पाहावयासाठीं लॉर्ड ऊपॅव्हॉन यांनीं त्याला आग्रह करून आणलं. मॉरिसचं येणं राशेलला आवडलं नाहीं. परंतु मॉरिस बंगल्यांत असला तरी देखील तिला स्वैराचार चालू ठेवतां आलाच.

यानंतर राशेलनं सारी मर्यादा सोडलीच. जूलियनच्या नाटकाचा जाहीर प्रयोग ठरला व त्याची तयारी सुरू झाली. राशेल आणि जूलियन यांचा प्रेमसंबंध मॉरिसच्या लक्षांत आला होता व तो लंडन शहरापासून दूर जाऊन राहिला होता. तिचं प्रेम आपल्यावर नाहीं, जूलियनवर आहे खरं, मग भांडणतंटा करण्यांत काय अर्थ आहे, होऊं दे तिची स्वैराचाराची होस एकदां पुरी, असा त्यानं विचार केला. त्याच्या लंडन येथील बंगल्यांत

राशेल एकटी राहूं लागली. परंतु जूलियनपासून दूर राहून तिला चैन पडेना, तेव्हां ती सरळ त्याच्या फ्लॅटवरच राहूं लागली.

* * *

एकदां कांहीं कामासाठीं मिना जूलियनच्या फ्लॅटवर आली. राशेल तिथें नव्हती. ती बाहेर गेली होती परंतु तिच्या वास्तव्याच्या खुणा मिनाला ओळखतां येत होत्या. ती भावाला म्हणाली, " अत्तराचा काय दरवळ सुटला आहे तुझ्या जागेंत. राशेल इथें असते काय ! " त्यानं विचारलं, " असली तर तुला आश्चर्य वाटेल काय ? " ती म्हणाली, " उलट नसली तर आश्चर्य वाटेल. " नंतरच्या संभाषणाच्या ओघांत तिनं विचारलं,

" त्या बाईत तुला एवढं काय आढळलं आहे ? "

" मिना, तुझ्या अंगीं इतर कोणतेहि गुणदोष असोत, परंतु तूं मूर्ख खचित नाहींस. मूर्खासारखे प्रश्न नको विचारूंस. "

" तुझं म्हणणं बरोबर आहे. ज्यावर पुरुषानं भाळावं असं तिचं सौंदर्य आहे खरंच. "

" बॅनरमनसारख्या कोट्याधीशानं तिला दारिद्र्याच्या गटारांतून उचलून घेतलं तें काय उगाच ! "

मॉरिसच्या उदार स्वभावाची खात्री पटल्यामुळें मिनाला तो आवडूं लागला होता व त्याच्याविषयीं तिला सहानुभूति वाटूं लागली होती. ती एकदम म्हणाली, " बॅनरमनचं नांव कशाला ओढतोस यांत ? "

मिना रागानं पुढें म्हणाली, " जूलियन, तुम्हां दोघांच्या गलिच्छ प्रेमप्रकरणांविषयीं मी कोणती वृत्ति ठेवावी अशी तुमची अपेक्षा आहे ! मनाची करमणूक करून घ्यावी ? दुर्लक्ष करावं ? उघड्या डोळ्यांनीं पाहावं ? नांदा सौख्यभरे असा आशीर्वाद द्यावा ? मॉरिसविषयीं माझं मत फार चांगलं झालेलं आहे. तुमचा दोघांचा अनाचार मला शांत मनानं बघवत नाहीं. राशेल म्हणजे एक शुद्ध रस्त्यावरची × × × आहे. "

जूलियन उसळून म्हणाला, " हां मिना, तोंड आटप. राशेलच्या प्रकरणांत नाक खुपसायचं तुला कांहीं एक कारण नाहीं. "

" कारण नाहीं कस ? भरपूर आहे. मी तुझी बहीण आहें, तूं आणि

राशेल मिळून मॉरिसचा घात करीत आहांत. मी स्वस्थ बसणार नाहीं. माझा हा इशारा समज. त्याकडे दुर्लक्ष करूं नकोस. ”

ती गेली. दाराचा आवाज झाला. जूलियन एका कोचांत धाडकन् पडला. गालिच्यावरची नक्षीदार आकृति दिसत होती तिच्याकडे तो बघत राहिला. मग कपाळावर हात मारून तो उद्गारला, ‘ नको या स्त्रियांची संगत ! सद्गुणी, दुर्गुणी साऱ्याच स्त्रिया मसणांत गेल्या तर फार बरं होईल. ’

* * *

होतां होतां जूलियनच्या नाटकाच्या जाहीर प्रयोगाचा दिवस उजाडला वास्तविक या दिवशीं दुपारीं जूलियन फार खुशींत असायला हवा होता. पण त्याचं मन अप्रसन्न होत. राशेलच्या सहवासाचे नव्या नवतीचे दिवस सरले होते. तिच्याशीं लग्न करण्याची तर त्याची इच्छा मुळींच नव्हती, आणि तिचा पाश कसा तोडायचा हेंहि त्याला कळत नव्हतं, परंतु कांहीं झालं तरी हा खेळ संपविला पाहिजे असं आज त्याच्या मनांत फार येत होतं. म्हणूनच त्याची वृत्ति आज बिनसलेली, आंबलेली होती...

पुढच्या बसावयाच्या खोलींत व आंतल्या निजावयाच्या खोलींत किती तरी सामान अस्ताव्यस्त पडलं होतं तें आवरावं असं त्याच्या मनांत आलं. त्या सामानांत मुख्यतः राशेलच्या वस्तु होत्या. त्या साऱ्या वस्तु त्यानं खणा-खणांतून उपसून काढल्या. त्यांच्या ढिगाकडे पाहून त्याला स्वतःची किळस आली. हा सारा ढीग उचलून कुठें टाकावा असा विचार करीत तो उभा राहिला.

तितक्यांत दारावर टकटक आवाज झाला. “ कुणी आहे कां ? ”

जूलियनची सहनशक्ति खलास झाली. त्याच्या मनांत आलं, याच घट-केला मला भेटण्याची बुद्धि कुणाला झाली. तो रागानं ओरडला, “ लोटा दार ! ” मिना आंत आली ! आणि खोलींतला तो पसारा पाहिल्याबरोबर ती जागच्या जागीं खिळून उभीच राहिली !

बहीणभावानीं एकमेकांकडे जळते कटाक्ष टाकले.

घोगऱ्या, चिरक्या आवाजांत मिना फुसफुसली, “ ती बया ! मला वाटलं होतं तुझा तिचा संबंध संपला असेल. पण नाहीं ! अजून तुमची बेशरम मौज चालूच आहे असं दिसतं ! ”

फुसफुसत धापा टाकीत ती उभी राहिली, ती अशा आविर्भावानं कीं जणूं हात उगारून जूलियनला फडाफड मारण्याचा तिचा बेत होता...परंतु ती ड्रेसिंग टेबलाकडे गेली, आणि एक सुंदर कांचेचं भांडं उंच उचलून तें तिनं जमिनीवर आपटलं. भांड्यांतली सुवासिक पावडर उधळली आणि तिचा थरचा थर एखाद्या ढगासारखा बहीणभावामध्यें तरंगत राहिला.

मिना कडाडली, " जूलियन, अरे तुला कांहीं शरम ? कांहीं भय ? कांहीं माणुसकी ? तुझ्या नाटकाचे जाहीर प्रयोग व्हावेत म्हणून ज्यानं भांडवल दिलं त्याच्या बायकोशीं खुशाल स्वैराचार चालविला आहेस ! मॉरिसनं जरूर त्या भांडवलाचं गुप्त दान केलं हें कदाचित तुला माहीत नसेल. पण आतां मी सांगते. हें सांगितल्यावर तरी तुझ्या चेहऱ्यावर कांहीं शरम दिसूं दे मला. "

परंतु जूलियनच्या ठिकाणचा सारा विवेक आतां सरला होता. तुच्छतेच्या स्वरांत तो शांतपणें म्हणाला, " मिना, बॅनरमनविषयीं तुला वाटणारा मायेचा उमाळा आतां सगळ्यांना ठाऊक झाला आहे. त्यानं माझ्या नाटकांत गुप्तपणानं भांडवल गुंतवलं आहे यावर माझा विश्वास बसत नाहीं. पण तें खरं असेलहि. पण तें खरं असलं तरी त्याचा पैसा सुरक्षित आहे. माझं नाटक पैसा देईल याची मला खात्री आहे. मॉरिसच्या बायकोला मी बिघडवीत आहें म्हणून तुझा माझ्यावर राग. परंतु तुझ्या माहितीसाठीं सांगतों कीं, मॉरिस राशेलचा कायदेशीर नवरा नाहीं. पाहिली बायको जिवंत असतांना त्यानं राशेलशीं लग्न केलं आहे. तुला वाटतों तसा तुझा मॉरिस बॅनरमन सद्गुणांचा पुतळा नाहीं. त्यानं राशेलला फसविलं आहे..."

मिनाचा चेहरा पांढरा फटफटीत झाला. ती अर्धवट स्वतःशीं पुटपुटली- " खरंच ! " जूलियन म्हणाला, "हवं तर राशेललाच विचार." "विचा, रीन ! " हा शब्द उच्चारतांना मिना पुटपुटल्यासारखं बोलली. ती निघून गेली तेव्हां तिच्याशीं झालेलं द्वंद्वयुद्ध आपण जिंकलं अशा समाधानानं जूलियननं सुस्कारा टाकला. मिना खोलीबाहेर पडली ती पराभूत आणि जखमी होऊन हें त्याला उघड दिसलं. त्याला फार बरं वाटलं.

* * *

खरा प्रकार असा असतो कीं लग्न करण्यापूर्वी मॉरिसनं राशेलला स्पष्ट सांगितलेलं असतं कीं, पूर्वी अमेरिकेंत असतांना मी एका मुलीशीं लग्न केलं, तिचं माझं पटलं नाहीं, मी इंग्लंडला आलों, नशिबानं हात दिला, मी कोट्याधीश झालों, मी निराळ्या नांवानं वावरूं लागलों, आतां माझी पहिली बायको हयांत असली तरी देखील मला ती ओळखूं शकणार नाहीं. राशेलनं मॉरिसशीं लग्न केलं तें हें सारं कळलेलं असतांना. पुढें तिला मॉरिस नकोसा झाला व जूलियन हवासा वाटला, तेव्हां राशेलनं असा विचार केला कीं पहिली बायको जिवंत असूनहि मॉरिसनं लग्न केलं या सबबीवर त्याला केव्हांहि उडवितां येईल. तिनं जूलियनची मात्र अशी समजूत करून दिली कीं मॉरिसनं खरी गोष्ट मला सांगितली नसून मला ती माहीत झालेली आहे.

अमेरिकेंतली आपली बायको अजूनहि जिवंत आहे कीं काय याचा तपास मॉरिसनं डिटेक्टिव्हांमार्फत करविला. तेव्हां असं आढळून आलं कीं कित्येक वर्षांपूर्वी ती बाई मेली होती. त्यानं मोठ्या आनंदानं ही बातमी राशेलला सांगितली, परंतु त्याचं जें अमृत तें तिचं विष होतं ! ती मनाशीं समजून चुकली कीं मॉरिसचा नवरेपणा पूर्ण कायदेशीर आहे. त्या बंधनांतून आपली सुटका आतां होण्यासारखी नाहीं. मात्र या नव्या बातमीचा पत्तादेखील तिनं जूनियनला लागू दिला नव्हता.

* * *

जूलियनची कल्पना नव्हती, पण मिना त्याच्याकडून रागारागानं जी निघाली ती तडक राशेलकडे गेली, राशेल विश्रांतीसाठीं झोंपली होती म्हणून ती दिवाणखान्यांत वाट पहात बसली. एक अतिशय देखणा बोका म्यॉंव म्यॉंव करीत आणि आपली झुबकेदार, गोंडस शेपटी उंच धरीत तिच्या अंगाला अंग घासूं लागला. अतिसुंदर जनावर होतं तें. मॉरिसचा सेक्रेटरी हार्टिंगन यानं तें पाळलेलं होतं. त्याचं नांव ‘ओमर’. तें साऱ्यावर माया करी, परंतु राशेलचं व त्याचं वैर असल्यासारखं वागे. राशेलला तें अगदीं दृष्टीसमोर नको असे. एकदां त्यानं तिच्या हाताला ओरखाडून जखम केली होती आणि तिनं त्याला चांगलंच बडविलं होतं. मिनाला पाहतांच ओमरनं आपल्या सुंदर शरीराची कमान काय उभारली, घिरट्या काय

घातल्या, आणि डोळे मिचकावून आपलं लालचुटुक तोंड उघडून म्यॉंव म्यॉंव काय केलं.

रेशमी झग्याची सळसळ ऐकूं आली तेव्हां मिनानं वळून पाहिलं. दिवाणखान्यांत प्रवेश करणारी राशेल तिला दिसली. पौर्णिमेच्या रात्रीं सर्व कलांनीं उजळलेलं चंद्रबिंब दिसावं तसं राशेलचं लावण्य शोभत होतं, आणि ती जितकी मोहक दिसत होती तितकीच निश्चिंत, निर्विकार ! तिच्याकडे बघतांच मिनाचं अवसान एकप्रकारें खचलं. तिनं हात पुढें केले नाहींत, उलट रागाचा कटाक्ष टाकला. ती म्हणाली, "अत्ताच ज्यूलियनला भेटून मी आलें."

"मला वाटतं स्वारी अगदीं गडबडून गेली असेल आज रात्रीं नाटकाचा प्रयोग आहे म्हणून. देवाचे उपकार कीं, असला घाबरटपणा माझ्या अंगीं नाहीं."

मिनानं एकदम कडवट आरोप केला, "स्त्रीच्या अंगीं सामान्यतः जें असतं त्यांपैकीं तुझ्याजवळ आहेच काय ?"

या अनपेक्षित टोल्याचं आश्चर्य वाटून राशेलच्या भुंवया किंचित् हालल्या. परंतु ती शांतपणें म्हणाली, "जें असावं तें आहे," आणि असं म्हणतांना तिनं जें हास्य केलं तें विलक्षण होतं.

मग मात्र मिनाच्या रागाचा स्फोट झाला. ती ओरडून म्हणाली, "नाहीं नाहीं. स्त्रीचा एकदेखील सद्‌गुण तुझ्या अंगीं नाहीं. तूं गलिच्छ आहेस ! तूं दुष्ट आहेस !"

राशेलनं आवाज चढविला नाहीं कीं तोल जाऊं दिला नाहीं. ती म्हणाली, "तुझ्या बोलण्याचं आश्चर्य वाटतं मला. आज रात्रीं मला नाटकांत काम करायचंय्. तुलाहि करायचंय्. या वेळेस भांडून कसं चालेल ? जातें मी."

ती वळली. तिच्या निर्विकार शांतपणाचा मिनाला दंश झाला. तिनं एकदम राशेलचा हात धरला आणि ओरडून म्हटलं, "मी जें बोलायला आलें आहे तें आधीं ऐक, आणि मग जा." आपला हात हिसकावून सोडवून घेऊन राशेल हळू आवाजांत परंतु संतापानं फुस्कारली, "हात टाकतेस माझ्यावर ? स्पर्श करतेस माझ्या अंगाला ? तूं ! तूं !"

तिचा तो उद्‌गार ऐकून मिनाच्या मनांत आलं, हिचं मोहक शरीर

हेंच हिचं सारं भांडवल आहे खरंच. हिच्या साऱ्या दुष्टपणाची शक्ति हिच्या रूपांत आहे. हिचं खरं पारिपत्य करायचं असेल तर हिच्या लावण्य-मंदिराचाच नाश केला पाहिजे! तेंच उध्वस्त केलं पाहिजे. मनांतल्या या विचारानं मिनाचे हात शिवशिवले...ती राशेलच्या नजरेला नजर देत म्हणाली, " माझ्या भावाचा सत्यानाश करते आहेस तूं ! "

हें ऐकल्याबरोबर राशेल हंसली. ती म्हणाली, " या प्रकरणांत तोटा आणि नफा सारखाच आहे मिना. माझ्यामुळें तुझ्या भावाचा फार मोठा फायदा होणार आहे. "

" पण तूं त्याला ठकविलंस. आपल्या नवऱ्याबद्दल खोट्या गोष्टी त्याला सांगितल्यास. तुझं आणि मॉरिसचं लग्न कायदेशीर नाहीं, असं सांगितलंस ना तूं जूलियनला ? "

" अस्सं ! जूलियन इतका मूर्ख आहे म्हणायचा. तुझ्याजवळ बडबडल्यावांचून त्याला रहावलं नाहीं म्हणायचं. "

" तुला तरी कुठं राहवलं ? बोल. मॉरिसची पहिली बायको जिवंत आहे असं तूं म्हणालीस कीं नाहीं ? जूलियनजवळ खोटं बोललीस कीं नाहीं ? "

तितक्यांत मॉरिसच्या गाडीचा आवाज ऐकूं आला. राशेल मिनाला म्हणाली, " खरं कीं खोटं तें आतां मॉरिसलाच विचार. "

या प्रसंगाचा मिनाला एकदम वीट आला. मॉरिसला विचारणं नको, खऱ्याखोट्याचा निवाडा नको असं तिच्या मनांत आलं. ती राशेलला म्हणाली, " मी चलतेच कशी. "

" तुझं समाधान झालं म्हणायचं. ठीक. "

विजयाच्या उन्मत्त आविर्भावानं तिनं हात पुढें केला. मिनानं राशेलच्या डोळ्यांकडे पाहिलं, तों त्यांत खवचट उपहास होता. तिनं राशेलचा तो गोरापान नाजूक हात फाडकन् चापट मारून दूर केला. तिच्या अंतःकरणांतला द्वेषाचा सारा लोंढा बांध फोडून बाहेर पडला, आणि तिनं उघड्या पंजानं खाडकन् राशेलच्या मुस्कटांत लगावली.

त्या प्रहाराच्या जोरापेक्षांहि अनपेक्षितपणाच्या धक्क्यानं राशेल कोलमडली आणि कोसळली. इतका वेळ शांत निजून राहिलेला आमर तिच्या कोपराखालीं सांपडला. तो दूर झाला तो एखाद्या हिंस्र वाघाप्रमाणें फूत्कार

सोडीत आणि शेपटी आपटीत. मिना ओरडली " देवा देवा ! " आणि तिनें डोळे झांकूनच घेतले. ओमरनं पंजांचीं नखं बाहेर काढलीं. लालचुटुक तोंड उघडून दांत विचकले. जणूं आतां झालेली जखम व पूर्वीचे अपमान, सारं आठवून त्यानं अत्यंत क्रूरपणानें राशेलचं तोंड ओरबाडून काढलं, त्याचं तोंड, त्याचे पंजे रक्तानं माखून गेले. राशेलची भयानक केविलवाणी किंकाळी साऱ्या बंगल्यांत घुमली व हार्टिंगन धांवत आला. त्यानं ओमरला ओढून उचललं...दुसऱ्या क्षणीं मॉरिस आला. त्यानं पाहिलं गालिचावर पसरलेल्या राशेलजवळ मिना गुघडे टेकून बसली होती. त्यांनीं तिला उचलून खुर्चीवर बसवलं आणि मग गुडघे टेकून त्यानं राशेलला बसती केली. कितीतरी वेळ राशेल कांहीं बोलली नाहीं. पण मग आपल्या चेहऱ्यावरून हात फिरवून त्यावरचं रक्त तिनं बघितलं तेव्हां ती मोठ्यांदा किंचाळली, " माझं रूप ! माझं रूप !" तिचं सर्व अंग हुंदक्यांनीं गदगदलं. ती दुमडून खालीं पडली. मॉरिसच्या पायावर तिचे सुंदर केस पसरले. मिनानं डोळे उघडले. राशेलचं लावण्य आतां तिच्या दृष्टीस पडलं नाहीं. फक्त तिच्या मानेची सुवर्णकांति तिला दिसली आणि मॉरिसच्या पायावर रुळणाऱ्या तिच्या केसांची अपूर्व शोभा ! तिनं पाहिलं तो मॉरिसच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा ओघळत होत्या, आणि राशेलच्या केसांवर ठिबकत होत्या. मॉरिस खाली वांकला, आणि दोन्ही हातांनीं राशेलचे केस कुरवाळीत हुंदके देत म्हणाला, ' राशेल, माझी राशेल ! '

या ठिकाणीं कादंबरी संपते !

या अखेरच्या प्रसंगाची भीषणता वाचकांच्या अंतःकरणाला बधिरपणा आणणारी आहे खचितच; परंतु मार्मिक रसिकांच्या दृष्टीनं या कादंबरीची शोभा अखेरच्या भीषण प्रसंगांत जितकी आहे तितकीच किंबहुना त्याहून ज्यास्त त्या प्रसंगाची पूर्वतयारी ज्या कौशल्यानं लेखकानं दांखविलेली आहे, त्यांत व प्रमुख पात्रांच्या स्वभावचित्रणांत आहे. मला स्वतःला अत्यंत नमुनेदार वाटतं तें हॉवर्ड स्प्रिंगचं या बाबतींतलं कौशल्य. त्या कौशल्यामुळेंच कथानकाची अखेरी विलक्षण परिणामकारक वाटते. या अखेरीचं सौंदर्य वाढविणारी आणखी एक लहानशी गोष्ट आहे. ती ही कीं राशेलच्या अनुपम

लावण्याचा नाश लेखकानं मिनाच्या हातून प्रत्यक्ष घडविला नाहीं. मांजराचं आणि राशेलचं वैर अगदीं पहिल्यापासून सूचित करून लेखकानं हिंसेचं प्रत्यक्ष कृत्य करविलं आहे तें त्या मांजराकडून ! ...जणूं मिनाचा राशेल-विषयींचा द्वेष कितीहि साहजिक व समर्थनीय असला तरी अखेरच्या विनाशकृत्याला फक्त ती निमित्त व्हावी, तिच्या आकर्षक स्वभावरेखेला विनाकारण धक्का लागू नये असा विचार लेखकानं केला, आणि राशेलच्या लावण्याची चिरफाड अशा प्रकारें झालेली त्यानं दाखविली कीं वाचकाच्या मनांत यावं, राशेलवर सूड घेतला तो नियतीनं ! माणसानं नव्हे ! तिच्या दैवानं !

* * *

# " तीं तीं पदें नित्य फिरूनि येती ! "

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## जेम्स हिल्टन

पाऊस जसा कधीं मनाजोगा पडायचा नाहीं, त्याप्रमाणें तरुण माणसाचं प्रेम वडीलधाऱ्या माणसांना कधीं पसंत असायचं नाहीं हें जवळ जवळ ठरलेलं आहे. आईबाप कितीही सुधारलेल्या पुढारलेल्या मतांचे असोत, मुलगा किंवा मुलगी कुणाच्या तरी प्रेमांत सांपडल्याचं त्यांना समजलं कीं संशय आणि चिंता यांनीं त्यांचीं मनं ग्रासलींच समजा. नवतारुण्यांतल्या पहिल्या प्रीतींत आंधळेपणा आणि वेडेपणा असण्याचा संभव आईबापांना अधिक दिसतो. क्वचित् त्या वेडेपणाचा अनुभव त्यांना स्वतःच्या आयुष्यांत आलेला असतो, आणि त्या अनुभवाच्या संदर्भांतच ते मुलांच्या प्रेम प्रकरणाकडे बघूं लागतात व पुढें ओढवणारा घात टाळला पाहिजे या विचारानं त्यांची धडपड सुरू होते. तरुण मुलं आणि त्यांचीं मातापितरें यांच्यातला हा संघर्ष अनादि कालापासून चालत आलेला आहे. आधुनिक काळाच्या परिस्थितींत तर या संघर्षाची चाहूल जिथें कधीं ऐकूं आली नाहीं असं घर सांपडणं कठीण आहे. तरुणांच्या प्रेमांतून उत्पन्न होणारा हा संघर्ष म्हणजे कथा-वाङ्मयाचा एक ठरीव विषय झालेला आहे. या संघर्षाचं चित्रण करणाऱ्या किती कादंबऱ्या, किती कथा, आणि किती नाटकं जगांतील प्रत्येक भाषेंतल्या लेखकांनीं लिहिलीं असतील त्याला गणति नाहीं. कुणी असं देखील म्हणेल कीं हा विषय शिळा झाला !

परंतु ललित साहित्याचे स्वरूप आणि त्याचा हेतु यांची मार्मिक जाणीव आहे तो रसिक मात्र असं म्हणायचा नाहीं. निसर्गांतले वृक्ष, डोंगरमाथे, जलसंचय, आणि मेघमाला किती चित्रकारांनीं कितीदांहि रंगविल्या, तरी त्यांत शिळेपणा येत नाहीं. चित्रकलेच्या बाबतींत ज्याप्रमाणें कांहीं विषय कितीदांहि हाताळले गेले तरी त्यांचा ताजेपणा कायम राहतोंच, त्याचप्रमाणें राग, अनुराग, हर्ष, खेद, चिंता इत्यादि कांहीं मानवी भावनांचं सौंदर्य शाश्वत आहे. जग कितीहि बदललं, मानवी जीविताची तऱ्हा कितीहि

घालटली तरी माणसांच्या दैनंदिन व्यवहाराच्या बुडाशीं याच भावनांचा खेळ नेहमीं चालू राहाणार. या खेळाचीं कलात्मक शब्दचित्रं ज्या ज्या कथेंत, कादंबरींत अगर नाटकांत आढळतील त्यांत वाचकांचीं मनं रमणारच. 'कादंबरी'ला इंग्रजींत म्हणतात 'नॉव्हेल'. ( हिंदींत म्हणतात 'उपन्यास' ! अजब हिंदी भाषेपासून परमेश्वर आमचं रक्षण करो ! ) ' नॉव्हेल ' म्हणजे ' नवीन ' ! म्हणजे या इंग्रजी नांवाचा अभिप्राय असा दिसतो कीं नवीनपणा हा कादंबरीच्या सौंदर्याचा एक महत्त्वाचा घटक आहे. कादंबरी-लेखकानं नवीनपणावर निशाण धरलं पाहिजे. विषय तरी अगदीं नवीन असावा, किंवा जुन्या विषयाचीच का होईना पण नवीन मांडणी केलेली असावी. या संकेतामुळेंच त्याच त्याच जुन्या विषयांकडे कादंबरीकारांचं लक्ष वळतं. त्या विषयांचं नवीन तऱ्हेनं चित्रण केलं कीं पुरें, हें त्यांना ठाऊक असतं. रुक्ष टीकाकार नाक मुरडून म्हणतात, ' हुंः ! हा विषय तर शिळा झालेला आहे. ' परंतु कादंबरी रसिकांना प्रिय होते आणि रसिकांची शाबासकी मिळाल्यावर टीकाकारांच्या कुजक्या मताची लेखक काय म्हणून पर्वा करील ! त्यांची टीका तरी काय दर वेळेस मोठी नवीन असते ? तिलाहि शिळेपणाचा आंबट वास येत असतोंच कीं !

* * *

' टाइम अॅण्ड टाइम अगेन ' ही कादंबरी लिहितांना जेम्स हिल्टन यांनीं एका ठराविक विषयाचीच निवड केलेली आहे. परंतु तो हाताळला आहे, फार कौशल्यानं, रंगविला आहे मोठ्या सहृदयतेनं. एकुलत्या एक मुलावरचं बापाचं प्रेम, नवतारुण्यांतल्या त्या मुलाचं एका स्त्रीवर जडलेलं प्रेम, आणि मुलाचं तें प्रेमप्रकरण ध्यानांत आल्यावर प्रेमळ बापाच्या मनाची होणारी प्रतिक्रिया येवढंच या कादंबरीचं साहित्य आहे. हें साहित्य नवं नाहीं, जुनं आहे याची जाणीव असल्यामुळेंच कीं काय कुणास ठाऊक, लेखकानं कादंबरीला नांव दिलं आहे ' टाइम अॅण्ड टाइम अगेन ! ' तरुण माणसं पहिल्या अविचारी प्रेमाच्या भोंवऱ्यांत सांपडतात, त्यांतून थोडीं भिजून थोडीं खरचटून बाहेर पडतात, म्हातारी होतात, त्यांचीं मुलं वाढतात, तारुण्यांत प्रविष्ट होतात, आणि कुणाच्या तरी प्रेमांत सांपडतात—

असं हें रहाटगाडगं सतत चालूं आहे. पिढ्यामागून पिढ्या उलटत आहेत. प्रत्येक जुन्या पिढीला नवी पिढी भलत्या मोहाला बळी पडते असं वाटतं आहे. ‘ तीं तीं पदें नित्य फिरुनि येती ’ या न्यायानं तेच तेच पेंचप्रसंग पुन्हा पुन्हा उभे राहत आहेत. या चक्रनेमिक्रमाला अंत नाहीं. जें पूर्वी झालं तेंच पुन्हा होत आहे, आणि जें होत आहे तेंच भविष्यकाळांतहि पुन्हा होणार आहे, हे सर्व विचार सूचित करण्यासाठीं जेम्स हिल्टननं आपल्या कादंबरीला नांव दिलं आहे ‘ टाइम ॲण्ड टाइम अगेन ! ’ जो विषय अनेक कथाकारांनीं पूर्वीं हाताळला तोच ह्याहि कादंबरींत हाताळला आहे. असाहि अभिप्राय कादंबरीच्या या नांवांत ध्वनित होतो. मात्र लेखकाला तो ध्वनित करायचा आहे का नाहीं तें मला कसं ठामपणानं सांगतां येणार !

कादंबरींत घडलेल्या घटनांचा एकंदर कालावधि जवळ जवळ चाळीस वर्षांचा आहे. दोन महायुद्धें या अवधींत घडतात, आणि त्यांचा परिणाम नायकाच्या मनावर झालेला दिसतो. या नायकाचं नांव आहे चार्लस अँडरसन. ‘ टाइम अँड टाइम अगेन ’ ही कादंबरी म्हणजे ह्या चार्लस अँडरसनचं चरित्र आहे, म्हणायला हरकत नाहीं. अर्थात् कादंबरीच्या रूपानं तें सांगितलं असल्यामुळें त्याच्या चरित्रांतल्या वेचक घटनाच तेवढ्या लेखकानं वाचकांपुढें मांडलेल्या आहेत. त्या सर्व घटनांची मिळून एक सुंदर कलात्मक आकृति बनलेली दिसावी असा जेम्स हिल्टनचा हेतु आहे.

चार्लस अँडरसनचा जन्म एका श्रीमंत कुळांत १९०० सालीं झाला. त्याचा बाप हेव्हलॉक अँडरसन एक नामांकित वकील होता. चार्लसनें शिकून मोठं व्हावं आणि इंग्लंडच्या परदेशी राजकीय वकिलातींत चांगल्या हुद्याची नोकरी करावी अशी हेव्हलॉकची इच्छा होती. चार्लसला मात्र राजकारणासारख्या गंभीर विषयाचं आकर्षण वाटत नव्हतं. त्याचा चित्र-कलेकडे ओढा होता. त्याची वृत्ति थोडी आळशी आणि चंगीभंगी होती. पहिलें महायुद्ध १९१८ सालीं संपलं त्या सुमारास चार्लस केंब्रिज विद्या-पीठांत अभ्यास करीत होता. ज्या परीक्षेला तो बसणार होता तिच्यांत त्यानें उत्तम यश मिळविलं तरच त्याच्या भावी आयुष्याबद्दलचे त्याच्या बापाचे मनोरथ पूर्ण होणार होते. केंब्रिजच्या वसतिगृहांत राहणारा आपला

मुलगा चार्लस उत्तम यश संपादील अशा आशेंत हेव्हलॉक अँडरसन होते. परंतु त्यांच्या या आशेला चांगलाच धक्का एकाएकी बसला.

त्यांना समजलं कीं आपला मुलगा लिली मॅन्सफील्ड नांवाच्या एका सामान्य कुटुंबांतल्या मुलीच्या प्रेमांत सांपडला असून आपण जर वेळींच कांहीं उपाय केला नाहीं तर तो तिच्याशीं लग्न करून मोकळा होईल. ते साधन होते, आणि निष्णात वकील होते. त्यांनीं लिलीच्या बापाची गांठ घेतली, भरपूर पैसे खर्च केले, लिलीला दूर पाठवून देण्याची व्यवस्था केली.

बापाचं हें करणं चार्लसला अगहीं आवडलं नाहीं. परंतु बापानं अगदीं सीलबंदच व्यवस्था करून टाकली होती. आणि विशेष हें कीं चार्लसच्या भावी हिताच्या दृष्टीनं त्याच्या तोलाची सधन कुळांतली बायको त्याला मिळायला हवी याबद्दल लिलीची आणि तिच्या बापाची दोघांचीहि खात्री पटविली होती. लिलीसाठीं झुरत बसण्यांत कांहीं अर्थ नाहीं असा उमज घेणं चार्लसला भागच पडलं. मनांतल्या मनांत त्यानं फार दुःख केलं. बापाशीं अबोलाहि धरला. राजकीय वकिलातींत नोकरी करण्याची आपली इच्छा नाहीं असं बापाला स्वच्छ सांगण्याचाहि त्यानं विचार केला. अभ्यासाच्या आणि परीक्षेच्या दिवसांतच लिलीच्या गांठीभेटी घेण्यांत त्यानं खूप वेळ घालविला होता. आपण परीक्षेंत नापास होणार याची त्याला खात्री होती. त्याला मनांतून वाटत होतं, आपण परीक्षेंत नापास झालों कीं वकिलातींत प्रवेश मिळण्याचा मार्गच आपोआप बंद होईल. बापाशीं वाद घालण्याचा प्रसंगच येणार नाही. चित्रकलेचा अभ्यास आपल्याला करतां येईल.

* * *

परंतु त्याचं दैव असं कीं, ज्या परिक्षेंत आपण नापास होऊं अशीं त्याची अपेक्षा आणि गुप्त आशा होती त्या परीक्षेंत त्याला पहिल्या प्रतीचं यश मिळालं ! त्याच्या बापाला फार आनंद झाला. त्याला स्वतःला वाईट वाटलं. परीक्षेचा निकाल उत्तम लागल्यामुळें पुढच्या योजनेवर त्याचा स्वतःचा ताबा राहिला नाहीं. बापाच्या म्हणण्याप्रमाणें वागणं त्याला भाग पडलं.

कालांतरानं लिलीच्या प्रेम-प्रकरणाचा चार्लसला विसर पडला. जेन

कॉपरमिल नांवाच्या एका धनाढ्य कुळांतल्या मुलीशीं त्याची ओळख झाली. मुलीशीं कसली, बाईशींच म्हटलं पाहिजे ! कारण जेन चार्लसपेक्षां वयानं पुष्कळच मोठी होती. चार्लसनं नुकतांच विशीचा उंबरठा ओलांडला होता. जेन तिशीच्या घरांतली होती ! पण तरीदेखील दोघांचं प्रेम जमलं. आणि वाढत गेलं. दोघांचं लग्न झालं. चार्लसचा वकिलातींत प्रवेशहि झाला. आणि लहान मोठ्या हुद्यावरच्या जागीं त्याची दूरदूरच्या देशांत नेमणूकहि होऊं लागली. मानमरातब आणि पैसा या दोन्ही दृष्टींनीं चार्लसचं आयुष्य भरभराटूं लागलं. विवाहानंतर त्याचं आणि जेनचं प्रेम अनेक कारणांनीं ओहोटीला लागलं. परंतु निर्वाणीच्या बेबनावाचा प्रसंग मात्र आला नाहीं. एकमेकांना संभाळून घेण्याइतपत दोघांनाहि परस्पराविषयीं जिव्हाळा वाटत राहिला. १९३४ सालीं जेनला मुलगा झाला. त्याचं नांव ठेवलं जीराल्ड.

पुढें पांचच वर्षांनीं दुसरं महायुद्ध सुरू झालं. इंग्लंडमधली परिस्थिति फार बिकट झाली. हवाई हल्ले म्हणजे नित्याची गोष्ट होऊन बसली. जीराल्डचं लहानपण असल्या वातावरणांत जाऊं नये, लहानाचं मोठं होतांना त्याच्या बाल-मनावर चांगले संस्कार व्हावेत, त्याचं शिक्षण निर्वेधपणें व्हावं, या हेतूंनीं जेनची एक बहीण अमेरिकेंत होती, तिच्याकडे राहण्यासाठीं जीराल्डची रवानगी चार्लसनं केली. तिकडेच जीराल्ड वाढूं लागला.

दुसरं महायुद्ध रेंगाळलं. एकदां लंडन शहराच्या एका भागांतली खूप मोठी इमारत स्फोटांत कोसळली. इतर अनेक स्त्रियांप्रमाणेंच जेनहि ‘एअर वार्डन’ चं काम करीत असे. इमारतीच्या अपघातांच्या वेळेस ती त्या जागीं होती. तिचं प्रेत सांपडलं नाहीं, परंतु त्या दिवसांपासून ती जी बेपत्ता झाली ती कायमचीच. ती मेल्याचाहि निश्चित पुरावा मिळाला नाहीं, आणि ती जिवंत राहिली असेल आणि केव्हांतरी परत येईल या आशेनंहि जसजसे दिवसांमागून दिवस गेले तसतसा अर्थ उरला नाहीं. अखेर आतां उरलेलं आयुष्य विधुरावस्थेंत काढलं पाहिजे ही गोष्ट चार्लस ॲंडरसन समजून चुकला. नोकरीच्या क्षेत्रांत बढती, कीर्ति, भरभराट योग्य त्या प्रमाणांत त्याच्या वांट्याला आली होती. सुदैवानं जीराल्डसारखा मुलगाहि त्याला होता. पुष्कळशा समाधानानं आयुष्याचीं पुढची वाट तो चालूं लागला. आज या देशांत उद्यां त्या

देशांत अशी त्याची बदली होत होती. पण महायुद्ध संपल्यानंतर त्यानं जीराल्डला इंग्लंडमध्यें परत आणून शिकण्यासाठीं ठेवलं होतं. त्याचं शिक्षण उत्तम प्रकारें चाललं होतं. अभ्यासांत आणि खेळांतहि तो प्रावीण्य मिळवीत होता. मोठेपणीं त्यानं अमुकच व्हावं असं कांहीं चार्लसनं मनाशीं ठरवलं नव्हतं. परंतु तो चांगला निघणार, मोठा होणार, अशा खात्रीच्या समाधानांत चार्लस होता. त्याला स्वतःला नेहमीं फिरती करावी लागे. त्याची आणि जीराल्डची गांठभेट क्वचितच होई. परंतु बापलेकांत परस्परांविषयीं गाढ प्रीति होती. चार्लस पन्नाशीच्या पुढें सरकला होता, जीराल्ड अवघ्या सोळा वर्षांचा किशोर होता. परंतु वयांतल्या ह्या अंतरामुळें दूरत्व उद्भवूं नये, आपल्याविषयीं मुलाच्या मनांत खरंखुरं सख्य असावं, आपण त्याच्याशीं बरोबरीच्या नात्यानं वागत आहोंत असं त्याला वाटावं, त्यानं आपल्यापासून कांहीं लपवून ठेवूं नये, असा चार्लसचा नेहमीं प्रयत्न असे.

* * *

१९५१ सालीं जीराल्डचा सतरावा वाढदिवस जवळ आला तेव्हां तो सुटीचे दिवस घालविण्यासाठीं स्वित्झर्लंडमध्यें गेला होता, आणि चार्लस एका राजकीय परिषदेसाठीं पॅरिसमधल्या एका बादशाही हॉटेलांत राहिला होता. त्यानं जीराल्डला पत्र लिहिलं कीं, “स्वित्झर्लंडहून लंडनला जाशील तेव्हां परत वाटेवर पॅरिसमध्यें थांबशील तर मला आनंद होईल. आपण एकत्र जेवूं, गप्पा मारूं, पॅरिसमधलीं प्रेक्षणीय स्थळं मी तुला दाखवीन. तुझ्या सतराव्या वाढदिवसानिमित्त भेट म्हणून सोबत चेक ठेवीत आहे.” पॅरिसमध्यें थांबण्याची आपली सूचना जीराल्ड मान्य करीलच अशी त्याला खात्री नव्हती. परंतु त्याची भेट व्हावी अशी इच्छा मात्र त्याला फार होती. फार दिवसांत त्याचा मुलगा त्याला भेटला नव्हता.

जीराल्डचं लगेच उत्तर आलं. त्यांत त्यानं चेकबद्दल बापाचे आभार मानले होते आणि पॅरिसमध्यें थांबण्याचं कबूल केलं होतं. त्याचं तें पत्र वाचून चार्लसला फार आनंद झाला. जीराल्ड अंगानं कितीसा वाढला

असेल, किती उंच झाला असेल, कसा दिसूं लागला असेल, याच्या कल्पना तो करीत राहिला. आणि मुख्य म्हणजे अगदीं उत्तमांतल्या उत्तम हॉटेलांत जीराल्डला जेवण द्यायचं, त्याला पॅरिस शहरांतल्या गंमती दाखवायच्या आणि त्याच्याशीं अगदीं मन मोकळं करून खूप खूप बोलायचं. असा बेत त्यानं केला. मुलगा मोठा झाल्यावर बापानं त्याच्याशीं एखाद्या मित्रा-सारखं वागावं, आणि त्याचा विश्वास संपादन करावा असं चार्लसचं मत होतं.

जीराल्डला घेण्यासाठीं तो स्टेशनवर गेला, आणि तेथून त्यानं त्याला जेवणासाठीं हॉटेलांत नेलं. हॉटेलच्या मालकाला आधींच भेटून त्यानं भोजनांतले पदार्थ ठरवून ठेवले होते. कोणतं मद्य द्यायचं तें सुद्धां! बरोबरीच्या नात्यांतल्या एखाद्या मित्राबरोबर जेवल्यासारखं वाटावं अशी त्याची इच्छा होती. जेवणाची एकंदर व्यवस्था पाहून जीराल्ड अगदीं खूष झाला. मनमोकळेपणानं बोलूं लागला. आपल्या हकीगती सांगूं लागला. टेनिसच्या खेळांत तो कांहीं पटाईत नव्हता, परंतु स्वित्झर्लंडमधल्या मुक्कामांत त्यानं एक टूर्नामेंट जिंकली होती; ॲन रेनॉर नांवाच्या एका मुलीचा पार्टनर म्हणून. गिर्यारोहणाची मजाहि त्यानं भरपूर केली होती. या साऱ्या गंमती त्यानं चार्लसला सांगितल्या. जेवण झाल्यानंतर कुठं कुठं जायचं तें चार्लस जीराल्डला सांगूं लागला, तेव्हां मात्र तो म्हणाला, “हें कसं जमायचं? मी तर साडेदहाच्या गाडीनं लंडनला जाणार आहे. तिकीटसुद्धां काढलंय्.” चार्लसची मोठी निराशा झाली. तो म्हणाला, “तिकीट बदलून घेऊं आपण. त्यांत काय मोठंसं?” पण जीराल्ड म्हणाला, “नको, नको. मला जायलाच हवं. उद्या लंडनमध्यें बरींच कामं ठरविलीं आहेत. माझी दाढ भरून घ्यावयाची आहे. डॉक्टरला वेळ दिलेली आहे.” यावर चार्लसनं अधिक आग्रह केला नाहीं. जीराल्डला त्यानं एक टॅक्सी करून दिली आणि निरोप दिला.

जेवणाच्या जागीं तो परत येऊन बसला, त्यानं जीराल्डला वरकांति दाखवलं नव्हतं, परंतु आपला मुलगा आपल्याला फसवीत आहे हें त्यानं मनांतून ओळखलं होतं. कारण जेवतां जेवतां एक महत्त्वाचा टेलिफोन करण्याच्या निमित्तानं उठून जाऊन त्यानं रेल्वेचं टाइम टेबल बघितलं होतं

तेव्हां त्याला समजलं होतं कीं लंडनला जाणारी साडेदहाची गाडी नव्हतीच. जीराल्डची ती निव्वळ थाप होती. त्यानं बापाला चक्क फसविलं होतं. बापाचा निरोप घेऊन तो कुणाला तरी भेटावयाला गेला होता. बहुधा एखाद्या मुलीला ! जिच्या प्रेमांत तो सांपडला आहे अशा एखाद्या मुलीला.

या विचारानं चार्लसला फार दुःख झालं. बरोबरीच्या मित्राच्या नात्यानं मुलाशीं वागावं, त्याचा विश्वास आणि प्रेम संपादन करावं, अशा तीव्र इच्छेनं त्यानं ही गांठभेट मोठ्या हौसेनं घडवून आणली होती. पण त्याचा हेतु साध्य झाला नव्हता. उलट जीराल्डनं बापाशीं खोटेपणा केला होता. बापाला फसविलं होतं. तो एखाद्या मुलीच्या प्रेमांत सांपडला होता खचित्. बापाच्या भावनांची पर्वा न करतां त्या मुलीकडे गेला होता खचित् !

चार्लस मनाशीं विचार करूं लागला, आतां आपण पुढें काय करावं ? स्वतःच्या तरुणपणांतली आठवण त्याला झाली. आपण जसे लिलीवर भाळून पागल झालों होतों त्याचप्रमाणें आपला मुलगाहि कुणातरी मुलीच्या नादी लागून पागल झाला आहे असा संशय त्याला आला. आपल्या बापानं आपल्याला वाचविलं होतं. आपल्या मुलाला आपण वाचवायला हवं कीं नको !......एकदां त्याला वाटे, कशाला मुलाच्या रहस्यांत आपण लक्ष घालायचं ? पण पुन्हा वाटे, उघड्या डोळ्यांनीं त्याचा घात होऊं द्यावयाचा ?......

* * *

शेवटीं तो उठला, हॉटेल बाहेर पडला, ज्या टॅक्सींतून जीराल्ड गेला होता, तीच टॅक्सी शोधून काढून तिच्यांत तो बसला, आणि त्यानं ड्रायव्हरला सांगितलं, " मघाशीं त्या तरुण मुलाला जिथं नेऊन सोडलंस तिथं घेऊन चल मला. " टॅक्सी धांवूं लागली. चार्लसच्या मनांतले विचारहि वांकडे-तिकडे धांवूं लागले. तो स्वतःशीं म्हणूं लागला, आतां हा ड्रायव्हर कुठें घेऊन जातो आहे कुणास ठाऊक ? एखाद्या मुलीच्या खोलीवर ? एखाद्या जुगाराच्या अड्ड्यावर ? कीं एखाद्या वेश्या गृहांत ? नरकांत देखील पाऊल टाकण्याची त्यानं आपल्या मनाची तयारी केली.

परंतु इतक्या पराकोटीचा वाईट प्रसंग चार्लसवर आला नाहीं. एका

हॅाटेलपुढें ड्रायव्हरनं टॅक्सी थांबविली. चार्लस आंत शिरला. त्यानं पाहिलं तो एका टेबलापाशीं जीराल्ड एका उंच ग्लासांतलं साधं पेय कार्डीतून पीत बसला होता. त्याच्यासमोर एक मुलगी बसली होती. तीहि पेय पीत होती. दोघांनीं खालीं माना घातल्या होत्या. दोघांच्या गुजगोष्टी चालल्या होत्या. चार्लसच्या मनांत आलेले भलते सलते तर्क खोटे ठरले होते. जीराल्डचं पाऊल अगदींच कांहीं भलत्या प्रकारें वाकडं तिकड पडलं नव्हतं. चार्लसला त्यांतल्या त्यांत बरं वाटलं. त्याला पाहतांच जीराल्डनं आश्चर्याचा उद्गार काढला. परंतु चार्लसनं सहज आल्याचं सोंग केलं, आणि त्या दोघांजवळ बसून तीं जें पेय पीत होतीं तें पिण्याचीहि तयारी दर्शविली. त्या दोघांशीं खेळीमेळीनं बोलण्यास त्यानं सुरुवात केली.

जी त्याला स्वित्झर्लंडमध्यें सहज भेटली होती व जिचा जोडीदार म्हणून तो टेनिस खेळला होता, ती ॲन रेनॉरच आतां जीराल्डबरोबर बसली होती. संभाषणाच्या ओघांत चार्लसला समजलं कीं जीराल्डनं त्याला फारसं ठकविलं नव्हतं. तो खरोखरच रात्रीच्या गाडीनं लंडनला जाणार होता. साडेदहाची वेळ त्यानं खोटी सांगितली होती एवढंच. गाडी उशिराची होती. ॲन त्याला निरोप देणार होती. मग ती स्वतः अमेरिकेंत जाण्यासाठीं निराळ्या गाडींत बसणार होती. जीराल्ड तिच्या प्रेमांत सांपडला होता, याविषयीं चार्लसला शंका उरली नाहीं. त्याच्या चर्येवरचे भाव ॲनशीं बोलण्याची तऱ्हा, यांचा अर्थ कुणाच्याहि लक्षांत यावा इतका उघड होता. परंतु मुलगा प्रेमांत सांपडला असला तरी फार वाहवला नाहीं या खात्रीनं चार्लसचं मन पुष्कळ शांत झालं. त्या दोघा प्रेमिकांचा त्यानं हसत हसत निरोप घेतला आणि तो आपल्या हॅाटेलांत परत आला. पुष्कळशा निश्चित मनानं. जो भलताच पेंचप्रसंग ओढविल्याच्या भयानं त्याच्या जिवाचा थरकांप झाला होता तो केवळ कल्पनेचा खेळ ठरला होता.

* *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हॅाटेलच्या प्रतीक्षागृहांत तो सहज आला, आणि पाहतो तों ॲन रेनॉर त्या ठिकाणीं बसलेली ! त्याला विलक्षण आश्चर्य वाटलं. तिच्याजवळ जाऊन त्यानं विचारलं, " तूं इथें कशी ? "

" मी ह्याच हॉटेलांत उतरलें आहे. "

" पण तूं तर रात्रीच्या गाडीनं अमेरिकेला जाणार होतीस ना ? "

" गेलें नाहीं. "

" आणि जीराल्डहि गेला नाहीं काय ? "

" तो गेला. त्याला आज लंडनमध्यें पुष्कळ कामं आहेत. "

चार्लसला बरं वाटलं. साडेदहाच्या गाडीच्या थापेप्रमाणें जीराल्डच्या लंडनमधल्या कामांचीहि थाप नव्हती, या विचारानं त्याला समाधान झालं. त्यानं ॲनला विचारलं, " पण तूं तर काल रात्रीं मला सांगितलंस कीं जीराल्डला निरोप देऊन तूं अमेरिकेला जाणार ? "

" होय, मी इथेंच राहणार आहें ही गोष्ट जीराल्डला समजूं द्यायची नव्हती मला. "

" कां ? "

" माझ्यासाठीं राहण्याचा त्याला मोह झाला असता. तो माझ्या प्रेमांत सांपडला आहे. परंतु त्याच्या प्रेमाला मी उत्तेजन देणार नाहीं. "

" कां ? "

" तो सतरा वर्षांचा आहे. मी तेहतीस वर्षांची आहे. "

चार्लसला एकदम आठवण झाली कीं, आपल्यांत आणि जेनमध्यें वयाचं असंच अंतर होतं. परंतु ती आठवण त्यानं चर्येवर दिसूं दिली नाहीं. ॲनकडे बघून तो फक्त म्हणाला, " अस्सं ! "

त्याच्या मनांत आलं, आपल्या मनांतल्या साऱ्या शंका आणि सारी भीति अकारणच होती म्हणायची !

तो ॲन रेनॉरशीं गप्पा मारीत बसला, इतकंच नव्हे, तर आपल्या बरोबर जेवायला येण्याचंहि वचन त्यानं तिच्याकडून घेतलं. ती देखणी, तब्बेतदार, विचारी प्रौढ मुलगी त्याला फार आवडली.

' टाइम ॲण्ड टाइम अगेन ' या कादंबरीचं कथानक एवढंच आहे. कादंबरीच्या विषयांत नावीन्य नाहीं, ही गोष्ट मी पहिल्यांदाच सांगितली आहे. परंतु ती सांगतांना मीं असंहि म्हटलं, कीं कादंबरीचा विषय ठराविक असला तरी त्या विषयाची मांडणी नवीन आहे आणि कथानकाच्या गुंफणींत तर फार मोठं सौंदर्य आहे.

हॉटेलपुढें ड्रायव्हरनं टॅक्सी थांबविली. चार्लस आंत शिरला. त्यानं पाहिलं तो एका टेबलापाशीं जीराल्ड एका उंच ग्लासांतलं साधं पेय कार्डीतून पीत बसला होता. त्याच्यासमोर एक मुलगी बसली होती. तीहि पेय पीत होती. दोघांनीं खालीं माना घातल्या होत्या. दोघांच्या गुजगोष्टी चालल्या होत्या. चार्लसच्या मनांत आलेले भलते सलते तर्क खोटे ठरले होते. जीराल्डचं पाऊल अगदींच कांहीं भलत्या प्रकारें वाकडं तिकडं पडलं नव्हतं. चार्लसला त्यांतल्या त्यांत बरं वाटलं. त्याला पाहतांच जीराल्डनं आश्चर्याचा उद्गार काढला. परंतु चार्लसनं सहज आल्याचं सोंग केलं, आणि त्या दोघांजवळ बसून तीं जें पेय पीत होतीं तें पिण्याचीहि तयारी दर्शविली. त्या दोघांशीं खेळीमेळीनं बोलण्यास त्यानं सुरुवात केली.

जी त्याला स्वित्झर्लंडमध्यें सहज भेटली होती व जिचा जोडीदार म्हणून तो टेनिस खेळला होता, ती ॲन रेनॉरच आतां जीराल्डबरोबर बसली होती. संभाषणाच्या ओघांत चार्लसला समजलं कीं जीराल्डनं त्याला फारसं ठकविलं नव्हतं. तो खरोखरच रात्रीच्या गाडीनं लंडनला जाणार होता. साडेदहाची वेळ त्यानं खोटी सांगितली होती एवढंच. गाडी उशिराची होती. ॲन त्याला निरोप देणार होती. मग ती स्वतः अमेरिकेंत जाण्यासाठीं निराळ्या गाडींत बसणार होती. जीराल्ड तिच्या प्रेमांत सांपडला होता, याविषयीं चार्लसला शंका उरली नाहीं. त्याच्या चर्येवरचे भाव ॲनशीं बोलण्याची तऱ्हा, यांचा अर्थ कुणाच्याहि लक्षांत यावा इतका उघड होता. परंतु मुलगा प्रेमांत सांपडला असला तरी फार वाहवला नाहीं या खात्रीनं चार्लसचं मन पुष्कळ शांत झालं. त्या दोघा प्रेमिकांचा त्यानं हसत हसत निरोप घेतला आणि तो आपल्या हॉटेलांत परत आला. पुष्कळशा निश्चिंत मनानं. जो भलताच पेंचप्रसंग ओढवल्याच्या भयानं त्याच्या जिवाचा थरकांप झाला होता तो केवळ कल्पनेचा खेळ ठरला होता.

* *

दुसऱ्या दिवशीं सकाळीं हॉटेलच्या प्रतीक्षागृहांत तो सहज आला, आणि पाहतो तों ॲन रेनॉर त्या ठिकाणीं बसलेली ! त्याला विलक्षण आश्चर्य वाटलं. तिच्याजवळ जाऊन त्यानं विचारलं, " तूं इथें कशी ? "

" मी ह्याच हॉटेलांत उतरलें आहे. "

" पण तूं तर रात्रीच्या गाडीनं अमेरिकेला जाणार होतीस ना ? "

" गेलें नाहीं. "

" आणि जीराल्डहि गेला नाहीं काय ? "

" तो गेला. त्याला आज लंडनमध्यें पुष्कळ कामं आहेत. "

चार्लसला बरं वाटलं. साडेदहाच्या गाडीच्या थापेप्रमाणें जीराल्डच्या लंडनमधल्या कामांचीहि थाप नव्हती, या विचारानं त्याला समाधान झालं. त्यानं ॲनला विचारलं, " पण तूं तर काल रात्रीं मला सांगितलंस कीं जीराल्डला निरोप देऊन तूं अमेरिकेला जाणार ? "

" होय, मी इथेंच राहणार आहें ही गोष्ट जीराल्डला समजूं द्यायची नव्हती मला. "

" कां ? "

" माझ्यासाठीं राहण्याचा त्याला मोह झाला असता. तो माझ्या प्रेमांत सांपडला आहे. परंतु त्याच्या प्रेमाला मी उत्तेजन देणार नाहीं. "

" कां ? "

" तो सतरा वर्षांचा आहे. मी तेहतीस वर्षांची आहे. "

चार्लसला एकदम आठवण झाली कीं, आपल्यांत आणि जेनमध्यें वयाचं असंच अंतर होतं. परंतु ती आठवण त्यानं चर्येवर दिसूं दिली नाहीं. ॲनकडे बघून तो फक्त म्हणाला, " अस्सं ! "

त्याच्या मनांत आलं, आपल्या मनांतल्या साऱ्या शंका आणि सारी भीति अकारणच होती म्हणायची !

तो ॲन रेनॉरशीं गप्पा मारीत बसला, इतकंच नव्हे, तर आपल्या बरोबर जेवायला येण्याचंहि वचन त्यानं तिच्याकडून घेतलं. ती देखणी, तब्येतदार, विचारी प्रौढ मुलगी त्याला फार आवडली.

' टाइम ॲण्ड टाइम अगेन ' या कादंबरीचं कथानक एवढंच आहे. कादंबरीच्या विषयांत नावीन्य नाहीं, ही गोष्ट मी पहिल्यांदाच सांगितली आहे. परंतु ती सांगतांना मीं असंहि म्हटलं, कीं कादंबरीचा विषय ठराविक असला तरी त्या विषयाची मांडणी नवीन आहे आणि कथानकाच्या गुंफणींत तर फार मोठं सौंदर्य आहे.

या सौंदर्याची कल्पना देण्यासाठीं ज्या अनेक गोष्टी मला सांगाव्याशा वाटतात त्यांतली पहिली ही कीं कथानकाला मुख्य पदर एकच असून बाकीच्या अनेक घटना मुख्य पदरांत गुंतविल्यासारख्या आहेत. सतारीच्या मुख्य तारेखालीं तराफाच्या लहान लहान तारा असतात तशा या घटना आहेत. एकंदर कादंबरीचा कालखंड जवळ जवळ चाळीस वर्षांचा आहे. परंतु कथानकाच्या मुख्य गाभ्याकडे बघितलं तर त्याचा काळ अवघ्या दोनच दिवसांचा आहे. आणि यांतूनच निवेदनाचीं आणि कथारचनेचीं अनेक सौंदर्यस्थळं निर्माण झालीं आहेत. कशीं तें पाहा !

'टाइम ॲण्ड टाइम अगेन'च्या कथानकाचा मुख्य पदर कोणता आणि त्यांत गुंतवलेले बाकीचे गौण पदर कोणते तें पाहिलं कीं एक चमत्कृतिपूर्ण गोष्ट ध्यानांत येते. कथानकाचा मुख्य गाभा एवढाच आहे कीं, चार्लस ॲंडरसन आणि त्याचा मुलगा जीराल्ड या दोघांची भेट होते. त्या भेटींत चार्लसला संशय येतो कीं, जीराल्ड प्रेमाच्या लफड्यांत सांपडलेला आहे, मुलाचं रहस्य समजून घेण्यासाठीं आणि अवश्य तर संभाव्य संकटांतून त्याला वाचविण्यासाठीं तो धांवतो, शेवटीं त्याला आढळून येतं कीं जीराल्डचं प्रेम-प्रकरण कांहीं फारसं चिंता करण्यासारखं नाहीं, जिच्यावर जीराल्डचं प्रेम जडलेलं आहे ती ॲन रेनॉर देखणी पण वयानं प्रौढ आणि विचारी असून जीराल्डची आणि आपली स्वतःची ताटातूट करून घेण्याचं तिनंच ठरविलं आहे, मनांत आलेली शंका आणि भीति खोटी ठरल्यामुळें चार्लस निश्चिंत होतो, इतकंच नव्हे, तर ॲन रेनॉरविषयीं त्याचं फार अनुकूल मत होतं. 'टाइम ॲण्ड टाइम अगेन' कादंबरींतली मुख्य घटना फक्त एवढीच आहे. पॅरिस शहरांत ती घडते आणि तिचा काल पुरता चोवीस तासांचा देखील नाहीं. एके दिवशीं संध्याकाळीं चार्लस आणि जीराल्ड एकमेकाला भेटतात. रात्रीं जीराल्ड लंडनला निघून जातो. दुसऱ्या दिवशीं सकाळीं चार्लसला ॲन रेनॉर भेटते, तिच्या बोलण्यावरून उघड होतं कीं, जीराल्डच्या डोक्यांत जरी प्रेमाचं वेड शिरलं आहे तरी तिचा तोल गेलेला नाहीं. चार्लसला ॲन आवडते. इतकी कीं रात्रींच्या जेवणाचं आमंत्रण तो तिला देतो. ती तें स्वीकारते. म्हणजे कथानकांतली मुख्य घटना एके दिवशीं संध्याकाळीं सुरू होते, आणि दुसऱ्या दिवशीं रात्रीं संपते.

कादंबरीला चित्राची उपमा देऊन असं म्हणतां येईल कीं, चित्राच्या पुढच्या भागांत बावन वर्षांचा चार्लस ॲण्डरसन, त्याचा सतरा वर्षांचा मुलगा जीराल्ड, आणि तेहतीस वर्षांची ॲन रेनॉर, एवढ्या तीनच व्यक्ति, त्यांच्या गांठीभेटी, आणि एकमेकांविषयींच्या त्यांच्या भावना, यांचंच चित्र आहे. मात्र या चित्राला जी पार्श्वभूमि आहे तिचा विस्तार फार मोठा आहे. तिच्यांत जवळजवळ चाळीस वर्षांच्या कालांतल्या घटना आहेत. चार्लसचं सबंध चरित्र आहे, त्याचा बाप हॅव्हलॉक त्यानं जिच्यावर प्रेम केलं ती लिली, लिलीचा बाप फ्रेड मॅन्सफील्ड आणि राजकीय वकिलातींतल्या कामाच्या निमित्तानं चार्लसचा ज्या माणसांशीं नवतारुण्यांत संबंध झाला अशा अनेक व्यक्तींचं, त्यांच्या उद्योगाचं आणि सुखदु:खांचं चित्र आहे. या विस्तीर्ण व वैचित्र्यपूर्ण पार्श्वभूमिवर जेम्स हिल्टननं मुख्य चित्र रंगविलं आहे. मुख्य चित्रांतल्या रेखा त्यान झपाट्यानं काढल्या आहेत, आणि पार्श्वभूमि रंगवितांना तपशील सावकाशपणानं गडद भरलेले आहेत, म्हणजे नेहमींच्या न्यायाहून उलटा न्याय पत्करून मुख्य चित्र कांहींसं धांवतं आणि अस्पष्ट दिसावं, परंतु पार्श्वभूमि मात्र पाहणाराच्या नजरेंत अगदीं रेखीवपणानं भरावी; असा एक नवीनच प्रयोग हिल्टननं केलेला आहे, पुढच्या वस्तूंऐवजीं पार्श्वभूमींतल्या वस्तूंवर फोकस लावून एखाद्या छायाचित्रकारानं फोटो काढला तर तो जसा दिसेल तसंच या कादंबरींतलं एकंदर निवेदन दिसावं असा हिल्टनचा प्रयत्न उघड उघड आहे.

म्हणून त्यानं काय केलंय्, कीं फक्त चोवीस तासांत घडणारा जो मुख्य कथाभाग आहे तो फक्त निमित्तमात्र धरला आहे आणि तो सांगतां-सांगतांच त्याचा धागा सोडून चार्लसच्या पूर्वायुष्याकडे वळून अनेक हकीगती सांगितल्या आहेत, सिंहावलोकनाची ही निवेदनपद्धति हिल्टनला फार आवडते. त्या पद्धतींत त्यानं नैपुण्यहि संपादन केलेलं आहे. त्याच्या बहुतेक कादंबऱ्या ह्याच पद्धतीनं लिहिलेल्या आहेत. 'टाइम ॲण्ड टाइम अगेन'ची सुरुवात कुठें होते ? चार्लस शाळेंत शिकत असतो तेव्हां ? नाहीं. सुरुवातीच्या प्रकरणांत बावन वर्षांचा चार्लस आपल्याला भेटतो. स्वित्झर्लंडमध्यें सुटी घालविण्याच्या आपल्या मुलाला पॅरिसमध्यें थांबण्याचं आमंत्रण देणारं पत्र चार्लस लिहितो, त्या ठिकाणीं कादंबरीचा प्रारंभ हिल्टननं केलेला आहे.

चार्लस आणि त्याचा मुलगा जीराल्ड हॉटेलांत जेवायला जातात व दोघांचं मोठं मनमोकळं प्रेमाचं संभाषण सुरू होतं, त्याचं वर्णन त्यानं केलं आहे. त्या संभाषणाच्या ओघांत चार्लसच्या विद्यार्थिदशेचा उल्लेख आणला आहे. आणि त्या उल्लेखाचं निमित्त करून भूतकालाकडे वळून कादंबरीच्या दुसऱ्या प्रकरणाला सुरुवात केली आहे. या दुसऱ्या प्रकरणाचा प्रारंभ चार्लसच्या लहानपणीं होतो. आणि सतराव्या वर्षी चार्लस लिली मॅन्सफील्डच्या प्रेमांत पडला तो कथाभाग याच प्रकरणांत घडतो चार्लसच्या बापानं लिलीच्या बापाला पैसे देऊन तिची दूरदेशीं रवानगी केली, चार्लस बापावर रागावला, आपण परीक्षेंत नापास झाल्यावर वकिलातींत प्रवेश करण्याचा मार्गच आपोआप बंद होईल आणि आपल्या मनाप्रमाणें चित्रकलेचा अभ्यास करतां येईल अशी आशा करूं लागला, पण तेवढ्यांत तो परीक्षेंत उत्तम प्रकारें पास झाल्याची तार आली. इत्यादि हकीकत सांगून हिल्टननं दुसरं प्रकरण संपविलं आहे, आणि " एकतीस वर्षांनंतर " अशा शब्दांनीं तिसऱ्या प्रकरणाचा प्रारंभ करून हॉटेलमध्यें जेवणाऱ्या पितापुत्रांच्या संभाषणाचं सूत्र त्यानं पुन्हां हातीं घेतलं आहे.

* * *

याच पद्धतीनं ' टाइम ॲण्ड टाइम अगेन ' ही सबंध कादंबरी लिहिलेली आहे. पॅरिस शहरीं चोवीस तासांत जें घडलें तें थोडंसं सांगायचं, मान मुरडून मागच्या हकीगती सांगायच्या, पुन्हा पॅरिस शहरांतल्या गोष्टींकडे नजर टाकायची, पुन्हा मागचा इतिहास सांगायचा, आणि पुन्हा पॅरिसमध्यें काय झालं त्याचं वर्णन करायचं—असं करीत करीत त्यानं एकंदर निवेदन केलेलं आहे. म्हणून ' पॅरिस ' या मथळ्याची एकंदर चार प्रकरणं या पुस्तकांत असून मधून मधून सिंहावलोकनपद्धतीनं लिहिलेलीं तीन प्रकरणं आहेत. ' पॅरिस ' अशा मथळ्याच्या प्रकरणाचा शेवट, पुढच्या प्रकरणाचा प्रारंभ, त्याची अखेरी, आणि 'पॅरिस' अशाच मथळ्याच्या पुढच्या प्रकरणाची सुरुवात यांचे सांधे कलात्मक रीतीनं एकमेकांत गुंतविण्यासाठीं ज्या युक्त्या लेखकानं केल्या आहेत त्या बारकाईनं पाहण्यासारख्या आहेत. वाचकांची उत्कंठा वाढविणं आणि त्यांना विस्मयाचा धक्का देणं, यासाठीं दोन

प्रकरणांच्या मधल्या सांध्यांत नाट्य असणं आवश्यक आहे हें ओळखून प्रसंगांची मांडणी ज्या कौशल्यानं हिल्टननं केली आहे तें मुद्दाम लक्ष देऊन बघण्यासारखं आहे.

यांतले दोन प्रसंग विशेष बहारीचे वठले आहेत. 'पॅरिस' या मथळ्याच्या नंबर दोनच्या प्रकरणांत जीराल्ड चार्लसला सांगतो कीं, "मला रात्रीं साडेदहाच्या गाडीनं लंडनला जायला हवं." तें ऐकून चार्लसची निराशा होते. जीराल्ड आपल्या सहवासांत दोन दिवस राहील अशी त्यानं अपेक्षा केलेली असते, ती खोटी ठरल्यामुळें त्याला दुःख होतं, परंतु मनांतला खेद तो बाहेर दाखवीत नाहीं, जीराल्डला टॅक्सींत बसवून तो निरोप देतो, हें सारं वर्णन वाचतांना वाचकाला विशेष कांहीं वाटत नाहीं. परंतु हें वर्णन संपतं न संपतं तोंच हिल्टननं विस्मयाचा सुंदर धक्का तयार ठेवलेला आहे. वाचकाला असं कळतं कीं चार्लसनं जीराल्डला मोठ्या प्रेमानं हंसत हंसत निरोप दिला खरा, परतु साडेदहाच्या गाडीची थाप देऊन मुलानं आपल्याला ठकविलं ही गोष्ट त्याच्या लक्षांत आलेली आहे. जीराल्ड ज्या ठिकाणीं गेला. त्या ठिकाणीं जाण्याचं त्यानं ठरविलं आहे. ज्या टॅक्सींतून त्यानं जीराल्डला धाडलं त्याच टॅक्सींत तो बसतो आणि निघतो!

हें वर्णन वाचलं कीं वाचक चकित होतो. आतां बापलेकांत कोणता प्रसंग घडलेला पाहायला मिळतो अशी उत्कंठा वाचकाला लागते.

परंतु जीराल्ड कुठें गेला. तें बघण्यासाठीं टॅक्सींतून निघालेल्या चार्लसला हिल्टननं तसंच सोडलं आहे–नवं प्रकरण सुरू केलं आहे. आणि १९२२ पासून १९३९ पर्यंतच्या सतरा वर्षांतल्या हकीगती ह्या प्रकरणांत सांगितलेल्या आहेत. जेन कॉपरमिल व चार्लस यांची ओळख, मैत्री, लग्न इत्यादि कथाभाग या प्रकरणांत आलेला, आहे. "महायुद्ध सुरू झालं तेव्हां चार्लस लंडनमध्यें होता." अशा वाक्यानं हें प्रकरण संपतं. "पॅरिस" या मथळ्याचं तिसरं प्रकरण सुरू होतं. जीराल्ड कुठें गेला तें बघण्यासाठीं टॅक्सींतून निघालेला चार्लस निवेदनाच्या रंगभूमीवर पुन्हा प्रकट होतो, व वाचक स्वतःशीं म्हणतो, आतां पितापुत्रांची कोणत्या ठिकाणीं भेट होते आणि दोघांत कोणता क्षोभकारक प्रसंग घडतो बघूं या.

वाचकांची उत्कंटा आणि विस्मय या भावनांशीं हिल्टननं अशा प्रकारें गंमतीचा खेळ केलेला आहे.

असाच गमतीचा खेळ पुढं एका ठिकाणीं दिसतो.

टॅक्सीवाला ज्या हॉटेलांत चार्लसला आणून सोडतो, तिथें त्याला जीराल्ड आणि ॲन रेनॉर हीं दोघं भेटतात, त्यांच्याशीं गप्पा मारीत आणि पेय पीत तो बसतो. जीराल्ड प्रेमांत सांपडला असला तरी फारसा वाहवलेला नाहीं अशा खात्रीनं त्याचं मन निश्चिंत होतं जीराल्ड लंडनला जाणार आहे आणि ॲन अमेरिकेला जाणार आहे असं त्याला कळतं, आणि मग त्या दोघांचा निरोप घेऊन तो हॉटेलांत परत जातो, हा कथाभाग वाचल्यावर वाचकाला साहजिक वाटतं कीं गोष्ट आतां संपली. जीराल्डच्या प्रेमप्रकरणाच्या निमित्तानं पितापुत्रांत झगडा निर्माण होईल अशी वाचकाची कल्पना झालेली असते. परंतु ती चुकीची ठरते. मोठा गोळीबार होईल अशी कल्पना झालेली असावी आणि प्रत्यक्ष ऐकूं यावा एक फुसका बार, म्हणजे माणसाची जी फसगत होईल ती वाचकाच्या वांट्याला येते. कादंबरी-लेखकानं आपल्याला उगीचच खोटी हुलकावणी दिली असं त्याला वाटतं. ह्या हुलकावणीचे चातुर्य तो मान्य करतो. परंतु तो थोडासा रागावतोहि. आणि म्हणूं लागतो, जीराल्डच्या प्रेमांतून मोंठा पेचप्रसंग उत्पन्न झाला नाहीं ना? ठीक आहे! मग आता संपवा तुमची कादंबरी. पण वाचक असं म्हणतो न म्हणतो तोंच हिल्टननं त्याला विस्मयाचा धक्का देण्याची युक्ति केलां आहे.

चार्लसची कल्पना असते कीं रात्रीच्या गाडीनं जीराल्ड लंडनला गेला व त्याला निरोप देऊन ॲन अमेरिकेला निघून गेली. परंतु दुसऱ्या दिवशीं सकाळीं हॉटेलच्या प्रतीक्षागृहांत तो सहज जातो आणि पाहतो तो तेथें वृत्तपत्र वाचीत बसलेली ॲन रेनॉर त्याच्या दृष्टीस पडते! त्याला आश्चर्य वाटतं आणि त्याच्याप्रमाणेंच वाचकालाहि! कारण चार्लसची अशी समजूत असते कीं ॲना अमेरिकेला गेली तशीच वाचकांनींहि कल्पना केलेली असते कीं ॲन रेनॉर हें पात्र आपल्याला कादंबरींत पुनः भेटायचं नाहीं.

विस्मयाच्या या धक्यामागोमाग आणखी दुसरा एक लहानसा धक्का

हिल्टननं दिलेला आहे. ॲनच्या आणि चार्लसच्या संभाषणावरून उघड होतं कीं जीराल्ड आपल्या नादीं अधिक लागूं नये म्हणून ॲननं त्याला आपण अमेरिकेला जाणार आहोंत असं खोटं सांगून निरोप दिलेला असतो. ती स्वतः जीराल्डच्या प्रेमांत मुळींच सांपडलेली नसते. "आम्ही दोघंहि एकमेकांच्या प्रेमांत पडलों असतों म्हणजे बरीक मोठाच पेंचप्रसंग निर्माण झाला असता ! कारण तो सतरा वर्षांचा. मी तेहतीस वर्षांची !" असं ती म्हणते. तिचा विचारी दूरदर्शी, प्रामाणिक स्वभाव बघून चार्लसला ती आवडते. तिचा देखणेपणा तर त्याला आकर्षक वाटतोंच. तिचा अधिक सहवास त्याला हवासा वाटतो. तो तिला विचारतो, "आज रात्रीं माझ्याबरोबर जेवशील काय ?" ती त्याचं आमंत्रण स्वीकारते हें वर्णन वाचून वाचकाच्या मनांत हळूंच शंका येते. या दोघांचं जमलं कीं काय ? वाचकाच्या या शंकेचं समाधान स्पष्ट शब्दांत हिल्टनन केलेलं नाहीं. त्यानं फक्त एवढंच सूचित केलं आहे कीं, ॲन कांहीं दिवस पॅरिसमध्यें राहिली, तिचा आणि चार्लसचा बराच सहवास घडला. पुढें ती अमेरिकेला गेल्यावर चार्लस तिला पत्र लिहूं लागला. कादंबरीची अखेर चार्लसनं ॲनला लिहिलेल्या एका पत्रावरच लेखकानं केलेली आहे. जीराल्ड आपल्या वयाच्याच एका मुलीच्या प्रेमांत सांपडल्याची बातमी चार्लसनं या पत्रांत लिहिलेली आहे. आणि "कांहीं कामाकरितां मी लवकरच अमेरिकेस येणार आहे" "तुझ्या भेटीसाटीं मी किती..." असं अर्धवट सोडलेलं वाक्य त्या पत्राच्या शेवटीं आहे.

या पत्रावरून वाचकांनीं काय तें ओळखावं, आम्ही काय तें सांगत नाहीं, असंच जणूं लेखकानं म्हटलं आहे आणि कादंबरीचा शेवट केला आहे. 'तीं तीं पदें नित्य फिरूनि येतीं !' असं जें कादंबरीचं नांव आहे त्याची सत्यता वाचकाला कादंबरी संपवितांना पुन्हां एकदां पटावी अशी ही योजना आहे खचित्. चार्लस व ॲन यांचं प्रेम स्पष्ट शब्दांनीं न सांगतां फक्त सूचित करण्यांत कलात्मकतेचं सौंदर्य लेखकानं साधलेलं आहे.

* * *

म्हणजे फक्त चोवीस तासांत घडणारा मुख्य कथाभाग पाहिला तर

आपल्याला काय दिसतं ? बापाच्या भेटीसाठीं जीराल्ड पॅरिसला आला, तो प्रेमाच्या लफड्यांत सांपडला आहे अशी चार्लसला शंका आली, जिच्या प्रेमांत जीराल्ड सांपडला होता ती ॲन रेनॉर चार्लसला भेटली, ती स्वतः जीराल्डच्या प्रेमांत सांपडलेली नाहीं हें त्याला कळलं आणि तिचा विचारी स्वभाव आणि देखणेपणा यांमुळें ती त्याला इतकी आवडली कीं त्याचंच तिच्यावर प्रेम जडलं ! 'टाइम ॲंड टाइम अगेन'चं मुख्य कथानक हेंच. या कथानकाचा काल अवघ्या चोवीस तासांचा. चार्लसच्या आयुष्यांतल्या चाळीस वर्षांच्या हकीकती आहेत त्या केवळ मुख्य कथासूत्राची पार्श्वभूमि सजविण्यासाठीं लेखकानं सांगितलेल्या आहेत.

मात्र या पार्श्वभूमीचं चित्रण अधिक तपशीलवारपणें आणि सावकाशपणें केलेलं असल्यामुळें त्यांत वैचित्र्य आणि स्पष्टपणा या दोन्ही अधिक प्रत्ययाला येतात. इतकंच नव्हे तर या पार्श्वभूमींतले कांहीं प्रसंग मुख्य सूत्रांतल्या प्रसंगांहूनहि अधिक मनोहर असल्यामुळें वाचकांच्या नजरेंत तेच अधिक भरतात.

उदाहरणार्थ, चार्लसचं आणि लिली मॅन्सफील्डचं प्रेमप्रकरण. एकंदर कादंबरींत या प्रेमप्रकरणाचं स्थान गौण आहे. सतरा वर्षांचा जीराल्ड ॲन रेनॉरच्या प्रेमांत सांपडला तेव्हां चार्लसला भीति आणि चिंता कां वाटली, तर तो स्वतः सतराव्या वर्षीं असाच एका मुलीच्या प्रेमांत सांपडला होता, येवढंच स्पष्ट करण्यापुरतांच—जें एका पिढींत घडलं तेंच पुढच्या पिढींत घडणार होतं, प्रत्येक पुरुषाच्या आयुष्यांत प्रेमानं आंधळे होण्याचे प्रसंग येतातच. एवढंच ध्वनित करण्यापुरतांच—चार्लस आणि लिली यांच्यांतील प्रेमाच्या आख्यानाचा कादंबरींत उपयोग आहे. हें आख्यान लेखकानं गौण म्हणून रंगविलेलं आहे; परंतु तें फार सरस वठलेलं आहे खरं. त्याचे रंगच असे बहारीचे आहेत कीं त्यामुळें त्या आख्यानाला विलक्षण उठाव मिळावा आणि कादंबरी संपवितांना त्याची आठवण वाचकाला पुन्हा तीव्रतेनं व्हावी.

केंब्रिज विद्यापीठांत अभ्यास करणाऱ्या चार्लसची आणि लिलीची पहिली आकस्मिक भेट, त्या भेटींतच त्याला तिच्याबद्दल वाटलेलं आकर्षण नंतरच्या दोघांच्या गांठीभेटी, त्यांत वेगानं वाढत गेलेलं प्रेम, दोघांनीं अनुभवलेली

प्रीति आणि नंतर चार्लसच्या बापाच्या हस्तक्षेपामुळें चार्लसवर झालेला ताटातुटीचा वज्राघात, या सर्व प्रसंगांचीं वर्णनं हिल्टननं अतिशय तादात्म्यानें आणि कौशल्यानं केलीं आहेत.

चार्लस सहजगत्या एका विश्रांतिगृहांत चहा पिण्यासाठीं गेलेला असतांना तेथें एका टेबलाजवळ चहा पीत बसलेली लिली मॅन्सफील्ड त्याला दिसली. तिला पाहतांच त्याला तिच्याविषयीं फार आकर्षण वाटलं. पुस्तक वाचण्यांत ती इतकी गढून गेली होती कीं त्यानं तिला धड पाहिलंदेखील नाहीं. संभाषण तर बाजूलाच राहिलं. परंतु जें पुस्तक ती वाचीत होती, त्याचं नांव चार्लसनं पाहून घेतलं. विश्रांतिगृहांतून बाहेर पडल्यावर एका दुकानांत जाऊन त्यानं तें खरेदी केलं, वाचलं, व तिची भेट त्याच विश्रांतिगृहांत पुनः होईल अशा आशेनं तो त्या ठिकाणीं दुसऱ्या दिवशीं गेला. तिची व त्याची भेट झाली. चार्लसनं तिच्याशीं बोलणं काढलं. तिचं संभाषण ऐकून ती त्याला अधिकच आवडली. मग दोघांच्या गांठीभेटी वारंवार होऊं लागल्या. एका फर्ममध्यें ती टायपिस्ट होती. तिचा बाप लंडनच्या एका उपनगरांतील बगीच्यांचा रक्षक होता. त्या उपनगरांतच तिचं घर होतं. चांगल्या कुलशीलाच्या पण गरीब कुटुंबांतली ती एक थोडीशीं देखणी, साधीसुधी, बेताच्या बुद्धीची मुलगी होती. स्वभावानं इतकी प्रेमळ कीं अमक्यावर ममता करावी अमक्यावर करूं नये असा पंक्तिप्रपंचच तिला ठाऊक नव्हता. चार्लसवर ती फार प्रेम करूं लागली. आपण मोठ्या खानदानी आणि श्रीमंत कुळांतले आहोंत ही गोष्ट लिलीला कळली तर ती आपल्यापासून दूर होईल अशा भीतीनं चार्लसनं स्वतःबद्दलच्या खऱ्या गोष्टी तिच्यापासून लपवून ठेवल्या. तिच्या प्रेमांत तो भलताच सांपडला होता. तिच्याशीं लग्न करण्याचं त्यानं मनानं पक्कं ठरविलं होतं...एके दिवशीं संध्याकाळीं उपनगरांतील तिच्या घरापर्यंत तिला पोंचविण्यासाठीं तो गेला तेव्हां —

त्याच्या लक्षांत आलं कीं लिलीचं आपल्या गांवावर भलतं प्रेम आहे. तिथल्या झाडांबद्दल तर ती फारच अभिमानानं बोलत होती. ती त्याला सांगत होती, 'आमच्या गावांतल्या प्रत्येक रस्त्याच्या दोन्ही बाजूंस सुंदर सुंदर झाडं लावलेलीं आहेत. तीं वाढून मोठीं झालीं कीं त्यांच्या

किती सुंदर कमानी तयार होतील. आणि हें सारं काम कुणाचं माहीत आहे का? माझ्या वडिलांचं. त्यांनीं निरनिराळ्या रस्त्यांवर निरनिराळीं झाडं लावलीं आहेत. आमच्या घराकडे जाणाऱ्या या रस्त्यावर लावलेलीं हीं झाडं लॅबर्नमचीं आहेत. आतां लवकरच या झाडांना तांबड्या लाल फुलांचे घोसच्या घोस येतील, आणि मग इथला देखावा असा कांहीं शोभिवंत दिसेल...' चार्लस म्हणाला, 'आत्ताच तो फार शोभिवंत दिसतो आहे.' त्याच्या मनांत येत होतं, आतां लवकरच हिचं घर येईल. ही निघून जाईल, आणि मग मला एकट्याला स्टेशनावर परत जावं लागेल. तिच्या संगतींतला एक एक क्षण तो एखाद्या कृपणासारखा सांठवीत होता. तिनं आपल्या घराचा नंबर मात्र सांगितला नव्हता, त्यामुळें त्याला सारखी भीति वाटत होती कीं हें पुढचं झाड ओलांडलं कीं तिचं घर येईल, आणि मग ती जाईल. तो एका झाडाखालीं थबकला व तिला हळूंच म्हणाला, 'लिली! माझं तुझ्यावर फार प्रेम आहे, माहीत आहे ना तुला! तुझं आहे?' लिली म्हणाली, 'आहे तर अगदीं पहिल्यापासून आहे. तुझं असेल की नाहीं अशी शंका होती मला. पण आतां मी फार आनंदांत आहे!' इतक्यांत जवळच्या एका बागेंतून एक मांजर उडी मारून त्यांच्या-जवळ आलं, आणि लिलीच्या पायाला अंग घासूं लागलं, ती हसली, आणि तिनं 'मिज! मिज!' असं म्हणत त्या मांजराला उचलून घेतलं. चार्लसला ती सांगू लागली, 'आज रात्रीं मला कांहीं धड झोप यायची नाहीं. मी फार आनंदांत आहे!' तिनं त्या मांजराला खालीं सोडलं आणि त्याला उद्देशून 'मिज! मिज! मिज!' असं म्हणत आणि चार्लसला उद्देशून 'गुड नाइट!' असं म्हणत व हात हालवून दाखवीत ती आपल्या घराकडे पळाली.

अशाच सुंदर वर्णनांनीं चार्लस आणि लिली यांच्यांतील प्रीतीचे सबंध आख्यान भरलेलें आहे. एकंदर कादंबरीच्या रचनेंत या आख्यानाचं स्थान गौण असूनहि तें इतकं हृदयस्पर्शी झालेलं आहे कीं मुख्य कथाभागापेक्षांहि वाचकांच्या स्मरणांत तेंच अधिक राहण्याचा संभव आहे.

ज्या ठिकाणीं चार्लसच्या बापानं रवानगी केली ही गोष्ट उघड होते, त्याच ठिकाणीं आख्यान संपल्यासारखं वाचकाला वाटतं. लेखकानं ते तसं

संपविलं असतं तर तें सरळच झालं असतं, चार्लस लिलीला विसरला, त्यानं जेन कॉपरमिलशीं लग्न केलं. चार चौघांप्रमाणें संसाराला लागला, इतक्या गोष्टी घडल्यावर निवेदनाच्या ओघांत लिलीचा उल्लेख पुन्हा येण्याचं सामान्यतः कांहीं कारण उरत नाहीं. लिलीचं पुढं काय झालं. तें कळून घेण्याची अपेक्षा वाचकाला राहत नाहीं. परंतु हिल्टननें या बाबतींत वाचकाला चकविलें आहे.

लंडनमधील एका स्फोटांत चार्लसची बायको जेन सांपडल्यानंतर थोड्याच दिवसांनीं ज्या उपनगरांत लिलीचं घर होतं त्या उपनगरांत कांहीं कामानिमित्त चार्लस गेला. त्याच्या मनांत आलं. आलोंच आहोंत. तर लिलीच्या बापाची भेट घ्यावी, आणि कसं काय, बरं आहे ना, विचारावं. तो त्याप्रमाणें त्याला भेटला. लिलीच्या बापाला फार आनंद झाला. तो आपल्या स्वभावाप्रमाणें ऐसपैस गप्पा मारूं लागला, तुझं कसं आहे, तुझे वडील कसे आहेत अशी चौकशी त्यानं केली आणि तो म्हणाला, “ आम्ही सारींजणं आनंदांत आहोंत. ” चार्लसनं हळूच विचारलं, आणि लिली कशी आहे ? म्हातारा म्हणाला, “ लिली मजेंत आहे. ऑस्ट्रेलियांतल्या एका माणसाशीं तिनं लग्न केलं. तिला आतां सहा मुलं आहेत. तिच्याकडून आलेले फोटो दाखवितो तुलां हं: ” म्हाताऱ्यानं फोटो काढले आणि दाखविले. चार्लसनं पाहिलं तों लिली आतां चांगलीच वाटोळी गरगरीत झाली होती ! त्यानें फोटो म्हाताऱ्याकडे परत दिले, इकडच्या तिकडच्या गप्पा केल्या आणि निरोप घेतला.

वीस वर्षांपूर्वी चार्लस आणि लिली दोघांनाहि असं वाटत होतं कीं, एकमेकांवांचून आपलं आयुष्य व्यर्थ आहे. ताटातुटीचं दुःख चार्लसला कांहीं दिवस असह्य झालं होतं. परंतु तोच चार्लस आतां वकिलातींतल्या नोकरींत रमला होता, जेन नाहींशीं तरी सुखांत होता ! तीच लिली दूर ऑस्ट्रेलियांत एका माणसाचा संसार करीत होती, सहा पोरांची आई झाली होती. अंगानं भलतीच सुटली होती ! मजेंत होती. ज्या दोघांना वीस वर्षांपूर्वी एकमेकांचा ध्यास लागला होता. तीं दोघं आयुष्याच्या वेगवेगळ्या वाटेनं गेलीं होतीं. चाललीं होतीं ! कांहीं फारसं बिघडलं नव्हतं !

प्रेमाच्या ऐन बहराच्या घटकेला प्रेमिकांना वाटतं, या प्रेमाखेरीज आयु-

ष्यांत अर्थ नाहीं. परंतु त्या प्रेमाची सांगता झाली नाहीं तरीदेखील त्यांच्या आयुष्याचे प्रवाह दुसऱ्या वाटा काढून वाहतातच ! अनादि कालापासून असंच चाललं आहे ! अंतापर्यंत असंच चालणार आहे ! माणसं प्रेमांत सांपडतात, त्या वेळेस अविचारानं आंधळीं होतात, एकमेकांपासून दूर होतात, पुन्हां कुणाच्या तरी प्रेमांत सापडतात ! संसाराचं हें रहाटगाडगं असंच चालायचं ! त्या त्या वेळच्या सुखदु:खांना त्या त्या वेळेपुरता पुष्कळ अर्थ असतो, परंतु एका निराळ्या दृष्टीनं पाहिलं तर कांहीं अर्थ नसतो ! ' टाइम अॅण्ड टाइम अगेन ' या कादंबरीचं हेंच तात्पर्य लेखकाला अभिप्रेत असावंसं वाटतं.

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१०८६०

# 'बेगुन्हा'

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## टेरेन्स रॅटिगन

पातिव्रत्य, राजनिष्ठा, स्वदेशप्रीति अशा कांहीं मानवी भावना चिरंतन स्वरूपाच्या आहेत, व त्यामुळं त्यांवर आधारलेलं नाट्यवाङ्मय सर्व भाषांत सर्व काळीं लिहिलं गेलं आहे आणि यापुढंहि लिहिलं जाईल. काळ कितीहि बदलला, माणसांचे आचारविचार कितीहि पालटले, तरी, या ना त्या स्वरूपांत निष्ठा, प्रीति, अप्रीति हे मनोविकार माणसांच्या व्यवहारांत प्रकट होणारच, आणि प्रसंगोपात्त त्या विकारांतून जो संघर्ष निर्माण होईल, त्याकडे नाटककारांचं लक्ष आकृष्ट होणारच. सत्यासाठीं आणि सत्त्वासाठीं सर्वस्व पणाला लावणं ही देखील मानवी जीवनाला उजळा देणारी एक शाश्वत भावना आहे. या भावनेचा उदात्त विलास सत्यवचनी हरिश्चंद्र राजाच्या चरित्रांतच दृष्टीस पडूं शकतो असें नाहीं; आधुनिक काळांतेदखील, अगदीं सामान्य माणसाच्या चरित्रांतसुद्धां सत्यासाठीं, घराच्या अब्रूसाठीं प्राणपणाचा झगडा होऊं शकतो, आणि झगड्याचा प्रसंग दृष्टीस पडला, कीं त्यांवर नाटक लिहिण्याची प्रतिभासंपन्न लेखकाला इच्छा होते. कथा-वस्तूला योग्य तो कलात्मक साज चढविण्याचं कसब लेखकानं वापरलं तर त्याची नाट्यकृति गाजल्यावांचून रहात नाहीं.

'Winslow Boy' ही अशाच प्रकारची अत्यंत गाजलेली अशी एक नाट्यकृति आहे. नाट्यकृतीचा कर्ता टेरेन्स रॅटिगन हा इंग्लंडमधील एक विशेष कुशल नाटककार म्हणून प्रख्यात आहे. 'The Deep Blue Sea.' 'French Without Tears,' 'Flare Path' हीं त्याचीं नाटकं विशेष गाजलीं. 'विन्स्लो बॉय' हें नाटक लंडन शहरांत सतत वर्षभर चालू होतं, व या नाटकाला अनेक पारितोषिकेंहि मिळालीं.

अशा प्रकारें टेरेन्स रॅटिगनच्या या नाटकाला भरघोस कीर्ति आणि

लोकप्रियता लाभली, याचीं कारणं अनेक होतीं. त्या नाटकाचा पहिला जाहीर प्रयोग १९४६ सालीं मे महिन्याच्या २३ तारखेला लंडन शहरांतील सुप्रसिद्ध ' लिरिक ' थिएटरमध्यें झाला. तेव्हां त्यांत प्रमुख भूमिका ज्यांनीं केल्या ते नट आणि त्या नटी नामांकित आणि कुशल होत्या. ज्या प्रत्यक्ष घटनेवर नाटकाचं कथानक आधारलेलं होतं, ती नुकतीच गाजली होती व लोकांच्या स्मरणांत ताजी होती. परंतु हीं झालीं प्रासंगिक आणि नैमित्तिक कारणं. नाटकाच्या अपूर्व यशाचं मुख्य कारण हें होतं कीं, ज्या प्रत्यक्ष घटनेवर नाटकाची उभारणी करण्याचं लेखकानं ठरवलं, त्या घटनेंत अनुस्यूत असलेल्या मानवी भावनांच्या संघर्षाला त्यानं अधिक स्पष्ट आणि वेधक स्वरूप दिलं, आणि मग नाट्य-कृतीच्या चार अंकांचं शिल्प मोठ्या कौशल्यानं घडविलं. हा संघर्ष आणि हें कौशल्य या दोहोंचा जितका अभ्यास वाचक करतील तितकं ' विन्स्लो बॉय ' या नाटकाचं सौंदर्य त्यांच्या लक्षांत अधिक येईल.

इंग्लंडमधील एका कुटुंबांतला चौदा वर्षांचा मुलगा ऑसबोर्न येथील शाही आरमारी विद्यालयांत शिकत होता. त्यानं दुसऱ्या एका विद्यार्थ्याच्या नांवाची पांच शिलिंगांची पोस्टल ऑर्डर खोटी सही करून वटविल्याचा आरोप सिद्ध झाल्यामुळं त्याला विद्यालयांतून काढून टाकण्यात आलं. मुलगा म्हणत होता, ' मीं चोरी केली नाहीं. ' परंतु कॉलेजच्या अधिकाऱ्यांचं म्हणणं असं कीं, ' आम्हीं केलेल्या चौकशींत जो पुरावा पुढं आला, त्यावरून या मुलानंच खोटी सही आणि चोरी केली याबद्दल संशयाला जागा उरत नाहीं, आणि विद्यालयांतून नांव काढून टाकण्याची जी शिक्षा त्याला दिली ती पूर्णतः योग्य आहे. ' मुलाच्या बापाची खात्री होती कीं, मुलगा बेगुन्हा आहे. कॉलेज–अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध आरमारी खात्याच्या वरिष्ठांकडे त्यानं दाद मागितली. या वरिष्ठांनीं प्रकरणाची फेरचौकशी केली व निकाल दिला कीं, मुलानं चोरीचा गुन्हा केलेला आहे व त्याला झालेल्या शिक्षेची दुरुस्ती करण्याचं कारण नाहीं. परंतु मुलाच्या बापानं न्याय मिळ-विण्याचे प्रयत्न चालूच ठेवले. या प्रकरणाला वृत्तपत्रांनीं मोठी प्रसिद्धि दिली. लोकमताची मोठीच लाट उसळली, आणि हें प्रकरण इतकं रंगलं कीं, पार्लमेंटच्या अधिवेशनांत तें चर्चेला निघून विरोधी पक्षाच्या कडक

टीकेला तोंड देतांदेतां सरकारला पुरेवाट झाली. अखेर मुलाचं निरपराधित्व सिद्ध झालं. त्याच्या बापानं एक मोठा अवघड लढा जिंकला.

ज्या प्रकरणानं उलटसुलट मतांची प्रचंड खळबळ साऱ्या इंग्लंड देशभर उडाली, त्या प्रकरणाचा सारांश एवढाच होता. एका चौदा वर्षांच्या मुलावर आलेला चोरीचा आळ, आणि मुलावरचा खोटा कलंक धुऊन काढण्यासाठीं त्याच्या बापानं केलेले भगीरथ प्रयत्न, एवढाच या प्रकरणाचा मुख्य गाभा. म्हटलं तर ही घटना सामान्य आणि क्षुल्लक आहे. लहान मुलांवर चोरीचे आरोप अनेक वेळां होतात. कांहीं खरे असतात, कांहीं खोटे असतात. जें खोटे असतात त्यांपैकीं बहुतेक वज्रलेप ठरतात. क्वचित् एखाद्याच प्रकरणीं निकरानं दाद मागितली जाते, आणि त्याहूनहि क्वचित् एखाद्याच वेळीं दाद मिळते. तसं पाहिलं तर असलीं प्रकरणं विशेष महत्त्वाचीं मानण्याचं कांहीं कारणहि नसतं. तीं थोडावेळ गाजतात, आणि लोकांच्या स्मरणांतून नाहींशीं होतात.

परंतु एखाद्या कुशल नाटककारानं अशा एखाद्या प्रत्यक्ष घटनेवर कलेचा साज चढविला तर मात्र ती घटना ललित साहित्यांत कायमचं स्थान मिळवूं शकते. आरमारी विद्यालयांत शिकणाऱ्या एका चौदा वर्षांच्या मुलावरील चोरीच्या आरोपाची जी हकीकत वर सांगितली तिला टेरेन्स रॅटिगन या नाटककारानं असंच मानाचं स्थान मिळवून दिलं आहे. या नाटकाची रंगभूमीवरची कारकीर्द आतां संपली आहे. गाजणारे चित्रपट-देखील कांहीं वर्षांनीं दिसेनासे होतात, हा न्याय या नाटकाच्या आधारानं तयार झालेल्या चित्रपटालाहि लागू आहेच. परंतु 'विन्स्लो बॉय' या कलाकृतीचं दृश्य स्वरूप जरी आतां कालवश झालेलं असलं तरी तिचं ग्रंथगत श्राव्य स्वरूप दीर्घकाल टिकणारच, आणि या नाट्यकृतीच्या अभ्यासाचा आल्हाद रसिकांना दीर्घकाल घेतां येणारच.

एखाद्या प्रत्यक्ष घटनेवर जेव्हां कादंबरीची किंवा नाटकाची उभारणी केली जाते, तेव्हां जें खरोखरच घडलं तें लेखकानं किती वापरलं, आणि स्वतःच्या कल्पनेनं त्यांत कोणती भर घातली, हें निश्चित सांगणं लेखका-खेरीज इतरांना कठीण असतं. त्याच्या कलाकृतींत प्रत्यक्षाच्या आणि

कल्पिताच्या रेषा आणि रंग मिसळून एकजीव झालेले असतात. एकापासून दुसऱ्याचा वेगळेपणा सहज ओळखतां येत नाहीं लेखकाच्या यशाची हीच खरी खूण असते. पण असं असलं तरी जें प्रत्यक्ष घडलं तें कल्पिताच्या कुंचल्यानं लेखकानं कसं नटविलं हें पहाण्यांतच खरा रसास्वाद आहे.

या दृष्टीनं 'विन्स्लो बॉय' या नाटकाचा विचार करायचा झाल्यास नाटकाचं कथानक सारांशरूपानं डोळ्यांपुढं आणायला हवं. नाटकांत प्रमुख पात्रं कोणतीं, आणि नाटकाच्या चार अंकांत तीं काय काय करतात तें बघायला हवं. बघूं या.

'आर्थर विन्स्लो' नांवाचा एक गृहस्थ बँकेंतल्या नोकरींतून नुकतांच निवृत्त झालेला आहे. त्याची सांपत्तिक स्थिति मध्यम प्रकारची आहे. त्याच्या बायकोचं नांव 'ग्रेस'. त्याला दोन मुलगे आहेत : एक विशीच्या सुमाराचा कॉलेजांत शिकणारा 'डिकी,' आणि दुसरा ऑसबोर्न येथील आरमारी विद्यालयांत कॅडेट म्हणून शिक्षण घेणारा चौदा वर्षांचा 'रोनी.' 'लग्नाला योग्य जाहली आहे' [illegible] एक तरुण मुलगी त्याला आहे. तिचं नांव 'कॅथरिन.' तिची राजकीय मतं जहाल आहेत, कामकऱ्यांचा कैवार घेणारी व स्त्रीस्वातंत्र्याचा हिरीरीनं पुरस्कार करणारी ती आहे. 'जॉन वॅदरस्टोन' नांवाच्या एका तरुणावर तिचं प्रेम आहे, व त्याचंहि तिच्यावर प्रेम असल्यामुळं लग्न करण्याची दोघांचीहि इच्छा आहे. नवरा, बायको, तीन मुलं आणि मुलीचा प्रियकर, अशा पांच माणसांच्या आयुष्यांत छोट्या मुलावर आलेल्या चोरीच्या आरोपामुळं उठलेलं वादळ,—एवढीच मध्यवर्ती कल्पना ठरवून लेखकानं 'विन्स्लो बॉय' या नाटकाच्या चार अंकांची रचना केलेली आहे. प्रत्यक्ष हकीकतीचं जें प्रकरण इंग्लंडमध्यें गाजलं त्यांत ज्याच्यावर आरोप आला तो मुलगा आणि त्याचा बाप, एवढ्या दोनच व्यक्ति लोकांना माहीत झाल्या असतील. ज्या वकिलानं मुलावरचा खटला हातीं घेतला, लढविला, आणि जिंकला त्याचंहि नांव लोकांना माहीत झालं असेल. नाट्यलेखकानं या तीन पात्रांच्या भरीला कोणतीं मुख्य पात्रं उभीं केलीं ?—तर ज्यावर चोरीचा आरोप आला त्या मुलाची आई, तरुण बहीण, थोरला भाऊ आणि बहिणीचा प्रियकर. या चार काल्पनिक पात्रांमुळं मुख्य कथावस्तूची रंगत कशी वाढली, सुख-

दुःखांचे धागेदोरे कसे विणले गेले, मुख्य विषयाला विलक्षण परिणामकारक उठाव कसा मिळाला, हें पहाणं फार मनोरंजक ठरेल.

एका चौदा वर्षांच्या मुलावर चोरीचा खोटा आरोप आला, पण त्याच्या बापानं प्रयत्नांची शिकस्त करून मुलाचं निरपराधित्व शाबीत केलं, एवढींच काय ती टेरेन्स रॅटिगननं प्रत्यक्षांतून केलेली उसनवारी. एखाद्या बिंदुमात्र गर्भाचा स्त्रीच्या उदरांत कलेकलेनं विकास व्हावा, त्याला अवयव फुटावेत, आणि तान्ह्या बालकाचं गोजिरवाणं रूप त्याला प्राप्त व्हावं, त्याप्रमाणं रॅटिगनच्या कौशल्यानं बिंदुमात्र प्रत्यक्ष हकीकतीला किती बाळसेदार स्वरूप प्राप्त झालेलं आहे तें बघण्यांत खरी मौज आहे. नाटकांतला बाप आर्थर हा नुकतांच निवृत्त झालेला आहे. दोन्ही मुलांचं शिक्षण यथाक्रम होईल, मुलगी कॅथरिन विवाहबद्ध होऊन सासरीं जाईल, मग उरलेलं आयुष्य आपल्याला निश्चिंतपणानं घालवितां येईल. अशा हिशेबांत असलेला नाटकाच्या प्रारंभीं तो आपल्याला दिसतो. तो स्वास्थ्याची अपेक्षा करीत असतो. नेकीनं नोकरी केली, लौकिक मिळविला, फार नव्हे पण बेतापुरतीं माया जोडली, गृहस्थाश्रमाची जबाबदारी पार पडली, आतां आयुष्याचे उरलेले दिवस बऱ्याचशा निश्चिंतपणानं घाल-वायला हरकत नाहीं, अशा समाधानी वृत्तींत तो असतो . आतां आपल्या संसारांत वांकडंतिकडं संकट तरी खास उत्पन्न होणार नाहीं अशी त्याची खात्री असते, आणि यामुळं तो कांहींसा बेसावध असतांनाच एकदम एका संकटाचा प्रहार त्याच्यावर होतो. — त्याचा चौदा वर्षांचा मुलगा रोनी अकस्मात् घरीं येतो ! खोटी सही करून एका विद्यार्थ्याची पोस्टल ऑर्डर वटविल्याचा आरोप त्याच्यावर सिद्ध झालेला असतो, व आरमारी विद्या-लयांतून त्याला हांकून घरीं पाठविलेलं असतं ! या एका घटनेनं मुलाचा बाप, मुलाची आई व बहीण या तिघांच्याहि आयुष्याच्या नीट बसलेल्या किंवा बसणाऱ्या घड्या पार विस्कटून जातात !

वास्तविक पहातां मुलावर चोरीचा आरोप आला तर एखादा सामान्य बाप थोडासा रागावेल, चिडेल पण मग म्हणेल, झालं तें गेलं खड्ड्यांत, मुलाच्या शिक्षणाची दुसरी व्यवस्था करावी आणि पुढचा मार्ग काढावा. परंतु जें प्रकरण इंग्लंडमध्यें गाजलं त्यांतला बाप असा

सामान्यांतला नव्हता हें तर उघडच आहे, आणि रॅटिगननं आपल्या नाटकांतल्या बापाचं असामान्यत्व तर आणखीच खुलविलं आहे. नाटकाच्या प्रारंभापासून रॅटिगननं असं सारखं सूचित केलेलं आहे कीं, विन्स्लो कुटुंबांतल्या साऱ्या माणसांना आर्थरविषयीं फार दरारा वाटत आहे, तो फार नेकीचा गृहस्थ आहे, वृत्तीनं गंभीर आहे, स्वभावानं कठोर आहे, व प्रेमळ आहे; परंतु शिस्तीचा भोक्ता आहे. आरमारी विद्यालयांतून हांकून दिलेला छोटा रोनी घरीं परत आल्याचें कुटुंबांतील सर्व माणसांना कळतं तेव्हां, त्यांना चिंता उत्पन्न होते ती रोनीवर हें काय नसतं संकट आलं याची नव्हे, तर आतां ही गोष्ट आर्थरला कळली तर कोणता भडका उडतो याचीच ! लेखकानं आपल्या नाटकांतल्या बापाचं स्वभावचित्रण अशा प्रकारें आधीं तयार केलेलं आहे. आर्थर हा सामान्य बापांपैकीं नव्हे ही गोष्ट लेखकानं पक्की प्रस्थापित केलेली आहे. अशा आर्थरला रोनीवरचा आरोप कळतो. तो रोनीला म्हणतो, "खोटं बोलूं नकोस. बोललास तर मला तें ओळखतां येईल. खरं काय तें सांग." आणि रोनी जेव्हां पुनःपुन्हा सांगतो, 'मी बेगुन्हा आहें," तेव्हां आर्थर त्याच्या सांगण्यावर विश्वास ठेवतो, आणि मनाशीं ठरवितो कीं, आपल्या मुलावर आलेला हा आरोप मुकाट्यानं गिळायचा नाहीं, तो बेशाबीत करायचाच. त्यासाठीं वाटेल ती किंमत द्यावी लागली तरी चालेल. कथानकांतलं नाट्य प्रथम प्रकट होतं तें या ठिकाणीं ! आणि मग कथानक एकेक वळण घेऊन पुढं सरकतं तें आणखी आणखी नाट्य निर्माण करीतच ! रोनी बेगुन्हा आहे आणि तो खोटं बोलत नाहीं अशी एक विलक्षण श्रद्धा आर्थरनं मनाशीं ठेवलेली आहे. नाटकांतला एकंदर झगडा आहे तो ही श्रद्धा खरी करण्याबद्दलचा !

रोनीवर आलेला आरोप काय वाटेल तें झालं तरी गैरशाबीत करीनच असं म्हणणं सोपं असलं, तरी त्याप्रमाणं करणं किती कठीण होतं, तें रोनीचा बाप आर्थर याला आढळून यायला वेळ लागला नाहीं. ऑसबोर्नच्या विद्यालयाकडे त्यानं तक्रार केली तेव्हां त्याला उत्तर मिळालं कीं, एकदां झालेला निर्णय फिरवितां येणार नाहीं. नाविक दलाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडं दाद मागितली, ती लवकर लागेना. खूप

धडपड करावी लागली, तेव्हां त्यांनीं रोनीचा फेरजबाब घेऊन ठरविलं कीं, विद्यालयानं दिलेला निर्णय बरोबर आहे. ऑसबोर्न विद्यालयाच्या अधिकाऱ्यांवर दावा करतां येत नव्हता; कारण तांत्रिक दृष्ट्या रोनी लष्करी नोकर ठरत होता व त्यानं फिर्याद करावयाची म्हणजे ती इंग्लंडच्या राजाविरुद्धच करावयाची असा अर्थ होत असल्यामुळं अशा फिर्यादीला आधीं सरकारची परवानगी लागत होती, ती मिळण्यासारखी नव्हती. मग उरला एकच मार्ग. तो म्हणजे लोकमत जागृत करायचं आणि या प्रकरणावर पार्लमेंटमध्यें चर्चा घडवून आणायची. अशा चर्चेंत सरकारचा पराभव होण्याची वेळ आली तर खुल्या फिर्यादीला सरकार परवानगी देईल असा संभव होता. आर्थरनं हा सारा खटाटोप केला. एक अत्यंत नांवाजलेला 'बॅरिस्टर 'सर रॉबर्ट मॉर्टन' याच्याकडे रोनीचं प्रकरण सोंपविलं. सर रॉबर्ट पार्लमेंटचा सभासद होता आणि विरोधी पक्षांतील एक अत्यंत वजनदार प्रमुख म्हणून त्याचा दबदबा होता. सर रॉबर्टनं हें प्रकरण अत्यंत कौशल्यानं आणि नेटानं लढविलं. खुल्या फिर्यादीचा मार्ग मोकळा करून घेतला. इतकंच नव्हे, तर दावा जिंकलादेखील ! रोनीचं निरपराधित्व कोर्टाच्या निवाड्यांत संपूर्णतः सिद्ध झालं. आर्थरची श्रद्धा खरी ठरली !

परंतु या अखेरच्या विजयासाठीं त्याला केवढी जबरदस्त किंमत द्यावी लागली ! सर रॉबर्टसारख्या नामांकित बॅरिस्टरची दणदणीत फी तर त्याला भरावी लागलीच, परंतु इतर कितीतरी प्रकारांनीं त्याला मनस्ताप सोसावा लागला आणि त्याग करावा लागला. किती धैर्यानं आणि आत्मविश्वासानं संकटांना आणि निराशेला तोंड द्यावं लागलं. 'विन्स्लो बॉय' हें नाटक म्हणजे आर्थरच्या श्रद्धेची, त्यागाची, आशावादाची, मनस्तापाची, आणि सत्याग्रहाची एक विलक्षण रोमांचकारक कथा आहे. या कथेचा शेवट आर्थरच्या विजयांत होतो. म्हणून नाटकाला सुखान्त म्हटलंच पाहिजे. परंतु विजयाच्या आनंदानं भरलेली अखेरी सोडली तर बहुतेक सबंध कथेवर निराशेची, दुःखाची छाया आहे. तींत परोपरीचं कारुण्य आहे, आणि कारुण्याचं चित्रण करण्यांतच नाटककाराच्या कौशल्याचा विलास अनेक तऱ्हांनीं प्रकट झाला आहे.

रोनीचा थोरला भाऊ डिकी याचं मत असं होतं कीं, आला या पोरावर चोरीचा आळ तर आला ! त्यांत काय मोठसं ? आमच्या शाळेंत तर सारींच पोरं चिकार चोऱ्या करीत असत ! एवढंच नव्हे, तर तो स्वच्छ असंदेखील बोलून दाखवी कीं, रोनीनं खरोखरीच चोरी केलीहि असेल. रोनीची आई ग्रेस हिची खात्री होती कीं, रोनी बेगुन्हा असला पाहिजे. परंतु त्याच्यावरचा कलंक धुऊन काढण्यासाठीं जवळ असेल—नसेल तें पणाला लावण्याचा एक प्रकारचा जुगार जेव्हां आर्थरनं मांडला, तेव्हां तिला तें सारं मूर्ख हटवादासारखं वाटूं लागलं. आपला नवरा हट्टी आहे, तो आपलं ऐकायचा नाहीं, हें ती जाणून होती. परंतु त्यामुळंच तिच्या मनातलं दुःख शतपटींनीं वाढलं होतं. रोनीचा दावा लढण्यासाठीं पैसे हवेत म्हणून आर्थरनं डिकीला सरळ सांगितलं कीं, ‘ तुझं शिक्षण पुरे झालं, तूं आतां नोकरी धर. ’ तेव्हां तर बापाच्या देखत नव्हे, परंतु बहिणीजवळ डिकीनं रोनीबद्दल असा उद्‌गार काढला कीं, ‘या कार्ट्यामुळं साऱ्या कुटुंबाची दैना होणार आहे. ’ रोनीच्या आईनं असा उद्‌गार काढला नाहीं, परंतु तिची भावना हीच होती कीं, रोनीच्या या प्रकरणापायीं आर्थर आपली प्रकृति बिघडवून घेत आहे, सारी जिंदगी घालवीत आहे, आणि सुखाचा संसार दुःखाचा करीत आहे.

आपण आपल्या सत्याग्रहापायीं कुटुंबाची वाताहत करीत आहोंत. आपल्या पत्नीला दुःखांत टाकीत आहोंत, थोरल्या मुलाचं नुकसान करीत आहोंत, या साऱ्या गोष्टी आर्थरला कळत कां नव्हत्या ? पण स्वतःच्या श्रद्धेसाठीं त्यानं एक झुंज आरंभिली होती; सर्वस्व पणाला लावलं होतं. त्यासाठीं जें जें करावं लागेल त्याची-त्याची तयारी त्यानं ठेवली होती. मात्र एकीकडे ही झुंज करीत असतांना दुसरीकडे त्यांच्या मनांत असं आल्यावांचून रहात नसे, कीं, एकंदर कुटुंबावर दारिद्र्याचं संकट ओढवून घेण्याचा मला खरोखर अधिकार आहे काय ? हा विचार मनांत आला कीं त्याचं अंतःकरण हादरून जात असे. पण तो मनाशीं म्हणे, हें दुःख कितीहि असह्य असलं तरी मला सोसलंच पाहिजे ! सत्यासाठीं ! न्यायासाठीं ! माझ्या श्रद्धेसाठीं !

विन्स्लो कुटुंबांतल्या व्यक्तींच्या या वेगवेगळ्या मनोवृत्तींचं जें चित्रण

रॅटिगननं नाटकांत केलेलं आहे, तें इतकं कौशल्यपूर्ण आहे कीं, त्या चित्रणांतल्या कारुण्याच्या छटा वाचकाच्या मनावर फार स्पष्ट आणि खोल ठसा उमटवितात. आर्थरची मुलगी कॅथरिन हिची स्वभावरेखा तर या कारुण्यामुळं फारच मोहक वठली आहे. रोनीची आई ग्रेस आणि थोरला भाऊ डिकी यांच्याहून कॅथरिनची वृत्ति अगदीं भिन्न आहे. बापानं सुरू केलेला लढा तिला पूर्ण पसंत आहे. आणि या लढ्यांत बापाच्या खांद्याला खांदा लावून ती उभी असलेली नाटकभर दिसते. रोनी खोटं बोलणार नाहीं आणि तो ज्या अर्थीं ' चोरी केली नाहीं ' म्हणतो त्या अर्थीं तो निष्कलंक असलाच पाहिजे, अशी आर्थरची श्रद्धा आहे. कॅथरिनची अशी श्रद्धा नाहीं. त्याचा काय नेम, पोरवयाच्या रोनीनं चोरी केली असेलहि, अशी तिच्या मनांत शंका आहे. परंतु तिच्या जहाल मतांना अनुसरून तिची विचारसरणी अशी कीं आपल्यावरच्या आरोपाची फेरचौकशी व्हावी व आपल्याला न्याय मिळावा, असं म्हणण्याचा हक्क प्रत्येक नागरिकाला असला पाहिजे आणि या हक्कासाठीं रोनीचं प्रकरण लढविलं पाहिजे, म्हणजे तिच्या व तिच्या बापाच्या तात्त्विक भूमिकेंत अंतर आहे; परंतु हें अंतर सोडलं तर बापाप्रमाणंच तिचा निश्चय खंबीर आहे. अखेर यश मिळेपर्यंत झगडायचं हीच तिचीदेखील वृत्ति आहे. आणि या झगड्यांत पडेल ती किंमत द्यायला ती स्वतः तयार असल्याचं नाटककर्त्यानं दाखविलं आहे. यामुळं एकंदर नाटकांत आर्थर आणि कॅथरिन हीं दोन पात्रं फार उठून दिसतात. दोघांच्याहि स्वभावचित्रांत कारुण्याचा अंश फार ठळकपणानं दिसतो. संकटाच्या वादळांत ताठ उभा राहिलेला आर्थर, आणि त्याच्या हातांत हात घालून त्याला सतत धीर देणारी कॅथरिन या दोघांच्या आकृति विशेष हृदयस्पर्शी वाटतात त्या, त्या दोघांनाहि मनांतल्या मनांत जें दुःख सोसावं लागतं त्यामुळं.

कॅथरिनचं दुःख कोणत्या प्रकारचं आहे पहा. पहिल्या अंकाच्या शेवटीं लष्करी नोकरींतला जॉन वॅदरस्टोन या तरुणाशीं तिचं लग्न ठरतं. त्याच्यावर तिचं प्रेम आहे. त्याची पत्नी होण्याची तिची इच्छा आहे. तिचा बाप विवाहाला संमति देतो, तेव्हां साहजिकच तिला फार आनंद होतो. परंतु हळूहळू हें स्पष्ट होऊं लागतं कीं रोनीच्या प्रकरणामुळं कॅथरिनच्या विवाहांत अडथळा निर्माण होणार आहे. सर रॉबर्ट मॉर्टनसारखा कायदेपंडित मिळ-

वायचा तर त्याची जबर फी द्यायला पाहिजे, आणि ती फी द्यायची झाली तर कॅथरिनच्या लग्नासाठीं हुंड्याचा खर्च करणं शक्य नाहीं. हुंडा न मिळाला तरी जॉन आपल्याशीं लग्न करीलच, अशी कॅथरिनला आशा वाटते. जॉन तिची ही आशा कांहीं काळ वाढवितोंहि. परंतु अखेर वेळ अशी येते कीं जॉनचा बाप त्याला धमकी घालतो, ' विन्स्लो कुटुंबांतलीं माणसं गाढव आहेत. त्यांच्या मुलीशीं तुझं लग्न व्हावं हें मला पसंत नाहीं.' नाटकाच्या तिसऱ्या अंकांत जॉनचा बाप कॅथरिनच्या बापाला कळवितो कीं, तुम्ही हें प्रकरण तावडतोब सोडून दिलं नाहींत तर तुमच्या मुलीच्या व माझ्या मुलाच्या लग्नाला मी निकरानं विरोध करीन. ' इतकं झाल्यावर जॉन गडबडतो व कॅथरिनला म्हणतो कीं, ' बापाचा विरोध न जुमानतां मी लग्न करीनहि, परंतु मला हुंडा मिळाला पाहिजे. ' नाटककर्त्यानं हा प्रसंग अशा वेळीं आणला आहे कीं पार्लमेंटमधल्या चर्चेनंतर सरकारनं खुल्या फिर्यादीला परवानगी दिलेली असते व आर्थरपुढें असा प्रश्न असतो कीं, सर रॉबर्ट मॉर्टनची जबर फी भरून कोर्टांत खटला लढवायचा कीं नाहीं ? तो लढवायचा झाला तर मुलीसाठीं हुंडा देणं अशक्य आहे. खटला तरी लढवायचा, किंवा हुंडा देऊन मुलीला सुखी तरी करायचं, हे दोनच मार्ग आर्थरपुढं असतात. सर रॉबर्ट मॉर्टन जेव्हां आर्थरला विचारतो, " काय करायचं बोला." तेव्हां ऑर्थर म्हणतो, " निर्णय माझ्या हातीं नाहीं कॅथरिनच्या हातीं आहे. सर रॉबर्ट तिच्याकडे पहातो. ती सांगते, " न्याय प्रस्थापित झालाच पाहिजे." हें सांगतांना तिनं आपल्या प्रेमावर आणि संसारसुखावर पाणी सोडलेलं आहे; स्वतःच्या निराशेचं दुःख गिळून टाकलं आहे. श्रद्धेसाठीं झगडणाऱ्या बापाचा हात तिनं अधिकच घट्ट धरला आहे. कसोटीच्या वेळेस ती कचरली नाहीं. नाटकाच्या तिसऱ्या अंकाच्या अखेरचं हें कॅथरिनचं चित्र कारुण्यानं ओथंबलेलं असल्यामुळं अत्यंत मोहक, हृदयस्पर्शी झालेलं आहे !

कॅथरिनच्या स्वभावचित्राची ही शोभा आणखीच वाढविणारी एक रंगछटा नाटककारानं योजिली आहे, ती अवश्य लक्षांत घ्यावयास हवी. या रंगछटेची खरी गंमत कळण्यासाठीं रोनीचं प्रकरण लढविण्याचं काम पत्करणारा सर रॉबर्ट मॉर्टन याचं चित्र लेखकानं कसं रंगविलं आहे तें आधीं

बवायला हवं. वकिलीच्या धंद्यांत अत्यंत निष्णात् म्हणून सर रॉबर्टची कीर्ती आहे. पार्लमेंटमध्यें त्याचं इतकं वजन आहे कीं, अधिकारारूढ सरकारला त्याचा दरारा वाटतो. तो इतका श्रीमंत आहे कीं, पैशाची त्याला फिकीर नाहीं. त्याचं बोलणंचालणं अत्यंत मिजासखोर, अहंमन्य माणसासारखं आहे. त्याच्या प्रत्येक शब्दांत आणि कृतींत एक प्रकारचा धुंदपणा आहे. मस्ती आहे. स्वतःच्या मोठेपणाची जाणीव आहे; दुसऱ्याला कस्पटासमान लेखण्याची वृत्ति आहे. अशा सर रॉबर्ट मॉर्टनच्या हातीं रोनीचं प्रकरण देण्याचं आर्थर ठरवितो तेव्हां कॅथरिनला तें कांहीं फारसं पसंत पडत नाहीं. "सर रॉबर्ट म्हणजे सर्वांत उत्तम वकील नाहीं काय ?" असं बाप विचारतो, तेव्हां ती उत्तर देते, "सर्वांत अधिक फॅशनेबल आहे असं म्हणा हवं तर !" सर रॉबर्ट मॉर्टननं रोनीचं प्रकरण हातीं घेतलं तर तें तो चांगल्या प्रकारं लढवील ही गोष्ट ती कबूल करते. परंतु ती बापाला सांगते कीं, "केवळ न्यायाचा कैवार घेऊन सर रॉबर्ट या प्रकरणांत लक्ष घालील असं समजूं नका. हें प्रकरण जिंकलं तर आपल्या नांवाची मोठी जाहिरात होईल, हें ओळखून सर रॉबर्ट तें लढविणार आहे." कॅथरिन स्वतः स्त्रीस्वातंत्र्याच्या चळवळींतील एक कळकळीची कार्यकर्ती आहे; उलट सर रॉबर्ट भांडवलदारांचा कैवार घेणारा असून स्त्री-स्वातंत्र्याची थट्टा करणारा असल्याचं तिला माहीत आहे. यामुळं सर रॉबर्टविषयीं तिचं मन प्रतिकूल आहे. सर रॉबर्टकडे प्रकरण सोंपविण्याच्या इच्छेला ती संमति देते. ती बऱ्याचशा नाराजीनंच. पुढं प्रकरण पार्लमेंटमध्यें रंगत, कोर्टाचा मार्ग खुला होतो. सर रॉबर्टच्या चिकाटीच्या प्रयत्नांमुळं व कौशल्यामुळं हें सारं घडलं, हें उघड होतं, तरीदेखील कॅथरिनचं त्याच्याविषयींचं मत कांहीं बद-लत नाहीं. न्याय मिळविण्याच्या उदात्त ईर्ष्येनं नव्हे, तर स्वतःचा लौकिक आणि बडेजाव वाढविण्याच्या हेतूनंच सर रॉबर्टनं या प्रकरणांत एवढं लक्ष घातलेलं आहे, असंच ती म्हणत रहाते. रोनीच्या प्रकरणावर पार्लमेंटमध्यें सरकारचा पराभव होणार, कोर्टांत खुली फिर्याद गुदरण्याची परवानगी द्यावी लागणार, आणि रोनीचा वकील म्हणून सर रॉबर्ट कोर्टांत उभा राहिला तर तो दावा जिंकणारहि, असा रंग दिसूं लागल्याबरोबर इंग्लंड मधील सर्वोच्च न्यायाधीशाची जागा सरकार सर रॉबर्टला देऊं करतं. हेतु

उघडच असा कीं, त्याला या सन्मानाच्या जागीं गुंतवून टाकावं आणि रोनीची केस लढविण्यासाठीं त्यानं उभं राहूं नये. परंतु ही जागा सर रॉबर्ट स्वीकारीत नाहीं. ही घटना अर्थातच गुप्त असते. परंतु कॅथरिनला कळते, आणि ती कळल्यावर मात्र तिला स्वतःशीं कबूल करावं लागतं कीं, आपण पहिल्यापासून सर रॉबर्टविषयीं वाईट ग्रह उगाच करून घेतला होता. केवळ स्वार्थासाठीं स्वतःच्या बडेजावासाठीं रोनीच्या प्रकरणांत त्यानं लक्ष घातलं असावं, असा आपण व्यर्थ आरोप केला होता. स्वयंकेंद्रित स्वार्थीपणाखेरीज सर रॉबर्टच्या स्वभावांत दुसरं कांहीं नाहीं, असं आपण समजत होतों तें चुकीचं होतं. सर्वोच्च न्यायाधीशाची जागा नाकारण्या-इतकी—केवळ रोनीची केस अखेरपर्यंत लढविण्यास स्वतंत्र रहाण्यासाठींच नाकारण्याइतकी—तत्त्वनिष्ठा, नेकी आणि दानत त्याच्या ठिकाणीं आहे, उदात्तपणाचा भाग त्याच्या स्वभावांत आहे. आपली पारख चुकली होती.

म्हणजे नाटकाच्या अखेरीस सर रॉबर्ट जशी रोनीची केस जिंकतो त्याचप्रमाणें कॅथरिनचं मनहि तो जिंकतो. तिचं मत आपल्याविषयीं प्रतिकूल होतं याची त्याला बिलकूल जाणीव नसते. तशी शंका आली असती तरी त्यानं फिकीर केली असती, असंहि नव्हे. ज्या त्याच्या धुंदपणामुळं कॅथरिनच्या त्याच्याविषयींच्या अप्रीतींत भर पडली होती, तो धुंदपणा त्याच्या एकंदर वृत्तीचा स्थायीभाव होता यांत शंकाच नाहीं. भावनाशून्य मतलबी माणूस असा कॅथरिननं आपल्यावर शिक्का मारलेला आहे. हेंहि त्याच्या गांवीं नसतं आणि स्वतःची चूक तिच्या लक्षांत आलेली आहे. याचीहि त्याला दाद नसते. सर्वोच्च न्यायाधीशाची जागा नाकारण्यांत त्यानं जो स्वार्थत्याग केला, तो पाहून कॅथरिनचं मन जिंकलं जातं; परंतु आपण तिचा पराभव केला आणि तिला जिंकलं, हें सर रॉबर्टच्या ध्यानींमनींदेखील नाहीं. त्याची नजर एक प्रकारें धुंद आहे, हें कांहीं खोटं नाहीं. परंतु नाटकाच्या चौथ्या अंकांत कॅथरिन आपण होऊन सर रॉबर्टला आपल्या मनाचं परिवर्तन सांगते आणि त्याची क्षमादेखील मागते. दुसरं कुणी जवळपास नाहीं असं पाहून ती सर रॉबर्टला म्हणते,—

" मला एक कबुली द्यायची आहे, आणि माफी मागायची आहे."

सर रॉबर्ट म्हणतो, " कबुली देण्यांत तुझी घाई होत असण्याचा संभव आहे. आणि माफी मागण्याचीहि कांहीं गरज नाहीं. मला तुझी कबुलीहि नको आणि माफीहि नको ! "

परंतु तरी देखील कॅथरिन हंसतहंसत म्हणते, " माझं म्हणणं तुम्हांला ऐकून घेतलंच पाहिजे आपली भेट कदाचित् अखेरचीच असेल. आणि जें कांहीं मला तुम्हांला सांगायचंय्. तें लिहून कळविण्यापेक्षां समक्षच सांगण्याचं प्रायश्चित्त मला अधिक सुसह्य वाटतं. रोनीच्या या प्रकरणांत तुमच्या भूमिकेविषयीं मी सर्वस्वी चुकीचा ग्रह करून घेतला होता, आणि त्यामुळं सौजन्य आणि कृतज्ञता सोडून माझं तुमच्याशीं वर्तन झालं असेल. मी अतिशय मनापासून आणि नम्रपणानं माफी मागतें. "

या दोघांतला यापुढचाहि संवाद मोठा खुसखुशित आणि झटापटीचा आहे. परंतु तो मी देत नाहीं. वाचकांनीं लक्षांत घेण्याची मुख्य गोष्ट ही कीं नाटकाच्या अखेरीस सर रॉबर्टनं दुहेरी विजय मिळविला आहे : एक रोनीचं निरपराधित्व सिद्ध करून सरकारवर, आणि दुसरा नकळत कॅथरिनसारख्या चतुर बुद्धिमति तरुण स्त्रीवर ! नाटकाचं मुख्य कथानक आहे रोनीच्या प्रकरणाचं, परंतु उपकथानक आहे कॅथरिनच्या सुखदुःखाचं, आणि मार्मिक रसिकांचं लक्ष या उपकथानकाकडेदेखील वेधल्यावांचून रहात नाहीं. रोनीच्या एकंदर प्रकरणाचा कॅथरिनच्या आयुष्यावर होणारा परिणाम फार महत्त्वाचा आहे. ' या नाटकाचा नायक कोण ? ' या प्रश्नाचं उत्तर देतांना कुणाला रोनीच्या बापाचं नांव सुचेल, कुणी सर रॉबर्ट मॉर्टनचं नांव घेईल; परंतु ' नायिका कोण, ' या प्रश्नाचं उत्तर एकच – कॅथरिन ! आणि हिच्या स्वभावांतील चातुर्य, समजूतदारपणा, त्याग, बुद्धिसत्ता, विशेष आकर्षक तर आहेच, परंतु सर रॉबर्ट मॉर्टनच्या बाबतींतला स्वतःचा पराभव ज्या सरळपणानं आणि प्रामाणिकपणानं ती कबूल करते, त्यानं तिच्या स्वभावचित्राची शोभा विलक्षण वाढली आहे. सर रॉबर्ट मॉर्टन कॅथरिनकडे आकृष्ट झाल्याचं लेखकानं जागोजाग ध्वनित केलेलं आहे. ती त्याला आवडते असं दाखवलं आहे, आणि कॅथरिननं सर रॉबर्टविषयीं कितीहि फणकारा बाळगला असला तरी त्याच्या हुषारीचा आणि त्याहिपेक्षां त्याच्या

चमत्कारिक धुंदपणाचा परिणाम तिच्यावर होत असल्याचंहि ध्वनित केलं आहे. हा दुहेरी ध्वनि लेखकानं मोठ्या कौशल्यानं अस्पष्ट ठेवलेला आहे. परंतु त्यामुळंच कीं काय कोण जाणे, आपल्या लक्षांत तो आल्यावांचून रहात नाहीं, आणि त्या ध्वनीमुळें सर रॉबर्ट आणि कॅथरिन हीं दोन्हीं पात्रं फार प्रभावी वाटतात. आपल्या धुंदपणाच्या मस्तींत कॅथरिनच्या जहाल मतांची थट्टा करीत करीत तिच्याविषयींचं मनांतलं आकर्षण व्यक्त करणारा सर रॉबर्ट मॉर्टन चित्तवेधक वाटतो. आणि त्याच्यापेक्षांहि अधिक कॅथरिन चित्तवेधक वाटते !

रोनीचा बाप आर्थर सर रॉबर्ट मॉर्टन, आणि कॅथेरिन यांचीं भिन्न भिन्न स्वभावचित्रं म्हणजेच या नाटकाचं खरं सौंदर्य आहे. परंतु हें अंतरंगाचं सौंदर्य आहे. या सौंदर्याला साजेसंच नाटकाच्या बाह्यभागाचंहि सौंदर्य नसतं तर कदाचित् हें नाटक गाजलं तितकं गाजलंहि नसतं. नाटक ही कलाकृतीच अशी आहे कीं, केवळ स्वभावरेखाटनाच्या कसबावर ती उभी राहूं शकत नाहीं. तिची बाह्यरचना सुबक असावी लागते. तिचं शिल्प मोहक असावं लागतं. ' विन्स्लो बॉय ' नाटकाच्या चार अंकांची घडण किती चतुराईनं केलेली आहे तें बघितल्यावांचून नाटकाच्या सौंदर्याचं मर्म पूर्णतः कळायचं नाहीं.

ऑसबोर्न विद्यालयांतल्या एका ' कॅडेट ' ला चोरीच्या आरोपावरून झालेली शिक्षा, या शिक्षेविरुद्ध दाद मिळविण्याच्या मार्गांतल्या नानाविध अडचणींशीं करावी लागलेली झटापट, आणि या झटापटींत अखेर मिळालेलं यश.—प्रत्यक्ष घडलेल्या हकीकतीचा सारांश एवढाच. या हकीकती-वरून सुंदर नाट्यकृति करण्यासाठीं मुख्यतः दोन गोष्टी करायला हव्या होत्या : कथानकाला भरघोसपणा यावा यासाठीं कल्पित पात्रांची भर घालून त्यांच्या संघर्षपूर्ण स्वभावरेखा निश्चित करणं ही पहिली गोष्ट; आणि दुसरी गोष्ट म्हणजे प्रत्यक्ष आणि कल्पित यांच्या मिश्रणानं तयार झालेली परिपुष्ट बाळसेदार कथा नाटकाच्या अंकांत अशा रीतीनं वांटणं, कीं विस्मय आणि उत्कंठा सारखी ताजी रहावी. यांपैकीं पहिली गोष्ट रॅटिगननं किती कौशल्यानं केली तें सांगण्याच्या हेतूनंच आतांपर्यंतचं विवेचन मीं केलं. आतां दुसरी गोष्ट करतांना लेखकानं कोणती चतुराई दाखविली आहे तें

बघायचं. एकंदर कथानकाची चार अंकांत वांटणी आणि मांडणी कशी करण्यांत आलेली आहे, एकेका नाटकाच्या अंकाचा आरंभ आणि शेवट कसा आहे व अंकांत विशेष रमणीय स्थळं कोणतीं आहेत तें बघायचं. बघूं या.

पहिल्या अंकाच्या अगदीं प्रारंभीं चोरीच्या आरोपावरून हांकून दिलेला रोनी घरीं परत येतो. तो परत आल्याची गोष्ट घरांतल्या इतर सर्व माणसांना कळतें; परंतु आर्थरपासून ती गुप्त ठेवण्यांत येते. पण अखेर ती आर्थरलाहि कळतेच. मग तो रोनीला बोलावून घेऊन म्हणतो, " खरं काय तें सांग. " रोनी पुनःपुनः सांगतो, " मीं तें कृत्य केलेलं नाहीं. " आर्थर त्याला म्हणतो, " ठीक आहे. जा तूं. " आणि तो गेल्यावर आर्थर ऑसबोर्न येथील विद्यालयाला टेलिफोन करतो. इथं पहिल्या अंकाचा पडदा पडतो.

दुसरा अंक नऊ महिन्यांनीं सुरू होतो. या अवधींत आरमारी खात्याच्या वरिष्ठांकडून रोनीची फेरचौकशी झालेली आहे आणि त्याच्यावरचा आरोप कायम राहिलेला आहे. वृत्तपत्रांत या प्रकरणाची उलटसुलट चर्चा चालूं आहे. हें प्रकरण पार्लमेंटपर्यंत पोंचविलं पाहिजे, असं आर्थरनं ठरवलं आहे. त्यासाठीं सर रॉबर्ट मॉर्टन याच्याकडे प्रकरण सोंपवायचा त्याचा विचार पक्का झालेला आहे. हें प्रकरण हातीं घ्यायचं कीं नाहीं हें ठरविण्यासाठीं आधीं रोनीची खाजगी तपासणी करायला हवी, असं सर रॉबर्ट मॉर्टन सांगतो. त्यासाठीं तो विन्स्लो कुटुंबाच्या घरीं येतो. कोर्टांत साक्ष द्यायसाठीं पिंजऱ्यांत उभ्या राहिलेल्या साक्षीदाराची तपासणी करावी, त्याप्रमाणं सर रॉबर्ट रोनीची तपासणी करतो, ती इतक्या कठोर आणि कडक रीतीनं कीं, रोनी शेवटीं रडतरडत खालींच कोसळतो, आणि आर्थर, कॅथरिन, वगैरे सर्वांची खात्री पटते कीं, सर रॉबर्टच्या मतानं रोनी गुन्हेगारच आहे व ही केस तो मुळींच हातीं घेणार नाहीं. परंतु निरोप घेऊन जाऊं लागतांना सर रॉबर्ट सांगतो, " या प्रकरणाचे सर्व कागद माझ्याकडे धाडून द्या. मुलगा बेगुन्हा आहे यांत संशय नाहीं. हें प्रकरण मी जरूर हातांत घेणार आहें ! " तें ऐकून सारीं माणसं थक्कच होतात. आपल्या नेहमींच्या धुंद बेफिकीर पद्धतीनं सर रॉबर्ट निघून जातो. इथं दुसऱ्या अंकाचा पडदा पडतो.

आणखी नऊ महिन्यांनीं तिसरा अंक सुरू होतो. या अंकांत हें उघड होतं कीं रोनीच्या प्रकरणावर पार्लमेंटमधील चर्चा परिणामकारक झाली आहे. कोर्टांत खुली फिर्याद दाखल करण्याची परवानगी सरकारकडून मिळत आहे. परंतु आतां आर्थरचं द्रव्यबळ संपलेलं आहे. कोर्टांत दावा लढवायचा झाला तर तर सर रॉबर्टची जबर फी द्यायला हवी आणि ती द्यायची झाली, तर कॅथरिनसाठीं हुंडा देणं अशक्य आहे. हुंडा मिळाल्या-वांचून लग्न करायला जॉन तयार नाहीं. मुलीचं लग्न मोडावं अशी आर्थरची इच्छा नाहीं. रोनीचं प्रकरण सोडून द्यायला तो तयार झालेला आहे. सर रॉबर्ट त्याला विचारतो, “ पुढं काय करायचं, बोला, ” तो म्हणतो, “ कॅथरिन सांगेल तें करायचं. ” रॉबर्ट तिच्याकडे पहातो. ती सांगते, “ ठीक आहे, न्याय मिळालाच पाहिजे. ” सर रॉबर्ट म्हणतो, “ ठीक आहे. न्याय मिळविण्याचा प्रयत्न आपण करूं. ” इथं तिसऱ्या अंकाचा पडदा पडतो.

यानंतर पांच महिन्यांनीं चौथा अंक सुरू होतो. रोनीचा खटला चालू आहे. निकाल जवळ येऊन ठेपला आहे. वृत्तपत्रांतली खळबळ शिगेला पोंचली आहे. साऱ्या जनतेचं लक्ष निकालाकडं लागलेलं आहे. ऑर्थर सारी जिंदगी घालवून बसला आहे. कॅथरिननं आपल्या लग्नावर केव्हांच पाणी सोडलेलं आहे. बाप-लेक घरांत बसलीं आहेत, तीं असा विचार करीत कीं, आपण केलेल्या जुगाराचा शेवट काय होतो?... इतक्यांत बाहेर वर्तमानपत्रं विकणारीं पोरं ओरडूं लागतात, ‘ विन्स्लो प्रकरणाचा निकाल! ’—रोनी सर्वथा निर्दोषी ठरलेला असतो! मध्यं-तरीं फक्त कॅथरिनला कळलेलं असतं कीं, ही केस लढविण्याचं स्वातंत्र्य रहावं म्हणून रॉबर्टनं सरन्यायाधिशाची जागा नाकारलेली असते. दावा जिंकल्याची आनंदाची बातमी घेऊन सर रॉबर्ट येतो तेव्हां योग्य संधि मिळतांच ती त्याची क्षमा मागते. रोनी धांवत येतो. त्याला सर रॉबर्ट विचारतो, “ कुठं गेला होतास? ” तो सांगतो, “ सिनेमा पाह्यला! ” आपल्यावरून गेल्या तेवीस महिन्यांत केवढं वादळ माजलं होतं. आपल्या बापानं व बहिणीनं केव्हढा त्याग केला होता व अखेर विजय मिळविल्यामुळें साऱ्यांना किती आनंद झाला आहे. याची

त्या पंधरा वर्षांच्या पोराला काडीमात्र कल्पना नाहीं. आपल्या बाबतींत सर रॉबर्टनं केवढी कामगिरी केली आहे हें तर त्याच्या गांवींहि नाहीं. कॅथरिनचा निरोप घेतांना सर रॉबर्ट म्हणतो, " आतां यापुढं पार्लमेंटमध्यें केव्हांहि भाषणं करायला उठलों कीं तूं दृष्टीस पडशील अशा अपेक्षेनं मी पहात जाईन. पार्लमेंटच्या सभागृहांत तुझी–माझी भेट होईल अशी आशा मी करूं काय ? " कॅथरिन हंसत उत्तर देते, " भेट होईलहि. पण मी प्रेक्षकांच्या गॅलरींत नसेन; तुमच्या विरोधी पक्षांत बसलेली असेन. " सर रॉबर्ट म्हणतो, " कदाचित्. अच्छा, गुड बाय् ! " तो निघून जातो. इथं चौथ्या अंकाचा पडदा पडतो. नाटक संपतं.

एकंदर कथाभागाची वांटणी आणि मांडणी करण्यांत नाटककर्त्यानं कोणतं कसब दाखविलं आहे तें यावरून लक्षांत यायला हरकत नाहीं. एकेका अंकाची सुरुवात आणि अखेरी करतांना विस्मय आणि उत्कंठा या दोहोंचा आल्हादकारक खेळ लेखकानं साधलेला आहे. नाटक जसंजसं पुढं सरकतं तसंतसं ' पुढं काय ? पुढं काय ? ' असं वाचकाला अगर प्रेक्षकाला वाटत रहातं. नाटकांत उत्तान धांगडधिंगा कुठंहि नाहीं, आरडाओरडा नाहीं, रडण्याभेकण्याचा कल्लोळ नाहीं. कोणत्याहि पात्राच्या स्वभावांत बेछूट भडक परिवर्तन नाहीं. नाटकाचा विषयच नरम आणि नाजुक आहे, आणि तो हाताळतांना कर्त्यानं विषयाला साजेसा मृदुपणा आणि संयम वापरलेला आहे, परंतु असं असूनहि सबंध नाटक चटकदार आणि चित्तवेधक झालेलं आहे. प्रत्येक अंक कोणत्या तरी विशेष रंगतीच्या प्रसंगानं उजळून निघालेला आहे. आणि ही रंगत ज्यायोगें वाढावीं असे कुंचल्याचे हात जागोजाग आढळतात.

उदाहरणार्थ, चौथ्या अंकांतली एक गंमतशीर खुलावट बघा. रोनीचा खटला कोर्टांत चालू आहे. तो ऐकण्यासाठीं जाण्याच्या तयारींत रोनीची आई ' ग्रेस ' आहे. तिनं जरा छानछोकीचा पोषाख केलेला बघून आर्थर तिला विचारतो, " तूं काय एखाद्या समारंभाला किंवा नाटकाला निघाली आहेस काय ? "

ती म्हणते, " रोज रोज कोर्टांत त्याच त्याच पोषाखांत जाणं मला आवडत नाहीं. लोक काय म्हणतील ? "

आर्थर म्हणतो, " पण तुझ्या पोराची चोरीच्या आरोपावरून चाकशी चालली आहे, ती ऐकायला जाते आहेस तूं. "

" असूं दे. कपडे जरा चांगले नकोत कां ? उंद्यां खटल्याचा निकाल होईल, तेव्हां तर, मी म्हणतें उंची काळा पोषाख करून जावं. "

यावर बिचारा नवरा काय बोलणार ? बायका बारशाला जायला निघोत किंवा बाराव्याला जायला निघोत, आपण लोकांना नीटनेटक्या दिसतों कीं नाहीं इकडे त्यांचं सारं लक्ष असायचं, हें लक्षांत घेऊन आर्थर तो विषय सोडून देतो.

सूक्ष्म विनोदाची ही जागा लहानशी आहे; परंतु ती लक्षांत आल्यावांचून रहात नाहीं.

अशीच आणखी एक जागा आहे; आणि तीदेखील या प्रवेशांतच आहे.

कपड्यांचा मनाजोगा थाटमाट करून निघालेली ग्रेस निघतांना म्हणते, " व्हायोलेट मोलकरीण खटला ऐकण्यासाठीं कोर्टांत गेली तेव्हां तिला मीं बजावलंय् कीं येतांना थोडे कांदे घेऊन ये. पण त्या विसर-भोळीच्या लक्षांत हें राहील कीं नाहीं, कुणास ठाऊक ? कोर्टांतून परत येताना मीच कांदे घेऊन येईन म्हणतें. "

पुढं रोनीच्या केसचा निकाल कांहींसा अकस्मात्‌च होतो. मोलकरीण व्हायोलेट घरीं परत येते ती रोनी निर्दोषी ठरल्याची आनंदाची बातमी घेऊन नाचतच. बातमीची वाट बघत घरीं बसलेल्या आर्थर आणि कॅथ-रिन यांना पाहतांच, " मालक ! मालक ! केवढी गंमत तुम्ही हुकवलीत!" असं म्हणून कोर्टानं निकाल दिल्याबरोबर तिथं आनंदोत्साहाची जी दंगल उसळली तिचं आपल्यापरीनं मोठं रसभरित वर्णन ती करते. ( हें काम करणारी नटी कुशल असेल तर ह्या वेळचं भाषण करतांना ती रंगभूमि अगदीं हालवून सोडील. मी चित्रपट पाहिला, त्यांत या वेळीं व्हायोलेट मोलकरणीचं काम अतिसुंदर झालेलं आहे. ) कोर्टातल्या दंगलीचं वर्णन करतां करतां ती आनंदानें नाचते काय, हुंदके देते काय आणि पुन्हा पुन्हा, " हें सारं प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाह्यला तुम्ही असायला हवे होतां हो ! " असं म्हणते काय ! . . . परंतु मनांतल्या अमर्याद आनंदाची ही उसळी संपल्या-नंतर तिला कसली आठवण होते, माहीत आहे ? कांद्याची ! आणि ती

म्हणते, ' हात् मेल्यांनो ! सारंच मुसळ केरांत ! मालकीणबाईनीं मला थोडे कांदे आणायला सांगितले होतें, ते मीं आणले नाहींतच ! '' ... नाटकाचा प्रयोग पहाणारे श्रोते पुरेसे मार्मिक आणि समजदार असतील तर व्हायोलेटच्या तोंडचं हें वाक्य ऐकल्याबरोबर थिएटरांत प्रचंड हंशा होत असेल खाचित्‌च !

अशाच तऱ्हेच्या नाजूक खुलावटीचं आणखी एक उदाहरण सांगण्या-सारखं आहे. चौथ्या अंकाच्या अखेरीला केसचा निकाल लागतो तेव्हां रोनी सिनेमा पाह्यला गेलेला असतो आणि त्याचप्रमाणें तिसऱ्या अंकांत पार्लमेंटमध्यें कडाक्याची चर्चा चाललेली आहे, चर्चेचा एकंदर रंग ओळ-खून खुल्या फिर्यादीची परवानगी सरकार देतं कीं नाहीं याबद्दलचा निकाल होण्याची वेळ जवळ आलेली आहे, आणि अखेर कोणती बातमी येते त्याची वाट बघत, वृत्तपत्रांतली अगदीं ताजी बातमी ग्रेसला वाचून दाख-वीत आर्थर घरीं बसलेला आहे, या वेळेस रोनी काय करीत आहे ? तर बाप जें वांचून दाखवीत आहे तें ऐकतां ऐकतां जांभया देत आहे, आणि डोळे मिटीत आहे ! थोड्याच वेळांत तो मुळीं झोंपींच जातो. त्याची आई मायेनं म्हणते, " त्याची रोजची झोंपायची वेळ टळून गेली. झोंपेला आलंय कोंकरूं माझं ! " यावर आर्थर तिला म्हणतो, "पण झोंपेला आलेल्या तुझ्या ह्या कोंकरावरून या घटकेला पार्लमेंटच्या सभागृहांत केवढी हातघाईची लढाई चालली आहे ! ... " आर्थरच्या या वाक्यांत प्रेक्षकाला खुदकन् हंसूं आणणारा विनोद तर आहेच, परंतु त्याच्या जोडीला हळूच डोळे दिपायला लावणारं कारुण्यदेखील आहे. ' विन्स्लो बॉय ' नाटकांत असल्या कौशल्याचे जे बारकावे आहेत, त्यामुळं प्रयोगाची रंगत खचितच वाढत असली पाहिजे.

सौंदर्याच्या या छोट्या छोट्या जागा दाट पालवीच्या आड लपलेल्या नाजूक कळ्यांसारख्या आहेत. वर वर बघणाराच्या लक्षांत त्या कदाचित् यायच्या नाहींत. परंतु ज्याकडे कुणाचंहि लक्ष वेधलं जावं अशीं झगझ-गाटाचीं ठिकाणं प्रत्येक अंकांत आहेत.

पहिल्या अंकात ऑसबोर्न विद्यालयांतून हांकून दिलेला रोनी घरीं परत आल्याचं विन्स्लो कुटुंबांतल्या सर्व माणसांना कळतं. परंतु सगळीं असंच

ठरवितात कीं, आर्थरला ही गोष्ट शक्य तितक्या उशीरा सांगायची. जो रोनी अभ्यासू आणि सद्गुणी म्हणून आईबापांचा विशेष आवडता आहे, ( डिकीचं गाऱ्हाणं असं कीं, ' मी जें जें करीन तें तें वाईट आणि रोनी जें जें करील तें तें चांगलं, असं साऱ्यांनीं ठरवूनच टाकलंय्. रोनीवर सद्गुणांचा आणि माझ्यावर दुर्गुणांचा छापच मारून टाकलाय् ' ! ) तो रोनी खोटी सही करणारा आणि चोरी करणारा ठरून घरीं आल्याचं पाहून ग्रेसला, कॅथरिनला. सर्वांनाच धक्का बसलेला आहे. परंतु या धक्क्यापेक्षां अधिक भय आणि चिंता सर्वांना वाटत आहे ती या गोष्टीची कीं, रोनी घरीं परत आल्याची बातमी आर्थरच्या कानांवर घालायची ती कुणी आणि कशी ? ती बातमी समजल्याबरोबर भलतांच प्रसंग ओढवणार याबद्दल सर्वांचीच खात्री आहे. डिकी तर बहिणीला म्हणतो, " आतां जो भयंकर स्फोट होणार आहे त्याच्या आसपास एक हजार मैलांवरसुद्धां रहायची माझी इच्छा नाहीं ! " रोनीची आई, बहीण आणि भाऊ यांच्यांतल्या या संवादावरून वाचकांची व श्रोत्यांची अशी खात्री पटते कीं, ज्या क्षणीं रोनी घरीं परत आल्याचं आर्थरला कळेल त्या क्षणीं विलक्षण मोठा भडका उडणार आहे. वाचकांच्या व प्रेक्षकांच्या मनांत अपेक्षा उत्पन्न होते कीं, तो स्फोटाचा क्षण जवळ जवळ येत आहे. त्या क्षणाची विलक्षण उत्कंठेनं ते वाट पाहूं लागतात. थोड्याच वेळांत आर्थरला रोनी घरीं परत आल्याची बातमी कळते. तुमच्या मुलाला अमुक अमुक अपराधाबद्दल विद्यालयांतून काढून टाकलेलं आहे, अशा मजकुराचं पत्र रोनीनं बरोबर आणलेलं असतं, तेंहि ग्रेस आर्थरला वाचून दाखविते. इतकं झाल्यावर वाचक आणि प्रेक्षक तयारींत रहातात कीं आतां आर्थरच्या संतापाचा भडका होणार !—परंतु प्रत्यक्ष काय होतं ? अगदींच निराळं होतं ? आर्थर बायकोला आणि मुलीला सांगतो, " तुम्ही सारींजणं आंतल्या खोलींत जा आणि रोनीला माझ्याकडे पाठवून द्या. " रोनी येतो. त्याला अगदीं जवळ, समोर उभं रहायला सांगून आर्थर पत्र दाखवून म्हणतो, " ही गोष्ट तूं केली असलीस तर केली म्हणून सांग. मी तुझ्यावर रागावणार नाहीं. पण तूं खरं मात्र सांगायला हवंस. खोटं सांगशील तर मला तें ओळखतां येईल. कारण तुझ्या-माझ्यांतलं असत्य कधीं छपूं शकणार

नाहीं. खरी गोष्ट मला समजेलच, हें लक्षांत ठेव. ही चोरी तूं केलीस काय ? " रोनी ताबडतोब उत्तर देतो, " नाहीं ! मीं चोरी केली नाहीं ! " त्याच्याकडे वटारलेल्या डोळ्यांची नजर लावून आर्थर पुन्हा विचारतो, " तूं चोरी केलीस काय ? " रोनी पुन्हा दृढ स्वरानं सांगतो, " नाहीं बाबा, मीं चोरी केली नाहीं " आर्थर त्याच्याकडे बघतच रहातो व मग रोनीला हळूंच दूर करीत म्हणतो, " जा, जाऊन नीज ! " तो गेल्यावर आर्थर आपल्या खुर्चीतून उठतो, टेलिफोनकडे जातो, आणि ऑसबोर्नच्या विद्यालयाचा नंबर मागतो ! इथंच पहिल्या अंकाचा पडदा पडतो ... ज्या स्फोटाची अपेक्षा वाचकांनीं अथवा प्रेक्षकांनीं केलेली असते ती होत नाहीं ! आर्थरच्या संतापाचं जें वादळ उठेलसं वाटलेलं असतं तें हवेंतच विरून जातं ! नाटककर्त्यानं वाचकांना व प्रेक्षकांना चमत्कृतिपूर्ण हुलकावणी दिलेली आहे, विस्रयाचा गमतीदार धक्का दिलेला आहे. आणि मुलाच्या बोलण्यावर श्रद्धा ठेवून आर्थर आतां कांहींतरी करणार, एवढंच सूचित केलेलं आहे. अंकाचा पडदा पडल्यावर वाचक आणि प्रेक्षक मनाशीं म्हणत रहातात, आर्थर आतां काय करणार ? पुढं काय घडणार ? पुढच्या अंकाविषयीं विलक्षण उत्कंठा निर्माण होते.

दुसऱ्या अंकांतली विशेष रोषणाईची जागा म्हणजे, सर रॉबर्ट मॉर्टन अगदीं निर्दयपणानं रोनीची तपासणी करतो ती. सर रॉबर्ट प्रवेश करतो, तेव्हांपासूनच रंगभूमीवर चित्तवेधक नाट्य सुरू झाल्यासारखं वाटूं लागतं. कॅथरिनचं सर रॉबर्टविषयीं मत चांगलं नाहीं हें वाचकांना व प्रेक्षकांना आधीं कळलेलं असतं, त्यामुळं सर रॉबर्ट प्रत्यक्ष भेटल्यावर ती त्याच्याशीं कशी वागते याबद्दल औत्सुक्य निर्माण झालेलं असतं. त्या दोघांच्या प्रारंभींच्या संवादांत उडणाऱ्या चकमकीनं त्या औत्सुक्यांत भर पडते.

" इकडे, या खुर्चीवर बसा ना. " कॅथरिन सर रॉबर्टला म्हणते, " जास्त आरामशीर वाटेल तुम्हांला. "

" नको, थँक्यू. "

" व्हिस्की, ब्रँडी कांहीं घ्याल का ? "

" कांहीं नको. थँक्यू. "

" धूम्रपान करतां ? "

" नको थँक्यू. "

" मीं धूम्रपान केलं तर तुमची हरकत नाहीं ना ? "

" माझी कशासाठीं हरकत असेल ? "

" कांहीं लोकांना त्याचा धक्का बसतो म्हणून विचारतें. "

" आपल्या स्वतःच्या घरांत वाटेल तसं वागायचा स्त्रीला खचित हक्क आहे. "

" तुम्ही आपला जाड वरकोट काढून ठेवा ना ! "

" नको थँक्यू. "

अशा प्रकारचीं उत्तरं-प्रत्युत्तरं कॅथरिन व रॉबर्ट यांच्यामध्यें झडतात. सर रॉबर्टविषयींचा कॅथरिनच्या मनांतला पूर्वग्रह व सर रॉबर्टच्या वागण्याची धुंद अहंकारी तऱ्हा यांच्यांतील या झटापटीनं हा प्रवेश मोठा रंगतदार होत असेल खास !...

पुढं रोनी येतो. सर रॉबर्ट त्याला प्रश्न विचारूनविचारून छळतो. परस्पर विसंगत कबुल्या त्याच्या तोंडून वदवतो. त्याला अगदीं रडकुंडीला आणतो. शेवटीं तर गळा काढून म्हणतो, " मीं चोरी केली नाहीं ! केली नाहीं ! " पण सर रॉबर्ट कठोर आवाजांत त्याला म्हणतो, " तुझ्या सांगण्यांतलं एक अक्षरदेखील खरं नाहीं ! तूं खोटारडा आहेस ! खोटी सही करणारा आहेस ! चोर आहेस ! आपला गुन्हा छपवून ठेवून तूं आपल्या घरांतल्या माणसांना व्यर्थ यातना दिल्या आहेस ! आतां तूं साऱ्या गोष्टी कबूल कराव्यास अशी वेळ आली आहे !... "

हा भयंकर समारोप ऐकल्याबरोबर रोनी स्वतः तर हुंदके देत देत आपल्या आईच्या गळ्यांत पडतोच, परंतु बाकीच्या सर्व माणसांना ( आणि त्यांच्याबरोबरच वाचक-प्रेक्षकांनासुद्धां) पक्कं कळून चुकतं कीं, संपलं सारं ! आतां कसली सर रॉबर्ट ही केस हातीं घेतो ! सर रॉबर्टनं ही केस लढवावी, या आर्थरच्या इच्छेचा पुरा चुराडा झाला खास !...पण रंगभूमीवरच्या पात्रांना व वाचक-प्रेक्षकांना असं वाटतं न वाटतं, तोंच सर रॉबर्ट, म्हणतो, " या केसचे सारे कागद माझ्याकडे पाठवून द्या. हा मुलगा उघड उघड बेगुन्हा आहे. ही केस हातीं घ्यायचं मीं ठरवलं आहे. " तो निघून जातो आणि अंकाचा पडदा पडतो, तेव्हां विन्स्लो कुटुंबांतल्या साऱ्या माणसांनाच

नव्हे, तर वाचक-प्रेक्षकांनादेखील विस्मयाचा मोठा धक्का बसतो, आणि आतां पुढं काय घडतं अशा प्रश्नानं त्यांची उत्कंठा वाढते. दुसऱ्या अंकाच्या अखेरीचा हा प्रसंग सगळ्यांत बहारीचा कदाचित् ठरेल.

'कदाचित्' असं मी मुद्दामच म्हणतों. कारण याहूनहि अधिक बहारीचा प्रसंग तिसऱ्या अंकांत आहे असं मला स्वतःला वाटतं. तिसऱ्या अंकांतल्या या प्रसंगांत दुसऱ्या अंकाच्या अखेरींची उत्तान खळबळ नाहीं; उलटसुलट संवादांचा कडकडाट नाहीं. परंतु तरीदेखील या प्रसंगांत नाट्याची खरी शोभा अधिक आहे असं माझं मत आहे. तिसऱ्या अंकाच्या शेवटीं एकंदर, परिस्थितीला लेखकानं मोठी चित्तवेधक कलाटणी दिलेली आहे. रोनीच्या प्रकरणावरची पार्लमेंटमधील चर्चा संपलेली आहे. त्या चर्चेत सर रॉबर्टनं विजय मिळविला आहे. उघडउघड पराभव टाळण्याची वेळ सरकारवर आली आहे, म्हणून खुल्या खटल्याची परवानगी सरकारनं दिली आहे परंतु मोठ्या आनंदाची ही बातमी घरीं येऊन पोंचते, तोंच जॉन वॅदरस्टोन कॅथरिनला भेटलेला आहे व त्यानं तिला स्वच्छ सांगितलं आहे कीं, ठरलेला हुंडा न मिळाला तर तुझ्याशीं लग्न करणं मला शक्य होणार नाहीं. मुलाचं निरपराधित्व सिद्ध करण्याचा प्रयत्न तडीला लावायचा, किंवा हुंडा देऊन मुलीचं सुख साधायचं, यांपैकीं एकच कोणती तरी गोष्ट आर्थरला करतां येण्यासारखी असते. मुलीला जन्माचीं दुःखी करण्याचं त्याच्या जिवावर येतं. रोनीचं प्रकरण सोडून देण्याचं—अगदीं हातातोंडाशीं यश आलेलं दिसत असतांनाहि सोडून देण्याचं—तो ठरवितो. सर रॉबर्ट जेव्हां विचारतो, "पुढं काय?" तेव्हां तो सांगतो, "मला नका विचारूं. माझ्या मुलीला विचारा." सर रॉबर्ट कॅथरिनकडे पहातो. ती दृढ स्वरानं उत्तर देते, "न्याय प्रस्थापित झालाच पाहिजे!" सर रॉबर्ट म्हणतो, "प्रयत्न करूं या." तो जातो. अंकाचा पडदा पडतो. मुलीवरच्या प्रेमानं आपला सत्याग्रह सोडून द्यावयास तयार झालेल्या आर्थरच्या मनांतली खळबळ, आणि केवळ आपली श्रद्धा खरी करण्यासाठीं आपल्या बापानं आतांपर्यंत केवढी झुज केली तें लक्षांत घेऊन स्वतःच्या सुखाचा त्याग करावयास सिद्ध झालेल्या कॅथरिनचा मनक्षोभ — या गोष्टी कांहींशा अमूर्त आहेत खऱ्या; परंतु त्यांत मोठं वेधक नाट्य

आहे, आर्थरचं व कॅथरिनचं काम करणाऱ्या व्यक्ति कुशल असतील तर हा प्रसंग विलक्षण रंगण्यासारखा आहे. अंकाचा पडदा जेव्हां पडतो तेव्हां आर्थर आणि कॅथरिन या दोघांच्याहि स्वभावांतील उदात्तपणाच्या दर्शनानं प्रेक्षकांचीं अंतःकरणं भारावून जात असतील खचित !

'विन्स्लो बॉय' ही नाट्यकृति लिहिणं एका दृष्टीनं किती कठीण होतं तें ध्यानांत घ्यायला हवं. रोनीच्या प्रकरणावरून सामान्य जनतेंत, वृत्तपत्रांत, पार्लमेंटमध्यें, आणि अखेर कोर्टांत खूप खळबळ उडाली खरी, परंतु बाहेरच्या जगांतल्या या खळबळीचं — ती कितीहि प्रचंड असली तरी— नाटक लिहिणाराला भांडवल वापरतां येण्यासारखं नाहीं. चित्रपट तयार करतांना कॅमेरा वाटेल तसा वाटेल तिकडे फिरवितां येतो; हें स्वातंत्र्य नाटककाराला नसतं. स्थलकालाच्या मर्यादा त्याला ओलांडतां येत नाहींत. या मर्यादा संभाळून रोनीच्या प्रकरणावर चारअंकीं नाटक लिहिणं फार कठीण होतं. हें कठीण काम नाटककर्त्यानं कोणत्या युक्तीनं सुलभ केलं आहे तें बघण्यासारखं आहे.

रोनीच्या प्रकरणावरून इंग्लंडच्या सामान्य जनतेंत उडालेली खळबळ, वृत्तपत्रांतील लोकमताचा उद्रेक, पार्लमेंटच्या सभागृहांतील खडाजंगी चर्चा, न्यायालयांतील चौकशी, या साऱ्या गोष्टी साक्षात् सांगावयाच्या म्हटल्या तर नाटकाचं निवेदन दहा ठिकाणीं नाचवावं लागलं असतं, आणि कित्येक डझन पात्रं उभीं करावीं लागलीं असतीं. या गोष्टी चित्रपटांत दाखविणं जितकं सुलभ आणि इष्ट, तितकंच रंगभूमीवरच्या नाट्यप्रयोगांत त्यांचा अंतर्भाव करणं अशक्य व अनिष्ट हें ओळखून 'विन्स्लो बॉय' नाटक लिहितांना रॅटिगननं कोणती युक्ति केली ती पहाण्यासारखी आहे. रोनीच्या एकंदर प्रकरणांत जी लढाई आहे ती प्रत्यक्ष कुठं कुठं घडते ? तर नाविक विद्यालयांत, आरमारी कचेरींत, पार्लमेंटच्या सभागृहांत आणि अखेर कोर्टांत. हें झालं प्रत्यक्ष लढाईचं क्षेत्र. परंतु त्या लढाईचं प्रतिबिंब कुठं पडतं ? तिचे प्र ध्वनि कुठं उठतात ? तर विन्स्लो कुटुंबाच्या घरांत. बाहेर जी लढाई चालू असते तिचे उलटसुलट परिणाम विन्स्लो कुटुंबांतल्या व्यक्तींवरहि होत असतात, म्हणजे रोनीच्या प्रकरणांतली लढाई दोन आघाड्यांवर लढली जाते असं म्हणायला हरकत नाहीं : एक बाहेरची

आघाडी, व दुसरी घरांतली आघाडी, रॅटिगननं युक्ति केली ती ही कीं, बाहेरच्या आघाडीवर घडणाऱ्या गोष्टी पात्रांच्या संवादांत फक्त सूचित करायच्या, आणि नाटकांतलं सारं निवेदन घरच्या आघाडीवर केंद्रित करायचं, असं त्यानं ठरविलं. बाहेर घडणाऱ्या घटनांच्या विन्स्लो कुटुंबांतल्या व्यक्तींच्या मनावर घडणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया हा त्यानं नाटकाचा विषय ठेवलेला आहे. विद्यालयांतून हांकून दिलेला रोनी प्रथम घरीं आला तेव्हां विन्स्लो कुटुंबांत काय घडलं, नंतर नऊ महिन्यांनीं काय घडलं, नंतर आणखी नऊ महिन्यांनीं काय घडलं, आणि अखेर पांच महिन्यांनंतर काय घडलं, तें एकेका अंकांत रंगभूमीवर दाखविण्याचं त्यानं ठरविलं. असं ठरविल्यामुळं नाटकाचे चारहि अंक एकाच ठिकाणीं त्याला घडवितां आले; स्थलाचं एकत्व साधतां आलं. वाचक–प्रेक्षकांचं सारं लक्ष विन्स्लो कुटुंबावर सतत खिळवून ठेवतां आलं. रोनीचा बाप आर्थर व त्याला सर्वतोपरी प्रोत्साहन देणारी कॅथरिन या दोघांनीं जी झुंज आरंभिली आहे आणि तिच्यांतला एकेक समरप्रसंग एकेका अंकांत वाचक–प्रेक्षकांच्या दृष्टीसमोर घडत रहातो, आणि ते एकंदर नाटकांत विलक्षण तल्लीन होऊन जातात.

आर्थर स्वतःच्या श्रद्धेसाठीं झगडत आहे. कॅथरिन निराळ्या कारणानं कां होईना, परंतु बापाच्या खांद्याला खांदा लावून उभी आहे. या दोघांची झुंज कुणाशीं चालली आहे ? तर रोनीचं निरपराधित्व सिद्ध करणं ज्या परिस्थितीनं निष्कारण कठीण केलं त्या परिस्थितीशीं ! या नाटकांतला खलनायक कोण ? —या प्रश्नाचं उत्तर असं कीं, अमूक एक व्यक्ति नव्हे. या नाटकांतला खलनायक अमूर्त आहे. तो आपल्या डोळ्यांना दिसत नाहीं. आपल्यापुढें कधीं उभा रहात नाहीं. रोनी बेगुन्हा असल्याचं सिद्ध करण्याच्या आड अमुक एक व्यक्ति येत नव्हती, तर सरकारची इभ्रत येत होती.—जिच्यामागं प्रस्थापित सरकारचं सबंध सामर्थ्य होतं अशी इभ्रत ! ही अमूर्त इभ्रत म्हणजे या नाटकांतला खरा खलनायक होय. या इभ्रतीचा जाच छोट्या रोनीला, त्याच्या वृद्ध बापाला, आईला आणि तरुण बहिणीला सतत दोन वर्षं किती प्रकारें सोसावा लागला, आणि अखेर या जाचांतून हीं माणसं कशीं पार पडलीं, त्याची रोमांचकारी हकीकत ‘ विन्स्लो बॉय ’ नाटकांत रॅटिगननं मोठ्या कौशल्यानं चित्रित केलेली आहे. लहा-

नाची मोठ्याशीं तुलना करणं हाहि एक भाषालंकारच आहे. तो वापरून असं म्हणतां येईल कीं, सत्त्वासाठीं आणि सत्यासाठीं परोपरीचे छळ सोसणाऱ्या राजा हरिश्चंद्राच्या आख्यानाप्रमाणेंच 'विन्स्लो बॉय' या नाटकाची कहाणी मनोवेधक व उद्‌बोधक आहे. सत्याच्या आणि श्रद्धेच्या विजयाची ही कथा आहे.

नाटककाराचं कौशल्य असं कीं, रोनीची आई ग्रेस, भाऊ डिकी, कॅथरिनचं ज्याच्याशीं लग्न ठरतं तो जॉन, हीं दुय्यम पात्रंदेखील आपापल्या स्वभाववैशिष्ट्यानं वाचक प्रेक्षकांच्या मनांत ठसतात. मोलकरीण व्हायोलेट-देखील वाचक-प्रेक्षकांना प्रिय होते. छोट्या रोनीचं स्वभावचित्रसुद्धां मोठं गहिरं वठलेलं आहे. परंतु सर रॉबर्ट मॉर्टन, रोनीचा बाप आर्थर, आणि कॅथरिन, या तिघांच्या व्यक्तिरेखा काढतांना नाटककाराचं कौशल्य अगदीं शिगेला पोंचलेलं आहे, व या तीन व्यक्ति वाचक-प्रेक्षकांच्या हृदयाचा ठाव घेतल्यावांचून रहात नाहींत! या तिघांच्या — त्यांतल्या त्यांत आर्थर व कॅथरिन या दोघांच्या — हर्षखेदांशीं नाटकाचा प्रयोग पहाणाराच नव्हे, तर एकांतांत नाटक वाचणारादेखील तद्रूप होतो, आणि नाटकाच्या शेवटीं कॅथरिनचा निरोप घेतांना 'पुन्हां आपली भेट होईल अशी आशा करूं या,' असं म्हणणाऱ्या सर रॉबर्टप्रमाणंच वाचकालादेखील — तो खरोखर सहृदय असेल तर — असं वाटतं कीं, ही सद्‌गुणी, चतुर, तत्त्वनिष्ठ, स्वार्थत्यागी तरुण कॅथरिन दृष्टीआड होत आहे हें कांहीं बरं नव्हे. आपली व हिची पुन्हा कधींतरी आणि कुठंतरी भेट व्हायला हवी!

* * *

# एका जगविख्यात नटीची गृहिणीची भूमिका

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## रिचर्ड अलाड्रिच

' नटींचा नवरा ' या पदवींत कौतुकापेक्षां उपहासच अधिक अभिप्रेत असतो. एखाद्या नटीवर प्रेम करणारा माणूस तिच्याशीं लग्न करण्याचा विचार करूं लागला तर त्याचे मित्र त्याला बहुधा म्हणतील, " बघ बाबा, जरा विचार करूनच पाऊल टाक, नटीशीं लग्न लावशील खरं, परंतु तें तुला सुखाचं व्हायचं नाहीं, चार दिवसांत मोडेल, आणि स्वतःचं हसं करून घेशील ! धी देखा लेकिन बडगा नहीं देखा ! नटीचा नवरा होणं म्हणजे सुळावरची पोळी आहे ! "

हा उपदेश फारसा चुकीचाहि म्हणतां येणार नाहीं. नटीवर प्रेम करणं सोपं आहे, पण बायको म्हणून तिला संभाळणं आणि तिचा नवरा म्हणून तिच्याजवळ नांदणं या दोन्ही गोष्टी फार फार कठीण आहेत. आणि नटी जितकी नांवलौकिकानं मोठी असेल आणि तिच्याशीं लग्न करणारा जितका स्वाभिमानी असेल तितका हा कठीणपणा अधिकच वाढतो. आपल्या हिंदुस्तानांतदेखील कीर्तीच्या आणि लोकप्रियतेच्या शिखरावर चढलेल्या नटींचे संसार फारसे यशस्वी झालेले दिसत नाहींत. इंग्लंड अमेरिकेंत तर विचारायलाच नको. तिकडल्या प्रख्यात नटींची आणि कलावतींचीं चरित्रं म्हणजे घटस्फोटाच्या हकीकतींनीं भरलेल्या शोकांतिकाच असतात !

परंतु नियम आहे तिथें अपवादहि असतोंच. कलेची उपासना आणि संसार दोन्ही उत्तम प्रकारें साधणारी एखादी अलौकिक तारका मध्येंच चमकून जाते. अशा असामान्य स्त्रीचं चरित्र केव्हांहि मनोरंजक आणि उद्-बोधक ठरेल, आणि तें तिच्या नवऱ्यानं लिहिलेलं असेल तर त्याची आकर्षकता विशेषच म्हणावी लागेल असं एक सुंदर चरित्रात्मक पुस्तक माझ्या वाचनांत नुकतंच आलं, तें मला इतकं आवडलं आहे कीं, त्याचा परिचय मराठी वाचकांना करून दिल्याखेरीज माझा आनंद पूर्ण होणार नाहीं.

ज्या नटीचं हें चरित्र तिच्या नवऱ्यानं लिहिलेलं आहे, तिचं नांव ' गर्ट्रुड लॉरेन्स'. ही मूळची इंग्लिश. अगदीं सामान्य गरीब कुळांत जन्मलेली. स्वतःच्या प्रयत्नांनीं आणि गुणांनीं विख्यात नटीच्या पदाला पोंचलेली. पुढें अमेरिकेंत जाऊन तिथल्या रंगभूमीवरहि चमकलेली. अखेर इंग्लंड आणि अमेरिका या दोन्ही देशांतून रंगभूमीवरील आणि चित्रपटांतील सर्वांत अधिक लोकप्रिय तारका ठरलेली. १९५२ सालीं जेव्हां तिचा अंत झाला, तेव्हां तिच्या स्मृतीस सन्मानार्थ अमेरिकेंतील आणि इंग्लंडमधील एकूणएक नाट्यगृहांचे दिवे रात्रीं साडेआठ वाजतां दोन मिनिटं मालविण्यांत आले होते. एक तेजस्वी विख्यात, लोकप्रिय तारका हजारो प्रेक्षकांना आणि रसिकांना टाकून गेली म्हणून दोन खंडांतल्या तिच्या चाहत्यांना जें अतीव दुःख झालं तें व्यक्त करण्यासाठीं सर्व रंगमंदिरं दोन मिनिटं अंधारांत ठेवण्यांत आलीं. मृताला श्रद्धांजली वाहण्याचा हा अपूर्व काव्यमय प्रकार पूर्वीं कधींहि, कोणत्याहि कलावन्ताच्या वांट्याला आला नव्हता. ' गर्ट्रूड लॉरेन्स' गेली, एक दिव्य प्रकाश ज्योति विझली. आतां जिकडेतिकडे अंधार राहिला !' लाखों लोकांच्या मनांतला हा दुःखोद्गार त्या दोन मिनिटांच्या अंधारांत व्यक्त झाला.

अशा अलौकिक नटीचं हें चरित्र आहे, या चरित्रांत मुख्यतः वर्णन केलेलं आहे तें तिच्या कलाक्षेत्रांतल्या पराक्रमाचं आणि यशाचं नव्हे तर तिच्या संसाराचं. रिचर्ड आलाड्रिच हें तिच्या नवऱ्याचं नांव.

लग्नानंतर नवऱ्याला लिहिलेल्या सर्व पत्राखालीं ' मिसेस ए ' अशी सही ती करीत असे. म्हणून लेखकानं चरित्र ग्रंथाला नांवच दिलं आहे. " Gertrude Lawrence as Mrs. A " असं म्हणजे चरित्रामागचा हेतूच असा कीं चरित्रनायिका किती मोठी नटी होती, रंगभूमींवरच्या आणि चित्रपटांतल्या एकाहून एक सुंदर भूमिका तिनं कशा वठविल्या आणि गाजविल्या हें सांगण्यापेक्षां गृहिणीची भूमिका तिनं कशी पार पाडली त्याचं वर्णन करायचं, हें वर्णन करतांना लेखकानं नायिकेची निर्भेळ स्तुति केली असती. तिच्यावर सर्व सद्गुणांचे अलंकार चढविले असते तर नायिका मोठी ठरली असती, परंतु चरित्र मोठं ठरलं नसतं. या चरित्रात्मक पुस्तकाची खरी गोडी हीच आहे कीं, लेखकानं नायिकेचे दोष लपवि-

ण्याचा बिलकुल प्रयत्न केलेला नाहीं. स्वतःचे स्वभावदोषहि झांकण्याची खटपट केलेली नाहीं, बऱ्या वाईट साऱ्या गोष्टी प्रामाणिकपणानं उघड करून सांगितल्या आहेत. स्वतःच्या आणि नायिकेच्या अमर्याद प्रेमाप्रमाणेंच संशय, मत्सर मतभेद, छोटीं मोठीं भांडणं, इत्यादिंचीहि वर्णनं मोकळेपणानं केलीं आहेत. यामुळें या चरित्राला एखाद्या चित्तवेधक कादंबरीचं स्वरूप प्राप्त झालं आहे. तें जितकं चटकदार तितकंच उद्‌बोधक झालं आहे. सुप्रसिद्ध कादंबरीकर्त्री डॅफ्न डयू मोरिए हिनं या चरित्र ग्रंथाला जी प्रस्तावना लिहिली आहे तिच्यांत तिनं असंच लिहिलं आहे कीं, "या पुस्तकांतलीं सगळीं पात्रं खरींखुरीं आहेत म्हणून ह्याला चरित्र म्हणायचं, परंतु खरं म्हणजे ही एक नितांत रमणीय अशी कादंबरी आहे. रिचर्ड आल्ड्रिच कांहीं साहित्यिक नव्हे. हें चरित्र लिहितांना त्यानं कोणा साहित्यिकाचं साहाय्यहि घेतलेलं नाहीं. परंतु अंतःकरणाच्या कळकळीनं आणि शुद्ध प्रामाणिकपणानं त्यानं आपल्या प्रेमाची आणि संसाराची ही कहाणी लिहिल्यामुळें या चरित्रांत नायिकेची जी प्रतिमा त्यानं उभी केली आहे, ती अत्यंत हृद्य वठली आहे. हें चरित्र वाचल्यावर कुणाही रसिकाला असंच वाटेल कीं बर्नार्ड शॉच्या 'पिग्मॅलियन' नाटकांतली लिझा, 'दि किंग अँड आय' मधली ॲना 'लेडी इन दि डार्क' मधली अवखळ जेनी अशा विविध प्रकारच्या भूमिका गर्ट्रुड लॉरेन्स हिनं गाजविल्या खऱ्या, परंतु या असामान्य नटीची सर्वांत रंगतदार आणि अविस्मरणीय भूमिका कोणती ठरण्यासारखी असेल तर ती गृहिणीचीच ! आणि तिनं ती सुंदर वठविली याचं श्रेय जितकं तिला तितकंच ज्याच्या जोडीनं तिनं ती भूमिका केली त्या रिचर्डलाहि द्यायला हवं !"

या चरित्रग्रंथांत हकीकत आहे ती बारा वर्षांच्या संसाराची. रिचर्ड आल्ड्रिच आणि गर्ट्रुड लॉरेन्स यांचं लग्न झालं १९४० मध्यें, हें लग्न दीर्घकाल टिकेल असं कुणालाहि वाटलं नव्हतं शत्रूंनीं भविष्य केलं होतं चार सहा महिन्यांत घटस्फोट नाहीं झाला तर आम्हांला विचारा, इष्टमित्रांनीं या लग्नाच्या टिकाऊपणाचा हिशोब जरा अधिक औदार्यानं केला होता, परंतु केव्हां न केव्हां तरी घटस्फोटाची वेळ दोघांवर येईल, अशीच त्यांचीहि कल्पना होती. स्वतः रिचर्ड आल्ड्रिचला तरी आपण जें पाऊल टाकीत आहोंत तें शहाणपणाचं आहे असा आत्मविश्वास कुठें होता ?

गर्ट्रुडच्या प्रेमांत सांपडल्यावर लग्नाची गोष्ट तिच्याजवळ काढण्यापूर्वी त्याच्या मनानं भीतीचें आणि संशयाचेच हेलकावे खाल्ले होते. त्यानं पुनः पुन्हा स्वतःला शिकविलं होतं, गर्ट्रुडशीं लग्न करण्याचा छंद सोडून देण्यांतच शहाणपणा आहे.

तिचं आणि आपलं जमायचं नाहीं. सुखापेक्षां दुःखच अधिक वाट्याला येईल. रिचर्डचं एक लग्न पूर्वीच झालेलं होतं. त्याच्या बायकोनं घटस्फोट घेऊन दुसरं लग्न केलं होतं. त्याला दोन लहान मुलगे होते. गर्ट्रुडनेंहि एकदां लग्न करून नवऱ्यापासून घटस्फोट घेतला होता. तिला एक मुलगी होती. म्हणजे दोघांच्याहि बाबतींत लग्नाचा प्रयोग एकदां फसला होता. शिवाय गर्ट्रुड जन्मानं इंग्लिश, तर रिचर्ड अमेरिकन. इंग्लिश-अमेरिकन लग्नं कधीं यशस्वी आणि सुखाची होत नाहींत, अशी दृढ प्रचलित लौकिक समजूत. शिवाय रिचर्ड खानदान घरांतला असला तरी त्याचं कुळ सरदार, दरकदाराचं नव्हतं किंवा धनाढ्यहि नव्हतं. उलट गर्ट्रुड कीर्तीच्या इतक्या उंच शिखरावर बसलेली होती कीं तिच्याभोंवतीं इंग्लंडांतले बडे बडे लोक नाचले होते. त्यांपैकीं कितीकांशीं तिची कमीअधिक मुदतीची प्रेमप्रकरणं झालेलीं होतीं. तिनं हु म्हणण्याचा अवकाश तिला गृहिणीपदावर बसविण्यासाठीं इंग्लंड-अमेरिकेंतले डझनभर करोडपती धांवले असते. रिचर्डशीं लग्न करून तिला काय मिळणार होतं? तो स्वभावान उमदा होता. अत्यंत नेकदार होता, सरळ मनाचा, विद्वान्, रसिक होता. नाट्याच्या क्षेत्रांत मोठ्या कळकळीनं काम करणारा प्रोड्युसर म्हणून थोडी कीर्ति त्यानं अमेरिकेंत मिळविली होती. परंतु एवढ्या गुणावर गर्ट्रुड लुब्ध होईल आणि त्याच्याशीं लग्न करावयास तयार होईल हें कसं शक्य होतं? आणि समजा, तिनं रुकार दिला तरी विवाह शहाणपणाचा ठरणार होता काय? गर्ट्रुडसारख्या विख्यात नटीचं प्रेम अढळ टिकविणं जसं कठीण तसंच ती कितीहि स्वतंत्रपणानं वागली तरी तिच्याविषयीं संशय न घेतां तिच्यावर सदैव प्रेम करणंदेखील फार कठीण!

अशा विचारांनीं रिचर्डनं किती दिवस तरी आपलं मन आवरलं. गर्ट्रुडला आपल्याविषयीं कितीसं आकर्षण आणि प्रेम वाटतं याचा अदमास त्यानं घेतला. मग मात्र 'स्कायलार्क' नाटकाच्या प्रयोगांचा

दौरा करण्यासाठीं ती दूर जाण्याचा दिवस जवळ आला तेव्हां रिचर्ड तिला म्हणाला,

" तूं गर्टरुड लॉरेन्स नसतीस तर अधिक सोपं झालं असतं. "

तिनं विचारलं, " काय सोपं झालं असतं ? "

" माझ्याशीं लग्न करशील का म्हणून विचारणं. "

भावनेनं भारावलेल्या हळू आवाजांत ती म्हणाली, " रिचर्ड विचार, खुशाल विचार, मात्र मी होय म्हटलंच पाहिजे असं तुला मनापासून वाटत असेल तरच विचार. "

तिचं हें उत्तर ऐकून अंतःकरणांत उचंबळून आलेला आनंद आवरणं रिचर्डला कठीण वाटलं. परंतु आपण किती सामान्य आहोंत आणि विशेषतः आपली आर्थिक परिस्थिति किती बेताची आहे याचा खुलासा करून तो म्हणाला, " कांहीं झालं तरी तुझ्या श्रीमंतीवर पोसला जाणारा नवरा म्हणवून घेण्याची माझी इच्छा नाहीं. "

" तुझी इच्छा असली तरी मलाच तें रुचायचं नाहीं. "

" मग मिसेस आल्ड्रिच होण्याची तयारी आहे तुझी ? "

" माझी परीक्षा बघ तरी ! "

दोघांनीं एकमेकाला मिठी मारली आणि लग्न लवकरच उरकून घेण्याचे बेत केले. जुलायच्या चार तारखेला गर्ट्रुडचा वाढदिवस होता. आणि मुख्य म्हणजे पूर्णिमेची रात्र येत होती. भर चांदण्यांत लग्नविधि व्हावा अशी गर्ट्रुडची इच्छा होती. त्याप्रमाणें बेत ठरला, परंतु ऐन घटकेला नुसता पाऊसच नव्हे तर वादळ झालं. लग्नसमारंभ मध्यरात्रीनंतर एका ल्हानशा बंगल्यांत झाला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या ऐंशी वर्षांच्या वृद्ध आईला रिचर्डनं टेलिफोन केला, आणि सांगितलं, " आज पहांटे गर्ट्रुड लारेन्सशीं मी लग्न केलं." रिचर्डच्या आईनं सुमारें वर्षांपूर्वीं, "स्कायलार्क" नाटकांत गर्ट्रुडचं काम पाहिलं होतं, परंतु त्याची आठवण तिला असेल अशी रिचर्डची खात्री नव्हती.

त्याची आई उलट कांहींच बोलली नाहीं. पांचदहा सेकंद तसेच गेले.

मग रिचर्डनं आवाज उंच करून पुन्हा म्हटलं, "आई, ऐकलंस कां? थोड्याच घटकापूर्वीं मीं लग्न केलं, ऐकूं आलं का ?"

त्याची आई म्हणाली, "ऐकलं रे पण गर्ट्रुड लारेन्स म्हणतोस, ती कोण ?"

इंग्लंड अमेरिकेंतल्या हजारों रसिकांना प्यार असलेली विख्यांत नटी गर्ट्रुड लॉरेन्स रिचर्डच्या आईला मात्र माहीत नव्हती ! या विचारानं रिचर्डला मनापासून हंसूं आलं. आपल्या मुलानं एका नटीशीं लग्न केलं हें म्हातारीला समजलं असतं तर तिला धक्काच बसला असता. तो धक्का वाचला हें ठीक झालं असा विचार रिचर्डच्या मनांत आला......

या वेळचा धक्का टळला, पण नंतरच्या काळांत सुनेनं सासूला दिलेल्या अनेक धक्क्यांचीं वर्णनं या चरित्रग्रंथांत रिचर्ड आल्ड्रिचनं केलेलीं आहेत. परंतु हे धक्के निराशेचे नव्हते, तर गोड आश्चर्यांचे होते ! वर्षांमागून वर्षं जशीं वाढत गेलीं तसतशी सासूची सुनेवरची प्रीति वाढत गेली. आपली सून एक धंदेवाईक नटी आहे याबद्दलच रिचर्डच्या आईचं पहिलं समाधान दूर झालं. नटी या नात्याचे सुनेचे अलौकिक गुण तर तिच्या लक्षांत आलेच पण शिवाय तिच्या ठिकाणचा अमर्याद प्रेमळपणाहि तिला अधिकाधिक पटत गेला.

लोकांचीं अंतःकरणं जिंकण्याची विद्या गर्ट्रुडच्या अंगीं खरोखर मोठ्या वैपुल्यानं होती. गरीबांविषयीं कनवाळूपणा दाखवितांना तिच्या औदार्याला भरती येत असे. तीं स्वतः गरीबींतून स्वकष्टानं वर आलेली होती गरीबीचीं दुःखं तिला माहीत होतीं. पैशानं विकत घेतां येणाऱ्या ऐषआरामांनीं जीवन किती सुखाचं आणि समृद्ध होतं याचा अनुभव, तिला होता. गाड्या, जड-जवाहिर, कपडेलत्ते यांची खरेदी करतांना भान कसं तें रहात नसे, आणि मग आर्थिक खडखडाटाचे असे प्रसंग येत कीं तिच्याजवळ कपर्दिकहि उरत नसे. तिच्या या उधळेपणाला आळा घालण्यासाठीं तिच्या पैशांचे सारे व्यवहार एका बँकेकडे सोंपविण्यांत आले होते, आणि एखादा गाऊन घ्यायचा झाला तरी तिला त्या खर्चाला आधी मंजुरी मागावी लागत असे. इतकं करूनदेखील तिचा उधळेपणा केव्हां केव्हां मर्यादेबाहेर जात असेच. या उधळेपणांत भर टाकणारी गोष्ट म्हणजे तिची परोपकाराची हौस. दुसऱ्याला मदत करतांना हात आवरतां घेणं तिला माहीतच नव्हं. इंग्लंड-अमेरिकेंतल्या

साऱ्या प्रमुख थिएटरांत तिनं कामं केलीं. प्रत्येक थिएटरांतला द्वाररक्षक आणि इतर नोकरचाकर तिच्या पक्के आठवणींत रहात असत. कितीहि वर्षांनीं भेट झाली तरी त्यांची विचारपूस ती अगत्यानं करीत असे, आणि त्यांना भरपूर बक्षिशी देत असे. कधीं कधीं दानधर्माची लहर पुरी करण्यासाठीं ती एक गम्मत करीत असे. नाटकाचा प्रयोग संपला कीं पडद्याच्या मागच्या बाजूस ती साऱ्या नोकराचाकरांना बोलावी, आपले खाजगी कपडे आणि दागदागिने काढून मांडी, आणि त्यांचा लिलांव.करी. अशा लिलांवांत वस्तूंच्या मूळ किंमतीच्या एकशतांशहि किंमत आली नाहीं तरी ती त्या देऊन टाकी. पैशाची फिकीर तिला नसे. दातृत्वाचा खेळ तिला खेळायचा असे! गरीबांवर ऐषआरामाचा वर्षाव करण्याची लहर तिला भागवायची असे!

दारिद्र्याचे हाल स्वतः अनुभविल्यामुळें श्रीमंतीची आणि ऐषआरामाची चव गरिबांना देता येईल तितकी द्यावी असं तिला वाटे आणि ती मुक्तहस्तानं पैसा खर्च करी, त्याप्रमाणेंच नाटकाच्या क्षेत्रांत तिनं स्वकष्टानं मार्ग काढून मानाचं स्थान मिळविलं होतं; त्यामुळें आपल्या कलेबद्दल तिचीं कांहीं विशिष्ट मतं बनलीं होतीं.

कोणत्याहि नाट्यप्रयोगांतली भूमिका करतांना त्यांत संपूर्णतः रमून जाण्याचा तिचा कटाक्ष असे. नाट्यप्रयोग रात्रीं साडेआठ वाजतां सुरू व्हायचा असला तर ती साडेसहा वाजतांच थिएटरांत जात असे. आपल्या वेषभूषेच्या खोलींत ती भरपूर विश्रांति घेत असे, आणि नंतर सावकाश आणि अतिशय काळजीपूर्वक भूमिकेसाठीं अवश्य तो साजशृंगार ती करीत असे. नाटकाचा प्रयोग आटपल्यानंतर निवडक मित्रमंडळीबरोबर एखाद्या उत्तम हॉटेलांत जाऊन खाण्यापिण्यांत, गप्पा मारण्यांत चार घटका घालविणं तिला आवडत असे. ती म्हणे नाटकांतल्या कामानं आलेला शीण घालविण्यासाठीं लौकर झोपावंसं मला वाटत नाहीं, हंसत खिदळत जागरण केल्यानंच माझ्या मनावरचा ताण कमी होतो. परंतु प्रयोग संपल्यानंतर चार घटका चैन करायचीच असा ज्याप्रमाणें तिचा परिपाठ होता, त्याप्रमाणेंच प्रयोगाच्या आधीं सर्वस्वी आपल्या कामांत गुंतून राहण्याचा तिचा नियम होता. ज्या खोलींत रंगायचं ती अत्यंत नीटनेटकी, स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न असायला हवी असा तिचा कटाक्ष असे. मित्रांनीं आणि

चाहत्यांनीं पाठविलेल्या फुलांनीं तिची ती खोली सदैव भरलेली असायची. अशा प्रसन्न वातरणांत प्रयोगासाठीं सिद्ध होण्यांत ती गुंतलेली असली कीं मग बादशहालादेखील तिला भेटण्याची परवानगी नसे. ‘ थिएटरची जागा गप्पासप्पा किंवा चैनीसाठीं नाहीं, कामासाठीं आहे ’ असं ती नेहमीं म्हणत असे. ज्या रसिकांचा लोभ आणि आश्रय मिळवायचा त्यांची सेवा करतांना किंचितही कसूर होता कामा नये असा तिचा आग्रह असे. कलेशीं आणि आपल्या चाहत्यांशीं अत्यंत प्रामाणिक राहणं आणि त्यांना खूष करण्यासाठीं परिश्रमांची पराकाष्ठा करणं हें या अलौकिक नटीचं ब्रीदवाक्य होतं. तिच्या अपूर्व यशाचं आणि लोकप्रियतेचं रहस्य हेंच म्हणावं लागेल. गर्ट्रुडला लग्नाचा प्रश्न टाकतांना रिचर्डनं तिला विचारलं होतं, ‘ मिसेस आल्ड्रिच होण्याची तुझी तयारी आहे काय ? ” आणि तिनं उत्तर दिलं होतं, “ माझी परीक्षा बघ तरी ! ” तिच्या या उत्तरांत रिचर्डला जें हवं होतं तें समाधान अर्थातच मिळालं आणि त्यानं तिच्याशीं लग्न केलं, परंतु तिची परीक्षा बघायची म्हणजे तिला नटीचा पेशा सोडायला सांगून केवळ संसारी स्त्री करून टाकायची अशी त्याची कल्पना मुळींच नव्हती. ती प्रेयसी आणि पत्नी म्हणून त्याला खचितच हवी होती, परंतु कलेच्या आणि कीर्तीच्या उंच स्थानावरून तिला खालीं ओढण्याचा त्याचा विचार नव्हता. एक सुंदर फुलपांखरूं त्याला आपलंसं करायचं होतं; परंतु त्याचे पंख त्याला तोडायचे नव्हते. ‘ नाइटिंगेल ’ पक्षाचा त्याला मोह पडला होता. परंतु त्याचं मंजुळ गाणं बंद करण्याची त्याची इच्छा नव्हती. त्याला हें कळत होतं कीं गर्ट्रुडचं खरं जीवितकार्य नटीचं आहे. कलेची उपासना आणि रसिकांचें कौतुक हे तिचे खरे जीवनरस आहेत. ते आटले तर खरी गर्ट्रुड लॉरेन्स शिल्लकच राहायची नाहीं. आणि म्हणून विवाहित आयुष्याला आरंभ करतांना त्यानं एक निश्चय केला होता. तो असा कीं तिच्या सहवासाचा हट्ट धरायचा नाहीं. तिच्या पेशावर कसलंहि बंधन घालायचं नाहीं. तिला पूर्ण स्वातंत्र्य द्यायचं. गृहिणीची भूमिका तिला जशी करावीशी वाटेल तशी करूं द्यायची...

यांतच दोघांची सोय होती. दोघांचं सुख होतं, परंतु त्याबरोबर यांतच भयदेखील होतं.

ज्यांनीं प्रीतिविवाह केला आहे अशा पतिपत्नींना साहजिकच वाटतं कीं एकमेकांचा अखंड सहवास मिळावा, ताटातूट कधींहि होऊंच नये, पण रिचर्ड आणि गर्ट्रुड यांच्या बाबतींत अखंड सहवास अशक्य होता. दोघांचं लग्न झालं तेंच मुळीं दुसरं महायुद्ध सुरू होऊन सुमारें एक वर्ष झालं होतं अशा वेळीं. युद्धाच्या ऐन धामधुमींत ! शांततेच्या काळांत रिचर्डचा मुख्य उद्योग होता आपल्या गांवीं—केप येथें—एक हौशी नाट्यमंदिर चालविण्याचा. युद्धकाळांतहि हा उद्योग त्यानं चालू ठेवला होता, परंतु लवकरच अशी वेळ आली कीं, आरमारी खात्यांतला एक मोठा अधिकारी म्हणून त्याला युद्धावर जावं लागलं. महायुद्धाच्या दिवसांत मोठमोठ्या शहरांतल्या रंगमंदिरांतले नाट्यप्रयोग थंडावले, परंतु प्रख्यात नटनटींना सैनिकांच्या मनोरंजनासाठीं दूरदूरच्या आघाड्यावर दौरे काढण्याचं काम करणं भाग पडलं. गर्ट्रुडच्या वांट्याला ही जबाबदारी मोठ्या प्रमाणांत आली. ती मूळची इंग्लिश. तिचा देशाभिमान अत्यंत जाज्वल. आपल्या देशानं महायुद्ध सुरू केलं आहे, तें जिंकण्यासाठीं आपण सारं तन मन धन खर्चिलं पाहिजे अशी तिची प्रखर भावना. दूरदूरचे दौरे काढून लढाईत गुंतलेल्या जवनांचा उत्साह शाबूत ठेवण्याच्या कामात तिनं उडीच घेतली. आज या आघाडीवर तर उद्या हजारों मैल दूर असलेल्या दुसऱ्या आघाडीवर अशा प्रकारें प्रवास करण्यांत आणि नाट्यप्रयोग वठविण्यांत ती गर्क झाली.

सैनिकांना प्रसन्न ठेवण्याच्या कामांत तिनं कोणत्याहि संकोचाला थारा दिला नाहीं. एखाद्या जहाजावर ती गेली तर प्रत्येक सैनिकाबरोबर तिनं नृत्य करावं, स्वाक्षरी केलेले आपले फोटो वाटावे, कुणी चुंबनालिंगनाची इच्छा दर्शविली तर खिलाडू वृत्तीनं हूं म्हणावं, नाचून गाऊन सगळ्यांना खूष करावं, 'लेडी इन् दि डार्क' या नाट्यप्रयोगांत 'जेनी'चं काम करतांना ती गाणीं म्हणत असे, त्यांतलं एक फार गाजलेलं होतं. या गाण्यावर लोक विशेष फिदा होते. याचं कारण तें म्हणतांना गर्ट्रुड प्रेक्षकांकडे पाठ करून नितंब उडवीत असे. जिथें जिथें ती जाई तिथें तिथें "तुमच्यासाठीं कोणतं गाणं गाऊं ?" असं तिनं विचारल्याबरोबर हजारों सैनिक ओरडत, "जेनी ! जेनी !" त्यांना नितंब उडविण्याचा तिचा आदा बघायचा असे. सरकारी अधिकाऱ्यांनीं तर तिला सूचना दिली होती कीं, तरुण सैनिकांनीं हा आदा बघितला तर त्यांची

नीति बिघडेल, तेव्हां हा आदा वगळून हें गाणं म्हटलं पाहिजे. आणि तसं तें ती म्हणूं लागली कीं, सारे सैनिक शिट्या घालीत, व ओरडत, "आदा पाहिजे! आदा पाहिजे!" अधिकाऱ्यांचा सक्त हुकूम मोडावा कीं, सैनिकांची मर्जी मोडावी असा पेंच गर्ट्रुटला पडत असे. तिनं अधिकाऱ्याला पुष्कळ सांगून बघितलं परंतु ते कांहीं आद्यावरची बंदी काढीनात. 'असला उत्तान शृंगाराचा आदा तरुण सैनिकांसाठीं करायचा नाहीं' हें एकच नीतिसूत्र ते घोकूं लागले. सैनिक नाराज राहावेत हें तर गर्ट्रुडला बरं वाटेना. मग तिनं एक युक्ति केली. 'जेनी'चं तें गाणं म्हणण्यापूर्वी तिनं सैनिकांना सांगावं,

"हें पहा, अधिकाऱ्यांचा हुकूम आहे कीं तुमच्यापुढें हें गाणं म्हणतांना मी आदा करतां कामा नये."

"कां? कां?" अशा आरोळ्या उठाव्या.

"तो आदा तुम्ही बघण्यालायक नाहीं म्हणे."

"का? कां?"

"तुम्हीं अजून लहान बच्चे आहांत सगळे."

"हो हो हो! म्यांव म्यांव!" असे चेष्टेचे उद्‌गार आणि कर्कश शिट्या व्हाव्या.

उजवा हात उंच करून गर्ट्रुडनं म्हणावं, "खामोष? खामोष! निराश होऊं नका. चिडूं नका. माझी साथ करण्यासाठीं हा इथं पियानोवर माझा मित्र ज्यो मून बसला आहे, तो कांहीं तरुण नाहीं. चांगला वयस्क आहे. त्याला मी आदा दाखविला तर सरकारी हुकूम मी मोडला असं होणार नाहीं. तेव्हां गाणं म्हणतांना ज्यो मूनला दाखविण्यासाठीं मी आदा करणार, आदा तुमच्यासाठीं नाहीं, त्याच्यासाठीं आहे. तुम्हांला बघायचा असला तर बघा."

असं म्हणून ती साऱ्या सैनिकांना उद्देशून डोळा घाली, आणि 'बूम! बूम!' अशा पालुपदाचं तें लोकप्रिय गाणं सुरूं करी...टाळ्या शिट्यांचा प्रचंड गजर होत असे.

सैनिकांचा उत्साह वाढावा यासाठीं गर्ट्रूड अशा प्रकारें सामान्य लाजलज्जेच्या, शिष्टाचाराच्या आणि सरकारी हुकूमांच्यादेखील मर्यादा ओलांडून झटत होती. घर–संसार सोडून दूरदूर हिंडत होती.

ती कुठेंहि असली तरी आणि कितीहि कामांत गर्क असली तरी रिचर्डला पत्र लिहीत असे. पत्र लिहिण्याइतकी सवड नसली तर तारा करीत असे. 'तुझ्यावांचून करमत नाहीं,' 'इथं तूं असायला हवा होतास, 'माझं तुझ्यावर फार प्रेम आहे,' असं तिनं पत्रांत आणि तारेंत लिहावं, आणि खालीं गोड गोड लाडिक अर्थाच्या सह्या कराव्या...परंतु या कागदी प्रेमानं रिचर्डची हुरहुर थांबत नसे. गर्ट्रुडच्या प्रत्यक्ष सहवासाची भूक त्याला होती, आणि तिचा मधुर सहवास आपल्याला मिळूं नये, इतर पुरुषांना मिळावा याचा त्याला असह्य विषाद वाटे. त्याला माहीत होतं, गर्ट्रुड जिथें-जिथें जाईल तिथेंतिथें तिच्याभोंवतीं चंगीभंगी श्रीमंत देखणे तरुण जमा होतील, तिला हॉटेलांत, नृत्यगृहांत घेऊन जातील, आणि त्यांना बरं वाटावं म्हणून गर्ट्रुडहि त्यांच्याबरोबर हिंडेल, सवरेल, हसेल, खेळेल. कित्येक ठिकाणीं तिचे जुने मित्र तिला भेटत आणि यापैकीं कित्येकांनीं तिच्यावर पूर्वींचं प्रेम केलं होतं. कांहींनीं तिला लग्नाची मागणीदेखील घातली होती, हें रिचर्डला माहीत्त होतं. त्याच्या मनांत नाहीं नाहीं तें विकल्प येत. त्याला धास्ती वाटे, कुणा पुरुषाच्या मोहजालांत गर्ट्रुड सांपडली तर कसं व्हायचं ?...

एके दिवशीं तो आपल्या कचेरींत गेला, आणि पाहतों तों कचेरींतल्या लोकांची कांहीं कुजबुज चालली होती. ती त्याला पाहतांच बंद झाली. जणुं त्याच्यासंबंधींच त्याची चर्चा चालू होती. कचेरींतलीं सारीं माणसं त्याची नजर टाळीत होती, आणि चिंतायुक्त नजरेनं त्याच्याकडे बघत होती. असा त्याला संशय आला. तो मनाशीं आश्चर्य करूं लागला. माझ्याविषयीं कांहीं वाईट बातमी यांना कळली आहे कीं काय ? त्याच्या सेक्रेटरीनं त्याला सांगितलं कीं, तो कचेरींत येण्याच्या आधीं त्याची चौकशी करण्यासाठीं त्याच्या कित्येक स्नेह्यांनीं फोन केला होता, व प्रत्येकानं निरोप ठेवला होता, आल्याबरोबर त्यांना सांगा, महत्त्वाचं खासगी काम आहे. रिचर्डला कळेना ही काय भानगड आहे. माझ्या बदलीचा किंवा बडतर्फीचा हुकूम निघाला आहे कीं काय आणि तो या लोकांना कळलेला आहे कीं काय, असं त्याच्या मनांत आल्यावांचून राहिलं नाहीं. त्यानं नित्याप्रमाणें कामाला प्रारंभ केला, परंतु ज्याला म्हणून टेबलाजवळ यानं बोलवावं त्यानं खालच्या मानेनं उभं

राहावं, त्याची नजर टाळावी आणि काम ऐकतांच झटकन आपल्या जागीं निघून जावं. रिचर्ड आपल्या मनाशीं म्हणूं लागला, हा आहे काय प्रकार ?...

दुपारच्या जेवणाची सुटी होण्याच्या सुमारास जॉन लॉज नांवाचा त्याचा मित्र पार्टिशनचं दार लोटून आंत डोकावला आणि म्हणाला, " जेवायसाठी बाहेर नाहीं का जाणार तूं ? "

" कसला जातो ? कामाचा ढीग पडला आहे, बघ. आणखी अर्धा तास तरी माझी सुटका व्हायची नाहीं. "

खरं म्हणजे त्यानं निघून जायचं पण् तो दाराशींच रेंगाळला आणि म्हणाला, " रात्रीं कुठें जेवणार आहेस ! क्लबावर येशील का माझ्याबरोबर जेवायला ? " त्याची चर्या नेहमींसारखी हसरी नव्हती. गंभीर दिसली.

रिचर्डनं सांगितलं, " आनंदानं येईन. परंतु मला उशीर होईल. "

" तुझ्या सोयीप्रमाणें ये. पण ये. ?" असं म्हणतांनाहि जॉनच्या स्वरांत चिंताच होती. त्याचा चेहरा बावरलेला होता. जणुं त्याला कांहीं बोलायचं होतं. कचेरींत बोलण्यासारखं नव्हतं, आणि त्या बोलण्यानं आपण रिचर्डला दुःख देणार आहोंत असं त्याला वाटत होतं.

रिचर्डनं त्याच्याकडं रोखून बघितलं. जॉननं नजर खालीं केली. रिचर्डनं चटकन् विचारलं, " काय वाईट बातमी आहे काय रे ? "

जॉन अडखळत म्हणाला, " जी बातमी आहे ती आमच्यापेक्षां तुलाच अधिक माहीत आहे. तिच्याविषयीं कुणाशीं बोलण्याची तुझी इच्छा नसेल. नसली तर तें साहजिक आहे. परंतु एक जुना स्नेही या नात्यानं माझ्यातर्फें आणि माझ्या बायकोतर्फें मला असं सांगायचं आहे कीं, आम्ही सगळी तुझ्या बाजूची आहोंत. आम्हांला फार दुःख होतंय्. "

रिचर्डला त्याच्या बोलण्याचा कांहीं बोधच होईना.

जॉन पुढें म्हणाला, " माझ्या बायकोनं मला टेलिफोन करून विचारलं, ही बातमी खरी का. मी तिला काय सांगणार ? ऐकल्यापासून मी देखील थक्कच झालों आहे. असं कांहीं—तुझ्या आणि गर्ट्रुटच्या बाबतीत घडेल असं आमच्या स्वप्नांतदेखील नव्हतं. कधींहि होणार नाहीं अशी पैज मारली असती— "

रिचर्डनं एकदम ओरडून विचारलं, " अरे पण काय, झालं आहे काय? कशाबद्दल बोलतो आहेस तूं? "

एव्हांना कचेरींतली पुष्कळच मंडळी दारांतून आंत आली होती आणि रिचर्डच्या टेबलाभोंवतीं गोळा झाली होती. त्यापैकीं एकानं रिचर्डच्या खांद्यावर हळूच हात ठेवला आणि म्हटलं, " आम्हांला सगळ्यांना वाटतंय कीं तुझ्यावर हा शुद्ध अन्याय झाला आहे. गर्ट्रुड असं कांहीं करील अशी कल्पना नव्हती कुणाची ! "—

रिचर्डनं खुर्ची फर्रकन मागं लोटली आणि तो उठून उभा राहिला. कोंडळी करून उभ्या राहिलेल्या मित्रांचे आणि सहकाऱ्यांचे चेहरे त्यानं न्याहाळले. प्रत्येक चेहऱ्यावर त्याला गाढ सहानुभूति आणि दुःख दिसलं. त्याच्या मनांत आलं, स्त्री म्हणजे एक कठोर कूट प्रश्न आहे आणि त्या प्रश्नाचं संकट निर्माण झालं कीं, सारे पुरुष सहानुभूतीनं एकवटतात हा काय चमत्कार !

साऱ्या मंडळींना उद्देशून तो म्हणाला, " हे बघा, तुम्हीं कशाबद्दल बोलत आहांत तें मला कळत नाहीं. उखाण्याच्या भाषेंत चांचरत बोलूं नका. गर्ट्रुडविषयीं कांहीं सांगायचं असेल तर स्पष्ट सांगा आणि लवकर सांगा. "

" आम्हीं घटस्फोटाविषयीं बोलत आहोंत. ती तुझ्याशीं काडीमोड करून कॅलिफोर्नियांतल्या एका कोट्याधीशाशीं लग्न करणार आहे. "

तें ऐकून रिचर्ड स्तंभितच झाला, सगळ्यांकडे बघून तो एक सेकंदभर स्तब्ध राहिला. मग त्यानं विचारलं, " कुठं मिळाली ही बातमी तुम्हांला? "

जॉन लॉज म्हणाला, " आजच्या सकाळच्या एका वृत्तपत्रांत याबद्दलचा एक कॉलम आहे. परंतु काल रात्रींच जिमि फिडलरनं ती रेडिओवर सांगितली. ती ऐकूनच माझ्या बायकोनं मला फोन करून विचारलं, तिला काल रात्रींच ती कळली. "

कुणीसं म्हटलं, " तिलाच काय, अर्ध्या जगाला कळली आहे. "

तितक्यांत टेलिफोन खणखणून वाजला गर्ट्रुडच्या बँकेचा मॅनेजर डेव्हिड याच्या सेक्रेटरीनं फोनवरून सांगितलं कीं, थोड्याच वेळांत डेव्हिड बोलणार आहे " अच्छा " म्हणून रिचर्डनं फोन ठेवून दिला.

मनांतल्या मनांत गर्ट्रुडशीं ज्यांची विशेष दोस्ती होती अशा पुरुषांची

आठवण तो करूं लागला. कॅलिफोर्नियांत गर्ट्रुडचा नाटकी दौरा नुकतांच झाला होता. कॅलिफोर्नियांतले तीन पुरुष त्याला आठवले. सगळे एकाहून एक धनाढ्य होते. त्यांनीं कुणीहि आपलं प्रेम लपविलेलं नव्हतं. गर्ट्रुडनंहि त्यांना प्रोत्साहन देणारीं पत्र लिहलेलीं रिचर्डला माहीत होती. त्याबद्दल त्यानं तिची चेष्टेच्या स्वरांत कां होईना पण कानउघाडणी केली होती. प्रत्येक वेळेस गर्ट्रुडनं उत्तर दिलं होतं, "तुला मत्सर वाटायचं कारण नाहीं. या लोकांच्या प्रेमांत मी सांपडेन असं का तुला वाटतं? वेडाच आहेस. अरे मी त्यांना गोड गोड पत्र लिहिते ती केवळ त्यांना दुखविण्याचं माझ्या जिवावर येतं म्हणून. आणि खरं म्हणशील तर ते सारे चांगले आहेत रे! त्यांच्या गांवीं नाट्य-प्रयोगासाठीं मी गेले कीं किती थाटाचं आगत स्वागत करतात तें! किती कौतुक करतात. मला कुठें ठेवूं आणि कुठें नको असं झाल्यागत वागतात!"

ती असं म्हणाली कीं रिचर्ड गप्प बसत असे.

गरीब लोकांवर उपकार करतांना पैशाच्या बाबतींत हात कसा आखडावा हें जसं गर्ट्रुडला माहीत नव्हतं त्याचप्रमाणें चाहत्यांना आणि मित्रांना आपल्या सहवासाचा आनंद देतांना जरा मर्यादा कशी राखावी हें देखील तिला कळत नव्हतं. तिच्या या स्वभावाला औषध नव्हतं...

आतां रिचर्डला या साऱ्या गोष्टी आठवल्या. तो स्वतःशीं म्हणाला, गर्ट्रुडचीं जीं प्रेमप्रकरणं निरुपद्रवी वाटलीं त्यांतलंच एखादं मर्यादेबाहेर गेलं असेलहि.

गर्ट्रुडसारख्या स्त्रीला माझ्या प्रेमपाशांत ठेवतां येईल हा माझा हिशोब चुकला असेलहि, नाहींतरी माझं पहिलं लग्न अयशस्वी ठरलंच होतं. अगदीं पहिल्यापासून मी माझ्या मनाला बजावलं होतं कीं जोराजुलमानं गर्ट्रुडला आपल्या मुठींत ठेवायची नाहीं. तिचं स्वातंत्र्य कधींहि मर्यादित करायचं नाहीं. संसारांत ती आपल्या मनानं रमेल तरच ती मला हवी... समजा तिला माझा कंटाळा आला असेल, माझा सहवास सुखाचा वाटेनासा झाला असेल, दुसऱ्या कुणा पुरुषाचं आकर्षण अधिक वाटूं लागलं असेल तर? तिला मी दोष देणार नाहीं...

गम्मत अशी की या प्रसंगाच्या आधीं दोनच दिवस केप येथील घरांत रिचर्ड आणि गर्ट्रुड एकत्र राहिलीं होतीं. कॅलिफोर्नियांतला नाट्यप्रयोगाचा

दौरा संपवून गर्ट्रुड विश्रांतीसाठीं आली होती. रिचर्ड चार दिवसांच्या रजेवर आला होता. लग्न झाल्यानंतरच्या तीन वर्षांत अगदीं निर्वेधपणानं एकत्र राहण्याचे योग नवरा-बायकोना फार क्वचित् लाभले होते, त्यामुळें केप येथील घरांतल्या त्या चार दिवसांच्या मुक्कामांत रिचर्ड आणि गर्ट्रुड फार मजेंत होतीं. रजा संपल्यावर मध्यरात्रीच्या गाडीनं घर सोडून निघतांना रिचर्डनं तिचा निरोप घेतला तेव्हां त्याला मिठी मारून चुंबन घेऊन ती म्हणाली होती, " लवकर परत ये. " त्यानं तिला विचारलं होतं, " तुला न्यूयॉर्कला येणं आवडेल कां ? " तिनं मान हालवून म्हटलं होतं, " नको. इथें आपल्या घरीं राहणंच मला आवडतं. या घरांत मी असलें कीं मी नटी आहे ही गोष्ट मला साफ विसरतां येते. मिसेस आर्लेड्रिच म्हणून राहतां येतं मला, आणि तेंच मला फार आवडतं. " तिनं अत्यंत प्रेमभरानं चुंबन घेऊन त्याला निरोप दिला होता......

हा प्रसंग रिचर्डला आठवल्यावांचून राहिला नाहीं....या प्रसंगाला पुरते दोन दिवसदेखील झाले नव्हते. आणि आतां वृत्तपत्रांत आणि रेडिओवर ही बातमी आली होती ! या चमत्काराला काय म्हणावं !...परंतु दुसऱ्याच क्षणीं रिचर्डच्या मनांत आलं, केप येथील घरांतल्या चार दिवसांच्या मुक्कामांत गर्ट्रुडनं माझ्यावर प्रेमाचा जो विशेष वर्षाव केला तो कायमच्या ताटातुटीपूर्वी दिलेला प्रीतीचा प्रसादच कदाचित् असेल. माझ्यापासून दूर होण्याचा गुप्त निश्चय तिनं केला असेल. म्हणूनच तिनं अखेरचं मनमुराद सुख मला दिलं असेल ....स्त्रीच्या प्रेमाचे मार्ग अगम्य आहेत ! पुरुषाला त्यांचा अंत कधीं लागला आहे काय ? ...

अशा अनेक आठवणींनीं आणि विचारांनीं भारावलेल्या मनःस्थितींत मित्रांच्या कोंडाळ्यांत रिचर्ड उभा राहिला. संपलं ! सारं संपलं ! अशा हताश उद्गाराचे ठोके त्याच्या अंतःकरणांत पडत राहिले...

तितक्यांत फोन पुन्हा वाजला,

दुसऱ्या टोकाला गर्ट्रुडच्या बँकेचा मॅनेजर डेव्हिड बोलत होता, " हॅलो ! रिचर्ड ! "

" हॅलो, रिचर्ड ! " असा डेव्हिडचा आवाज रिचर्डनं ऐकला. तेव्हां तो स्वतःशीं म्हणाला, घटस्फोटाची इत्थंभूत हकीगत आतां आपल्याला

समजणार. मन घट्ट करून ऐकण्याची त्यानं तयारी केली आणि विचारलं, " हॅलो डेव्हिड ! काय बातमी आहे ? "

दुसऱ्या टोकाकडून डेव्हिड म्हणाला, " अरे गृहस्था, तूं आहेस तरी कुठें ? दहा ठिकाणीं तुला फोन करून दमलो मी, आणि गर्ट्रुडहि. तिला आतां धीर धरवत नाहीं. "

" साहाजिक आहे. लग्नाची उतावीळी झाली असेलना तिला. कुणाशीं लग्न करण्यासाठीं घटस्फोट घेणार आहे ती ? "

डेव्हिड ओरडला, " घटस्फोट ? भलतंच ! घटस्फोटाची बातमी तुझ्या-पर्यंत येऊन पोंचली असेल तर ती आधीं कचऱ्याच्या टोपलींत टाकून दे पाहूं. निखालस खोटी बातमी आहे ती, आणि हें तुला सांगण्यासाठींच ती आणि मी उजाडल्यापासून तुला फोन करीत सुटलो आहोंत. ही बातमी ऐकल्यामुळेंच तूं तिला टाळीत असावा अशी गर्ट्रुडनं समजूत करून घेतली आहे, आणि ती जास्तच भडकली आहे. फिडलरनं काल रात्रीं रेडिओवर ही बातमी दिली, ती ऐकल्यापासून गर्ट्रुड एखाद्या वेड्यापिशासारखी पांच पांच मिनिटांनीं मला फोन करून म्हणत आहे, " फिडलरचा हा काय चावटपणा आहे, याचा ताबडतोब बंदोबस्त करा पाहूं. "

रिचर्डच्या मनांत आलं, साराच मूर्खांचा बाजार म्हणायचा ! त्यानं टेलिफोनचं तोंड तळहातानं झांकलं आणि भोंवतीं जमलेल्या चिंताग्रस्त दोस्तांना उद्देशून म्हटलं, " भाईयो, फिकर मत करो. सब कुछ ठीक है. फिडलरची बातमी निखालस खोटी आहे. कॅलिफोर्नियांतला कोट्याधीश म्हणजे निव्वळ गप्प आहे. घटस्फोटाची वार्ता सर्वस्वी हास्यास्पद आहे. "

रिचर्डच्या साऱ्या दोस्तांनीं हास्य केलं. कित्येकांनीं त्याच्याशीं हस्तांदोलन केलं. रेडिओवर बातम्या देणाऱ्या लोकांची जातच महाचावट असल्याचे उद्गार काढले. मंडळी हळूहळू पांगली. डेव्हिड पुन्हा रिचर्डशीं फोनमधून बोलूं लागला.

" जी बातमी पसरली तिच्यांत कांहीं एक सत्यांश नाहीं हें तुला सांगण्यासाठींच फोन केला. रेडिओवरच्या लोकांना मी चांगला दम भरला आहे. त्यांनीं तुझी आणि गर्ट्रुडची माफी मागितली आहे, आणि सर्वस्वी

निराधार असलेली बातमी दिल्याबद्दल फिडलरच्या तोंडून दिलगिरी वदविण्यासाठीं स्पेशल ब्रॉडकास्ट करण्याचं त्यांनीं वचन दिलं आहे.

" ठीक, ठीक. " म्हणून रिचर्डनं फोन बंद केला.

जें वादळ उठलं होतं तें अखेर चहाच्या पेल्यांतलं वादळ ठरलं होतं! रिचर्डला आतां हंसूं आलं. परंतु लगेच त्याच्या मनांत आलं, घटकाभर का होईना, मी गर्ट्रुडच्या प्रीतीचा संशय घेतला हा एक प्रकारें तिचा अपराधच केला. तिला माझ्या अपराधाची कल्पना नसेल, परंतु त्याचं प्रायश्चित् मला घेतलंच पाहिजे...त्यानें एका फुलांच्या दुकानांत टेलिफोन केला, गर्ट्रुडचा संपूर्ण पत्ता दिला, आणि दोन डझन सुंदर पांढऱ्या शुभ्र गुलाबाचे गेंद तिला पोंचते करण्याची ऑर्डर दिली. आपल्या मनांतल्या साऱ्या भावना ते गुलाबाचे गेंद हातीं घेतांच गर्ट्रुड ओळखील याविषयीं त्याला शंका नव्हती.

नवराबायकोचं एकमेकांवर कितीहि प्रेम असलं तरी लोकप्रवाद म्हणून एक बेजबाबदार चीज आहे. जी माणसं मोठ्या नांवलौकिकाला चढलेली असतात त्यांना दंश करायला लोकप्रवादाची विषारी जीभ टपलेलीच असते, आणि नवरा आपल्या उद्योगांत, बायको आपल्या उद्योगांत, अशा प्रकारें एकमेकांपासून दीर्घकाल दूर दूर राहणारं प्रख्यात दांपत्य असलं कीं लोक केव्हा, कोणत्या सवंग कंड्या उठवितील त्याचा तर नेमच नाहीं. जें विचित्र वादळ चार प्रहर उठलं आणि अखेर विरलं त्यावरून लोकप्रवादाचा हा धोका रिचर्ड आणि गर्ट्रुड दोघांनाहि समजला, परंतु तो समजून तरी काय उपयोग? एकमेकापासून दीर्घकाल दूर दूर राहिलं कीं, असल्या चावट कंड्यांना अनुकूल वातावरण निर्माण होणार हें ओळखणं जितकं सोपं होतं तितकंच सदैव एकत्र राहणं कठीण होतं...

महायुद्ध जोरांत चालू होतं. रिचर्ड आल्ड्रिचला आज या आरमारी तळावर, उद्यां त्या आरमारी तळावर अशाप्रकारें हिंडणं भागच होतं. आणि गर्ट्रुडचे दौरे संपण्यासारखे नव्हते. तिची तर अशी तीव्र इच्छा होती कीं, लढाईच्या दिवसांत आपण आपली जी जन्मभूमि इंग्लंड तिथें असायला हवं.

"मला इंग्लंडमध्यें बोलावून घ्या" म्हणून तिनं थेट युद्ध कचेरीला लिहायला कमी केलं नाहीं. युद्धमंत्र्यांना तिची योग्यता कुणी सांगायला नको होतं.

तिला आमंत्रण मिळालं. आणि सैनिकांचं मनोरंजन करण्यासाठीं इंग्लंडच्या मंत्रिमंडळानं खास गौरवपूर्वक निवडलेली गायिका, नर्तिका आणि नटी म्हणून केवळ इंग्लंडमध्येंच नव्हे तर फ्रान्स, होनोलूलू, गुआमा, वाइकिकी अशा दूरदूरच्या ठिकाणीं ती काम करूं लागली. एकप्रकारें ती सैन्यांतच दाखल झाली लष्करी गणवेषहि ती करूं लागली...

नवरा आणि बायको एकमेकांपासून कितीकदां तरी तीनतीन हजार मैलांच्या अंतरावर असावीत हाच नियम ठरला. आपापल्या मार्गानें फिरणारे दोन ग्रह क्वचित् कधींकाळीं एकमेकांजवळ जावेत त्याप्रमाणें रिचर्ड आणि गर्ट्रुड यांची भेट चुकून कपिलाषष्ठीच्या योगावर घडत असे. एखादा दौरा संपवून छोट्या विश्रांतीसाठीं गर्ट्रुड लंडन शहरीं आलेली असावी, जवळच्याच आरमारी तळावर रिचर्ड काम करीत असावा, गर्ट्रुड आलेली कळतांच त्यानं एखाद्या अर्ध्या दिवसाची रजा मिळवावी, आणि कुठल्या तरी हॉटेलांतल्या खोलींत रात्रीच्या चार घटका पतिपत्नींनीं एकांतांत घालवाव्या...साऱ्या शहरांत काळोख पसरलेला असावा, बंबारा केव्हां होईल त्याचा नेम नसावा, फक्त चार घटकांच्या भेटीनंतर पुन्हां ताटातूट होणार या जाणीवेनं अंतःकरणं जड झालेलीं असावीत, प्रीतिसंगमाची आतुरता उचंबळून आलेली असावी, अशा चमत्कारिक परिस्थितींतल्या आणि मनःस्थितींतल्या त्या दुर्मिळ गांठी-भेटींचं वर्णन लेखकानं केलं आहे तें अत्यंत हृदयस्पर्शी आहे...महायुद्ध चालू होतं तोंपर्यंत अशा गांठीभेटींवरच रिचर्ड आणि गर्ट्रुड यांचं समाधान आणि सुख आधारलेलं होतं...

अखेर १९४७ सालीं महायुद्ध संपलं. तें संपल्याबरोबर रिचर्डच्या मनांत पहिला विचार आला तो असा, कीं ताटातुटीचे दिवस आतां सरले. आतां आपण आपल्या घरीं जाऊं. गर्ट्रुडलाहि इंग्लंडमध्यें राहण्याचं प्रयोजन उरलेलं नाहीं. तीहि अमेरिकेस परतेल, घरीं येईल, तिला आणि आपल्याला एकत्र राहतां येईल.

रिचर्डचा हा हिशेब खरा ठरला. परंतु पूर्णांशानें नव्हे. युद्धकाळांत गर्ट्रुडची कीर्ति शतपटीनं अधिक वाढली होती, आणि नटी या नात्यानं नाटकं करणाऱ्या प्रोडयूसरांना ती अधिकच हवीशीं वाटूं लागली होती.

कोणत्याहि नव्या नाटकांत मुख्य भूमिकेसाठीं गर्ट्रुड मिळाली पाहिजे असं ज्या त्या प्रोडयुसराला वाटूं लागलं होतं. यामुळें गर्ट्रुड अमेरिकेस परतली तरी तिचा पाय घरांत ठरेना. अमेरिकेंतल्या मोठमोठ्या शहरीं तिचे नाट्य-प्रयोग तुफान गर्दींत चालूं राहिले. तिचे दौरे होतच राहिले... रिचर्डच्या वांट्याला बायको येईना...

या प्रकारचा रिचर्डला मनस्ताप होत असे. परंतु गर्ट्रुडशीं लग्न करतांना त्यानं पहिलं तत्त्व ठरविलं होतं कीं गर्टरुडच्या कलेच्या आणि कीर्तीच्या मार्गांत कधींदेखील आड यायचं नाहीं, तिच्या स्वातंत्र्याला बाध आणायचा नाहीं. हें तत्त्व त्यानं आपल्या मनावर पक्कं ठसविलं होतं. आणि शिवाय मधून मधून आठ पंधरा दिवसांचाच कां होईना, जो गर्ट्रुडचा सहवास त्याला मिळत असे तो अत्यंत संतोष देणारा असे. गर्ट्रुड घरांत असली कीं, गृहिणीच्या भूमिकेंत तिनं इतर साऱ्या गोष्टींचं भान विसरावं. सासूला बोलावून घ्यावं, आप्तइष्टमित्र गोळा करावेत, छोट्यामोठ्या पार्ट्या कराव्या, वनभोजनाचे बेत करावे, घर सजवावं, घराला, दारं खिडक्यांना स्वतःच्या हातांनीं रंग द्यावा, जिकडे तिकडे हास्य आणि आनंद पसरून टाकावा. आणि सगळ्यांत महत्त्वाची गोष्ट ही, कीं रिचर्डचं खाणंपिणं, कपडेलत्ते बसणंउठणं, त्याच्या सुखसोयी, याकडे इतकं लक्ष द्यावं कीं रिचर्डची खात्री पटावी, " ही माझी आहे ! "

रिचर्डची काळजी घेतांना त्याला रीतभात शिकविण्याची आणि शिस्त लावण्याची खटपट गर्ट्रूडनं करावी. नवऱ्याला सुधारण्याची जबाबदारी आपल्यावर आहे असा सामान्यतः सर्वच बायकांचा समज असतो, आणि याबाबतींत नवऱ्यावर अधिकार गाजविण्याची हौस साऱ्याच बायकांना असते.

गर्ट्रुड या नियमाला अपवाद कशी असेल ? रिचर्डच्या आवडीनिवडीला व वागणुकीला वळण देण्याची गर्ट्रुडची खटपट नित्य चालू असे. इंग्लिश लोक आणि अमेरिकन लोक वास्तविक एकाच वंशाचे, परंतु चमत्कार असा कीं, लहान सहान बाबतींत दोघांच्या रीतीभाती अगदीं भिन्न आहेत. न्याहारीचे, जेवणाचे पदार्थ दोघांचे निराळे, नांवं निराळीं, सुरीकांटा वापरण्याची तऱ्हा निराळी, अंडं फोडण्याची पद्धत निराळी. रिचर्ड आणि गर्ट्रुड जेवायला खायला एका टेबलावर बसलीं कीं, ही भिन्नता साहजिकच

प्रगट व्हायची, आणि आपली अमेरिकन तऱ्हा टाकून रिचर्डनं इंग्लिश तऱ्हा शिकावी म्हणून गर्ट्रुडची टीका आणि खटपट सुरूं व्हायची. रिचर्डचं प्रामाणिक मत असं कीं काय खावं, कसं खावं हे प्रश्न अगदींच क्षुल्लक आहेत, या प्रश्नांत अमेरिकन माणसानं इंग्लिश माणसावर किंवा इंग्लिश माणसानं अमेरिकन माणसावर जोर–जुलूम करूं नये. तो म्हणे " इंग्लिश व अमेरिकन माणसांनीं सलोखा वाढविण्यासाठीं असुक करावं, तमुक करावं असली चर्चा पुष्कळ वाचतों आणि ऐकतों मी, परंतु चहा-कॉफी, अंडी, दुधाचा ग्लास, कांटे, चमचे असल्या क्षुल्लक गोष्टींवरून एकमेकांचा उपहास करण्याची संवय इंग्रजांनीं आणि अमेरिकनांनीं कायमची बंद केल्याखेरीज दोन देशांतला सलोखा वाढीला लागायचा नाहीं. " परंतु रिचर्डचं हें म्हणणं गर्ट्रूड्ला मुळींच पटत नसे न्याहारीच्या वेळेस त्यानं दुधाचा ग्लास घ्यावा ही गोष्ट तिला मंजूर नसे दूध काय घ्यायचं आजारी माणसासारखं ? चांगला कढत कढत चहा घ्यावा ! अंडं खायचं तें थंड कशाला होऊं द्यायचं ? त्यांतून गरम वाफा निघत असतांना तें खावं.

" अंडं थंड होऊं देऊं नकोस रे. "

" अग, पण गरम अंडं हातांत धरलं कीं माझीं बोटं भाजतात. "

" अंडं कसं धरावं हें तुम्हा अमेरिकन लोकांना कळत नाहीं. "

रिचर्ड रागानं म्हणे, " उद्यांपासून अंडींच खाणार नाहीं मी. "

त्यानं आपल्या अमेरिकन पद्धतीनं अंड्यावर सुरी मारावी, आणि अंड्याचा वरचा अर्धा भाग बशींत पाडून तो कांट्यानं उचलून तोंडांत घालावा.

तें पाहून गर्ट्रुडनं नाक चढवून अगदीं किळस आल्यासारखा तुच्छ उद्‌गार काढावा, " ऊः ! " त्याच्याकडं बघत पुन्हा तिनं खांदे उडवून हताशपणानं म्हणावं, " ही काय रीत झाली ? "

रिचर्डनं अंतिमोत्तर द्यावं, " हें पहा, तुझी टीका तरी बंद कर किंवा माझीं अंडीं तरी बंद कर. "

हा प्रेमकलह नित्य व्हायचा.

एके दिवशीं तो झाला नाहीं तेव्हां रिचर्डला चमत्कार वाटला. नंतरच्या सात-आठ दिवसांत रिचर्डनं पाहिलं तो चार छोट्या छोट्या लोखंडी तारा

घेऊन कांहींतरी खटपट करण्यांत बाईसाहेब गुंतलेल्या दिसल्या. कसली खटपट चालली होती तें त्याला कळेना, पण एक दिवस सकाळच्या न्याहारीच्या वेळेस गर्ट्रूड म्हणाली, "गरम अंडं हातांत धरल्यावर तुझीं बोटं भाजतात ना? तीं भाजूं नयेत म्हणून मी ही पकड तयार केली आहे, बघ. या पकडींत अंडं धर, मी सांगते तसं काप आणि गरम गरम खा बघ..."

सात आठ दिवस लोखंडी तारा घेऊन बाईसाहेबांचा हा उद्योग चालला होता म्हणायचा—अशा विचारानं रिचर्डला हंसूं आलं. त्यानं निमूटपणानं पकडींत अंड धरण्याचा धडा घेतला, आणि अंडं खाल्ल्यावर प्रामाणिकपणानं कबुली दिली कीं, "तुझी ही पकड उत्तम आहे खरी!"

नवऱ्याची शाबासकी मिळाल्यावर गर्ट्रूडला आणखी अवसान चढलं. तिनं चारपांच दिवस खटपट करून पकडींत आणखी सुधारणा केली. पकडीचीं चित्रं तयार केलीं, आणि पेटंट मिळावं म्हणून अर्जदेखील केला. पेटंट खात्याचा मुख्य चार्लस कील याला गर्ट्रूडची पकड फार पसंत पडली. आणि अशा पकडीचा खप फार मोठ्या प्रमाणांत होईल असं त्यानं बोलून दाखविलं, परंतु पुढं कील मरण पावला, गर्ट्रूड एका नव्या नाटकाच्या उद्योगांत गुंतली. आणि 'गर्ट्रूड लॉरेन्सची अंड्याची पकड' म्हणून जिची जगभर ख्याति होण्याचा योग आला होता. ती फक्त एकट्या रिचर्डच्या उपयोगापुरती शिल्लक राहिली.

जेवणाखाण्यातली इंग्लिश रीतभात नवऱ्याला शिकविण्याची गर्ट्रूडची जशी धडपड असे तशीच त्यानं कपडे, पुस्तकं, इकडे तिकडे टाकूं नयेत, वृत्तपत्रं, मासिकं घरभर पसरूं नयेत, म्हणूनहि तिची धांदल चाललेली असे.

कितीकदां तरी तिनं रिचर्डच्या कपड्यांचीं कपाटं रिकामी करावीत, त्यांचा ढीग रचावा, आणि कपाटं पुन्हां शिस्तींत लावावी. याचा परिणाम असा व्हावा कीं रिचर्डला आपल्या वस्तू त्यानं जिथं खुणेनं ठेवल्या असतील, तिथें सांपडूं नयेत, आणि भांडणं व्हावं.

नवरा—बायकोंतल्या असल्या गोड भांडणाचं आणखी एक निमित्त घरांत होतं, तें म्हणजे गर्ट्रूडची कुत्रीं! तिला कुत्र्यांचं भलतं वेड, आणि रिचर्डला ती दृष्टीसमोरदेखील नकोत! लग्नापूर्वी दोघांच्या गांठीभेटी होऊं लागल्या आणि प्रीति जमत चालली तेव्हांच एकाची जी आवड ती दुस-

त्याची नावडं हें दोघांनाहि कळलं. रिचर्डला कुत्रीं आवडत नाहींत, मांजरी आवडतात हें समजतांच उत्तम सयामी मांजरांची एक सुंदर जोडी गर्ट्रुडनं रिचर्डला नजर केली. आणि या भेटीवरुनच रिचर्डच्या बहिणीनं त्यांची चेष्टा केली, "हीं चिन्हं कशाचीं महाराज! आज गर्ट्रुडचीं मांजरं मिळालीं. उद्यां गर्ट्रुड मिळेल!" त्या प्रणयाराधनाच्या दिवसांत मॅकी' नांवाचा गर्ट्रुडचा लाडका कुत्रा होता. त्याला हिंडविण्याफिरविण्याचं काम रिचर्डला कितीकदां करावं लागे. कधीं कधीं रात्रीं हॉटेलांतल्या नियमांचा भंग होऊं नये म्हणून मॅकीला आपल्या अंथरुणांत घेण्याची पाळी रिचर्डवर येई. त्यानं भुंकूं नये म्हणून त्याला पांघरुणांत लपेटून घेणं भाग असे. मग डाराडूर झोप व्हायची, पण ती मॅकीची! रिचर्डनं मनाशीं चरफडत रात्र जागून काढावी. पण करतो काय? गर्ट्रुडच्या प्रेमांत तो सांपडला होता! 'थोराघरचें श्वान' प्रेमानं सांभाळणं त्याला भागच होतं......

पुढें लग्न झाल्यावर गर्ट्रुडनं एक सुंदर कुत्रा आणला. त्याचं नांव 'अँगस'. हा कुत्रा फारच देखणा होता आणि कित्येक प्रदर्शनांत त्यानं सुवर्णपदकं मिळविलीं. पण त्यामुळेंच गर्ट्रुडनं त्याचे भलतेच लाड करावे, आणि रिचर्डला ते मुळींच आवडूं नये. डॉक्टरानं गर्ट्रुडला बजावलं होतें कीं, अँगसला अमुक अमुक पदार्थच खायला घाला. पण ती हें पथ्य मुळींच सांभाळायची नाहीं. अँगस हवं तें खायचा, सदा मोटारींतून हिंडायचा. आणि अंथरुणांत नक्की घाण करून ठेवायचा. मात्र अँगसचे हे 'गुन्हे' रिचर्डच्या दृष्टीस पडूं नयेत अशी दक्षता गर्ट्रुड घ्यायची. बाहेर फिरून परत आल्याबरोबर ती आधीं शय्यागृहांत धांव घेई, पलंगावरचं अंथरूण तपासी आणि 'गुन्हा' दृष्टीस पडला तर चादर बदलून टाकी. इंग्रजींत "अँग्विश" असा एक शब्द आहे, त्याचा अर्थ मनस्ताप! घाण झालेली चादर काढून नवी घालतांना गर्ट्रुडनं उद्‌गार काढावा, "माय ऑंग्विश!" अँगसऐवजीं ऑंग्विश असं तिनं म्हटलेलं बाहेर रिचर्डला ऐकूं आलं कीं तो समजत असे अंथरुणांत अँगसनें प्रसाद टाकला असला पाहिजे. त्याला अँगसवर चिडण्याचं भानच उरत नसे, नवऱ्याच्या रागलोभाला गर्ट्रुडनं इतकं जपावं, याबद्दलच्या कौतुकानं आणि समाधानानं त्याचं अंतःकरण भरून जात असे. गृहिणीची भूमिका किती तन्मयतेनं

गर्ट्रुड वठवीत आहे याचा हा एक लहानसा पुरावा मिळाल्यासारखं त्याला वाटे.

कित्येकदां रिचर्ड आपल्या कामानिमित्त दूर जाई आणि घरीं एकटी राहण्याची वेळ गर्ट्रुडवर येई. एकदां अशी वेळ आली असतांना तिनं बाजारांत जाऊन एक लहानशी सुंदर बांधणीची सुबक वही विकत आणली. त्या वहीच्या मलपृष्ठावर रिचर्डचा, तो सहा वर्षांचा असतांना काढलेला फोटो चिकटविला, आंतल्या पहिल्या पानावर मथळा लिहिला, 'रिचर्डच्या गैरहजेरींतलं माझं आयुष्य', आणि पुढच्या पानावर लिहून ठेवलं, " रिचर्ड मला सोडून दूर गेला कीं या वहींत माझी दैनंदिनी मी लिहिणार आहे." चार दिवस तिनं या वहींत आपल्या एकाकी दिनक्रमाची नोंद केली. मग सात महिने ती वही तशीच पडली आणि नंतर तिनं त्या वहींत लिहिलं, लिहिण्याजोगं आहे काय ? रिचर्ड माझ्याजवळ नसला कीं मला आयुष्यच उरत नाहीं ! "

सारांश, गर्ट्रुड रिचर्डवर प्रेमाचा वर्षाव करीत होती. नटीचा पेशा करतांनाहि आदर्श गृहिणी म्हणून राहिली होती, तिच्या प्रेमाविषयीं आणि एकनिष्ठेविषयीं शंका घ्यायला जागा नव्हती !

परंतु जागा नव्हती असं तरी कसं म्हणायचं ? गर्ट्रुडचा पेशाच असा होता कीं रिचर्डला सोडून दूरदूरच्या शहरीं तिला जावं लागे, आणि तिच्या भोंवतीं कीर्तिवलय एवढं मोठं होतं कीं ती जिथें जाईल तिथें तिथें तरुण पुरुषांचा आणि धनाढ्य चाहत्यांचा घोळका तिच्याभोंवतीं जमा होत असे. रिचर्ड एकटा राहिलेला असे, आणि मग त्याच्या मनांत मत्सराचे विचार गर्दी करीत. यांत भर टाकणारी एक गोष्ट ती ही कीं महायुद्धाच्या दिवसांत गर्ट्रुडनं ज्या कित्येक लष्करी अधिकाऱ्यांशीं मैत्री जोडली होती त्यांतले कांहीं अजून तिच्या नादीं होते. ते तिला पत्र लिहीत, फोन करीत, मी अमुक अमुक दिवशीं येत आहे, तुझी संगत हवी आहे, भेटशील कां असं विचारीत. रिचर्डला हें प्रकार मुळींच आवडत नसत. तिच्या चाहत्यांचीं पत्रं त्याच्या हातीं आलीं कीं त्यानं तीं फेंकून द्यावीत, आणि कुणाचा फोन आला तर त्यानं सांगावं 'गर्ट्रुड लॉरेन्स फार कामांत

आहे, तुमची तिची भेट होणं शक्य नाहीं, पुन्हा फोन करूं नका? ' आपल्या मित्रांच्या आणि चाहत्यांच्या पत्राचा आणि टेलिफोनांचा रिचर्डनं परस्पर निकाल लावावा ही गोष्ट गर्ट्रूडला बिलकूल नापसंत असे, परंतु तिच्या पसंती नापसंतीकडे लक्ष द्यायचं नाहीं, असं रिचर्डनं ठरविलं होतं. हीं प्रेमपत्रं फोनवरचीं लाघट बोलणीं आणि गांठीभेटींचीं आमंत्रणं थांबलीच पाहिजेत असं त्याला मनापासून वाटत होतं.

गर्ट्रूड म्हणे, " त्या लोकांना दुखवूं नये एवढ्याच बुद्धीनं मी गोड गोड पत्रं लिहिते, आणि त्यांचीं जीं प्रेमपत्रं मला येतात त्यांना तरी विशेष महत्त्व तूं कशाला देतोस ? "

रिचर्ड म्हणे, " मी दिलं नाहीं तरी जे पुरुष हीं पत्रं लिहितात त्यांना ती महत्त्वाची वाटतातच ना. त्यांना लिहिलेल्या पत्रांत प्रियकरा, लाडक्या, असल्या संबोधनांचा वापर तूं सढळ हातानं केलेला असतो, आणि त्यांना वाटतं ही आपल्या प्रेमांत सांपडली आहे. दामटावं आपलं घोडं जरा पुढें, करावी मजा. हा विचार तूं करावयाला नकोस ? "

हें बोलणं तिला पटत असे आणि ती म्हणे, " पण कांहीं झालं तरी तूं रुसूं फुगूं नकोस. युद्ध काळांतली गरज ओळखून मी तशीं वागले. युद्ध संपलं. माझ्या वागण्याचं प्रकरणहि संपलं. "

रिचर्डला वाटलं भांडण तंट्याचं एक निमित्त दूर झालं.

परंतु एके दिवशीं फोनवरून एका पुरुषानं सांगितलं, " गर्ट्रूड लॉरेन्सचा मी एक जुना दोस्त आहे. युद्ध काळांत तिची माझी मैत्री झाली. मी न्यूयॉर्क शहरांत आलो आहे. तिच्याशीं बोलायचं आहे. "

रिचर्डनं सांगितलं, " माफ करा. लॉरेन्स कामांत आहे. ती फोनवर कुणाशीं बोलणार नाहीं. "

" परंतु माझ्याशीं नक्कीच बोलेल. "

" शक्य नाहीं. माफ करा. "

दुसऱ्या टोकावरून बोलणाऱ्या माणसानं आर्जवी आवाजांत म्हटलं, " तुम्ही तिला सांगा, आर. डी. चा फोन आला आहे. ती असेल तशी फोनवर धांवत येते कीं नाहीं बघा. "

त्या माणसाचं तें आत्मविश्वासाचं बोलणं ऐकून रिचर्डला इच्छा झाली कीं त्याच्या दोन मुस्कुटांत द्याव्या. त्यानं बजावून सांगितलं, " लॉरेन्स फार कामांत आहे, समजत नाहीं तुम्हाला ? "

उद्धट आवाजांत उत्तर आलं, "मी न्यूयार्कमध्यें आलों कीं भेटायचं तिनं कबूल केलं आहे. माझ्याबरोबर ती येणार आहे, हिंडणार-फिरणार आहे; आमचं दोघांचं हें कधींपासून ठरलं आहे. आमचा फार दिवसांचा पत्र-व्यवहार आहे, हें लक्षांत घ्या तुम्ही. "

" आणि महाराज, तुम्ही हें लक्षांत घ्या कीं सतराशेंसाठ लोकांशीं लॉरेन्सचा असाच पत्रव्यवहार होता. युद्धकाळांत हें सारं ठीक होतं, पण आतां युद्ध संपलेलं आहे. शांततेच्या काळांतल्या नित्याच्या आयुष्याला लॉरेन्सनं सुरुवात केली आहे. तुम्हीदेखील आतां तेंच करावं, आणि लॉरेन्सला विसरून जावं हें बरं. "

रिचर्डनं धाडकन् फोन आपटला तितक्यांत गर्ट्रूड त्याच्याजवळ आली.

तिच्या नजरेकडे बघतांच रिचर्डची खात्री पटली कीं तिनं फोनवरचं अखेरचं बोलणं ऐकलं होतं.

तिनं कडवट स्वरांत विचारलं, " झाली का नवरेबाजी सुरूं ? "

रिचर्ड म्हणाला, " ही नवरेबाजी नाहीं. साधा व्यवहारी शहाणपणा आहे. नसत्या गुंतागुंती होऊं नयेत म्हणून तुझं रक्षण करतों आहे. "

" वा ! केवढं स्त्रीदाक्षिण्य ! परंतु कुणाचा फोन आला होता एवढं तर सांगशील ? "

" गोड गोड पत्रव्यवहार करून डझनावारी जे दोस्त तूं आपल्या नादीं लावलेस त्यांतल्या एकाचा. महामूर्ख दिसतो आहे बेटा. आर. डी. असं खुणेचं नांव त्यानं सांगितलं. "

" होय ? तो महामूर्ख मुळींच नाहीं, हुशार आहे. काव्य लिहितो. मुक्तछंद "

" आणि सौंदर्यसम्राज्ञी गर्ट्रूड लॉरेन्स हिला तें काव्य तो अर्पण करतो, असंच कीं नाहीं ? "

" त्यानं आपल्या कांहीं कविता मला अर्पण केल्या आहेत. तो न्यूयार्क-मध्यें आला असेल तर त्याची भेट मला घेतलीच पाहिजे. जनतासंपर्क

कचेरींत फोन केला तर तो कुठल्या हॉटेलांत उतरला आहे तें मला कळेल." अस म्हणून फोन उचलायसाठीं तिनं हात पुढें केला.

रिचर्डनं झटकन तिचं मनगट धरलं आणि म्हटलं, "फोन करूं देणार नाहीं मी तुला."

"रिचर्ड, हे काय? हात सोड माझा."

तिनं हिसकाहिसकी केली. तिचं मनगट रिचर्डनं सोडलं नाहीं. दोघांनीं एकमेकाकडे खाऊं कीं गिळूं अशा अभिप्रायानं पाहिलं.

तितक्यांत दारावरची घंटा खणखणली. कुणीतरी भेटायला आलं होतं. भांडणाचा प्रसंग टळला.

दोन दिवस तसेच गेले. परंतु तिसऱ्या दिवशीं योग्य वेळ पाहून रिचर्ड म्हणाला, गर्ट्रूड तुझ्याशीं कांहीं बोलायचं आहे. ज्या माणसानं परवां तुला फोन केला होता त्याच्याविषयीं. व्यक्ति या नात्यानं त्या माणसाचं महत्त्व नाहीं परंतु ज्या भयाचा तो प्रतिनिधि आहे त्याचं महत्त्व आहे."

"रिचर्ड, तुझ्या मत्सरानं पुन्हा उचल खाल्ली काय?" असं विचारतांना तिनं जें रुक्ष हास्य केलं त्यांतला उपहास रिचर्डला चीड आणण्यासारखा होता. त्यानं फटकन म्हटलं, "मत्सर नाहीं वाटत मला. परंतु किळस येते."

"किळस?" मर्मभेद झाल्याप्रमाणें तिनं उद्‌गार काढला.

"होय, होय, किळस! तूं आतां लहान नाहींस. वयाबरोबर समजुतदार-पणा येऊं दे अंगीं जरा. तूं आपल्या पेशांत केवढे पराक्रम केले आहेस. केवढा नांवलौकिक मिळविला आहेस. पण कांहीं बाबतींत तूं अशी वागतेस कीं जणूं तुला तुझ्या पेशाचा अभिमान नाहीं. कीर्तीचा अभिमान नाहीं. नवऱ्याचा अभिमान नाहीं. एखाद्या अल्पवयी अक्कलशून्य पोराप्रमाणें स्वैराचार करतेस, वाटत नाहीं तुला कांहीं?"

गर्ट्रुडचा चेहरा रागानं लालबुंद झाला. ती फुसफुसली, "मला असा टाकून बोलण्याचा तुला काय अधिकार?"

"अधिकार? मी तुझा नवरा आहे!"

"असशील! पण म्हणून काय मला वाटेल ते बोलशील? टीका करशील? हुकूम सोडशील? मी काय तुझ्या आरमारी खात्यांतली एक

सैनिक आहे असं समजलास कीं काय? मला कुणी पत्रं लिहावींत, मी कुणाला लिहावींत, कशीं लिहावीत, कुणाला भेटावं, कुणी माझ्याकडे यावं, यांवर तुझं नियंत्रण काय म्हणून? हें माझं घर आहे. इथें माझी सत्ता आहे."

"तुझी एकटीची नाहीं. आपल्या दोघांची आहे. आपलं लग्न झालेलं आहे. तुला स्वच्छंदानं वागतां यायचं नाहीं. लक्षांत ठेव."

"आणि महाराज, आपणहि हें लक्षांत ठेवा कीं, लग्न असो, कांहीं असो, मी वाटेल त्याला पत्रं लिहिणार, भेटणार. घरांत भेटणार. बाहेर भेटणार. माझ्या आयुष्यांत मला कुणी मॅनेजर नको आहे. रिचर्ड आल्ड्रिच नांवाचा माणूस मला ऐकूनसुद्धां माहीत नव्हता तेव्हांपासून मी स्वैरपणानं वागत आलें आणि मोठी झालें."

"झाली असशील. मला मॅनेजर व्हायचं नाहीं. परंतु तुझे स्वैरचार मी खपवून घेणार नाहीं."

गर्ट्रूड ओरडली, "माझ्यावर व्यभिचाराचा आरोप करतांना तुझी जीभ कशी कचरत नाहीं?"

"असला आरोप मीं केला नाहीं."

"केला नाहींस कसा? लख्ख केलास. हें पहा रिचर्ड, तूं माझ्यापासून दूर असलास कीं काय थोड्या मैत्रिणी गोळा करतोस? त्यांच्याबद्दल मी तुला एकदां तरी विचारलं? कधीं तुझा संशय घेतला? मग युद्धकाळांत ज्या पुरुषांची आणि माझी मैत्री झाली, त्यांच्याबद्दल तूं काय म्हणून डंख धरावास, आणि मला एकदम व्यभिचारिणी म्हणावंस?" ती रागानं थरथर कांपूं लागली.

"व्यभिचारिणी शब्दाचा तुला राग येतो हें तरी नशीब म्हणायचं!"

हें ऐकतांच तिनं डोक्यावरची टोपी काढली आणि रिचर्डच्या तोंडावर भिरकावली. हवेंतून झोका घेत ती दूर जाऊन पडली. हें पाहून ती अधिकच भडकली. तिनं चार पावलं टाकून झेप घेतली आतां ती आपल्याला ओरबडणार हें रिचर्डनं ओळखलं. त्यानं तिचे हात पकडले आणि तिला जवळ ओढून घट्ट मिठींत धरलं, अतिशय प्रेमळ स्वरांत तिला थोपटीत तो म्हणाला, "उगीच काय बरं भांडतेस? शांत हो! शांत हो!" ती शांत झाली. स्फुंदत स्फुंदत तिनं त्याला मिठी मारली.

या कलह प्रसंगाची आठवणदेखील नको म्हणून दोघांनीं त्याच दिवशीं न्यूयॉर्क शहर सोडलं आणि मॅसॅचुसेट्स संस्थानांतील डेनिस गांवांत 'बेरीज' नांवाचा जो बंगला त्यांनीं बांधला होता, त्या बंगल्यांत जाऊन तीं कांहीं दिवस राहिलीं.

आणखी एक वादळ उठून अशाप्रकारें शांत झालं. परंतु भांडणाचं बीज नाहींसं झालं होतं असं नव्हे. दोघांच्याहि मनोभूमींत तें राहिलं होतंच. तें पुरतं नाहींसं होण्यासाठीं झालीं एवढीं वादळं पुरेशीं नव्हतीं, तर आणखी एका मोठ्या निर्णायक वादळाची गरज होती ! आणि तें केव्हां कसं उद्-भवेल त्याचा नेम नव्हता !

एका रविवारीं सकाळीं फोन आला. रिचर्डनं घेतला. वेस्टर्न युनियनच्या तारकचेरींतल्या माणसानं फोनवरून, विचारलं, "तुमच्या बायकोच्या नांवाची एक तार आलेली आहे. तुमची हरकत नसेल तर ती वाचून दाखवितो." रिचर्डनं वाचा म्हणून सांगितल्यावर कचेरींतल्या माणसानं तारेंतला मजकूर वाचला. ज्या माणसाची तार आली होती, त्याचं नांवहि कधीं रिचर्डनं ऐक-लेलं नव्हतं. तो दोन दिवसांच्या रजेवर येत होता आणि रजेच्या मदतींत गर्ट्रुडनं त्याला भेटावं अशी त्याची इच्छा होती. तसं करण्याचं तिनं त्याला वचन दिलेलं होतं. त्याची त्यानं तिला आठवण दिली होती...

तारेंतला मजकूर ऐकून रिचर्डचा राग एकदम उसळून आला. या तारेबद्दल गर्ट्रुडला कांहींदेखील सांगायचं नाहीं असं त्यानं ठरविलं. गर्ट्-रुडच्या त्या मित्राला बसूं दे कोकलत ! कांहींच उलट उत्तर कळलं नाहीं कीं बेटा मनाशीं चरफडेल आणि चार सहा घटकांनीं गर्ट्रुडच्या सहवासाची मजा लुटण्याची स्वारीची उर्मी थंड होईल !...रिचर्डनं गाडी काढली आणि तो बाजारांत चक्कर टाकण्यासाठीं गेला. तो परत येतो तो माडीवर गर्टरुड फोनवर कुणाशीं तरी बोलत असल्याचं त्याला ऐकूं आलं. बैठकीच्या खोलींत त्यानं पाऊल टाकायला आणि गर्ट्रुड जिन्यावरून खाली यायला एकच गांठ पडली. मोठ्या खुषींत हसत हसत आणि गात गातच ती पायऱ्यावरून खालीं आली.

तिनं रिचर्डच्या जवळ येऊन लाडिक स्वरांत म्हटलं, "न्यूयॉर्कला गेलं पाहिजे मला. दोन दिवस राहावं लागेल."

" काय काम निघालं आहे ? "

" आधींच ठरलेलं एक काम आहे. मी तें अजिबात विसरून गेले होते, आणि म्हणून तुला सांगितलं नव्हतं. माझे प्रकाशक माझ्या सन्मानार्थ एक पार्टी देणार आहेत. त्यांचाच फोन आला होता आतां. "

रिचर्ड अत्यंत कुत्सितपणानं हसला, आणि घटकेपूर्वी ज्याची तार आली होती त्याच्या नांवाचा उल्लेख करून म्हणाला, " तुझा हा परम दोस्त पार्टीला येणार असेलच. त्याला दोन दिवसांची रजा आहे. तुझ्या भेटीसाठीं त्याचा जीव घाबरा झाला आहे. "

तिनं मोठमोठे डोळे करून त्याच्याकडे बघितलं. त्यानंहि उलट तिच्यावर डोळे फाडले. तो स्वतःशीं म्हणाला, पुष्कळ झाल्या तुझ्या गमजा.

त्याच्याकडे रोखून बघत तिनं हळूच विचारलं, " माझ्या परम मित्राची गुप्त तार जशी सांगितलीस तशी आणखी कांहीं गुप्त बातमी मिळविली असलीस तर सांग कीं. "

रिचर्डनं कुत्सित हास्य केलं आणि म्हटलं, " तुझ्या परम मित्राची ती तार गुप्त कशी म्हणतां येईल ? तार कचेरींतल्या निदान दोन डझन लोकांना ती केव्हांच समजली आहे, आणि तिच्याबद्दल त्यांच्यांत चर्चा खचितच चालली असणार. उद्यांच्या वृत्तपत्रांत ती आली नाहीं किंवा फिडलरनं रेडिओवर सांगितली नाहीं तर आश्चर्य म्हणावं लागेल. "

त्याच्या या चिंतेचं जणु कांहींच महत्त्व नव्हतं. अशा मुद्रेनं ती म्हणाली, " माझ्या मित्राची बातमी तूं मला दिलीस याबद्दल मी तुझी फार आभारी आहे. त्याला मी जरूर भेटेन, आणि त्याच्याबरोबरच पार्टीला जाईन. माझ्याबरोबर चल असं तुला म्हणण्यांत कांहीं अर्थ नाहीं. माझं आत्मचरित्र (ए स्टार डान्स्ड) प्रसिद्ध झाल्यापासून मी बघते आहे, माझ्या साहित्यिक-कीर्तीचा तुला मत्सर वाटतो. "

तिच्या त्या टोमण्याकडे रिचर्डनंहि दुर्लक्ष केलं. वटारलेले डोळे तिच्यावर रोखून तो म्हणाला, " हें बघ, अखेरचं म्हणून सांगतों. नीट ऐक. न्यूयॉर्कला जाण्याचं तुझं निमित्त कोणतंहि असो, तें खरं असो, खोटं असो. ज्यानं तुला तार केली त्याला तूं जर भेटलीस तर तुमचा आमचा कायमचा रामराम ! "

" काय ? काय म्हणालास ? "

" जें म्हटलं तेंच ! स्वतःच्या कीर्तीचा नवऱ्याच्या अब्रूचा कांहींएक विचार न करतां हवं तसं वागणाऱ्या स्वैरिणीची संगत मला नको ! "

गर्ट्रुडच्या संतापाचा एकदम स्फोटच झाला. ती ओरडून म्हणाली, " असं कां ? मग माझंहि अखेरचं सांगणं ऐक. ज्याला माझा भरंवसा नाहीं, माझ्याविषयीं आदर नाहीं, जो पदोपदीं माझा घाणेरडा संशय घेतो अशा पुरुषाची संगत मलासुद्धां नको ! " ती एकदम हुंदके देऊन रडूं लागली.

"साऱ्यांनीं भविष्य केलंच होतं कीं, हें लग्न टिकायचं नाहीं. किती बरोबर होतं त्यांचं म्हणणं. तुझं माझं पटणं शक्य नाहीं. आपण दोघांनीं आपापला रस्ता सुधारावा हेंच चांगलं. "

" तुझा हा निर्णय ठरला असेल तर जास्त वाद करण्यांत कांहीं अर्थच नाहीं. जा ! न्यूयॉर्कला जा ! आणखी कुठें जा ! हव्या त्या दोस्ता-बरोबर जा ! घरांतून चालती हो. सुटेन मी एकदाचा या मनस्तापांतून. जा ! जा ! आणि तुला या घरांत राहायचं असेल तर मी बाहेर पडतों. क्लबांत राहायला जातों. "

आसवांनीं ओल्या झालेल्या आणि रागानं तांबारलेल्या डोळ्यांनीं बघत गर्ट्रुड एक क्षणभर थरथर कांपत उभी राहिली. मग रिचर्डकडे अखेरचा एक कटाक्ष टाकून तिनं झटकन तोंड फिरविलं आणि हुंदके देत, दोन्ही हातांनीं तोंड झांकून ती माडीवर निघून गेली.

रिचर्डच्या मनांत आलं, याक्षणींच घर सोडावं, आणि दूर कुठेंतरी चालतं व्हावं. परंतु मोटरमध्यें पेट्रोल नव्हतं. रेशनिंगमुळें पेट्रोल मिळण्याची शक्यता नव्हती. आगगाडीनं जायचं म्हटलं तर संध्याकाळपर्यंत गाडी नव्हती...तो तसाच डोकं धरून बसून राहिला. गोठून गेल्यासारखं त्याला वाटत होतं. प्राणच गेल्यासारखं ! फक्त एकाच विचाराची जाणीव त्याच्या बधिर मनांत शिल्लक उरली होती. बेफाट, मूर्ख, वागण्याचा गर्ट्रुडनं कळस केला होता. त्याची सहनशक्ति संपुष्टांत आली होती. यापुढें तिच्याशीं संसार करणं, घरांत नादणं, त्याला केवळ अशक्य होतं ! या एकाच कल्पनेच्या मनावर होणारे घाव मोजीत तो बसून राहिला. अर्धा तास ! पाऊण तास ! ! तास !

पुढच्या दारांतून कुणीतरी बैठकीच्या खोलींत आल्याचा चाहूल त्याला लागली म्हणून त्यानं वर पाहिलं.

त्याची शेजारीण आणि मैत्रीण म्हातारी डॉ. हॅरिएट त्याच्यापुढें उभी होती. अतिशय गंभीर मुद्रेनें त्याच्याकडे बघत होती. तिनं विचारलं, " गर्ट्रुड कुठें आहे ? "

रिचर्डनं तुटक स्वरांत उत्तर दिलं, " माडीवर आहे. "

" तिला खालीं बोलाव. तुम्हां दोघांशीं मला कांहीं बोलायचं आहे. गर्ट्रुडला बोलाव म्हटलं ना. तुला आणि तिला चार समजुतीच्या गोष्टी कुणीतरी सांगितल्याच पाहिजेत अशी वेळ आली आहे, आणि सुदैवानें म्हण किंवा दुर्दैवानं म्हण, ती कामगिरी मला करावी लागत आहे "–

" पण आमचं भांडण झाल्याचं तुला कळलं कसं ? "

" गर्ट्रुडचा व्यवहार पहाणारा बँकेचा मॅनेजर डेव्हिड याला गर्ट्रुडनं फोन करून सांगितलं, प्लाझा हॉटेलमध्यें तिला राहायसाठीं खोली ताबडतोब रिझर्व्ह करायला हवी; घर सोडून जाण्याचं तिनं ठरविलं आहे. गर्ट्रुडचा हा फोन मिळल्याबरोबर मला डेव्हिडनं फोन केला, आणि जी भयंकर गोष्ट घडण्याचीं चिन्हं दिसताहेत ती घडूं नये यासाठीं प्रयत्न करण्याची त्यानं मला विनंति केली. मित्रांच्या किंवा शेजाऱ्याच्या खाजगी गोष्टींत मी कधीं लक्ष घालीत नाहीं. त्यांचा गाढवपणा दिसला तरी. परंतु तुम्हां दोघांच्या बाबतींत मला गप्प राहवणार नाहीं. गर्ट्रुडला खालीं बोलाव. "

" मी नाहीं बोलावणार. तुला वाटलं तर तूं बोलाव. "

डॉ. हॅरिएटनं ओरडून हांका मारल्या. गर्ट्रुड खालीं आली. रुसलेली, फुगलेली, आंतल्या आंत फुसफुसणारी, गंभीर, रिचर्डकडं ढुंकूनसुद्धां न पाहतां ती कोचावर बसली. एखाद्या दुखावलेल्या, संतापलेल्या, चिडलेल्या पोरासारखी !

डॉ. हॅरिएटनं डोळ्यावरचा चष्मा काढला, हातरुमालाच्या कोपऱ्यानं तो पुसला, आधीं रिचर्डकडे मग गर्ट्रुडकडे तिनं बघितलं. आपल्या मुद्रेवर आर्जवी स्मित आणलं, आणि ती म्हणाली, " मी जें कांहीं बोलणार आहे, त्यांतलं अक्षरन् अक्षर तुम्ही दोघांनीं लक्षपूर्वक ऐकलं पाहिजे. तुम्हां दोघांचीहि मी मैत्रीण आहे. तुमच्यापेक्षां चार पावसाळे मी जास्त

पाहिलेले आहेत. मी सुद्धां तुमच्यासारखाच प्रेमविवाह केलेला आहे. माझं बोलणं अनुभवाचं आहे हें लक्षांत घ्या..."

रिचर्ड आणि गर्ट्रुड दूर दूर बसली होती. मनानं तर तीं दोघं एकमेकांपासून फारच दूर होतीं, पण दोघंहि खालच्या मानेनं म्हाताऱ्या डॉ. हॅरिएटचं बोलणं ऐकत होतीं. ती पुढें बोलत राहिली,

"जें महायुद्ध नुकतंच संपलं तें मीं पाहिलेलं दुसरं महायुद्ध. प्रत्येक महायुद्धांत हजारों सैनिक प्राणाला मुकतात, परंतु आघाडीवरल्या या हत्येवरच महायुद्धांतली नासधूस थांबत नाहीं, घराघरांतसुद्धां ती होते. संसार मोडतात. नवरा-बायकोच्या प्रेमाचे बळी पडतात. असाच एक बळी तुमच्या घरांत पडणार आहे तो वांचविण्यासाठीं मी धडपडते आहे. माझा पेशा डॉक्टरचा आहे. जखमा धुणं आणि शिवणं हें माझं कर्तव्य आहे, आणि मी तुमची मैत्रीण आहे. शेजारीण आहे, तुम्हां दोघांवरहि माझं फार प्रेम आहे. यामुळें माझी जबाबदारी दुपटीनं वाढली आहे असं मी समजते. पहिल्या महायुद्धांत कित्येक संसारांची मोडतोड झाली ती एवढ्याच कारणानं कीं, आघाडीवर गेलेला नवरा आला खरा, पण परत दीर्घकाळ एकमेकांपासून दूर राहिल्यामुळें नवरा-बायकोंना एकमेकांशीं जमवून कसं घ्यावं तें कळेना. या दुसऱ्या महायुद्धानंतर तर ही मोडतोड फारच मोठ्या प्रमाणावर होत आहे. युद्ध चालू होतं तेव्हां तुम्ही एकमेकांपासून तीन तीन हजार मैलांच्या अंतरावर राहिलांत. भोंवतालीं जिकडे तिकडे संहार आणि अस्थिरता तुम्ही पाहिली, स्थिरपणा कसा तो तुम्हाला लाभला नाहीं. तुमचीं मनं ताणलीं गेलीं, शिणलीं. त्याच्या विपरित परिणामांतून तुम्ही बाहेर पडलां नाहीं. तुम्हां दोघांच्याहि मनाचा तोल गेलेला आहे. ज्याचा तुमच्या आयुष्यावर परिणाम होईल असा कोणताहि निर्णय घेण्याच्या अवस्थेंत तुम्ही नाहीं."

बोलतां बोलतां डॉ. हॅरिएट थांबली. रिचर्ड आणि गर्ट्रुड मनापासून ऐकत आहेत कीं नाहीं याचा तिनं अदमास घेतला. मग जरा पुढें झुकून ती म्हणाली, "महायुद्धाच्या दिवसांत वर्षानुवर्षं तुम्ही दोघं एकमेकांपासून दूर राहिलांत. आतां एकत्र आलां आहांत खरी, परंतु युद्धाच्या दिवसांत पडलेल्या ताणामुळें तुमचीं मनं ठिकाणावर नाहींत. चिडचीड, वैताग,

संताप, संशय, अविचार यांची जळमटं तुमच्या मनांत अजून आहेत. प्रेमाचे रेशमी धागे आधींच नाजूक, ते आणखीच हळवे झाले आहेत. एकानं दुसऱ्याला संभाळावं अशी जी सहानुभूतीची आंतरिक ओढ असावी लागते ती संपली आहे. पण केवळ एवढ्याच कारणासाठीं तुम्ही आपला संसारच मोडलात तर ती खेदाची गोष्ट म्हणावी लागेल. वैवाहिक-सुखाचं मंदिर एका दिवसांत किंवा रात्रींत उभं राहत नाहीं. वर्षानु-वर्षांच्या समजुतीनं, त्यागानं, कसोटी पाहणाऱ्या अनेक प्रसंगांनीं, भांड-णांनीं, समेटांनीं, विश्वासानं, मनाच्या मोठेपणानं, क्षमाशीलत्वानं तें मंदिर बांधावं लागतं. तुम्ही दोघं बुद्धिमान आहांत, उमद्या अंतःकरणाचीं आहांत, याबद्दल माझी खात्री झालेली आहे. मग ज्या घरांत तुम्ही सुख निर्माण केलंत, प्रेमाची देवघेव केलीत त्याच या घरांत तुम्ही आपल्या हातांनीं त्या सुखाची आणि प्रेमाची होळी करणार आहांत काय? केवळ एका क्षुल्लक भांडणाचं निमित्त करून?—"

"पण डॉ. हॅरिएट—" रिचर्ड बोलण्यासाठीं पुढें झुकला.

परंतु डॉ. हॅरिएटनं त्याला गप्प बसण्याची खूण केली आणि म्हटलं, "तुमचं भांडण कशावरून झालं तें मला ऐकायचं नाहीं. त्यांत कुणाचं चुकलं, कुणाचं बरोबर होतं याचा निवाडा मला करायचा नाहीं. त्यासाठीं मी आलेच नाहीं. मला कुणाची बाजू घ्यायची नाहीं. तुम्हां दोघांनाहि शुद्धीवर आणायचं आहे. गर्ट्रूड, एक गोष्ट कधीं विसरूं नकोस. जेव्हां तूं लग्न केलंस तेव्हां एक जबाबदारी पत्करलीस, रिचर्डविषयींची जबाबदारी. सामाजिक जबाबदारी. ही जबाबदारी तुला टाळतां येणार नाहीं. केवळ व्यवसायांतल्या कीर्तीचं सुख कोणत्याहि स्त्रीला पुरेसं होत नाहीं. संसारांतल्या खाजगी सुखावांचून स्त्रीच्या आयुष्याला पूर्णता येत नाहीं. मी डॉक्टरीण आहे. माझा नवरा डॉक्टर आहे. पण केवळ डॉक्टरीपेशांत मिळविलेल्या लौकिकामुळें आम्ही सुखी झालों नाहीं. आमचं वैवाहिक सुख हेंच खरं टिकाऊ सुख आहे, आणि तें मिळविण्यासाठीं आम्हाला दोघांनाहि प्रयत्न करावा लागला आहे. मनं आवरावीं लागलीं आहेत, त्याग करावा लागला आहे. स्त्रीला काय किंवा पुरुषाला काय दृढमूल सुखाची मोठी किंमत द्यावीच लागते. ती देण्याचं टाळतां येत नाहीं."

बोलतां बोलतां डॉ. हॅरिएट एकदम थांबली. कारण तिनं पाहिलं तो गर्ट्रुडच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा ओघळूं लागल्या होत्या. दाबलेल्या हुंदक्यामुळें तिचं अंग गदगदत होतं.

डॉ. हॅरिएटनं रिचर्डकडे तोंड वळविलं आणि ती म्हणाली, " आणि रिचर्ड, तूं देखील एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे ती ही कीं, हें घर आहे. लष्करी कचेरीं नाहीं. आपल्या हुकुमाप्रमाणें लोकांनीं बिनतक्रार वागलंच पाहिजे अशा तोऱ्यानं वागण्याचं हें ठिकाण नाहीं. हुकूम सोडण्याची, अधिकार गाजविण्याची तुला संवय झाली असेल. ती टाकणं सोपहि नाहीं, परंतु ती तूं टाकलीच पाहिजेस. तुझी बायको म्हणजे एक सामान्य स्त्री नव्हे. तिच्याशीं वागतांना अहंकार ठेवूं नकोस. अहंकारासारखा प्रेमिकांचा दुसरा शत्रू नाहीं. "

तिनं रिचर्ड आणि गर्ट्रुड दोघांकडेहि बघितलं, एक मोठा उसासा सोडला, किंचित् स्मित करून डोळे मिचकावले आणि ती म्हणाली, " आणखी काय बोलूं ? कितीहि बोललें तरी थोडं होईल. पण तुम्ही दोघंहि शहाणी, समजूतदार आहांत. जेवढं बोललें तेवढं पुष्कळ झालं आहे. अखेर तुम्हा दोघांजवळ मला एकच मागणं मागायचं आहे. आणखी एक वर्ष एकत्र राहून बघण्याचं वचन तुम्ही मला द्या. फक्त एक वर्ष. मात्र या अवधींत एकमेकाला संभाळून घेण्याचा, एकमेकांचीं मनं समजून घेण्याचा तुम्ही पराकाष्ठेचा प्रयत्न प्रामाणिकपणानं केला पाहिजे. हें करण्याचं वचन तुम्हा दोघांकडून मला हवं. माझ्यासाटीं नव्हे, तुमच्यासाठीं. हें वचन मला द्या, म्हणजे मी चालले. "

डॉ. हॅरिएट खुर्चीतून उठून उभी राहिली.

गर्ट्रुडनं हळूच रिचर्डकडे एक कटाक्ष टाकला. ती आपल्या जागेवरून उठली. चार पावलं टाकून डॉ. हॅरिएटजवळ गेली. त्या वृद्धेनें तिला जवळ ओढून छातीशीं धरलं.

हळूं आवाजांत गर्ट्रुड म्हणाली, " मी वचन देतें....रिचर्ड कबूल असेल तर. " तिचा आवाज भारावलेला होता, कांपरा होता. जणूं एखाद्या नववधूनं विवाहमंत्राचा उच्चार करावा त्याप्रमाणें तिनं पवित्र् मंत्र उच्चारला होता, " मी वचन देते... "

त्या घटकेला तिच्या अंतःकरणांतलं सारं प्रेम, सारी कळकळ, निष्ठा, औदार्य उचंबळून आलं होतं. तिच्या लावण्याला विलक्षण शोभा चढली होती. तिच्याकडे बघितल्याबरोबर रिचर्ड विरघळून गेला. तो आपल्या खुर्चीतून उठला, त्या दोघींच्या जवळ गेला, आणि हळूंच म्हणाला, "माझी तयारी आहे."

डॉ. हरिएटनं दोघांचे हात गुंतविले. रिचर्डला राहवलं नाहीं. त्यानं गर्ट्रुडचा मुका घेतला, आणि ज्या वृद्धेनं त्याचं आणि गर्ट्रुडचं पुनर्मीलन घडवून आणलं होतं तिचंहि आदरानं आणि कृतज्ञतेनं चुंबन घेतलं.

डॉ. हरिएट दोघांच्या खांद्यावर थोपटीत म्हणाली, "आतां जाते मी. तुम्हांला अडचण नको माझी. माझा तुम्हांला सल्ला असा कीं उरलेला दिवस या घरांत घालवूं नका. समुद्रस्नानाला जा किंवा मोटारींतून दूर कुठेंतरी जा. आणि मुख्य म्हणजे जें भांडण झालं त्याचा उल्लेख निदान चौवीस तास करूं नका. त्यानंतर त्या भांडणाच्या कारणांची, कुणाचं कुठं चुकलं त्याची चर्चा करा."

डॉ. हरिएट निघून गेली.

तिनं केलेल्या उपदेशाप्रमाणें रिचर्ड आणि गर्ट्रुड दोघंहि नंतर वागूं लागलीं. चमत्कार असा का पुढें गर्ट्रुडच्या मृत्युपर्यंत कधींदेखील नवरा बायकोत भांडणाच वादळ उठलं नाहीं. दोघांची प्रीति अढळ राहिली आणि प्रीतीबरोबर सुखहि !

कित्येक वर्षांनंतर 'दि ग्लास मेनेजरी' या चित्रपटांत गर्ट्रुड काम करीत असतांना तिच्या संगतींत नाताळाची सुटी घालविण्यासाठीं रिचर्ड विमानानं हॉलिवूडला गेला. दूरच्या पहाडी वाळवंटांत त्यांनीं सणाचे दिवस अगदीं एकांतांत घालविले. रात्रीच्या वेळेस त्यांनीं एकमेकांचे हात धरून घटकान् घटका स्तब्ध बसावं, हवेंत स्वच्छ, उग्र, तिखट दर्प भरलेला असावा. वर निळ्या आभाळांत असंख्य तारका चमचमतांना दिसाव्यात.

एकदां तीं दोघं अशीं बसलीं असतांना गर्ट्रुड हळूच एक कविता गुणगुणूं लागली.

त्या कवितेचा अर्थ असा होता कीं—

" आकाशांतली जी चांदणी मला आवडते तिच्याबद्दल मला इतकंच

माहित आहे कीं तिच्यांतून मध्येंच तांबडे किरण, मध्येंच जांभळे किरण बाहेर पडतात. माझे मित्र मला म्हणतात, बघूं तरी तुझी चांदणी. मी त्यांना दाखवितो. माझ्या त्या चांदणींतून भाले फेकल्याप्रमाणें तांबडे किरण, जांभळे किरण बाहेर पडतात. अन् मग एखाद्या पक्षाची फडफड थांबावी तशी माझ्या चांदणीची चमक थांबते. एखाद्या फुलाच्या पाकळ्या पूर्ण पसराव्या आणि तें फांदीवर स्वस्थ राहावं तशी माझी ती चांदणी दिसूं लागते. माझे स्नेही नाक उडवून म्हणतात, ही चांदणी काय आवडते तुला ? तो शनीचा तारा बघ. केवढा मोठा ! स्वयंप्रकाशी ! मी मनांत म्हणतो, तुमचा तो तारा तुम्हाला लखलाभ होवो. या चांदणीनं आपलं अंतःकरण माझ्याजवळ उघडं केलं आहे. म्हणून तिच्यावरच माझी प्रीत जडली आहे ! ”

गर्ट्रुड जी कविता गुणगुणत होती ती ब्राऊनिंग कवीची होती, हें रिचर्डनं ओळखलं. शाळेंत असतांना त्यानं ती वाचली होती. त्याच्या अध्यापकानं म्हणून दाखविलेली ऐकली होती. परंतु त्या वेळेस त्या कवितेचं त्याला कांहीं वाटलं नव्हतं. आतां मात्र गर्ट्रुडनं ती म्हटलेली त्यानं ऐकली तेव्हां त्याचं अंतःकरण सद्‌गदित झालं. त्याच्या मनांत आलं जणुं गर्ट्रुडला उद्देशूनच कवीनं तें काव्य रचलं होतं. मनांतला हा विचार गर्ट्रुडला सांगितल्यावाचून त्याला राहवलं नाहीं. तें सांगून तो पुढें म्हणाला, “ आपल्या लग्नाला दहा वर्षं झालीं. टीकाकारांचं भविष्य आपण खोटं ठरविलं ! ”

गर्ट्रुड म्हणाली, “ आणि गम्मत अशी कीं आपलं वैवाहिक आयुष्य कंटाळवाणं नाहीं. का तुला येतो कंटाळा कधीं मधीं ? ”

“ कंटाळा ? ” तिला मिठी घालून रिचर्ड म्हणाला, “ माझी ही चांदणी कंटाळा येऊं देईल काय ? तिच्यांतून जांभळे किरण, तांबडे किरण भाल्यासारखे बाहेर पडत असतात ना. लाडके, आतां आपल्या प्रीतीला कसलंहि भय उरलेलं नाहीं. पण आपली बारीक सारीक भांडणं थोडीं कां होतात ? जांभळे किरण ! तांबडे किरण ! ” रिचर्ड मोठ्या खुषींत हंसला.

गर्ट्रुडनं एक उसासा टाकला आणि म्हटलं, “ एक गोष्ट तुला सांगण्याचा धीर मला आजपर्यंत झाला नव्हता. पण आतां सांगतें. सांगूं ? ”

“ सांग. ”

"आपलं लग्न झाल्यावर कांहीं दिवस तुझ्याविषयीं मला मोठीच निराशा वाटूं लागली होती. कारण मी एखादं भांडण काढलं-अन् मी पुष्कळच भांडणं काढायची ! कीं तूं उलट भांडायचा नाहींस. अगदीं थंड राहायचास. विस्तवांत टाकलेला ओल्या लाकडाचा ओंडकाच जसा कांहीं. धूर सुद्धां निघायचा नाहीं, जाळ तर दूरच राहिला. भडकणं कसं तें तुला माहीतच नव्हतं. मला वाटायचं, हा भांडत नाहीं, ओरडत नाहीं, याचं माझं कसं जमायचं ? परंतु पुढें पुढें तूं भांडायला शिकलास. आपलीं भांडणं व्हायला लागलीं मला तूं अधिक आवडूं लागलास, कितीदां तरी आपली अगदीं कडकडून भांडणं झाली, नाहीं ? या भांडणांची मजा अशी कीं समेट झाल्यानंतर तूं फारच गोड गोड वागायचास आणि मग गुलाबाचीं फुलं काय पाठवायचास, माझे लाड काय करायचास ! मला भारी भारी बरं वाटायचं ! कारण रिचर्ड, मी तुझी बायको आहे खरी, परंतु नटीहि आहे. संसाराच्या नाटकांत अधूनमधून भांडणांच्या प्रवेशांचा मसाला असलाच पाहिजे. त्या खेरीज नाट्य नाहीं, रंगत नाहीं."

रिचर्डनं तिला आणखी जवळ धरून विचारलं, "म्हणजे तूं भांडण काढतेस तें मजेखातर म्हणायचं ? मला भडकविण्यांत तुला गंम्मत वाटते म्हणून ? ठीक आहे. हें सारें नाटक असतं हें माहीत झालं. आतां माझा पार्ट चांगला वठवायची माझी तयारी आहे. "

"आतां कसं बोललास ! किती लाडका रे तूं ?" असं म्हणून तिनं त्याचा मुका घेतला,

नंतरच्या दिवसांत तिनं कित्येकदां रिचर्डला म्हणावं, "फार दिवसांत भांडलो नाहीं रे आपण !"

रिचर्डनं म्हणावं, "भांडणावांचून गंमत नाहीं तुला ?"

"अं हं—" असं म्हणून तिनं त्याला मिठीत घ्यावं.

पण एवढं खरं कीं डॉ. हरिएटनं जो उपदेश केला तो दोघांच्याहि मनावर पूर्णतः ठसला होता. भांडणाच्या गंमतीसाठीं गर्ट्रुडला भांडणं हवीं असतात हें माहीत झाल्यामुळें रिचर्ड भांडणांचा पुरवठा अधूनमधून करीत असे. त्यानं न केला तर गर्ट्रुड एखादं भांडण उकरून काढीत असे, परंतु

हीं भांडणं म्हणजे छोट्या वळवाच्या सरी असत. डॉ. हरिएटच्या उपदेशा-नंतर नवरा बायकोंत झंझावाती वादळ कधीं झालं नाहीं.

महायुद्धाच्या समाप्तीनंतर गर्ट्रुड अमेरिकेस आली आणि तिथली नाट्यसृष्टि गाजवूं लागली. नव्या नव्या नाटकांत ती कामं करूं लागली, आणि तिचं प्रत्येक नाटक तुफान गर्दीचं होऊं लागलं.

'प्ले हाऊस' नांवाची रिचर्डची हौशी प्रयोगसंस्था आणि रंगमंदिर होतं. या संस्थेतर्फे रिचर्डच्या राहत्या गांवीं आणि इतर मुख्य मुख्य शहरीं नाटकं होत असत. रिचर्डनं व त्याच्या सहकाऱ्यांनीं बर्नार्ड शॉचं 'पिग्मॅ-लिअन' नाटक बसविण्याचं ठरविलं, शॉची परवानगी मिळविण्याचं काम कठीण होतं, परंतु ती मिळविली. नाटकांतली मुख्य भूमिका करण्याचं गर्ट्रुडनं कबूल केलं. ती भूमिका आपण गाजवूं अशी तिची महत्त्वाकांक्षा आणि खात्री होती. 'पिग्मॅलिअन'चा पहिला प्रयोग न्यूयॉर्कमध्यें झाला. तिथें तें नाटक सतत दोन महिने चाललं आणि नंतर सर्व मोठाल्या शहरीं तर त्याचे कित्येक प्रयोग झालेच, परंतु शिवाय अमेरिकेच्या डाव्या उजव्या दोन्हीं किनाऱ्यावरच्या गांवीं नाटकाचे दौरे झाले आणि मेक्सिको शहरींदेखील तें झालं. जिकडे तिकडे वृत्तपत्रांनीं गर्ट्रुडच्या कामावर प्रशंसेचा वर्षाव केला, याखेरीज नोएल कॉवर्ड या विख्यात नाटककारानं गर्ट्रुडसाठीं मुद्दाम लिहिलेलीं 'टू नाइट ॲट एट थर्टी' 'रेड पेपर्स' 'फ्यूम्ड ओक' ही नाटकंही तिनं गाजविलीं, आणि विविध प्रकारच्या भूमिका वठविण्यांतील आपला निष्णातपणा सिद्ध केला. नाटकांच्या दौऱ्या-वर ती हॉलिवूडमध्यें असतांना तिच्या सत्कारार्थ चित्रपटसृष्टींतील सर्व बड्या बड्या प्रोडयूसर्सनीं, दिग्दर्शकांनीं आणि नटनटींनीं एक खूप मोठी मेजवानी दिली. ठिकठिकाणच्या विश्वविद्यालयांनीं तिचा सन्मान केला, आणि 'इथाका' कॉलेजच्या अध्यक्षांनीं तिला 'डॉक्टर ऑफ फाइन आर्टस्' अशी पदवीदेखील दिली.

सारांश, युद्धकालानंतरच्या दीड दोन वर्षांत गर्टरुडनं अमेरिका अगदीं गाजवून टाकली, परंतु तिचं मन ओढ घेत होतं इंग्लंडकडे. अमेरिकेच्या जनतेचा अलोट लोभ तिनं संपादिला होता. गर्ट्रुड लॉरेन्स म्हणजे एक असामान्य आणि अजोड नटी आहे अशी एकमुखी कीर्ति मिळविली होती. परंतु

तिच्या महत्त्वाकांक्षी मनाची भूक एवढ्यावर भागत नव्हती. अमेरिकेप्रमाणेंच तिला इंग्लंडही जिंकायचं होतं. युद्धकाळांत तिनं इंग्लंडमध्यें पुष्कळ नाट्य-प्रयोग केले होते. परंतु त्यांचा हिशोब तिला मोठासा वाटत नव्हता. आतां शांततेच्या काळांत इंग्लंडमध्यें जाऊन पराक्रम करण्याची तिची इच्छा होती. ज्या मोठ्या इंग्लिश नटींची नांवं नाट्यसृष्टीच्या इतिहासांत कायमची कोरलीं गेलीं होतीं, त्यांच्या रांगेत मानाचं स्थान मिळवावं असं तिला वाटत होतं. अमेरिका कांहीं तिची जन्मभूमि नव्हती.

व्यवसायाच्या निमित्तानं ती अमेरिकेंत आली, तिनं रिचर्डशीं लग्न केलं म्हणून ती अमेरिकन नागरिक झाली, आणि अमेरिकन रंगभूमीची तिनं सेवा केली. हें सारं ठीक होतं. परंतु तिची इंग्लंड जन्मभूमि होती. दारिद्र्यांतून स्वकष्टांनीं ती वर चढली, आणि चांगली नटी म्हणून प्रसिद्धीस प्रथम आली ती इंग्लंडमध्यें. त्यामुळें अमेरिकेंतल्या मानसन्मा-नांचा मुकूट डौलानें डोक्यावर वागवितांनादेखील तिच्या मनाची खरी ईर्षा होती ती अशी कीं इंग्लंडमध्यें परत जावं, आपले गुण दाखवावे, पराक्रम गाजवावा, आपल्या देशबांधवाची प्रशंसा मिळवावी, आपला मायदेश आपली आठवण अखंडपणें ठेवील असं करावं ...अमेरिकेच्या नाट्यसृष्टीची सम्राज्ञी म्हणून साऱ्या रसिकांचे आणि टीकाकारांचे कुर्निसांत घेतांना तिचं खरं लक्ष होतं इंग्लंडकडे ! ती बेत करीत होती इंग्लंडला जाण्याचे !

डफ्ने डयू मोरिए या इंग्लिश लेखिकेनं 'सप्टेंबर टाइड' नांवाचं एक नवं नाटक लिहिलं, आणि या नाटकांतली मुख्य भूमिका गर्ट्रुडनं करावी अशी इच्छा प्रदर्शित केली. इंग्लंडला जाण्याची संधी केव्हां मिळते म्हणून गर्ट्रुड वाटच बघत होती.

शिवाय नाटकाची लेखिका तिची मैत्रीण होती. तिनं ताबडतोब रुकार दिला. 'सप्टेंबर टाइड'च्या तालमी सुरू करण्यासाठीं ती इंग्लंडला गेली. तें नाटक गाजलें. लंडन शहरीं त्याच्या प्रयोगांचा मोठा मोसम झाला. नंतर इतर शहरांतून त्याचे प्रयोग झाले. वृत्तपत्रांनीं तिची तारीफ केली. तिच्या लहानपणीं ज्यांनीं तिला पाहिली होती ते 'गर्टी' या नांवानं तिला ओळ-

खीत होते, अशा जुन्या प्रेक्षकांनीं उद्गार काढले, " आमची गर्टी अमेरिकेस गेली होती ती आमची आम्हांला परत मिळाली यासारखी आनंदाची, आणखी भाग्याची दुसरी कोणती गोष्ट असेल ? " बडे बडे सरदार तिच्याभोंवतीं नाचूं लागले. जुने मित्र, जुन्या मैत्रिणी तिला भेटल्या. सर्वांना तिचा हेवा वाटावा असं उच्च सन्मानाचं स्थान तिनं आतां मिळविलं होतं.

बर्नार्ड शॉच्या भेटीला ती गेली तेव्हां विक्षिप्तपणाबद्दल विख्यात असलेल्या त्या वृद्ध सारस्वतानं तिला अतिशय प्रेमानं वागविलं. इंग्लंडच्या परराष्ट्रीय धोरणापासून तो नाट्यप्रयोगावरील करापर्यंतच्या अनेक विषयांवर त्यानं तिच्याशीं चर्चा केली. जुन्या नटांच्या गुणाचं वर्णन केलं, नव्या नटांच्या तोकड्या अभिनयावर तोंडसुख घेतलं, मूक नाट्यांचा विषय निघाला तेव्हां ' अल्लादिन ' नांवाच्या खेळाची आठवण तर सांगितलीच पण शिवाय त्यांतलं एक गाणंहि स्वारी म्हणूं लागली. आणि तें गाणं गर्ट्रुडला पाठ असल्यामुळें शॉनं आणि तिनं तें संबंध गाणं अभिनयासकट म्हटलं...या संगीत प्रवेशानंतर शॉ अधिकच खुषींत आला, आणि म्हणाला,

" येत्या जुलायच्या सव्वीस तारखेस माझ्या वाढदिवसानिमित्त मोठा नाट्यमहोत्सव होणार आहे. त्यासाठीं मी एक नवीन एकांकी नाटक लिहिलं आहे. " नाटकाचें कथानकहि त्यानं सांगितलं.

गर्ट्रुडनं विचारलं, " या नाटकांतली मुख्य भूमिका कोण करणार आहे ? "

शॉ म्हणाला, " दुसरं कोण ? तूंच ! तुला सेक्सॅफोन वाजवितां येतो कीं नाहीं ?

गर्ट्रुडनं उत्तर दिलं, " शिकेन मी. "

तो विषय तितक्यावरच राहिला. परंतु दुसऱ्या दिवशीं ' आल्ड्विच ' थिएटरमध्यें गर्ट्रुडचा नाट्यप्रयोग होता. तेव्हां शॉकडून एक भलं मोठं जाड पाकीट आलं. पाकिटावर लिहिलेलं होतं, " गर्ट्रुड लॉरेन्सला वाचून पहाण्यासाठीं, आणि न जाणो पसंत पडल्यास–" खालीं शॉची सही होती. पाकिटांत शॉच्या नाटकाची कॉपी होती.

गर्ट्रुडवर शॉ इतका खूष होता कीं एकदां लंडनच्या बी. बी. सी. वर तिला कांहीं नाट्यप्रवेश करावयाचे होते तेव्हां 'पिग्मॅलिअन' मधील एक प्रवेश करण्याची परवानगी तिनं शॉजवळ मागितली. शॉकडून स्वतःच्या हस्ताक्षरांतलं उत्तर एका कार्डावर आलं. त्यांत स्वारीनं लिहिलं होतं.

"या पत्रद्वारें मिस गर्ट्रुड लॉरेन्स हिला परवानगी देण्यांत येत आहे कीं, पिग्मॅलिअन नाटकांतील तिसरा अंक–किंवा माझ्या कोणत्याहि नाटकांतील कोणताहि भाग तिनं बी. बी. सी. वरील आपल्या कार्यक्रमांत करावा. या हक्कासाठीं तिनं मला मानद्रव्य देण्याचं कारण नाहीं. फक्त येत्या हिंवाळ्यांत मला उपयोगी पडावे म्हणून स्वतःच्या हातांनीं विणलेले लोकरीचे सुंदर हातमोजे तिनं मला द्यावेत."

गर्ट्रुडचा मुक्काम इंग्लंडमध्यें होता त्या दिवसांत 'प्लेहाऊस' या संस्थेचीं नवीं नवीं नाटकं करण्याचा रिचर्डचा उद्योग अमेरिकेंत चाललाच होता. या नाटकांत कमी अधिक गाजलेल्या नटी कामं करीत असत. त्यांच्या कमी अधिक सहवासांत रिचर्ड रहात असे. चाहत्यांच्या आणि मित्रांच्या परिवारांत गर्ट्रुड गुरफटलेली होती; अमेरिकेंत रिचर्डहि आपल्या उद्योगांत आणि नटनटींच्या सहवासांत वावरत होता. एकानं दुसऱ्याचा संशय घ्यायचा नाहीं असं उभयतांचं ठरलं होतं. पण तरीदेखील रिचर्डला लिहिलेल्या पत्रांतून गर्ट्रुड रेशमी चिमटे काढीतच असे. "तूं खूप खूप कामांत आहेस तें बरं आहे. कुणाच्या जाळ्यांत सांपडायला तुला सवड नाहीं हा विचार माझ्या समाधानाला उपयोगी आहे" असं तिनं लिहावं किंवा कधीं कधीं स्पष्ट ताकीद द्यावी, "रिचर्ड, तुझं चित्त दुसऱ्या कोणत्याही स्त्रीकडे धांवता कामा नये. मला तें खपायचं नाहीं. तूं कुणाचा आहेस माहीत आहे ? माझा ! एकटीचा !"

पत्रांतून ती असं लिहीत होती, 'तुझ्यापासून दूर इकडे एकटं मला करमत नाहीं' असंहि प्रत्येक पत्रांत रिचर्डला सांगत होती. परंतु अमेरिकेला परतण्याचं नांव ती काढीत नव्हती. 'रिचर्डनं विमानानं इंग्लंडला जावं चार सहा दिवस तिच्या संगतींत काढावे. अशाच नवरा-बायकोच्या क्वचित गांठीभेटी होत होत्या. गर्ट्रुड इंग्लंडमध्यें इतकी रमली होती कीं कायमच्या बिऱ्हाडासाठीं जागा बघायची आणि त्या जागेंत रिचर्डसाठीं एक

खोली सुंदर सजवायची असे तिचे बेत चालले होते. तिचे हे बेत एका मित्राकडून रिचर्डला समजले, तेव्हां मात्र तो चरकला. त्याच्या मनांत आलं ही आतां कधींच अमेरिकेला परत येणार नाहीं कीं काय? इंग्लंड-मध्यें तिला नाटकांचे नवे नवे करार मिळत होते. या करारांची गंगा कधींच आटण्यासारखी नव्हती. तिला खरमरीत पत्र लिहावं आणि परत घरीं ये म्हणावं असा विचार रिचर्ड करूं लागला. परंतु असं पत्र लिहायचं म्हणजे तिच्या उद्योगांवर आणि वाढत्या यशावर नियंत्रण घालण्यासारखं होतं. तिच्यावर जुलूम करण्यासारखं होतं. रिचर्ड मनाशीं म्हणे, मी तिला हट्टानं बोलवावं यांत कांहीं अर्थ नाहीं. तिलाच माझ्याकडे यावसं वाटलं पाहिजे...आणि तसं तिला वाटेल अशीं चिन्हं तर त्याला कांहीं दिसेनात..

एकदां गर्ट्रुड छोट्या विश्रांतिसाठीं नेपल्स शहरीं गेली होती. रिचर्डनं तिला फोन केला, "आज तिसऱ्या प्रहरीं विमानानें मी तुझ्याकडे येत आहे. संध्याकाळीं वाट पहा."

गर्ट्रुडनं विचारलं, "म्हणजे काय? अरे तुझ्या तर नव्या नाटकाचा पहिला प्रयोग जवळ आला आहे ना? काम खूप असेल तुला! सवड कशी काढतोस?"

"नाटक गेलं खड्डयांत! तूं आणि मी एकत्र असायला हवं या गोष्टी-पुढें दुसऱ्या कशाचीहि किंमत मला वाटत नाहीं. याबद्दल तुला शंका राहूं नये म्हणूनच मी तुझ्याकडे धांव घ्यायचं ठरविलं आहे."

हजारो मैलांच्या अंतरावरूनही गर्ट्रुडचा उसासा रिचर्डला स्पष्ट ऐकूं आला. ती म्हणाली, "रिचर्ड केवळ मला बरं वाटावं म्हणून तूं असं म्हणत आहेस काय?"

"बिलकूल नाहीं. मला स्वतःला एकत्र सहवासावांचून सुख नाहीं. म्हणूनच सारं काम टाकून येत आहे मी."

ती चटकन् म्हणाली, "येऊं नकोस. मीच विमानानं तुझ्याकडे येते. तुला सुख व्हावं म्हणून. तुझं सुख ते माझं सुख. तुला नटीचा नवरा होणें कधीं आवडलंच नव्हतं, मला माहीत आहे, आणि याक्षणीं मलासुद्धां काय असावंसं वाटतयं सांगूं? नटी नव्हे! तर मिसेस रिचर्ड आल्ड्रिच! तुझी एकट्याची लाडकी गर्ट्रुड!"

तिच्या त्या शब्दावर रिचर्डचा क्षणभर विश्वासच बसेना.

परंतु ज्या चमत्काराची तो गेले कित्येक दिवस वाट बघत होता, तो खरोखरच घडला !

सारा उद्योग सोडून गर्ट्रुड इंग्लंडहून घरीं परतली ! आणि नंतर अखेर-पर्यंत ती अमेरिकेंत राहिली !

रंगभूमीवरील सर्वश्रेष्ठ नटी म्हणून गर्ट्रुडची कीर्ति आतां इतकी पसरली होती कीं हॉलिवुडच्या निर्मात्याचं लक्ष तिच्याकडे न जाणं केवळ अशक्य होतं. 'दि ग्लास मेनेजरी' या चित्रपटांत तिनं काम केलं आणि तो चित्रपट गाजला. अनेक निर्माते तिच्याशीं करार करण्यासाठीं तिची मनधरणी करूं लागले.

'ऑल अबाउट ईव्ह' नांवाच्या चित्रपटांत तिनं मुख्य भूमिका करावी म्हणून त्याच्या निर्मात्यानं धरणंच धरलं. या कामाबद्दल त्यानं जी रक्कम देऊं केली ती आजपर्यंत कोणत्याही नटीला मिळालेल्या रकमेच्या दुपटी तिपटीनं मोठी होती. चित्रपटाचं कथानक रिचर्डनं वाचलं होतं, आणि तो चित्रपट विलक्षण गाजेल. याची त्याला खात्री होती. गर्ट्रुडच्या व्यावसायिक प्रश्नांत निर्णायक मत कधीं द्यायचं नाहीं. तिच्या इच्छेप्रमाणें तिला काय तें करूं द्यायचं असं धोरण रिचर्डनं ठरविलेलं होतं. परंतु या चित्रपटांत तिनं काम करावं अशी त्याच्या मनांतली इच्छा होती. एके दिवशी त्यानं गर्ट्रुडला विचारलं, " काय करायचं ठरविलं आहेस ? "

तिनं चटकन् उत्तर दिलं, " नकार देणार आहे मी. "

" हा निर्णय शहाणपणाचा होईल अशी खात्री आहे का ? "

" मुळींच नाहीं. आर्थिकदृष्ट्या नकार देण्यासारखा दुसरा मूर्खपणा होणार नाहीं याची मला खात्री आहे. पण तरी मी नकार देणार आहे. कारण मला गृहिणी म्हणूनच पुढें राह्यचं आहे. समजलास ? "

रिचर्डला जितकं आश्चर्य वाटलं तितकाच आनंद झाला.

नंतरच्या दिवसांत त्यानं पाहिलं तों गृहकृत्यांत आणि संसारसुखांत गर्ट्रुड अगदीं गढून गेली, जणूं केवळ रिचर्डच्या सुखासाठीं ती जगत होती ! त्याचं खाणंपिणं, कपडेलत्ते, त्याची विश्रांति, झोंप यांवर देखरेख करण्या-साठीं ती नाचत होती. एकदां तो चेष्टेनं तिला म्हणाला, " सध्यां तूं माझी

इतकी काळजी घेते आहेस कीं एखाद्या नवीन नाटकांतलं काम तूं पत्करलंस कीं माझी किती आबाळ होईल याची पूर्ण कल्पना मला येते. "

तिनं चटकन् विचारलं, " नवं नाटक ? मी नव्या नाटकांत काम करणार आहे, असं कुणी सांगितलं तुला ? "

" कुणी नाहीं. परंतु तुझ्या भेटीला लोक येताहेत, तासन्‌तास तुझ्या खोलींत तुमच्या चर्चा चालताहेत, कांहींतरी मोठी गोष्ट लवकरच घडणार आहे. एवढा तर्क मला करतां येतो. "

रिचर्ड अंथरुणावर पडला होता. गर्ट्रूड त्याच्या अंगावर चादर घालीत होती. नर्सची भूमिका करतांना ती नेहमींच फार खुषींत असे. तिनं चटकन् वांकून रिचर्डचा मुका घेतला आणि म्हटलं, तुझा तर्क कांहीं खोटा नाहीं. कांहींतरी मोठं आणि आणि आश्चर्यकारक घडणार आहे खरंच. इतक्यांत सांगत नाहीं मी तुला. परंतु लवकरच साऱ्या गोष्टी निश्चित होतील आणि मग मी तुला सारं सांगेन—"

" मला सोडून केव्हां जाशील तें सुद्धां ? "

तिनं त्याचे पटापट मुके घेतले आणि म्हटलं, " छे! छे! मी तुला सोडून कधीं जाणार नाहीं. गेले तरी फार दिवसासाठीं जाणार नाहीं. हा माझा निश्चय पक्का आहे. "

' मोठं आणि आश्चर्यकारक ' असं जिचं वर्णन गर्ट्रूडनं केलं होतं ती घटना लवकरच घडली. ' ॲना ॲण्ड दि किंग ऑफ सयाम ' नांवाचा चित्रपट फार गाजला होता. गर्ट्रूडनं तो पाहिला तेव्हां तिच्या मनानं घेतलं कीं त्या कथानकावर नृत्यसंगीतप्रधान नाटक तयार केलं तर तें अतिशय यशस्वी होईल. ॲनाची भूमिका तिला फार पसंत पडली होती आणि ती आपण गाजवूं अशी तिची खात्री होती. तिनं त्या नाटकांत मुख्य भूमिका केली पाहिजे या अटीवरच प्रयोगांचे हक्क मिळाले. लगेच सर्व तयारी करण्यांत आली. संगीत, वेषभूषा या सर्व बाबतींत उत्तमांतली उत्तम माणसं योजिण्यांत आलीं. पैसा पाण्यासारखा खर्च करण्यांत आला. हा संगीतनृत्यप्रधान नाट्यप्रयोग अगदीं पहिल्या खेळापासून चिक्कार गर्दीपुढें होऊं लागला, आणि त्यांतली ॲनाची भूमिका म्हणजे गर्ट्रूडची सर्वोत्कृष्ट अविस्मरणीय भूमिका ठरली !

अविस्मरणीय ! परंतु दुर्दैव असं कीं अखेरची !

कारण त्यानंतर या असामान्य स्त्रीची जीवितयात्रा लवकरच संपुष्टांत आली. कदाचित् असंहि म्हणणें समर्थनीय ठरेल कीं 'ॲना ॲन्ड दि किंग ऑफ सयाम' या चित्रपटाच्या कथानकावरून 'दि किंग ॲन्ड आय' या नांवाचं जें नाटक तयार करण्यांत आलं त्यांतील ॲनाची मुख्य भूमिका गाजविण्याच्या ईर्षेनं गर्ट्रुडनं जे अतिश्रम केले त्यामुळेंच तिचा अंतकाल जवळ आला. या नाटकांतली ॲनाची भूमिका अभिनयाच्या दृष्टीनं कोणत्याहि निष्णात नटीची कसोटी पहाणारी तर होतीच, परंतु गायनाचे आणि नृत्याचे परिश्रमहि अतोनात होते. ॲनाची भूमिका करतांना गर्ट्रुडला जे पायघोळ झगे वापरावे लागत, त्यांचे फुगे कायम रहावे म्हणून आंतून पितळेच्या कड्या लावलेल्या असत, त्यांचं ओझं सबंध प्रयोगभर वागविणं म्हणजेच एक दिव्य होतं. या नाट्यप्रयोगांत गर्ट्रुडला सतत जी हालचाल करावी लागे तिचं मोजमाप घेण्यासाठीं एकदां तिच्या कमरेला गतियंत्र बसविण्याची एका कल्पक मित्रानं युक्ति केली, तेव्हां सबंध प्रयोगभर मिळून ती एकंदर चार मैल चालते असं दिसून आलं. या नाटकांत गर्ट्रुडवर जो शारीरिक ताण पडला, तो सामान्य सहनशक्तीच्या पलीकडचा होता. मानसिक परिश्रमांचा हिशोब निराळाच ! परंतु या भूमिकेवर गर्ट्रुडचं विलक्षण प्रेम होतं, तिच्या त्या कामावर प्रेक्षक बेहद्द खूष होते, आणि प्रेक्षकांना संतुष्ट करण्याच्या कामीं कुचराई म्हणून काडीचीसुद्धां होऊं द्यावयाची नाहीं असा गर्ट्रुडचा स्वभाव होता. जसं जसं नाटक गाजूं लागलं तसतशीं गर्ट्रुड एक प्रकारें या भूमिकेच्या आहारीं गेली. रोज रात्रीं एक प्रयोग, आणि शनिवारीं लागोपाठ दोन प्रयोग करावे लागण्यापर्यंत नाटकाच्या लोकप्रियतेची कमान चढली, आणि लाटेबरोबर पुढें जाणं गर्ट्रुडला भाग पडलं. अखेर एका प्रयोगाच्या वेळेस गर्ट्रुड भोंवळ येऊन बेशुद्ध पडली' तिला ताबडतोब इस्पितळांत पोंचविण्यांत आलं. नाटकांत तिचं काम दुसरी नटी करूं लागली, नाटकाचं उत्पन्न एकदम खालीं गेलं. गर्ट्रुडवांचून तो नाट्यप्रयोग लोक पाहिनात. एका आठवड्याच्या विश्रांतीनंतर नाटकांतल्या आपल्या कामावर पुन्हा रुजू होण्याचं गर्ट्रुडनं ठरविलं. न्यूयॉर्केच्या चव्वेचाळीसाव्या रस्त्यावरच्या

रंगमंदिराच्या प्रवेशद्वारावर विद्युतदीपांच्या मोठमोठ्या जाहिराती झळकूं लागल्या—

" मिस् गर्ट्रुड लॉरेन्स ॲनाची भूमिका आजच्या प्रयोगापासून पुन्हा करूं लागणार ! "

ही जाहिरात झळकल्याबरोबर कित्येक आठवड्यांचीं तिकिटं ताबडतोब खपलीं. चिक्कार गर्दीचे खेळामागून खेळ झडूं लागले. अमेरिकन शौकिनांच्या बोलण्यांत गर्ट्रुडच्या ॲनाखेरीज दुसरा विषय राहिला नाहीं. त्या नाटकांतल्या नृत्यांची फॅशन रूढ झाली. नाटकांतलीं गाणीं सर्व स्त्रीपुरुषांच्या तोंडीं झालीं. ' गेटिंग टु नो यू ' हें गाणं तर घराघरांत म्हटलं जाऊं लागलं !...

या सुमारास इंग्लंडमध्यें राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली. लंडनमधील अतिविख्यात थिएटर ' ड्रुरी लेन ' च्या रंगमंदिरांत गर्ट्रुडच्या ' दि किंग ॲण्ड आय ' नाटकाचे प्रयोग राज्याभिषेकाच्या निमित्तानं व्हावेत अशी योजना आंखण्यांत आली, हें निमंत्रण गर्ट्रुडनं मोठ्या आनंदानं पत्करलं. ' ड्रुरी लेन 'मधील हे नाट्यप्रयोग म्हणजे तिच्या रंगभूमीवरील पराक्रमावर सगळ्यांत झगझगीत सन्मानाचा कळस ठरणार होता ! गर्ट्रुड इंग्लंडच्या सफरीचे बेत मोठ्या उत्साहानं करूं लागली.

परंतु माणसाचा एक बेत असतो, दैवाचा बेत दुसराच असतो, हेंच खरं !

तिची तब्येत ढांसळली. नाटकांतलं काम तिनं बंद केलं पाहिजे असा डॉक्टरांनीं सल्ला दिला. तिला उपचारासाठीं हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलं. तिची फार काळजी घेतली पाहिजे असं डॉक्टर चिंतातुर स्वरांत म्हणूं लागले. साऱ्या डॉक्टरांना आणि परिचारिकांना ती पुन्हां पुन्हां बजावून सांगत होती, " रिचर्ड माझी फार काळजी करील. त्याला सांगूं नका. " तिचा स्वतःचा धीर कायम होता. या दुखण्यांतून आपण बऱ्या होऊं अशी तिची खात्री होती. इतकंच नव्हे, राज्याभिषेकासाठीं इंग्लंडला जाण्याच्या बाबतींतदेखील तिनं अजून निराशा पत्करली नव्हती...

कमालीचा आशावाद हा तर तिच्या स्वभावाचा स्थायीधर्म होता. ती जशी प्रयत्नवादी होती, अविश्रांत परिश्रमांची जशी तिला आवड होती,

स्वतःच्या अंगच्या गुणांची जशी तिला खात्री होती, त्याचप्रमाणें आशा आणि श्रद्धा यांची सोबत तिनं जन्मभर केली होती.

रूढ अर्थानं ती धार्मिक प्रवृत्तीची नव्हती. कोणत्याहि धर्मपंथाची अनुयायी ती नव्हती. कोणत्याहि चर्चची सभासद ती झाली नाहीं. परंतु सहज जातां जातां कधींमधीं एकाद्या प्रार्थना मंदिरांत–कोणत्याही पंथाच्या प्रार्थना मंदिरांत–तिनं शिरावं आणि घटकाभर प्रार्थना करावी. परमेश्वराविषयीं बोलतांना मोठमोठ्या धर्मोपदेशकांना तिनं म्हणावं, "ईश्वर आहे. परंतु तुम्ही सांगता त्याप्रमाणें तो स्वर्गांत आहे असं मी समजत नाहीं. माझ्या–प्रत्येक माणसाच्या हृदयांत तो आहे. त्याचा साक्षात्कार करून घ्यायचा असेल तर उपासतापास, जपजाप्य हे मार्ग नव्हेत. अंतःकरणावर महत्त्वाची खोट्या अहंकाराचीं जीं पटलं असतील तीं निपटून माणसानं दूर करावीं, म्हणजे ईश्वर दूर नाहीं, आपल्या सन्निध आहे, असं आढळून येईल. तिची धर्मावर भक्ति होती, परंतु तो धर्म कोणत्याहि पवित्र ग्रंथानं नव्हे तर धकाधकीच्या प्रत्यक्ष व्यवहारानं तिला शिकविलेला होता. "ईश्वराचं अस्तित्व मी मानते. परंतु मी इतकी प्रयत्नवादी आहे कीं माझ्यासाठीं ईश्वरानं कांहीं करावं अशी सवडच त्या ईश्वराला मी ठेवीत नाहीं" असं ती वरवर पाहता विनोदानं, पण खरं पहातां, अत्यंत गांभीर्यानं ती म्हणत असे./ 'सुसान ॲण्ड गॉड' या नाटकांतल्या नायिकेचं काम करतांना तिच्या तोंडचं ईश्वरविषयक भाषण ती इतक्या तन्मयतेनं म्हणे कीं प्रेक्षकांचीं अंतःकरणं थरारून जात ! कारण तें भाषण तिच्या स्वतःच्या तत्त्वज्ञानाला धरून होतं !... दुसऱ्यावर प्रेम आणि उपकार करण्यांत तिनं कधीं कंजूषपणा केला नाहीं. आपल्या महत्त्वाकांक्षेची कमान कधीं ढिली होऊं दिली नाहीं. प्रयत्नांची शिकस्त करण्यांत कधीं आळस होऊं दिला नाहीं, आणि त्याचप्रमाणें दुर्दम्य आशेची आणि दृढ श्रद्धेची कास तिनं कधीं सोडली नाहीं !...

मोठ्या दुखण्यानं ती हॉस्पिटलमध्यें पडली होती. डॉक्टर मनांतल्या मनांत चटपटून गेले होते. परंतु तिची उल्हसित वृत्ति आणि हंसतमुख कायम होतं ! नवऱ्यावर तिचं इतकं प्रेम कीं आपल्या दुखण्यामुळें त्यानं चिंता करतां कामा नये एवढी एकच तिची चिंता होती ! आणि स्वतःच्या अभिनयकलेविषयीं तिची एवढी भक्ती कीं, 'दि किंग ॲण्ड आय'चा

प्रयोग इंग्लिश नाट्याचं माहेरघर अशा लंडन–शहरीं केव्हां करायला मिळेल हा एकच ध्यास तिच्या मनांत होता !...

परंतु तिच्या या वृत्तीवर दुर्दैवानं अखेर मात केली. तिच्या जीवन-ज्योतीचा प्रकाश एकोणीसशे बावन सालच्या सप्टेंबर महिन्यांत अखेर संपला ! रिचर्ड-आणि गर्ट्रुड यांच्या सुखी संसाराच्या बारा वर्षांच्या कहाणीखालीं 'समाप्त' असा शब्द लिहिला गेला !

तिच्या सन्मानार्थ अमेरिकेंतल्या आणि इंग्लंडमधल्या रंगमंदिरांच्या मोहोल्यांत दोन मिनिटांचा अंधार करण्यांत आला. अमेरिकेंतल्या कित्येक विश्वविद्यालयानीं आपलं निशाण अर्ध्या उंचीवर खाली ओढलं ! कोरियाच्या युद्धभूमीवर लढणाऱ्या सैनिकांनीं दुखवट्याच्या सभा घेतल्या... तिच्या अंत्यविधीच्या वेळेस लोकांची अलोट गर्दी झाली. अंत्यविधिनंतर रिचर्ड घरीं परतला तेव्हां 'दि किंग ॲण्ड आयमधलं' तिचं काम तुम्हांला आठवतं काय ?' तिचा कधींच विसर पडणार नाहीं', 'अशी नटी कधीं झाली नाहीं, कधीं होणार नाहीं' असे गर्दींतल्या लोकांचे उद्‌गार त्याच्या कानीं पडले...एका स्त्रीनं दुसरीला विचारलं, "किती तरुणपणीं गेली बिचारी ! 'पिग्मॅलिअन' नाटकांतलं तिचं काम तूं पाहिलं होतंस काय ?" दुसरीनं उत्तर दिलं, "तिचं एकदेखील नाटक पाहिल्यावांचून मीं टेवलं नाहीं !"... असले उद्‌गार ऐकत रिचर्ड घरीं येऊन पोंचला... त्या घरांत त्याला आतां पुन्हां कधीं त्याची लाडकी गर्ट्रुड दिसणार नव्हती ! लाखो रसिकांची आवडती नटी त्यांना दुःखांत टाकून गेली होती ! त्याची स्वतःची परमप्रिय सहचारिणी कायमची दूर गेली होती ! आतां त्याला कुणाची सोबत नव्हती ! तो एकटा राहिला होता !

* * *

रा. क्र. १८८८

REFBK-0010868

# आमचीं नवीं प्रकाशनें

× × ×

| | | | |
|---|---|---|---|
| १ | बोलका शंख | ग. दि. माडगूळकर | ४—०० |
| २ | क्षण एक पुरे— | प्रभाकर अत्रे | २—०० |
| ३ | आहुति | प्रभाकर विडवे | १—०० |
| ४ | तृप्ति | सौ. सुहासिनी हर्लेकर | २—०० |
| ५ | जोगिया (दु. आ.) | ग. दि. माडगूळकर | ४—०० |
| ६ | उज्ज्वला | मालतीबाई दांडेकर | ३—०० |
| ७ | प्रफुल्ला | सुशीला चिकटे | ३—०० |
| ८ | कस्तुरीची लूट | ना. सी. फडके | ४—०० |

छापत आहेत

× ×

काव्यकथा — ग. दि. माडगूळकर
आणि वि. वि. बोकील
ना. सी. फडके
कमला फडके
दिनकर पाटील यांचे कथासंग्रह

कुलकर्णी ग्रंथागार, १८६, शनवार, पुणें २